# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# दूर शिक्षण केंद्र

बी. ए. भाग–३ : समाजशास्त्र

स्पेशल पेपर–१० (ब)

# गुन्हेगारीशास्त्र
**(Criminology)**

स्पेशल पेपर–१५ (ब)

# दंडशास्त्र
**(Penology)**

सेमिस्टर–५ व ६ करिता

(शैक्षणिक वर्ष २०१५–१६ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१५
बी. ए. भाग-३ समाजशास्त्र पेपर (१० (ब) व १५ (ब)) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-81-8486-644-5

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

# दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
मा. कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
मा. कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
मा. प्र-कुलगुरू,
इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. अनिल गवळी**
अधिष्ठाता, कला व ललितकला विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील**
अधिष्ठाता, सामाजिक शास्त्रे विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे**
अधिष्ठाता, विज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. आर. जी. फडतरे**
अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डी. आर. मोरे**
संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एन. व्ही. कोंगळे**
वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**कॅ. डॉ. एन. पी. सोनजे** (सदस्य सचिव)
प्रभारी संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यासमंडळ : समाजशास्त्र

अध्यक्ष - **प्रा. (डॉ.) आर. बी. पाटील**
विभागप्रमुख, समाजशास्त्र व मानव्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

- **डॉ. मच्छिंद्र ज्ञानू सकटे**
  मंगल रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज,
  ता. कराड, जि. सातारा

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**पेपर–१० (ब) गुन्हेगारीशास्त्र**
**पेपर–१५ (ब) दंडशास्त्र**
बी. ए. भाग–३ : समाजशास्त्र

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **चंद्रकांत खंडागळे**<br>श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली | १, २, ४ | १, २, ३, ४ |
| **प्राचार्य डॉ. माणिक चंद्रकांत माने**<br>कला महाविद्यालय, वाघोली, ता. कासेगाव, जि. सातारा | १, ३ | – |

■ **संपादक** ■

**चंद्रकांत खंडागळे**
विभागप्रमुख, समाजशास्त्र
(पदवी आणि पदव्युत्तर)
श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज,
सांगली.

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण विभागांतर्गत बी. ए. पदवी अभ्यासक्रमासाठी स्पेशल विषय म्हणून समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थी मित्रांचे मी हार्दिक स्वागत करतो. या पदवीसाठी तुम्ही समाजशास्त्राचे सत्रपद्धतीनुसार एकूण दहा पेपर्स अभ्यासणार आहात. त्यापैकी सत्र ५ साठी पेपर क्रमांक १० (ब) गुन्हेगारीशास्त्र व सत्र ६ साठी पेपर १५ (ब) दंडशास्त्र असे आहेत. या दोन पेपर्समध्ये एकूण आठ अध्ययन घटक समाविष्ट असून त्यांचे लेखन अत्यंत सुलभपणे व पद्धतशीरपणे केलेले आहे. त्यामुळे तुम्हा विद्यार्थ्यांना गुन्हेगारीशास्त्राचे व दंडशास्त्राचे यथार्थ आकलन होईल याची मला खात्री आहे.

सदर पुस्तक लेखनात सहकार्य केलेले सहलेखक प्राचार्य डॉ. माणिक माने यांना मनःपूर्वक धन्यवाद. दूर शिक्षण केंद्राचे संचालक आणि केंद्रातील सर्व कर्मचारी या सर्वांचे सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार.

**चंद्रकांत खंडागळे**
संपादक
विभाग प्रमुख, समाजशास्त्र
(पदवी आणि पदव्युत्तर)
श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय,
सांगली.

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | घटकाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–१० (ब) गुन्हेगारीशास्त्र** | |
| १. | गुन्हेगारीशास्त्राचा परिचय | १ |
| २. | गुन्हेगारी वर्तनाविषयीची प्रारंभिक स्पष्टीकरणे | १९ |
| ३. | गुन्हेगारी वर्तनाविषयीची समाजशास्त्रीय स्पष्टीकरणे | ३७ |
| ४. | बालगुन्हेगारी | ५९ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१५ (ब) दंडशास्त्र** | |
| १. | दंडशास्त्र | ७१ |
| २. | सुधारणा पद्धती | ८७ |
| ३. | भारतातील तुरुंग (कारागृह) व्यवस्था | १०५ |
| ४. | पोलीस आणि न्यायव्यवस्था | १२१ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१५-१६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक १

# गुन्हेगारीशास्त्राचा परिचय

**घटक संरचना**

१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्टे

१.३ विषय विवेचन

१.३.१ गुन्हेगारीशास्त्राचे स्वरूप व व्याप्ती

१.३.२ गुन्हेगारीशास्त्राची व्याप्ती

१.३.३ गुन्ह्याची संकल्पना

१.३.४ गुन्ह्याचे प्रकार

१.४ सारांश

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ स्वाध्याय/गृहपाठ

१.७ चिंतन आणि कार्य

१.८ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## १.१ प्रस्तावना

या पहिल्या परिचयात्मक घटकामध्ये समाजशास्त्राच्या एका महत्वाच्या शाखेचा परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे. ही शाखा म्हणजे गुन्हेगारीशास्त्र होय.

गुन्हेगारीशास्त्र हे स्वतंत्र शास्त्र आहे की नाही याबाबत मतभिन्नता असली तरी आपण मात्र येथे समाजशास्त्राची शाखा म्हणूनच गुन्हेगारीशास्त्राचा अभ्यास करणार आहोत.

कोणत्याही विषयाचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करताना त्या विषयात योजल्या जाणाऱ्या संज्ञा, किंवा संकल्पनाच्या अतिशय सुस्पष्ट, नि:संदिग्ध व औपचारिक व्याख्या ही त्या अभ्यास विषयाची गरज असते. काही नामवंत गुन्हेगारीशास्त्रज्ञांनी, केलेल्या व्याख्या आपण येथे समजावून घेणार आहोत.

मानवी समाजाइतकीच गुन्हेगारी प्राचीन असून कोणताही मानवसमाज गुन्हेगारी मुक्त नाही असेच इतिहास सांगतो. गुन्हा ही एक सार्वत्रिक आणि अपरिहार्य अशी घटना आहे. एमिल डूर्खीम म्हणतात, ''गुन्हेगारीची समस्या भेडसावत नाही असा एकही समाज नाही. गुन्हेगारीचे प्रकार आणि वैशिष्ट्यांमध्ये फरक असेल इतकेच.'' प्रो. फ्रँक टॅनब्युम म्हणतात, ''गुन्हा हा समाजाइतकाच चिरंतन

असून मानवी गैरवर्तनाचा आविष्कार हा सर्व प्रकारच्या व आकाराच्या मानवी संघटनामध्ये होत असलेला आपणास ठाऊक आहेच'' "Crime is eternal, as eternal as society, so for as we know human fallibility has manifested itself in all types and forms of human organizations."

पुढे प्रो टॅन ब्युम म्हणतात, ''समाजात ज्या प्रमाणे आजार, रोगराई आणि मृत्यू अटळ आहे तसाच गुन्हा ही आहे'' तर हॅरी बार्नस व नेगल टीटर्स म्हणतात, "So long as we have people we shall have criminals" म्हणजे ''सर्व सामान्य माणसाप्रमाणेच समाजामध्ये भविष्यकाळातही गुन्हेगार असणारच आहेत.''

सामाजिक कल्याण, सामाजिक सुरक्षितता आणि जीवित हे गुन्हेगारीमुळे धोक्यात आले असून समाजापुढे गुन्हेगारीचे मोठेच आव्हान आहे. गुन्हेगारीने गंभीर स्वरूप धारण केले असून समाजशास्त्रज्ञ, पोलीस व कायदेशीर यंत्रणेची ती डोकेदुखी बनली आहे.

गुन्हेगारीची संकल्पना समजून घ्यायची असेल तर गुन्हा म्हणजे काय? गुन्ह्याची व्याख्या काय? यासारख्या प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत. या प्रकरणात आपण गुन्ह्याचा अर्थ व त्या बाबतचे विविध दृष्टिकोन समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

## १.२ उद्दिष्टे (Objectives):

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास-

- गुन्हेगारीशास्त्राचे स्वरूप व व्याप्ती समजावून घेता येईल.
- गुन्हा ही संकल्पना स्पष्ट करता येईल.
- गुन्ह्याचे प्रकार विशद करता येतील.

## १.३ विषय विवेचन

प्रस्तुत घटकाच्या पहिल्या भागामध्ये गुन्हेगारीशास्त्राचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करण्यात आलेली आहे.

### १.३.१ गुन्हेगारीशास्त्राचे स्वरूप

कोणत्याही संकल्पनेची व्युत्पतीशास्त्रीय माहिती त्या संकल्पनेच्या मुळाशी जाऊन तिचा आशय स्पष्ट करण्यामध्ये सहाय्यभूत ठरते. एखादा शब्द किंवा संज्ञेच्या भाषाशास्त्रीय स्त्रोताच्या अभ्यासाला व्युत्पतीशास्त्र म्हणतात. (Study of linguistic origin of the word)

इ. स. १८७९ मध्ये फ्रेन्च मानवशास्त्रज्ञ टोपीनार्दे च्या लेखनामध्ये पहिल्यांदा गुन्हेगारीशास्त्र या संज्ञेचा उल्लेख झाल्याचे आढळते. लॅटिन भाषेतील Crimen या शब्दाचा अर्थ गुन्हा (Crime) असा आहे. ग्रीक भाषेतील Logos या शब्दाचा अर्थ Study किंवा अभ्यास असा आहे. Crimen आणि

Logos या दोन शब्दांचा संकर होऊन Criminology हा शब्द बनला आहे. जर्मन भाषेमध्ये Gefangnisswesen ही संज्ञा गुन्हेगारीशास्त्रा साठी प्रचिलित आहे.

**गुन्हेगारीशास्त्राची व्याख्या**

गुन्हा, गुन्हेगार आणि गुन्हेगारीकडे कालओघामध्ये समाज परतत्वे वेगवेगळ्या दृष्टिकोणातून पाहिले जात आहे. साहजिकच विद्वानांनी स्वतंत्र दृष्टिकोनातून व्याख्या केलेली असल्याने गुन्हेगारी शास्त्राच्या कोणत्या तरी एका समान व्याख्येवर अवलंबून राहणे कठीण आहे. ही केवळ गुन्हेगारी शास्त्रांची नव्हे तर सर्वच सामाजिक शास्त्रांची समस्या आहे.

आता आपण गुन्हेगारीशास्त्राच्या कांही व्याख्या पाहू.

१) **वेबस्टर यांचे मते:** ''गुन्हेगारीशास्त्र म्हणजे गुन्ह्यांचा सामाजिक घटना म्हणून शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करणे होय. त्यामध्ये गुन्हेगार, त्यांची मानसिक लक्षणे, त्यांच्या सवयी, त्यांची शिस्त इत्यादींचा अभ्यास अंतर्भूत आहे.''

२) **इलियट, मेरिल :** ''गुन्हा आणि त्यावरील उपचारांचा शास्त्रीय अभ्यास म्हणजे गुन्हेगारीशास्त्र होय.''

३) **डोनाल्ड, तफ्त :** ''गुन्हेगारीशास्त्र ही संज्ञा सामान्य आणि विशिष्ट अशी दोन्ही अर्थांनी योजली जाते. व्यापक अर्थाने अपराधशास्त्रामध्ये गुन्हे आणि गुन्हे प्रतिबंध, गुन्हेगारांचे पुनर्वसन आणि शिक्षा इ. चे आकलन करून घेण्याचा अभ्यास अंतर्भूत आहे. संकुचित अर्थाने अपराधशास्त्र म्हणजे गुन्हेगारीचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न होय.''

४) **जहांगीर एम. जे. सेठना :** ''गुन्हेगारीचा अर्थ त्यांचे अंगभूत घटक, गुन्हेगारीची कारणे त्यावरील उपाययोजनांचे आकलन करून घेऊन अभ्यास करणे म्हणजे गुन्हेगारीशास्त्र होय.''

५) **मायकेल आणि ॲडलर :** ''गुन्हेगारी वर्तनाचा अभ्यास म्हणजे गुन्हेगारी शास्त्र''

६) **विल्यम स्कॉट :** ''विविध प्रकारचे गुन्हे आणि गुन्हेगारांबाबतच्या सामाजिक, अभिवृत्ती, वैधानिक नियमणे व गुन्हेगारी वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे गुन्हेगारी शास्त्र.

(The study of criminal behavior, legal norms, and social attitudes towards various types & crimes and criminals)

वेगवेगळ्या विद्वानांनी वरील प्रमाणे वेगवेगळ्या संज्ञाचा उपयोग करून व्याख्या केल्या असल्या तरी बहुतेक सर्वांचे गुन्हा, गुन्हेगार आणि गुन्हेगारीशी संबंधीत घटकांवर मतैक्य असल्याचे दिसते.

थोडक्यात ''गुन्हा, गुन्हेगार, दंडशास्त्र, आणि त्याचा कायदा, न्यायव्यवस्था आणि पोलिस यंत्रणेशी असलेल्या संबंधाचा अभ्यास म्हणजे गुन्हेगारीशास्त्र'' अशी व्याख्या आपल्याला करता येईल.

गुन्हेगारीशास्त्रात अंतर्भूत असलेली 'गुन्हा' ही संज्ञा मूलतः समजून घेतली पाहिजे. गुन्हेगारी ही कुठल्यातरी विशिष्ट कालखंडाशी, युगाशी, समुदायाशी किंवा समाजापूरती मर्यादित असलेली दिसत नाही. उलट सर्व जगामध्ये असलेली गुन्हेगारी ही एक सामाजिक/कायदेशीर अपरिहार्य घटना

असल्याचे दिसते. मुळात 'गुन्हा' या संज्ञे बाबतच अभ्यासकांच्यात मतभिन्नता असल्याने आपल्याला गुन्ह्याची एकच एक सर्वमान्य अशी व्याख्या देता येत नाही कारण गुन्ह्याच्या प्रत्येक व्याख्येमध्ये काहींना काही उणीव ही जाणवतेच.

तथापि, गुन्हेगारीशास्त्राचा अर्थ जाणून घेण्यासाठी आपल्याला गुन्ह्याची व्याख्या जाणून घेणे क्रमप्राप्त ठरते. पुढील प्रकरणामध्ये गुन्ह्याच्या संकल्पनेचा सविस्तर विचार केला असल्याने येथे सर्वसामान्य माणसाला अभिप्रेत असणारा गुन्ह्याचा अर्थ आपण जाणून घेणार आहोत. सर्वसामान्य माणसाच्या दृष्टिकोनातून 'विशिष्ट समाजात विशिष्ट वेळेला होणारे कायद्याचे उल्लंघन म्हणजे गुन्हा' एवढाच अर्थ असतो. पण समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञांसारख्या सामाजिक शास्त्रज्ञानां गुन्ह्याचा अर्थ याहूनी व्यापक म्हणजे.

१) गुन्हा ही एक समाज- मानस-सांस्कृतिक कायदेशीर अशी संकीर्ण घटना असल्याने तिचा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून तसेच एकात्मिक दृष्टिकोनातून सूक्ष्म पातळीवर अभ्यास करणे आवश्यक ठरते. गुन्हा ही एक सापेक्ष संकल्पना असून गुन्हेकार्यप्रणाली, प्रकार, शिक्षा, उपचार, पुर्नवसन इत्यादी बाबतीत स्थल, काल समाज परत्वे बदलत असते.

गुन्हेगारीशास्त्राचा अर्थ जाणून घेणे म्हणजे गुन्हेगारीशास्त्राचा अभ्यास विषय जाणून घेणे होय. गुन्हेगारीशास्त्राचा अभ्यास विषय खालील प्रमाणे:

१) गुन्हा आणि गुन्हेगारीशी संबंधीत बाबींचा शास्त्रीय अभ्यास.

२) गुन्हेगाराची मानसिक लक्षणे, सवयी इत्यादींचा अभ्यास.

३) गुन्हा आणि गुन्हेगारावरील उपचार पद्धतींचा अभ्यास.

४) गुन्हा, गुन्हेप्रतिबंध, गुन्हेगारांचे पुर्नवसन आणि शिक्षा पद्धतीचा अभ्यास.

५) गुन्हेगारीच्या कारणांचा अभ्यास.

६) गुन्हेगारीमध्ये अंतर्भूत असलेल्या घटकांचा अभ्यास.

वरील सर्व अभ्यास विषय हे फक्त समाजशास्त्राच्या कक्षेत येतात असे मानने अयोग्य ठरेल. कारण शरीरशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, मनोविकारतज्ञ, जीवशास्त्रज्ञ इत्यादी सुद्धा गुन्हे आणि गुन्ह्यांशी संबंधीत घटकांचा शास्त्रीय अभ्यास करताना दिसतात.

गुन्हेगारीशास्त्र केवळ गुन्हे आणि गुन्ह्याच्या कारणापुरते सीमीत नाही तर गुन्ह्येगाराची एकूणच मानसिक ठेवण, शरीरबांधा आणि एकूणच त्याचे व्यक्तिमत्त्व व गुन्हेगारी प्रतिबंधाचा अभ्यास करण्यावर भर देते.

याबरोबरच गुन्हेगारीशास्त्र गुन्हा, गुन्हेगार आणि दंडशास्त्रातील संबंधाचा अभ्यास करते. यामध्ये शिक्षा, उपचार पध्दती- म्हणजे उदा. परीविक्षा, अभिवचन, खुले कारागृह व त्यांचा कायदा आणि न्यायव्यवस्थेशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करते. दुसऱ्या शब्दात गुन्हेगारीशास्त्रात दंडशास्त्राचा अभ्यास अंतर्भूत असतो. दंडशास्त्राच्या अभ्यासाशिवाय गुन्हेगारीशास्त्राचा अभ्यास अपुराच मानावा लागेल.

आधुनिक काळामध्ये गुन्हेगारांनी नवनवीन तंत्रे, शस्त्रे, गुन्हे कार्यप्रणाली, संगणकीय गुन्हे आणि दहशतवादाचा अवलंब करायला सुरूवात केली आहे. त्यामुळे सर्वसामान्य कायदेपालन करणाऱ्या नागरिकांच्या जीवित आणि वित्ताला धोका निर्माण झाला आहे. साहजिकच गुन्हेगारीशास्त्र आणि दंडशास्त्र या दोन शाखा भगिनींनी हातात हात घालून गुन्हे आणि गुन्हेगारीचे निर्दालन करून नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**गुन्हेगारीशास्त्र हे शास्त्र आहे का?**

पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र यासारख्या नैसर्गिक शास्त्रांच्या बाबतीत ती 'शास्त्र' आहेत का हा प्रश्न उद्‌भवत नाही कारण त्या शास्त्रांचे नियम त्रिकालबाधित सत्य असतात. सामाजिक शास्त्रांच्या बाबतीत तसे संभवत नाही. कारण समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इ. सामाजिक शास्त्रे मानवाच्या जटील वर्तनाचा अभ्यास करतात.

मानवी वर्तन हे अस्थिर, गूढ आणि संकीर्ण असल्याने अर्थातच प्रयोगशाळेत प्रयोग करून मानवी वर्तनाचे निरीक्षण करणे शक्य नसते. गुन्हेगारीशास्त्र पण गुन्हेगारी वर्तनाबाबतचा सिद्धात मांडत नाही किंवा संभाव्य गुन्हेगारी बाबत भविष्यकथन करत नाही. परंतु गुन्हेगारीशास्त्राला शास्त्र म्हणता येत नाही.

जर्मन समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर यांच्या मते शास्त्र हे मूल्याभिमुख (Value oriented) असू शकत नाही. सामाजिक घटना जाणून घेणे हा समाजशास्त्राचा उद्देश असला पाहिजे. मूल्याभिमूख उपाय योजना सुचविणे हा नव्हे! गुन्हेगारी शास्त्राने जर केवळ गुन्हा, गुन्हेगार, फौजदारी कायदे, कारागृह यांचाच अभ्यास करण्याचे उद्दिष्ट मानले तर गुन्हेगारीशास्त्राला शास्त्र म्हणता येईल. जसे अणूच्या अभ्यासावरून अणूबाँबचा उपयोग कसा करायचा हे सांगता येत नाही तद्‌वत गुन्हेगार आणि कारागृहाच्या अभ्यासावरून गुन्हेगारावर करावयाच्या उपचारांबाबतही सांगता येत नाही असे जर्मन विचारप्रवाह मानतो.

गुन्हेगारीशास्त्राला खऱ्या अर्थाने 'शास्त्र असे म्हणता येणार नाही. प्रयोग, निरीक्षण, पडताळणी आणि सिध्दांत मांडणे हे शास्त्राचे काम आहे असा एक युक्तीवाद केला जातो.

स्थिर आणि एकजिनसी घटकांच्या बाबतीत काही सार्वत्रिक नियम, सिध्दांत मांडणे, त्याचे निष्कर्ष तपासणे-पडताळा घेणे आणि सिध्दांत मांडणे हाच शास्त्राचा गाभा आहे असे सदरलँड आणि क्रेसी यांनी आपल्या 'Principles of Criminology' या सुप्रसिद्ध ग्रंथात म्हटले आहे. गुन्हा ही एकजिनसी आणि स्थिर स्वरूपाची घटना नाही तर ती व्यक्ती, समाजपरत्वे सातत्याने बदलणारी संकल्पना आहे हे स्फटिकाइतके स्पष्ट आहे. गुन्हेगारी वर्तनातील संकीर्णतेचा विचार करता गुन्हेगारीचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करणे केवळ अशक्य आहे. अनुभव प्रामाण्यता, निरीक्षण, प्रयोग, विश्वसनीयता, पडताळणी, वैश्विक सत्यता, गणिती अचूकता इ. शास्त्राच्या वैशिष्ट्यांच्या कसोटीवर गुन्हेगारी शास्त्र उतरू शकत नाही. म्हणून गुन्हेगारी शास्त्राला शास्त्र म्हणणे संयुक्तिक ठरणार नाही.

★ **स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न -१**

**अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) गुन्हेगारीशास्त्राची व्युत्पती सांगा

२) गुन्हेगारीशास्त्राची सर्वमान्य व्याख्या का देता येत नाही?

३) वेब्स्टर यांनी केलेली गुन्हेगारीशास्त्राची व्याख्या सांगा.

## १.३.२ गुन्हेगारीशास्त्राची व्याप्ती

कोणत्याही सामाजिक शास्त्राचा अभ्यास करतांना त्याची व्याख्या, व्याप्ती आणि मर्यादा जाणून घेणे क्रमप्राप्त ठरते. सर्वच सामाजिक शास्त्रे ही परस्पर संबंधित असल्याने आपणास नेमका कशाचा अभ्यास करायचा आहे? त्या विषयाचे अभ्यासक्षेत्र कोणते आहे? गुन्हेगारीशास्त्राचा अभ्यास करतांना या प्रश्नांचे आपल्याला भान ठेवावे लागते.

गुन्हेगारीशास्त्राच्या व्याख्या गुन्हेगारीशास्त्राची व्याप्ती दर्शविणाऱ्या आहेत. मुळात समाजशास्त्राचीच व्याप्ती इतकी मोठी आहे की त्यामध्ये पृथ्वीवरील व आकाशा खालील सर्व काही येते. मानवी आंतरक्रिया, मानवी सामाजिक संबंध आणि मानवी वर्तन हा समाजशास्त्राचा अभ्यास विषय आहे. मानवी वर्तनातील जटिलता विचारात घेता आपण समाजशास्त्राची व्याप्ती सीमित करू शकतो का?

अर्थातच गुन्हेगारीशास्त्र ही समाजशास्त्राची शाखा असल्याने समाजशास्त्राप्रमाणेच गुन्हेगारी शास्त्राची व्याप्ती अत्यंत व्यापक आहे. गुन्हेगारीशास्त्राप्रमाणेच गुन्हा, गुन्हेगारी आणि संबंधित घटकांचा दंडशास्त्र आणि फौजदारी कायदा अभ्यास करते. साहजिकच गुन्हेगारीशास्त्राची व्याप्ती विचारात घेताना आपणास गुन्हेगारी, दंडशास्त्र आणि फौजदारी कायदे यांच्यातील परस्पर संबंध विचारात घ्यावे लागतात. दुसऱ्या शब्दात गुन्हेगारीशास्त्राची व्याप्ती ही फौजदारी कायदा व दंडशास्त्र या शाखा भगिनींशी निगडित आहे.

दैनंदिन जीवनामध्ये आपण चोरी, दरोडे, खून, सांप्रदायिक हिंसाचार, लैंगिक शोषणाच्या घटना पाहतो. संकीर्ण मानवी वर्तनाचा अभ्यास करणाऱ्या समाजशास्त्र, मानसशास्त्र, गुन्हेगारीशास्त्रासारखी शास्त्रे या घटनांचे कोणत्या तरी एका सर्वमान्य-स्वीकारार्ह सिध्दांताच्या आधारे स्पष्टीकरण करू शकत नाहीत. गुन्हेगारी शास्त्राची व्याप्ती अभ्यासतांना आपण हे ध्यानात घेतले पाहिजे की मुळात गुन्ह्याची संकल्पना वादग्रस्त असून ती स्वरूप, तीव्रता आणि व्याप्तीच्या बाबत सापेक्ष आहे. अर्थातच गुन्हेगारी शास्त्राची व्याप्ती पण त्या प्रमाणे लवचिक असेल.

अनेक विद्वानांनी गुन्हेगारीशास्त्राची व्याप्ती खालीलप्रमाणे स्पष्ट केलेली आहे.

**१) ए. एच. जॉन्सन :**

अ) गुन्हेगारीची कारणे, गुन्हेगारी वर्तन आणि व्युत्पत्ती

ब) सामाजिक प्रतिक्रियांचे स्वरूप हे समाज वैशिष्ट्यांचे लक्षण मानून अभ्यास करणे.

२) **इलिएट. एम. ए.**

अ) गुन्हेगारीची व्याख्या आणि स्वरूप

ब) गुन्हेगारीची कारणमीमांसा

क) गुन्हेगारांचे अध्ययन

ड) गुन्हेगारांवरील उपचार

इलिएट यावर भाष्य करतांना म्हणतात की गुन्हेगारीशास्त्रज्ञांनी केवळ गुन्हेगारीची व्याख्या व गुन्ह्याच्या स्वरूपाचा विचार न करता गुन्हेगारीच्या कारणांच्या मुळाशी जावून गुन्हेगारीस जबाबदार कारणांचे विश्लेषण केले पाहिजे. त्यासाठी गुन्हेगारी वर्तनाला जबाबदार असणाऱ्या गुन्हेगाराची शारीरिक व मानसिक वैशिष्ट्यांचा अभ्यास केला पाहिजे. इतकेच नव्हे तर गुन्हेगारी प्रतिबंध व संभाव्य गुन्हेगारीबाबत मार्गदर्शन करण्याच्यादृष्टीने गुन्हेगारीशास्त्रज्ञांनी गुन्हेगारांवरील उपचार पध्दतीचा ही अभ्यास केला पाहिजे.

३) **डोनाल्ड, तफ्त :** यांचे मते गुन्हेगारीशास्त्र ही व्यापक ज्ञानशाखा असून सामान्य अर्थाने गुन्हेगारी गुन्हेगारी प्रतिबंध, गुन्हेगारांचे पुनर्वसन आणि शिक्षा यांचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न त्यात अंतर्भूत आहे. गुन्हेगारीशास्त्र हे पूर्णपणे विकसित झालेले नाही तरीही गुन्हेगारीशास्त्राला तसा दर्जा देणे हे गुन्हेगारीशास्त्राच्या विकासाला मारक ठरू शकते.

४) **सदरलँड, एड्विन :**

सदरलँड यांनी गुन्हेगारीशास्त्राची व्याप्ती खालील तीन भागात विभागली आहे.

**अ) कायद्याचे समाजशास्त्र** : यामध्ये फौजदारी कायदे, त्यांची व्याप्ती आणि मर्यादा, गुन्हेगारी नियंत्रणातील कायद्याची भूमिका, त्याचा समाजाशी असलेला संबंध इत्यादीचा अभ्यास होतो.

**ब) गुन्हेगारी चिकित्साशास्त्र :** गुन्हेगारीशास्त्राचे एक महत्वपूर्ण कार्य म्हणजे गुन्हेगारीच्या मुळाशी असलेल्या कारणांचा शोध घेऊन त्याचे शास्त्रीय पध्दतीने विश्लेषण करणे होय. त्यामुळे गुन्हेगारीशी संबंधित निदानात्मक, उपचारात्मक किंवा अंदाज व्यक्त करणे शक्य होते.

**क) दंडशास्त्र :** गुन्हेगारीस प्रतिबंध करण्यासाठी विविध शिक्षा पध्दतींचा व सुधारात्मक उपचारपध्दतींचा अवलंब केला जातो. या शिक्षापद्धतींचा व सुधारात्मक उपचारपद्धतींचा अभ्यास दंडशास्त्र करते.

★ **स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२**

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१) गुन्हेगारीशास्त्राची कोणतीही व्याख्या लिहा.

२) सर्वसामान्य माणसाच्या दृष्टिकोनातून गुन्हा म्हणजे काय?

३) गुन्हेगारीशास्त्र हे शास्त्र का नाही?

### १.३.३ गुन्ह्याची संकल्पना

आता तुम्ही गुन्हा ही संकल्पना सविस्तर अभ्यासणार आहात. त्यासाठी आपण गुन्ह्याच्या व्याख्या पाहू.

**गुन्ह्याची व्याख्या**

गुन्हा ही स्थल, काल व समाजपरत्वे बदलणारी एक संकीर्ण अशी संकल्पना असून वेगवेगळ्या अभ्यासकांनी तिचा वेगवेगळा अर्थ सांगितलेला आहे. साहजिकच गुन्ह्याच्या व्याख्या ही वेगवेगळ्या आहेत.

१. **सी. डॅरो:** ''विशिष्ट प्रदेशातील कायद्याने प्रतिबंधित केलेल्या दंडनिय कृत्याला गुन्हा म्हणतात.''

२. **बार्नस आणि टिटर्स :** ''शासनाने प्रतिबंधित केलेल्या जनभावना दुखविणाऱ्या समाजविरोधी कृत्यास तांत्रिकदृष्ट्या गुन्हा म्हणता येईल.''

३. **इलिएट मेरिल :** ''गुन्हा म्हणजे कायद्याने प्रतिबंधित केलेले असे कृत्य की ज्याबद्दल सुधारशाळेत, कारावासात डांबण्याची किंवा दंड वा देहदंडाची शिक्षा देता येते.''

४. **जहांगिर एम. जे. सेठना :** ''प्रचलित कायद्यानुसार एखादे कृत्य करणे किंवा न करणे की जे समाज किंवा शासनाच्या दृष्टीने दंडनिय असते अशा कृत्यास गुन्हा म्हणतात.''

५. **मायकेल ॲडलर :** ''फौजदारी कायद्याने प्रतिबंधित केलेल्या वर्तनास गुन्हा म्हणतात.''

६. **सदरलँड आणि क्रेसी :** ''फौजदारी कायद्याचं उल्लंघन म्हणजे गुन्हा.''

७. **डोनाल्ड तफ्त :** ''कायद्याने प्रतिबंधित केलेले कृत्य म्हणजे गुन्हा आणि जो असे कृत्य करतो तो गुन्हेगार होय.''

**गुन्ह्याचा अर्थ :**

वरील व्याख्यांचा सूक्ष्मपणे अभ्यास केला तर आपल्या असे ध्यानात येते की

१) सर्व व्याख्यांमध्ये 'कायदा' हा मध्यवर्ती घटक आहे.

२) गुन्हा ही संज्ञा कायद्यांच्या उल्लंघनाशी निगडित आहे.

३) हे उल्लंघन शिक्षापात्र किंवा दंडनिय असते.

सर्व व्याख्याकारांनी आपली व्याख्या ही कायदा व कायद्याच्या उल्लंघनापुरती सीमित केली आहे. वास्तविक पाहता गुन्हेगारी हा एक बहुआयामी संकल्पना असून तिला सामाजिक, मानसशास्त्रीय, मनोविकारशास्त्रीय, शरीरशास्त्रीय, जनुकीय इ. बाजू असल्याने केवळ कायद्याच्या परिघात गुन्हेगारीचा विचार किंवा स्पष्टीकरण करणे बरोबर नाही.

भारतामध्ये कायदेच कायदे आहेत. सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यास, धूम्रपानास मनाई आहे. आपल्या भाबड्या श्रद्धेपाई (गायी-म्हशीची कास जळू नये म्हणून!) दुधात पाणी घालणारा शेतकरी हा कायद्याच्या दृष्टीने 'भेसळ करणारा ठरतो! वरील व्याख्यांचे निकष लावले तर सार्वजनिक जागी थुंकणारा, धुम्रपान करणारा, दुधात पाणी मिसळणारा गुन्हेगार ठरतो. जबरी चोरी करणारे, दरोडेखोर, खंडणी मागणारे यांचेशी त्यांची तुलना होऊ शकते का? सामाजिक प्रथा म्हणून विवाहात हुंडा-दागिने देण्या-घेण्याची प्रथा समाजमान्य असली तरी कायदेशीर नाही. काही जाती-जमातीत सण-समारंभ प्रसंगी मद्यपान करण्याच्या रूढीबाबत म्हणता येईल. काही जाती-जमातीत देवा धर्माच्या नावावर स्त्रियांचा अनैतिक व्यापार चालतो (उदा. देवदासी) याला सामाजिक मान्यता असली तरी कायदेशीर मान्यता नाही. थोडक्यात, गुन्ह्याच्या अर्थाबाबत संमिश्रता व संदिग्धता असल्याने आपणास गुन्ह्याची संकल्पना समजावून घ्यावी लागते.

**गुन्ह्याची संकल्पना :**

काळाच्या ओघात गुन्ह्याची संकल्पना बदलत आलेली आहे. हे बदल पुढीलप्रमाणे:

**१) गुन्ह्याची प्रारंभीची संकल्पना** (Early concept) प्राचीन काळापासून समाजाच्या विकासाच्या टप्प्याबरोबर गुन्ह्याची संकल्पना लक्षणीयरीत्या बदलली प्राचीन काळी कोणत्याही घटनेचे स्पष्टीकरण हे नियतीची इच्छा किंवा Devil-will च्या सहाय्याने केले जाई. जेव्हा एखादी व्यक्ती भूत-पिशाच्याने पछाडली जाते तेव्हा ती गुन्हा करते असा समज होता. आफ्रिकेतील तसेच भारतातील आदिवासी जमातींमध्ये पण अशीच धारणा असलेली दिसते. गुन्ह्याबाबतची ही भूत-पिशाच्यवादी संकल्पना होय.

**२) गुन्ह्याची धार्मिक संकल्पना :** हे संपूर्ण विश्व कोणत्या तरी एका अतिमानवी शक्तीच्या इच्छेनुसार नियंत्रित होते असा एक सार्वत्रिक विश्वास जगभर असलेला दिसतो. विशेषतः १२ व्या १३ व्या शतकापर्यंत असा दृढ विश्वास होता. परमेश्वर निंदा, मद्यासक्ती आणि व्यभिचारासारखी कृत्ये धर्माने निंदनिय, निषेधात्मक मानलेली होती. कायद्याला धर्माचे आधिष्ठान होते. साहजिकच धर्मविरोधी कृत्ये ही पाप तसेच गुन्हा समजले जाई. काही प्राण्यांना धार्मिकदृष्ट्या पवित्र मानले जात असल्याने अशा प्राण्यांबाबतचे क्रूर वर्तन किंवा त्यांना ठार मारणे हे गुन्हा समजले जात असे. सम्राट अशोकाने प्राण्यांच्या संरक्षणार्थ कायदे केले होते. कुत्र्याशी क्रूर वर्तन करणाऱ्यांना पर्शियामध्ये दंडाची शिक्षा होती. भारतातील आदिवासी जमातीमध्ये सुद्धा कुलचिन्ह (Totem) असलेल्या प्राण्याची शिकार करीत नाहीत. १२ व्या १३ व्या शतकामध्ये ब्रिटिश समाजात धर्म व राज्य विरोधी केलेली कृत्येच गुन्हा समजली जात. राजद्रोह, बलात्कार आणि परमेश्वर निंदा ही कृत्ये गुन्हा समजत. पण 'खून' हा गुन्हा मानला जात नव्हता.

आपले निर्दोषत्व सिद्ध करण्यासाठी 'शपथ घेणे' आणि 'दिव्य' करण्याची तत्कालीन पध्दत गुन्ह्याच्या धार्मिक संकल्पनेवर प्रकाश टाकते.

**३) गुन्ह्याची नैतिक कल्पना :** प्रत्येक समाजामध्ये असणाऱ्या नैतिक कल्पना आपल्या सदस्यांचे वर्तनाचे नियमन करीत असतात. याच अर्थाने धर्म आणि नैतिकता हातात हात घालून वाटचाल करीत असतात. नीतिमत्तेच्या कल्पनांचे स्वरूप हे सामान्यत: योग्य - अयोग्य, चूक-बरोबर, पवित्र-अपवित्र, नैतिक-अनैतिक अशा प्रकारचे असते. त्याचप्रमाणे समाजामध्ये वैवाहिक एकनिष्ठा, पातिव्रत्य, ब्रह्मचर्य, एकपत्नीत्व यासारखे नीतिनियम असतात व त्यांच्या विरोधी केलेले वर्तन हे गुन्हा समजले जाते. या संदर्भात एडवर्ड वेस्टरमार्क म्हणतात-

''**एखाद्या समाजातील प्रथा आणि कायदे हे त्या समाजातील नितिमत्ताविषयक कल्पनांवर आधारलेले असतात. त्या विरोधी होणारे वर्तन हे समाजाच्या दृष्टीने गुन्हा असते.**''

थोडक्यात, या संकल्पनेप्रमाणे अनैतिक वर्तन गुन्हा मानले जाते. उदा. विवाहबाह्य संबंध, उसने घेतलेले पैसे बुडविणे, विश्वासघात इ.

साधारणपणे अठराव्या शतकापर्यंतच्या गुन्ह्याच्या संकल्पना नाकारून अभ्यासकांनी गुन्हेगारी वर्तनाच्या वस्तुनिष्ठ अभ्यासाला सुरुवात केली. **गुन्हेगारी वर्तनाला भूतपिशाच्चवादी शक्ती जबाबदार नसतात, तर संबंधित व्यक्तीच तिने केलेल्या कृत्यास जबाबदार असते** हे तत्व प्रस्थापित झाले. नैतिकतेच्या कल्पना बदलू लागल्या. उदा. गर्भपात करणे पाप मानले जात होते तसेच ते दंडनिय कृत्य पण होते. पण १९७८ सालच्या वैद्यकीय गर्भपात कायद्याने गर्भपात (विशिष्ट अटींवर) कायदेशीर मानला जाऊ लागला. 'लॉटरी' ला जुगार म्हणता येत नाही. आता तर Live-in-relationship म्हणजे विवाहाशिवाय स्त्री-पुरूष पती-पत्नी म्हणून राहू शकण्याची कल्पना मूळ धरतेय. दारू दुकानांना शासनच परवाना देत आहे. देह-विक्रय बेकायदेशीर समजत नाहीत.

अशाप्रकारच्या वर्तनाची चिकित्सा कायद्याच्या चौकटीतच होऊ शकते. त्यातूनच गुन्ह्याची कायदेशीर संकल्पना निर्माण झाली.

**गुन्ह्याची कायदेशीर संकल्पना :**

''प्रचलित कायद्याचे उल्लंघन करणे म्हणजे गुन्हा'' असे कायद्याच्या दृष्टीने मानले जाते. यासंदर्भात पुढील मुद्दे महत्त्वाचे आहेत.

१. आजची फौजदारी न्यायव्यवस्था ही कायदाधिष्ठित आहे.

२. गुन्हेगारांचे अनुभवाधिष्ठित अभ्यास हे गुन्हेगारीची कायदेशीर व्याख्या विचारात घेऊनच केले जातात.

३. गुन्हेगारीविषयक सांख्यिकी व शासकीय अहवाल गुन्ह्याच्या कायदेशीर व्याख्येवर आधारलेले असतात.

४. ही व्याख्या निश्चित, नि:संदिग्ध आणि मोजमाप योग्य असते.

उदा. आपण पॉल तपन यांनी केलेली व्याख्या पाहू.

**''गुन्हा म्हणजे हेतूत: केलेले किंवा न केलेले कृत्य, की जे केल्याने फौजदारी कायद्याचे उल्लंघन होते. कोणतेही संरक्षण किंवा समर्थनाशिवाय असे कृत्य केलेले असते आणि त्या कृत्याला गंभीर किंवा सौम्य अपराध म्हणून राज्यसंस्थेची मान्यता असते.''**

गुन्हेगारीची कायदेशीर संकल्पना आपण पॉल तपन या समाजशास्त्रज्ञाने केलेल्या व्याख्येचे विश्लेषण करून समजावून घेणार आहोत. या व्याख्येत एकून चार घटक अंतर्भूत आहेत.

१) गुन्हा हे हेतूत: केलेले वा न केलेले कृत्य असते एखाद्याच्या विचाराबद्दल त्याला दोषी धरून शिक्षा करता येणार नाही. आपले कायदेशीर कर्तव्य पार न पाडणे म्हणजे सुद्धा गुन्हा ठरते.

   उदा. नशापाणी करून वाहन चालविणे, निष्काळजीपणे शस्त्र हाताळणे, कर्तव्य बजावत असताना झोपणे इ.

२) फौजदारी कायद्याचे उल्लंघन झाले पाहिजे.

३) असे कृत्य व्यक्तीने स्वेच्छेने व पूर्णपणे शुध्दीत केलेले असले पाहिजे आणि त्यासाठी तिने संरक्षण किंवा बचावाचा पवित्रा घेता कामा नये. तसेच त्या कृत्याचे समर्थनही करता येण्यासारखे नसावे. उदा. वेडाच्या भरात केलेले कृत्य किंवा स्व संरक्षणासाठी केलेले कृत्य गुन्हा ठरत नाही.

४) अशा कृत्याला गंभीर किंवा सौम्य अपराध म्हणून राज्यसंस्थेची मान्यता असली पाहिजे.

असे असले तरी ही कायदेशीर संकल्पना गुन्हेगारीचे पुरेसे स्पष्टीकरण करू शकत नाही. तसेच तिच्या काही मर्यादा पण आहेत. मानवी वर्तन हे कमी जास्त प्रमाणात समाजात प्रचलित असलेल्या मूल्याशी निगडीत असते. गुन्हेगारी ही बहुआयामी, गतीमान व बदललेली संकल्पना असून ती सामाजिक नियमने आणि वर्तनप्रणालीशी निगडीत असल्याने ती नेहमीचे सामान्य वर्तन पण वाटू शकते. उदा. सार्वजनिक उद्यानातून होणारे वर्तन हे सामाजिक दृष्ट्या आक्षेपार्ह असले तरी कायद्याच्या चौकटीत ते गुन्हा असेलच असे नाही. उदा. तरूण-तरूणींनी शृंगारिक वर्तन करणे, विवाहाशिवाय एकत्र राहणे, अविवाहित माता प्रेम करणे इत्यादी कृत्ये गुन्हा आहेत असे कायदा म्हणत नाही.

दुसरे म्हणजे ज्या त्या काळात कायद्याप्रमाणे आचरण करणे सुसंगत असते. उदा. सायकलला परावर्तक, घंटा, कंदिल (डायनेमो) असली पाहिजे तसे कायदा म्हणतो. आज ते कालबाह्य झाले आहे. पण कायद्याच्या दृष्टीने याचे उल्लघन होणे म्हणजे गुन्हाच! परवान्याशिवाय स्वयंचलित दुचाकी चालवून गुन्हा करणारा महाविद्यालयीन तरूण आणि सराईत धंदेवाले, दरोडेखोर यात काहीच गुणात्मक फरक नाही का? इंग्रजांच्या राजवटीत स्वातंत्र्य मिळविण्यासाठी दरोडे घालून ज्यांनी पैसा उभा केला ते देशभक्त स्वातंत्र्य सैनिक की दरोडेखोर?

थोडक्यात कायदा प्रत्यक्ष कृत्य होणे न होण्यावर महत्व किंवा भर देतो. त्याच्या उद्दिष्टाला किंवा उद्देशाला नाही.

## ५) गुन्हेगारीची समाजशास्त्रीय संकल्पना :

या आधी अभ्यासलेल्या गुन्हेगारीच्या संकल्पनांपेक्षा गुन्हेगारीची समाजशास्त्रीय संकल्पना ही व्यापक आणि सर्वसमावेशक आहे. सामाजिक कल्याण हेच कोणत्याही समाज व्यवस्थेचे अंतिम उद्दिष्ट असते आणि ते सामाजिक नीतिमत्ता, मूल्ये आणि सामाजिक नियमनांचे पालन करून साध्य करता येते. अशी सामाजिक धारणा असते. त्यामुळे सामाजिक दृढऐक्य निर्माण होतो. साहजिकच सामाजिक नियमनांविरुध्द होणारे वर्तन हे गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन मानले जाते मग ते कायद्यात बसू देत अथवा न बसू देत. याचा अर्थ समाजात जे उचित, योग्य, नैतिक किंवा समाजसुसंगत मानले असेल तेच समाज सदस्यांनी अनुसरले पाहिजे व त्यातच समाजाचे हित सामावलेले असते. सामाजिक नियमनांविरूद्ध होणारे वर्तन या संकल्पनेनुसार गुन्हाच मानले जाईल.

उदा. जात हा अंतर्विवाही समूह आहे. आपल्याच समूहात विवाह करण्यास भाग पाडण्याच्या बंधनाला अंतर्विवाहाचा नियम म्हणतात. उदा. **क्ष** जातीच्या मुलाने **य** जाती मुलीशी विवाह केला तर त्यांची कुटूंबे पण जाती निर्बधांचे उल्लंघन केल्याबद्दल अपराधी मानली जावून त्यांना 'बहिष्कृत' किंवा वाळीत टाकण्याची शिक्षा होऊ शकते (उदा. भिल्ल मुलाने गोंड मुलीशी विवाह करणे)

थॉर्स्टीन सेलिन म्हणतात, ''जर मानवी वर्तनशास्त्राचा विकास व्हायचा असेल तर या विषयाच्या संशोधन क्षेत्रातील अभ्यासकांनी फौजदारी कायद्याच्या पकडीतून आपली मुक्तता केली पाहिजे.

रॅडल्फिफ ब्राऊन म्हणतात, गुन्हा म्हणजे ''प्रचलित चालीरीतींचे उल्लंघन की, जे केल्याने दंड पध्दतीचा अवलंब केला जातो.''

व्यापक समाजहिताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी समाज सदस्यांनी प्रस्थापित वर्तन प्रणालीचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे अशी समाजाची अपेक्षा असते. याच कारणासाठी चोरी, दरोडे, व्यभिचार, विवाहबाह्य संबंध, शोषण, हिंसाचार इ. कृत्ये सामाजिक हितास व सामाजिक व्यवस्थेला धोका किंवा हानी पोचविणारे कृत्ये मानली जातात. आजही ग्रामीण तसेच आदिवासी जमातींमध्ये जादू-टोणा किंवा करणी करण्याच्या संशयावरून संबंधिताला शिक्षा केली जाते याचे कारण हेच आहे. या संदर्भात एल्मर ह्यूबर जॉन्सन म्हणतात,

**''बहुधा जेव्हा केंव्हा पहिल्यांदा मानवप्राण्याला नैतिकतेची जाणीव झाली तेव्हापासून नैतिकतेचे उल्लंघन करणे हा गुन्हा आहे असा विश्वास निर्माण झाला.''**

गुन्ह्याच्या समाजशास्त्रीय संकल्पनेतही उणिवा आहेतच. ही संकल्पना गुन्हेगारीचे पुरेसे समाधानकारक स्पष्टीकरण देत नाही. प्रत्येक समाजातील योग्य-अयोग्य, उचित-अनुचित, नैतिक-अनैतिक, आदर्श वर्तन, रूढी-प्रथा, विश्वास इ. कल्पना वेगवेगळ्या असतात. उदा. मद्यपान हे मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजात सामाजिकदृष्ट्या अनुचित मानतात तर आदिवासींमध्ये सण समारंभामध्ये ती सामाजिक आवश्यकता मानली जाते. तर उच्च गर्भश्रीमंतामध्ये मद्यपान हे 'शिष्टाचार' व प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. आजही काही जातीजमाती ह्या दरोडे घालणे, वेश्याव्यवसाय करणे, दारू गाळणे हा त्यांच्या चरितार्थाचा पारंपरिक व्यवसाय आहे असे मानतात. **''आम्ही पोटासाठी चोऱ्या करतो तो आमचा धर्मच आहे''** असे त्या म्हणतात. विशेष म्हणजे त्यांच्या जात बांधवांचीही तशीच धारणा असते या पार्श्वभूमीवर आपण त्यांना गुन्हेगार असे लेबल लावू शकतो का?

### ६. गुन्हेगारीची सामाजिक–कायदेशीर संकल्पना :

गुन्हेगारीच्या समाजशास्त्रीय आणि कायदेशीर संकल्पनांचे एकत्रीकरण करणारी ही गुन्हेगारीची सामाजिक कायदेशीर कल्पना आहे. कायदेशीर संकल्पना ही कायद्याच्या उल्लंघनावर भर देते. उदा. शिरस्त्राण (हेल्मेट) शिवाय दुचाकी चालविणे गुन्हा ठरते. तर गुन्ह्याच्या समाजशास्त्रीय संकल्पनेनुसार समाजविरोधी समाजविघातक कृत्यावर भर दिला जातो. उदा.तरूण -तरूणींनी परस्पर संवाद करणे, मुलींनी तंग व आखूड कपडे घालून 'सेक्सी' दिसण्याचा प्रयत्न करणे इ.

सामाजिक–कायदेशीर संकल्पना वरील दोनही दृष्टिकोन नाकारते आणि त्यांचा एकत्रित (Synthesis) विचार करते. त्यानुसार १) एखादे कृत्य हे समाजविरोधी–विघातक असले पाहिजे– तसा त्या समूहाचा विश्वास असला पाहिजे. (२) ते कृत्य कायदेशीररीत्या शिक्षापात्र असले पाहिजे.

उदा. प्रेमालाप करणारे तरूण तरूणीचे वर्तन समाजिकदृष्ट्या आक्षेपार्ह असेल पण कायदेशीर दृष्ट्या रवचितच नाही. त्याचप्रमाणे भिन्न जातीच्या तरूण–तरूणीने पळून जाऊन विवाह केला तर तो सामाजिकदृष्ट्या आक्षेपार्ह असला तरी ते कृत्य समाज–विरोधी समजून कायद्याने शिक्षापात्र मानता येणार नाही.

### ७. गुन्हेगारीची मानसिक–सामाजिक संकल्पना :

गुन्हेगारीबाबतची ही आधुनिक संकल्पना असून ती गुन्हेगाराच्या व्यक्तिमत्वाचा, विशेषत: त्यांची मानसिक यंत्रणा, मानसिक लक्षणे, चंचलता वगैरे वैशिष्ट्यांवर भर देते. या आधीच्या संकल्पनामध्ये गुन्हेगार वगळून इतर बाबींचाच विचार केलेला दिसतो. वास्तविक पाहता गुन्हेगार व्यक्ती कोण आहे? ती मानसिकदृष्ट्या कशी आहे? सामान्य आहे की अपसामान्य? कोणत्या परिस्थितीत तिने गुन्हा केला? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत.

उदा. पतीने दिवसाढवळ्या आपल्या पत्नीला तिच्या प्रियकराबरोबर ''नको त्या अवस्थेत'' पाहून संतप्त झाल्याने त्या दोघांवर हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले.

या उदाहरणातील पतीची मानसिकता पाहा. द्वेष, कौटुंबिक वैर, सूड, भीती, नैराश्य इ. मानसिक वैशिष्ट्ये ही एखाद्याची मानसिक स्थिती दर्शवितात. याच्या बरोबरीनेच ज्या परिस्थितीत गुन्हा घडला ती सामाजिक परिस्थिती पण विचारात घेतली पाहिजे.

गुन्हेगारीबाबतची ही संकल्पना पण व्यवहार्य नाही. एखादे गुन्हेगारी कृत्य करतांना त्या व्यक्तीची मानसिक परिस्थिती कशी होती एवढा एकच निकष गुन्हेगारी वर्तनाचे स्पष्टीकरण करायला पुरेसा नाही. केवळ मानसिक स्थिती हाच निकष लावायचा म्हटले तर गुन्ह्याचे गांभीर्य, सौम्यता, शिक्षा याला काही अर्थ उरणार नाही.

थोडक्यात, गुन्हा ही एक बहुआयामी, गतीमान, सापेक्ष संकल्पना आहे स्थळकालपरत्वे तिचा अर्थ बदलतो. आज गुन्हेगारीची कायदेशीर कल्पना हीच लोकप्रिय असून पोलीस–न्यायव्यवस्था, फौजदारी कायदा, संख्याशास्त्रज्ञ, राज्यकर्ते याच संकल्पनेचा अवलंब करतात.

**★ स्वयं–अध्ययन प्रश्न–३**

१. गुन्हा या संज्ञेची व्याख्या लिहून गुन्ह्याचा अर्थ स्पष्ट करा.

२. गुन्ह्याच्या कोणत्याही तीन संकल्पना सांगा.

३. गुन्ह्याची 'कायदेशीर संकल्पना' स्पष्ट करा.

### **१.३.४ गुन्ह्याचे प्रकार** (Types of Crime)

गुन्हा ही संकल्पना अभ्यासल्यानंतर आता तुम्ही गुन्ह्याचे विविध प्रकार समजावून घेणार आहात. तथापि, गुन्हा ही संकल्पना अत्यंत गुंतागुंतीची असल्याने तसेच गुन्ह्याची संकल्पना ही स्थळ, काळ, परिस्थिती इत्यादीनुसार बदलत असल्याने गुन्ह्याचे वर्गीकरण करणे किंवा प्रकार पाडणे अवघड जाते. असे असले तरी अनेक शास्त्रज्ञांनी गुन्ह्यांचे प्रकार पाडलेले आहेत. त्यापैकी काही मान्यवर शास्त्रज्ञांनी पाडलेले गुन्ह्याचे प्रकार आपण पाहाणार आहोत.

**अ) एडविन हार्डीन सदरलँड :** या अमेरिकन समाजशास्त्रज्ञाने गुन्ह्याचे गांभीर्य विचारात घेऊन गुन्ह्याचे पुढील दोन प्रकार पाडलेले आहेत.

**१) अतिगंभीर किंवा अतिभयानक स्वरूपाचे गुन्हे** (Felony) : जे गुन्हे केल्यानंतर गुन्हेगारास देहदंड (फाशी) किंवा दीर्घ तुरुंगवास (जन्मठेप) अशा कडक शिक्षा केल्या जातात त्यांना अतिगंभीर किंवा अतिभयानक गुन्हे असे म्हणतात. उदा. खून करणे, सशस्त्र दरोडा टाकणे, देशद्रोह करणे, मादकद्रव्यांची निर्मिती व व्यापार करणे इत्यादी अतिगंभीर गुन्हे ठरतात.

**२) सामान्य किंवा सौम्य गुन्हे** (Misdemeanour) : जे गुन्हे केल्यानंतर गुन्हेगारास तुलनेने सौम्य शिक्षा उदा. अर्थदंड करणे, अल्पकाळ तुरुंगवास, नुकसान भरपाई देणे इत्यादी, केल्या जातात त्यांना सामान्य किंवा सौम्य गुन्हे असे म्हणतात. उदा. वाहतुकीच्या नियमांचा भंग करणे, सार्वजनिक शांततेचा भंग करणे, किरकोळ चोरी करणे, एखाद्यास अपशब्द वापरून अपमानीत करणे इत्यादी गुन्हे सामान्य गुन्हे ठरतात.

**ब) हेज** यांनी गुन्ह्याचा हेतू किंवा उद्दिष्ट विचारात घेऊन गुन्ह्याचे दोन प्रकार पाडलेले आहेत.

**१) सुव्यवस्थेविरुद्ध गुन्हे** (Crimes Against Order) : समाजातील शांतता व सुव्यवस्था यांचा भंग करणाऱ्या कृत्यांना सुव्यवस्थेविरुद्धचे गुन्हे असे म्हणतात. उदा. एखाद्या पुतळ्याची किंवा प्रार्थनास्थळाची विटंबना करणे, रस्त्यावर हाणामारी करणे, विनापरवाना मोर्चा काढून गोंधळ घालणे इत्यादी गुन्हे हे सुव्यवस्थेविरुद्धचे गुन्हे ठरतात.

**२) संपत्तीविरुद्धचे गुन्हे** (Crimes against property) : खाजगी किंवा सार्वजनिक संपत्तीचे नुकसान करणे, ती हडप करणे, एखाद्याच्या संपत्तीविषयक हक्कांवर अतिक्रमण करणे, किंवा त्याला त्याच्या संपत्तीपासून वंचित करणे इत्यादी कृत्यांना संपत्तीविरुद्धचे गुन्हे असे म्हणतात. या ठिकाणी संपत्ती ही संकल्पना व्यापक असून तिच्यामध्ये पैसा, अलंकार, शेतीवाडी, जमीनजुमला, घरदार, कागदपत्रे, वृक्ष, इत्यादींचा समावेश होतो.

**क) विल्यम ॲड्रियन बोंजर :** यांनीदेखील गुन्ह्यामागील हेतू विचारात घेऊन गुन्ह्याचे चार प्रकार पाडलेले आहेत.

**१) आर्थिक गुन्हे** (Economic crimes) : अर्थप्राप्तीच्या हेतुने केलेल्या गुन्ह्यांना आर्थिक गुन्हे असे म्हणतात. या प्रकारच्या गुन्ह्यांची व्याप्ती अत्यंत विस्तृत असून त्यामध्ये खिसा कापणे, चोरी करणे, भ्रष्टाचार, पैशाचा अपहार, दरोडा, बँक घोटाळा, शरीराच्या अवयवांचा व्यापार, तस्करी, आर्थिक फसवणूक इत्यादी गुन्ह्यांचा समावेश होतो.

**२) लैंगिक गुन्हे** (Sexual Crimes) : लैंगिक गरजांच्या पूर्तीसाठी केलेल्या गुन्ह्यांना लैंगिक गुन्हे असे म्हणतात. यामध्ये विनयभंग, बलात्कार, लैंगिक छेडछाड व छळ, अनैसर्गिक लैंगिक संबंध इत्यादींचा समावेश होतो.

**३) राजकीय गुन्हे** (Political Crimes) : राजकीय हितसंबंधास धोका निर्माण करण्याच्या हेतुने केलेल्या गुन्ह्यांना राजकीय गुन्हे म्हणतात. यामध्ये राज्याविरुद्ध युद्ध पुकारणे, राजकीय उच्चपदस्थांवर (राष्ट्रपती, राज्यपाल, मंत्री इ.) हल्ला करणे वा त्यांचे अपहरण करणे, राज्यद्रोह किंवा राष्ट्रद्रोह करणे, राष्ट्राची गुपिते फोडणे इत्यादी गुन्हे समाविष्ट आहेत.

**४) संकीर्ण गुन्हे** (Miscellaneous Crimes) : अर्थप्राप्ती, लैंगिक गरजांची पूर्ती व राजकीय हितसंबंधास बाधा आणणे या तीन हेतुशिवाय इतर हेतुंच्या पूर्ततेसाठी केलेले गुन्हे संकीर्ण गुन्हे ठरतात. उदा. वाहतुकीच्या कायद्यांचा किंवा निवडणूकविषयक कायद्यांचा भंग करणारी कृत्ये संकीर्ण गुन्हे ठरतात.

**ड) एडविन लेमर्ट यांनी गुन्ह्याचे तीन प्रकार पाडले आहेत.**

**१) परिस्थितीजन्य गुन्हे** : विशिष्ट परिस्थितीच्या दडपणामुळे व्यक्तीच्या हातून कळत नकळतपणे जे गुन्हे घडतात त्यांना परिस्थितीजन्य गुन्हे म्हणतात. उदा. आत्महत्येचा प्रयत्न करणे.

**२) नियोजनबद्ध गुन्हे :** जे गुन्हे पूर्णपणे नियोजन (Planning) करून केले जातात त्यांना नियोजनबद्ध गुन्हे म्हणतात. उदा. एखाद्या गुन्हेगारी कृत्ये करणाऱ्या टोळीने बँक लुटणे, सुपारी घेऊन एखाद्याचा खून करणाऱ्या व्यक्तीने एखाद्याचा विचारपूर्वक कट रचून खून करणे किंवा खूनाचा प्रयत्न करणे इत्यादी गुन्हे नियोजनबद्ध गुन्हे ठरतील.

**३) विश्वासघाताचे गुन्हे :** एखाद्या व्यक्तीचा विश्वास संपादन करून नंतर त्याची फसवणूक करणारे कृत्य हे याप्रकारचा गुन्हा ठरेल. उदा. एखाद्या व्यक्तीने मोठ्या विश्वासाने दुसऱ्यास उसने दिलेले पैसे परत न करणे. विवाहाचे वचन देऊन नंतर विवाहास नकार देणे इत्यादी.

गुन्ह्याची वरील सर्व वर्गीकरणे ही पूर्णतः समाधानकारक नाहीत. प्रत्येकामध्ये काही ना काही तरी उणीव आहेच. विशिष्टच उद्देश डोळ्यापुढे ठेवून प्रत्येक गुन्हा घडतोच असे नाही. तसेच एकाच गुन्ह्यात गुंतलेल्या वेगवेगळ्या व्यक्तींचे हेतुही वेगवेगळे असू शकतात. तसेच एखादे कृत्य हे गंभीर गुन्हा आहे की सामान्य गुन्हा आहे हे ही स्थळ, काळ व परिस्थितीवर अवलंबून असते. एकंदरीत गुन्हा ही घटना अत्यंत संकीर्ण असल्याने तिचे काटेकोर प्रकार पाडणे कठीण जाते.

## १.४ सारांश :

या प्रकरणामध्ये आपण गुन्हेगारी शास्त्राचा परिचय करून घेऊन त्याची व्युत्पतीशास्त्रीय माहिती घेतली. लॅटीन शब्द, क्रायमेन आणि ग्रीक शब्द लोगॉस पासून क्रिमिनॉलॉजी हा शब्द झाला आहे. त्याचा अर्थ गुन्हेगारीचा अभ्यास असा आहे. गुन्हा ही संज्ञा समजल्याशिवाय गुन्हेगारीशास्त्र समजणार नाही. स्थल काल परत्वे गुन्हा ही संकल्पना बदलते साहजिकच गुन्हेगारीशास्त्रातही फरक पडू शकतो.

गुन्हेगारीशास्त्र आणि दंडशास्त्र या शाखा भगिनी असून गुन्हेगारीशास्त्रासाठी दंडशास्त्राचा अभ्यास महत्वाचा ठरतो.

गुन्हेगारीशास्त्र हे शास्त्र आहे का हा वादाचा विषय असून गुन्हेगारीच्या गुणात्मक व वैविध्यपूर्ण स्वरूपामुळे तसेच संकीर्ण गुन्हेगारी वर्तनामुळे गुन्हेगारीला शास्त्र म्हणणे कठीण आहे.

समाजशास्त्राप्रमाणेच गुन्हेगारीशास्त्राचीही व्याप्ती विशाल आहे. त्यामध्ये गुन्हा, गुन्हेगारी, कारणे, शिक्षा, उपचार पध्दती, पुनर्वसन इ. च्या आभ्यासाचा समावेश होतो. इलिएट, डोनाल्ड तफ्त, सदरलँड इ. नी गुन्हेगारीशास्त्राची व्याप्ती विशद केली आहे.

गुन्हेगारीशास्त्र हे कमी यथार्थ शास्त्र असल्याने गुन्हा गुन्हेगारीचे समाधान कारक स्पष्टीकरण देता येत नाही गुन्हा ही एक बहुआयामी सापेक्ष घटना असल्याने गुन्ह्याची एकच समान स्वीकारार्ह व्याख्या देता येत नाही. समाजशास्त्रा प्रमाणेच गुन्हेगारीशास्त्राचीही व्याप्ती विशाल असून त्यात दंडशास्त्राच्या अभ्यासाचा समावेश होतो. प्रारंभीच्या भूतपिशाच्चादि संकल्पनेपासून आधुनिक कायदेशीर मानस-सामाजिक संकल्पनेपर्यंत गुन्ह्याची संकल्पना बदलली आहे. तथापी गुन्हेगारीची कायदेशीर संकल्पना लोकप्रिय झाली आहे. गुन्हा आणि गुन्हेगारी वर्तन ही संकीर्ण घटना असल्याने तिच्या कारणाबाबतही विविधता आहे. समाजशास्त्रज्ञांनी उध्वस्त कुटुंब, अनैतिक कुटुंब, अतिरिक्त गर्दी, पालकांच्या देखरेखीचा अभाव, सामाजिक नियंत्रणाचा अभाव, चित्रपट यासारख्या परिस्थितीजन्य किंवा पर्यावरणात्मक कारणांचा गुन्हेगारी संदर्भात विचार केला आहे. तथापि गुन्हेगारी आणि सामाजिक कारणातील कार्यकारणभाव असल्याचा निर्णायक पुरावा नाही.

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

★ **स्वयं-अध्ययन प्रश्न-१**

१. लॅटीन Crimen शब्द आणि ग्रीक शब्द logos या दोहोंच्या मिश्रणातून Criminology हा शब्द बनला आहे.

२. प्रत्येक विद्वानाने गुन्हेगारी शास्त्राची व्याख्या विशिष्ट दृष्टिकोनातून केली असल्याने एकच समान व्याख्या देता येत नाही.

३. वेबस्टर यांनी केलेली व्याख्या :

गुन्हा ही एक सामाजिक घटना मानून त्याचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करणे त्यामध्ये गुन्हेगार त्याची मानसिक लक्षणे, त्याच्या सवयी, इ. चा अभ्यास अंतर्भूत आहे.

★ **स्वयं-अध्ययन प्रश्न-२**

१. सीझर लोंब्रोसो यांना आधुनिक गुन्हेगारीशास्त्राचे शिल्पकार म्हणतात.

२. सीझर बेकारीया यांना आधुनिक गुन्हेगारी शास्त्राचे जनक असे म्हणतात.

३. गुन्हेगारी वर्तनाचे अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे गुन्हेगारी शास्त्र होय.

४. विशिष्ट समाजात विशिष्ट वेळेला होणारे कायद्याचे उल्लंघन म्हणजे गुन्हा.

५. अनुभव प्रामाण्यता, निरीक्षण, प्रयोग विश्वसनियता, पडताळणी, गणिती अचूकता इ. शास्त्राच्या वैशिष्ट्याच्या कसोटीवर गुन्हेगारीशास्त्र उतरू शकत नाही.

★ **स्वयं-अध्ययन प्रश्न-३**

१. विशिष्ट प्रदेशातील कायद्याने प्रतिबंधित केलेल्या दंडनिय कृत्याला गुन्हा म्हणतात.

२. भूतपिशाच्चादी, नैतिक आणि कायदेशीर संकल्पना.

३. प्रचालित कायद्याचे उल्लंघन म्हणजे गुन्हा असे कायदेशीर कल्पना मानते.

## १.६ स्वाध्याय/गृहपाठ

**अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या.**

१) गुन्हेगारीशास्त्राची व्याख्या स्पष्ट करा.

२) गुन्हेगारीची प्रारंभिक कल्पना कोणती?

३) गुन्हेगारीची कायदेशीर संकल्पना विशद करा.

**ब) टीपा लिहा.**

१) गुन्ह्याची धार्मिक संकल्पना.

२) गुन्ह्याची नैतिक संकल्पना.

३) गुन्ह्याची समाजशास्त्रीय संकल्पना.

## १.७ क्षेत्रीय कार्य

तुम्ही अभ्यासलेल्या गुन्ह्याच्या संकल्पनेच्या संदर्भात गुन्हेगाराची मुलाखत घ्या.

## १.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) Elliot, M.A. and Merill F.E : Social Disorganization.

२) Sue Titus Read : Crime and Criminology 2nd Edn. Holt Rinehart and Winston Chicago 1980.

३) Paranjape N.V. : Criminology and Penology, Central law agency, Allahabad 1980.

❑❑❑

## घटक २

# गुन्हेगारी वर्तनाविषयीची प्रारंभिक स्पष्टीकरणे

**(Early Explanations of Criminal Behaviour)**

**घटक संरचना**

२.१ प्रस्तावना

२.२ उद्दिष्टे

२.३ विषय विवेचन

२.३.१ अभिजात स्पष्टीकरण

२.३.२ प्रत्यक्षवादी स्पष्टीकरण

२.३.३ मानसशास्त्रीय स्पष्टीकरण

२.३.४ आर्थिक स्पष्टीकरण

२.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ क्षेत्र-कार्य

२.८ चिंतन आणि कार्य

२.९ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## २.१ प्रस्तावना (Introduction)

पहिल्या प्रकरणात आपण गुन्हा किंवा गुन्हेगारी वर्तनाचा अर्थ, व्याख्या, गुन्ह्यांचे वर्गीकरण किंवा प्रकार इत्यादींचे अध्ययन केलेले आहे. आता या दुसऱ्या प्रकरणात आपण गुन्हेगारी वर्तनासंबंधिच्या प्रारंभिक स्पष्टीकरणांचा अभ्यास करणार आहात. स्पष्टीकरण देणे म्हणजे खुलासा करणे किंवा उलगडून सांगणे होय. एखाद्या घटनेचे स्पष्टीकरण करणे म्हणजे त्या घटनेचे स्वरूप कसे आहे किंवा ती घटना कशामुळे घडते याचा खुलासा करणे होय. गुन्हेगारी वर्तनाचे स्पष्टीकरण करणे म्हणजे व्यक्ती गुन्हेगारी वर्तन (म्हणजे गुन्हा) का करते याचा खुलासा करणे किंवा गुन्हेगारी वर्तनास जबाबदार असणारे घटक (किंवा कारणे) उलगडून दाखविणे होय. गुन्हा ही घटना मानव समाजाइतकीच प्राचीन आहे. तथापि, गुन्ह्याचा किंवा गुन्हेगारी वर्तनाचा पद्धतशीर अभ्यास मात्र अलिकडील काळात म्हणजे अठराव्या शतकात सुरू झाला. आणि एक शास्त्र म्हणून गुन्हेगारीशास्त्राचा (Criminology) पाया १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात घातला गेला. गुन्हेगारी वर्तनाच्या अभ्यासाचा जो सुरुवातीचा किंवा प्रारंभीचा कालखंड होता, त्या कालखंडात अनेक

विचारवंतांनी गुन्हेगारी वर्तनाची कारणमीमांसा करणारी सैद्धांतिक स्पष्टीकरणे दिलेली आहेत. त्यांनाच प्रारंभीची स्पष्टीकरणे असे म्हणता येईल. या घटकात आपण वेगवेगळी चार स्पष्टीकरणे अभ्यासणार आहात.

## २.२ उद्दिष्टे (Objectives)

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास –

- गुन्हेगारी वर्तनासंबंधीचे अभिजात स्पष्टीकरण समजावून घेता येईल.
- गुन्हेगारी वर्तनासंबंधीचे प्रत्यक्षवादी स्पष्टीकरण विशद करता येईल.
- गुन्हेगारी वर्तनाविषयीचे मानसशास्त्रीय स्पष्टीकरण सांगता येईल.
- गुन्हेगारी वर्तनाविषयीच्या आर्थिक स्पष्टीकरणाचा खुलासा करता येईल.

## २.३ विषय–विवेचन (Presentation of subject matter)

या घटकात आपण गुन्हेगारी वर्तनाविषयीची चार स्पष्टीकरणे अभ्यासणार आहोत. विवेचनाच्यादृष्टीने या घटकाचे चार विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात अभिजात स्पष्टीकरण, दुसऱ्या विभागात प्रत्यक्षवादी स्पष्टीकरण, तिसऱ्या विभागात मानसशास्त्रीय स्पष्टीकरण तर चौथ्या विभागात भौगोलिक स्पष्टीकरण आपण अभ्यासणार आहोत.

### २.३.१ अभिजात स्पष्टीकरण (Classical Explanation)

इटालियन विचारवंत कैसर बेकॅरिया Cesare Beccaria (१७३८–१७९४) याने गुन्हा आणि शिक्षा याविषयीचे अभिजात स्पष्टीकरण १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात विकसित केले. बेकॅरियावर उपयुक्ततावादी इंग्रज विचारवंत जेरिमी बेंथम आणि जॉन हॉवर्ड यांचा प्रभाव होता. मॉंटेस्क्यू, ह्युम, बेकन, रूसो इत्यादी युरोपियन विचारवंताच्या लिखाणाचासुद्धा प्रभाव बेकॅरियावर पडलेला होता. त्याचाच परिणाम म्हणून त्याचे गुन्ह्यासंबंधीचे अभिजात स्पष्टीकरण उदयास आले.

**अभिजात स्पष्टीकरणातील मध्यवर्ती कल्पना :**

१८ व्या शतकापर्यंत युरोपवर धार्मिक विचाराचा मोठा पगडा होता. व्यक्तीला कोणतेही वर्तन किंवा कृत्य करण्याचे इच्छास्वातंत्र्य (Free-will) नाही. तिचे वर्तन हे अलौकिक शक्तीद्वारे नियंत्रित होते किंवा तिच्या प्रभावाखाली घडते असे मानले जाई. या समजुतीप्रमाणे व्यक्तीचे गुन्हेगारी वर्तनदेखील पाशवी किंवा सैतानी (demon or devil) शक्तीच्या प्रभावामुळे घडते, गुन्हा करणे किंवा न करणे हे व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून नसते म्हणजेच गुन्हा करण्याचे इच्छा–स्वातंत्र्य व्यक्तीस नसते असे मानले जाई. बेकॅरियाने सर्वप्रथम पाशवी शक्तीच्या प्रभावामुळे व्यक्ती गुन्हे करते ही विचारसरणी अमान्य केली आणि कोणतेही कृत्य किंवा वर्तन (– गुन्हेगारी वर्तनसुद्धा) करण्याचे व्यक्तीला इच्छास्वातंत्र्य असते असे मत मांडले.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे १८ व्या शतकापर्यंत युरोपमध्ये न्यायदानाची मनमानी पद्धती प्रचलित होती. म्हणजे न्यायाधीश त्यांच्या लहरीनुसार किंवा मनमानेल त्याप्रमाणे न्यायदान करीत. तसेच शिक्षण देण्याच्या पद्धतीसुद्धा रानटीपणाच्या होत्या. म्हणजेच अगदी साध्या-साध्या गुन्ह्यासाठीसुद्धा कठोर शिक्षा दिल्या जात. अशा ह्या लहरी व रानटी न्यायदानास व शिक्षापद्धतीस विरोध करण्यासाठी बेकॅरिया याने अभिजात स्पष्टीकरण मांडले आणि व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कांचे स्वातंत्र्याचे व हितसंबंधाचे संरक्षण होईल अशा प्रकारची कायदेव्यवस्था व न्यायव्यवस्था असावी असे मत किंवा विचारसरणी आग्रहाने मांडली. बेकॅरिया आणि इतर अभिजातवादी विचारवंतांना समाजाच्या किंवा राज्याच्या उदयाचा 'सामाजिक करार' हा सिद्धांत (हॉब्ज, लॉक व रूसो यांनी मांडलेला) मान्य होता. समाज किंवा राज्यसंस्था ही सार्वभौम नाही. स्वतंत्र व समान असणाऱ्या व्यक्तींनी आपल्या वर्तनाचे नियंत्रण करण्यासाठी तसेच वैयक्तिक व सामूहिक हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी परस्परांशी एक करार करून त्याद्वारे राज्याची स्थापना केलेली आहे असे सामाजिक करार सिद्धांत सांगतो. या सिद्धांतानुसार प्रत्येक व्यक्ती ही स्वतंत्र, विवेकी (rational) आणि सार्वभौम (sovereign) असून तिला आपले हित कळते तसेच आपल्या कृत्याचे होणारे इष्टानिष्ट परिणाम ओळखण्याचीही क्षमता किंवा विवेकशक्ती तिच्याकडे असते असे मानले गेले. ह्या विचाराचा प्रभाव पडून अभिजातवादी विचारवंतांनी राज्यसंस्था सार्वभौम असते हा विचार नाकारला आणि राज्याचे अधिकार किंवा सत्ता ही केवळ व्यक्तींच्या स्वातंत्र्याचे व हक्काचे रक्षण करण्यापुरतीच मर्यादित असावी असे विचार मांडले. व्यक्तींच्या स्वातंत्र्याचे व हक्कांचे संरक्षण करण्यासाठी राज्याने/कायदेमंडळाने कायदे करावेत. या कायद्यांचे उल्लंघन हे गुन्हा मानावे. आणि गुन्ह्याच्या प्रमाणातच गुन्हेगारास शिक्षा व्हावी असे विचार अभिजातवादी विचारवंतांनी मांडले.

**अभिजात स्पष्टीकरणातील गृहीत तत्त्वे :**

१) व्यक्तीचे वर्तन हे सहेतूक (Purposive) आणि तार्किक किंवा विवेकी (rational) असते. तसेच ते वर्तन हे सुखवादावर (hedonism) आधारलेले असते. म्हणजेच ''आनंद किंवा सुख मिळावे आणि दुःख टळावे'' या तत्त्वावर आधारलेले असते.

२) गुन्हा केल्याने व्यक्तीला कोणते तरी सुख मिळत असते किंवा कोणत्यातरी दुःखापासून मुक्ती मिळत असते म्हणून ती जाणिवपूर्वक गुन्हा करीत असते.

३) प्रत्येक गुन्ह्यासाठी अशी शिक्षा निर्धारित केली पाहिजे की जी गुन्हा केल्याने मिळणाऱ्या सुखापेक्षा अधिक प्रमाणात दुःखदायक असेल.

४) शिक्षा ही कठोर (severe) आणि दहशतकारी (deterrent) नसावी तर ती गुन्ह्याच्या प्रमाणातच असावी. म्हणजे जेवढ्या प्रमाणात गुन्हा घडलेला आहे तेवढ्या प्रमाणातच असावी. त्यापेक्षा कमी वा जास्त नसावी. तसेच शिक्षा ही पूर्वनिर्धारित, शीघ्र आणि सर्वश्रुत असावी.

५) सर्व नागरिकांना कायदा समान पद्धतीने लागू करावा म्हणजेच कायद्यापुढे सर्वांना समान लेखावे. त्यामध्ये पक्षपात किंवा भेदभाव करू नये.

६) कायदेमंडळाने स्पष्ट व निसंदिग्ध स्वरूपाचे कायदे करावेत. न्यायाधीशांनी केवळ न्यायनिवाडाच करावा. कायद्याचा अन्वयार्थ (inter pretation) लावण्याच्या फंदात त्यांनी पडू नये. म्हणजेच

व्यक्तीने कायदेभंग (गुन्हा) केला आहे किंवा नाही एवढेच न्यायाधीशांनी पहावे आणि कायदेभंग केला असल्यास कायद्यात निर्धारित केलेलीच (स्वतःच्या मतानुसार नव्हे) शिक्षा सुनवावी.

**अभिजात स्पष्टीकरणाचे मूल्यमापन :**

गुन्हेगारी वर्तन हे पाशवी शक्तीच्या प्रभावामुळे नव्हे तर व्यक्तीच्या स्वइच्छेने जाणिवपूर्वकपणे घडते असे विचार मांडून बेकॅरियाने गुन्ह्यासंबंधीच्या मध्ययुगातील अंधश्रद्धा व काल्पनिक विचारसरणीवर जोरदार हल्ला केला. सामाजिक वर्तन प्रतिमानांचे उल्लंघन हे गुन्हा मानून गुन्हेगारी वर्तनास निश्चित अर्थ प्राप्त करून दिला. त्याने लिहिलेल्या "Essays on Crimes and Punishment." या कृतीस संपूर्ण युरोपमध्ये मोठी प्रसिद्धी मिळाली आणि त्यामुळे गुन्हेगारीविषयीच्या एका नवीन विचारसरणीस समकालीन युरोपमध्ये मोठे उत्तेजन मिळाले. त्याने मानवाच्या नैसर्गिक हक्कांच्या व स्वातंत्र्याच्या संरक्षणाचा जोरदार पुरस्कार करून गुन्हेगारी कायद्यांना (Criminal Laws) सहृदयी किंवा सुसंस्कृत बनविण्याचा प्रयत्न केला. कारण बेकॅरिया व अन्य अभिजातवादी विचारवंतानी साध्या साध्या गुन्ह्यासाठी कठोर व दहशतकारी शिक्षांविरुद्ध आवाज उठविला. फाशी किंवा देहदंडाच्या (मृत्यूदंड) शिक्षेस, किंवा देशाबाहेर हद्दपार करणे यासारख्या शिक्षांना विरोध केला. फ्रेंच विचारवंत व्हाल्तेअर याने बेकॅरियाच्या विचाराचे समर्थन केले. परिणामी अनेक युरोपियन राष्ट्रांनी आपल्या पिनल कोडमध्ये दुरुस्त्या/सुधारणा करून कठोर व रानटी शिक्षांचे उच्चाटन केले. यातूनच पुढे काही राष्ट्रांनी फाशीची/देहदंडाची शिक्षा रद्द ठरविली. थोडक्यात अभिजात स्पष्टीकरणाने गुन्हेगारीविषयीच्या विचारसरणीचे विवेकीकरण (rationalization) केले.

वरीलप्रमाणे **अभिजातवादी स्पष्टीकरणाचे** गुण असले तरी त्यामध्ये पुढील प्रमुख **दोष** किंवा **उणिवा** आढळतात.

१. या स्पष्टीकरणातील प्रमुख उणिव ही आहे की हे स्पष्टीकरण व्यक्तीस इच्छास्वातंत्र्य आहे या अमूर्त (abstract) गृहीततत्त्वापासून सुरू होते आणि पुढे मात्र ते गुन्हेगाराच्या मानसिक स्थितीवर लक्ष केंद्रीत न करता केवळ मानवाच्या मूर्त कृतीवर (concreate act) म्हणजे गुन्ह्यावर (crime) पूर्णपणे विसंबून राहते.

२. या स्पष्टीकरणातील दुसरी उणिव किंवा दोष म्हणजे ते गुन्हेगाराचे वय, लिंग, बुद्धिमत्ता इत्यादीकडे दुर्लक्ष करून समान गुन्ह्यासाठी समान शिक्षेचा पुरस्कार करते. गुन्हेगार नवखा (पहिल्यांदाच गुन्हा करणारा) आहे की सराईत (वारंवार गुन्हा करणारा) आहे, तसेच त्याने केलेला गुन्हा साधा आहे की महाभयानक (गंभीर) आहे हे विचारात न घेता समान शिक्षा करणे हे मान्य होण्यासारखे नाही. एखाद्या लहान व मंदबुद्धीच्या बालकाने केलेली पहिली चोरी व एखाद्या सराईत गुन्हेगाराने केलेली चोरी यांना एकाच मापाने मोजून त्या दोघांनाही समान शिक्षा देण्याची अभिजातवाद्यांची विचारसरणी अन्यायकारक ठरेल.

३. व्यक्तीच्या गुन्हेगारी वर्तनाचे (किंबहुना कोणत्याही वर्तनाचे) स्पष्टीकरण स्वतंत्र-इच्छाशक्तीच्या (Free-will) आधारे करणे तसेच सुखवादाच्या आधारे शिक्षा निर्धारित करणे ही विचारसरणी किंवा तत्त्वज्ञान अव्यवहार्य आहे. कारण व्यक्ती प्रत्येक वेळी स्वच्छेने किंवा

जाणिवपूर्वक गुन्हा करतेच असे नाही. कांही वेळा इच्छा नसतानाही, केवळ परिस्थितीच्या दबावामुळे तसेच अजाणतेपणेही (नकळतपणे) व्यक्तीच्या हातून गुन्हा घडू शकतो. तसेच सुखदुःखाचे मोजमाप करता येत नाही. हे अभिजात स्पष्टीकरण विचारात घेतलेले नाही.

४. बेकॅरिया तसेच बेंथम यांना गुन्हेगारीचे नियंत्रण करणे व गुन्हेगारीशास्त्राचे सिद्धांत विकसित करणे यापेक्षा फौजदारी कायद्यात सुधारणा करणे, ज्युरीपद्धतीतील दोष काढून टाकणे, शिक्षेतील कठोरपणा व रानटीपणा नष्ट करणे, हद्दपार व फाशीसारख्या शिक्षा रद्द करणे इत्यादीमध्येच अधिक रूची होती अशी ही टिका केली जाते.

५. अभिजातवादी विचारवंताचे विचार हे केवळ आरामखुर्चीतील चिंतन असून त्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव आहे अशीही टीका केली जाते.

या स्पष्टीकरणात वरीलप्रमाणे दोष किंवा उणिवा असल्यातरी त्याने जुलमी शिक्षांचा आधार न घेता अंमलात आणण्यास सोपे असलेले गुन्ह्यासंबंधीचे एक नवीन धोरण सुचविले. गुन्हा व गुन्हेगारासंबंधीच्या जुन्या धार्मिक व भ्रामक कल्पनांच्या विरोधात बेकॅरियानेच प्रथम आवाज उठविला आणि दोषारोप व शिक्षा निर्धारित करण्यासाठी गुन्हेगाराच्या व्यक्तिमत्त्वावर भर दिला. त्याने गुन्हेगारीच्या कारणासंबंधीच्या नंतरच्या सिद्धांतांना विवेकनिष्ठ अशी पार्श्वभूमी पुरविली आणि त्याद्वारे आधुनिक गुन्हेगारीशास्त्राचा व दंडशास्त्राचा पाया घातला.

**नव–अभिजात स्पष्टीकरण (Neo-classical explanation)**

अभिजातवाद्यांनी क्लेशदायक शिक्षांना विरोध दर्शवून ''एकाच/समान गुन्ह्यासाठी सर्वांना समान शिक्षा देण्यात यावी.'' या तत्त्वाचा पुरस्कार केला. तथापि हे तत्त्व अवास्तववादी असल्याने त्याच्यावर जोरदार टीका होऊ लागली. त्यामुळे १९ व्या शतकाच्या पहिल्या व दुसऱ्या दशकात कांही ब्रिटिश विचारवंतानी अभिजात स्पष्टीकरणामध्ये दुरुस्ती किंवा सुधारणा केली आणि समान गुन्ह्यासाठी समान शिक्षा हे तत्त्व नाकारून किमान व कमाल शिक्षांची तरतूद केली व शिक्षा पद्धतीत न्यायसंगतपणा आणला. या विचारवंतांना नव अभिजातवादी विचारवंत असे म्हणतात. शिक्षा करताना गुन्हेगाराचे वय, मानसिक स्थिती, विवेकशिलता किंवा बौद्धिक दर्जा इत्यादी घटक विचारात घ्यावेत असे ह्या नव–अभिजातवाद्यांनी प्रतिपादन केले. आणि त्यानुसार त्यांनी लहान मुले, मतिमंद व्यक्ती, वेडे, मनोरुग्ण इत्यादींना कायदेशीर तरतुदीपासून दूर ठेवावे असे सुचविले. कारण त्यांना आपल्या वर्तनाच्या परिणामाची योग्यायोग्यता (बरेवाईटपणा) ठरविता येत नाही. तसेच ह्या विचारवंतानी नवखा गुन्हेगार (प्रथमच गुन्हा करणारी व्यक्ती) आणि सराईत गुन्हेगार यांच्यातही फरक केला आणि दोघांसाठी वेगवेगळ्या शिक्षा असाव्यात असे सूचविले. आरोपीची मानसिक संतुलन स्थिती विचारात घेऊन शिक्षा करावी असेही त्यांनी प्रतिपादन केले. नवअभिजातवाद्यांच्या या विचारातूनच पुढे पॅरोल, परीविक्षा, मुक्त तुरुंग, शिक्षेची सुधारणात्मक पद्धती इत्यादी गोष्टी उदयास येण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाले. असे असले तरी नव–अभिजातवाद्यांनी स्वतंत्र इच्छाशक्ती आणि सुखवादाचा सिद्धांत यांचा पुरस्कारच केला. त्यामुळे त्यांचे विचार हे गुन्हेगारीशास्त्रात अशास्त्रीयच मानले जातात. नव–अभिजातवाद्यांनी गुन्हेगारीशास्त्राविषयी व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोन स्वीकारला आणि व्यक्ती ज्या परिस्थितीत गुन्हा करते त्या परिस्थितीवर लक्ष केंद्रीत केले.

### २.३.२ प्रत्यक्षवादी स्पष्टीकरण (Positive Explanation)

गुन्हेगारी वर्तनाच्या कारणमीमांसाचे दुसरे प्रारंभिक स्पष्टीकरण म्हणजे प्रत्यक्षवादी स्पष्टीकरण होय. प्रत्यक्षवादी स्पष्टीकरण हे अभिजातवाद्यांची स्वतंत्र इच्छाशक्तीची कल्पना नाकारते व त्याऐवजी नियतीवादाचा (determinism) पुरस्कार करते. गुन्हेगारी वर्तनास कांही जैविक किंवा आनुवंशिक म्हणजेच शारीरिक घटक जबाबदार असतात असे प्रत्यक्षवादी स्पष्टीकरण सांगते. **इटालियन गुन्हेगारीशास्त्रज्ञ कैसल लोम्ब्रोसो, एन्रिको फेरी आणि रॅफेल गॅरोफॅलो ह्या तिघांनी प्रत्यक्षवादी स्पष्टीकरणाचा पुरस्कार केलेला आहे.** त्यामुळे या स्पष्टीकरणास इटालियन स्पष्टीकरण असेही म्हणतात. हे स्पष्टीकरण समजण्यासाठी ह्या तिघांचे विचार समजावून घेऊ.

**अ) लोम्ब्रोसो** (१८३६-१००९) हे डॉक्टर व क्लिनिकल सायकियॅट्रीक होते. तसेच त्यांना गुन्हेगारांचा मानवशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्यामध्ये विशेष रूची होती. इटलीच्या लष्करात डॉक्टर म्हणून काम करताना त्यांनी हजारो सैनिकांच्या शारीरिक वैशिष्ट्यांचा अभ्यास केला. तसेच पुढे तुरुंगातही डॉक्टर म्हणून काम करताना अनेक कैद्यांच्याही शारीरिक वैशिष्ट्यांचा अभ्यास केला. या अभ्यासाच्या आधारे त्याने १८७६ मध्ये उत्क्रांतीवादी पुर्वजानुरूपता सिद्धांत (Theory of evolutionary atavism) या नावाचा सिद्धांत मांडला. या सिद्धांतास शारीरिक गुन्हेगारी प्रकार (physical criminal type) तसेच जन्मजात गुन्हेगाराचा सिद्धांत (Theory of born criminals) असेही म्हणतात.

लष्करातील रुग्ण सैनिकांच्या व तुरुंगातील गुन्हेगारांच्या मानवशास्त्रीय अभ्यासाद्वारे लोम्ब्रोसोने असे मत मांडले की बिगरगुन्हेगार व्यक्ती व गुन्हेगार व्यक्ती यांच्या शारीरिक वैशिष्ट्यांमध्ये मोठी तफावत असते. गुन्हेगार व्यक्तीमध्ये कांही खास अशी विलक्षण शारीरिक वैशिष्ट्ये असतात, जी सामान्य किंवा गुन्हेगार नसलेल्या (non criminal) व्यक्तींमध्ये नसतात. लोम्ब्रोसोने जवळपास अशी १६ शारीरिक वैशिष्ट्ये नमूद केलेली आहेत. त्यापैकी कांही प्रमुख पुढीलप्रमाणे आहेत. ''अरुंद कपाळ, फुगीर व पसरट नाकपुड्या, अप्रमाणबद्ध कवटी, अतिशय वक्राकार भुवया, कानाच्या मोठ्या पाळ्या, दुःखाविषयी सापेक्ष असंवेदनशीलता, दाट व कुरळे केस, आक्रमक व रागीट स्वभाव, लांब व सपाट हनुवटी, अप्रमाणबद्ध दात, विस्तृत जबडा, मांसल ओठ इत्यादी.'' अशी ही रानटी आणि कनिष्ठ दर्जाच्या प्राण्यांमध्ये असलेली वैशिष्ट्ये मानवाच्या पूर्वजांमध्ये होती. अशी ही वैशिष्ट्ये घेऊन जन्मलेली व्यक्ती ही गुन्हेगार असते असे लोम्ब्रोसोचे मत आहे. अशा गुन्हेगारास जन्मजात गुन्हेगार (Born criminals) ही संज्ञा वापरतात. अशी ही मानवाच्या अतिदूरच्या पूर्वजाची रानटी शारीरिक वैशिष्ट्ये व्यक्तीमध्ये प्रकट होणे यालाच biological throwback किंवा atavism असे म्हणतात. अशाप्रकारे आपल्या जीवशास्त्रीय व मानवशास्त्रीय अभ्यासाच्याधारे लोम्ब्रोसोने डार्विनचा जीवशास्त्रीय नियतीवाद (biological determinism) गुन्हेगारी वर्तनामध्ये आढळतो असे दाखवून दिले आहे. यालाच उत्क्रांतीवादी पूर्वजानुरूपता सिद्धांत असे म्हणतात.

लोम्ब्रोसोने गुन्हेगारांचे तीन प्रकार पाडलेले आहेत.

**१) आनुवंशिक किंवा जन्मजात गुन्हेगार :** वर नमूद केलेली रानटी शारीरिक वैशिष्ट्ये असलेल्या गुन्हेगारांना आनुवंशिक किंवा जन्मजात (Hereditary or Born) गुन्हेगार म्हणतात. अशा गुन्हेगारांसाठी लोम्ब्रोसोने Atavists ही संज्ञादेखील वापरली आहे. हे गुन्हेगार जन्मानेच गुन्हेगार

असतात. पर्यावरणातील घटकांचा त्यांच्या गुन्हेगारी वर्तनाशी किंवा प्रवृत्तीशी कांहीही संबंध नसतो. त्यामुळे ह्या प्रकारच्या गुन्हेगारात सुधारणा होऊ शकत नाही असे लॉम्ब्रोसो म्हणतात.

**२) वेडसर गुन्हेगार** (Insane Criminals) : मानसिक विकृती किंवा अव्यवस्था (Mental depravity or disorder) असल्यामुळे ज्या व्यक्ती गुन्हेगारी वर्तनाचा आश्रय घेतात त्यांना वेडसर गुन्हेगार म्हणतात.

**३) क्रिमीनॉईड्स** (Criminoids) : आपल्यातील न्यूनतावर (inferiority) मात करून आपले अस्तित्व टिकविण्याशी संबंधित असलेल्या गरजा भागविण्यासाठी ज्या व्यक्ती गुन्हेगारी वर्तन करतात त्यांना क्रिमीनॉईड्स असे म्हणतात.

**परिक्षण :** लोम्ब्रोसोच्या विचारावर अनेकांनी जोरदार टीका केलेली आहे. **चार्लस बकमन गोरिंग** या इंग्रज डॉक्टरने तीन हजार गुन्हेगारांच्या ९६ शारीरिक वैशिष्ट्यांचा सांख्यिकी-गणिती पद्धतीने अभ्यास करून असा निष्कर्ष काढला की गुन्हेगारी वर्तन किंवा प्रवृत्ती ही आनुवंशिकतेने प्राप्त होत नाही. शारीरिक वैशिष्ट्ये व गुन्हेगारी वर्तन यांच्यात कांहीही संबंध नाही. **गॅब्रिएल-द तार्द** ह्या फ्रेंच गुन्हेगारीशास्त्रज्ञाने लोंब्रोसोच्या सिद्धांतावर टीका करताना असे म्हटले आहे की गुन्हेगारी वर्तन हे शिकण्याच्या प्रक्रियेचा परिणाम आहे. त्यामुळे व्यक्तीचे शारीरिक रूप किंवा दिसणे (appearance) व गुन्हेगारी प्रवृत्ती यांच्यात कांही प्रत्यक्ष संबंध आहे असा तर्क करणे म्हणजे गुन्हेगारीच्या वास्तविक कारणांकडे दुर्लक्ष करण्यासारखे आहे. तसेच त्याने डोक्याच्या कवटीचा आकार, मेंदू व व्यक्तीचे सामाजिक वर्तन इत्यादीमध्ये सहसंबंध असतो ह्या मतासही कडाडून विरोध केला. लोम्ब्रोसोच्या स्पष्टीकरणावर पुढील आक्षेप घेतले जातात.

१) लोम्ब्रोसोचे तथ्य संकलन हे केवळ जैविक घटकापुरतेच मर्यादित होते व त्यांनी मानसिक व सामाजिक घटकांकडे दुर्लक्ष केले.

२) सामान्यीकरण करताना त्यांनी तथ्यांचा अयोग्य वापर केला. त्यामुळे सिद्धांत व तथ्य यांच्यात दरी निर्माण झाली.

३) त्यांच्या संशोधनाची तऱ्हा (रीत) ही मुख्यतः वर्णनात्मक असून प्रयोगात्मक नव्हती

४) पुर्वजानूरूपतेसंबंधीचे त्याचे सामान्यीकरण हे केवळ एकाच उदाहरणावरून केलेले असल्याने अशास्त्रीय होते.

५) तार्दच्या मते पुरूष गुन्हेगारासारखीच शारीरिक न्यूनता असलेल्या स्त्रियांत गुन्ह्याचे प्रमाण कमी का आढळते याचा खुलासा लोम्ब्रोसोच्या सिद्धांताद्वारे मिळत नाही.

असे असले तरी लोम्ब्रोसोचे गुन्हेगारीशास्त्रातील योगदान महत्त्वाचे आहे. त्यानेच सर्वप्रथम गुन्ह्याऐवजी गुन्हेगाराच्या व्यक्तिमत्त्वाच्या अभ्यासाकडे लक्ष केंद्रित केले. गुन्हेगारी वर्तनाच्या अभ्यासात वैज्ञानिक पद्धतीचा (अनुभवजन्य व विगामी पद्धतीचा) सर्वप्रथम वापर त्यांनेच केला. म्हणूनच त्यांना आधुनिक गुन्हेगारीशास्त्राचा जनक मानले जाते. आपल्या पुर्वजानूरूपता (atavism) ह्या सिद्धांताच्या निरर्थकतेची खात्री करून घेताना लोम्ब्रोसो यांनी आपल्या नियतीवादाचा विस्तार गुन्हेगाराच्या सामाजिक व आर्थिक परिस्थिती विचारात घेण्यापर्यंत केला. तसेच सर्वच गुन्हेगार हे

जन्मजात गुन्हेगार असतात हे अमान्य केले. कांही गुन्हेगार हे साधारण (सामान्य शारीरिक व मानसिक लक्षणे असलेले), कांही आकस्मिक तर कांही भावनाप्रधान असतात असेही त्याने मान्य केले.

### ब) एन्रिको फेरी (१८५६–१९२८)

हा ही प्रत्यक्षवादाचा पुरस्कर्ता आहे. त्याने लोम्ब्रोसोच्या मतास आव्हान देऊन असे मत मांडले की गुन्हेगारी वर्तनाचे स्पष्टीकरण केवळ जैविक किंवा शारीरिक घटकांच्या आधारे करणे पुरेसे नाही. त्यासाठी इतरही कांही घटक उदा. मानसिक, सामाजिक, भौगोलिक इ. विचारात घेतले पाहिजेत. कारण व्यक्तीची गुन्हेगारी प्रवृत्ती निर्धारित करण्यामध्ये त्यांचीही भूमिका महत्त्वाची असते. फेरीने गुन्ह्यासंबंधीचा मांडलेला सिद्धांत Law of Criminal Saturation या नावाने ओळखला जातो. या सिद्धांतानुसार गुन्हा ही घटना १) भौतिक किंवा भौगोलिक, २) मानवशास्त्रीय व ३) मानसशास्त्रीय किंवा सामाजिक अशा तीन घटकांमुळे घडून येते. फेरीच्या मते आजच्या गतिशील समाजात सामाजिक परिवर्तन वेगाने होत असून त्याचा परिणाम म्हणून समाजात विसंवाद, संघर्ष व सांस्कृतिक बदल/स्थित्यंतर निर्माण होत आहे आणि त्यामुळे सामाजिक विघटनास चालना मिळून सामाजिक नियंत्रणाची पारंपरिक यंत्रणा कोलमडून पडली आहे. या सर्वाचा परिणाम म्हणून गुन्हेगारीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. समाजिक परिस्थितीतील विजातियतेमुळे अनुकूल किंवा हितकारक सामाजिक संबंध नष्ट होत असून समाजात पोकळी निर्माण होत आहे आणि ही परिस्थिती गुन्हेगारीस पोषक ठरत आहे. फेरीच्या अशा विचारांमुळे त्याला गुन्हेगारी समाजशास्त्राचा जनक म्हटले जाते. फेरीने गुन्हेगारांचे १) जन्मजात (born) गुन्हेगार, २) प्रासंगिक (occasional) गुन्हेगार, ३) भावनाप्रधान (passionate) गुन्हेगार, ४) विकृत किंवा वेडसर (insane) गुन्हेगार व ५) सराईत (habitual) गुन्हेगार असे पाच प्रकार पाडले आहेत.

जीवनातील परिस्थितीमुळे व्यक्ती गुन्हेगार बनते म्हणून गुन्ह्यास प्रतिबंध करण्याच्या कार्यक्रमात अशी परिस्थिती नष्ट करण्यावर भर द्यावा असे फेरी सुचवितो. गुन्हेगारास सुधारण्यासाठी शिक्षा ही एक पद्धती असू शकते असे मानून फेरी अनिश्चित शिक्षेचा पुरस्कार करतो. शिवाय सूड घेण्याच्या हेतूने शिक्षा करू नये असेही सुचवितो. गुन्हेगाराचे समाजात पुनर्वसन/पुनर्समायोजन करण्यावर तो भर देतो.

### क) रॅफेल गॅरोफॅलो (१८५२–१९३४)

इटालीतील न्यायालयात प्रथम वकील असलेला व नंतर न्यायमंत्री बनलेल्या गॅरोफॅलोने प्रत्यक्षवादाचा पुरस्कार करून गुन्हेगाराच्या जीवनाच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यावर भर दिला. त्याच्या मते गुन्हा असे कृत्य आहे जे सामान्य लोकांच्या दया किंवा करूणेच्या आणि सचोटीच्या भावनेस ठेच पोहचविते व समाजाच्यादृष्टीने धोकादायक असते. दयेच्या अभावामुळे व्यक्तिविरुद्धचे तर सचोटीच्या अभावामुळे मालमत्तेविरुद्धचे गुन्हे घडतात असे तो म्हणतो. त्याने गुन्हेगारांचे चार प्रकार पाडले आहेत. १) खूनी (endemic or murderes), २) हिंसक गुन्हेगार जे धार्मिक, राजकीय, व मानसन्मान याबाबतच्या पूर्वग्रहामुळे प्रभावित झालेले असतात, ३) सचोटीच्या भावनेचा अभाव असणारे गुन्हेगार, ४) कामातुर किंवा विषयासक्त गुन्हेगार जे लैंगिकता व पावित्र्यविषयक गुन्हे करतात. त्याने गुन्हेगारासाठी देहदंड, आजन्म कारावास, हद्दपारी व भरपाई अशा शिक्षांचा

पुरस्कार केला. न्यायाधीश म्हणून असलेला अनुभव व फ्रान्समधील गुन्हेगारांना सुधारण्यासाठी केलेल्या योजनांची असफलता पाहून गॅरोफॅलो हा गुन्हेगारांमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या बाबतीत फारसा आशावादी नव्हता. त्यामुळे सामाजिक संरक्षणासाठी त्याने जे गुन्हेगार समाजात अनुकूलता/समायोजन (adoptation) साधू शकत नाहीत अशा सराईत गुन्हेगारांच्या निराकरणावर भर दिला.

**ड) ई. ए. हूटन**

या अमेरिकन शारीरिक मानवशास्त्रज्ञांने देखील प्रत्यवादाचा पुरस्कार केला. त्याने १३८७३ पुरूष कैद्यांची ३२०२ सामान्य (कैदी नसलेल्या) पुरूषांशी तुलना करून असा निष्कर्ष काढला की गुन्हेगारीचे मूळ कारण जीवशास्त्रीय न्यूनता (biological inferjority) आहे. यासंदर्भात त्यांचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

१) निमुळते कपाळ, पातळ ओठ, सरळ केस, पातळ दाढी, अंगावर केस, डोक्यावर दाट केस, लाल-तपकिरी रंग, निळे व संमिश्र रंगाचे डोळे, लांबट निमूळती मान, झुकलेले खांदे, पुढे आलेले व लहान आकाराचे कान, इत्यादी जीवशास्त्रीय न्यूनता गुन्हेगाराच्या ठिकाणी असतात. (मात्र या शारीरिक वैशिष्ट्यांना जीवशास्त्रीय न्यूनता का म्हणावयाचे हे दाखविण्यात हूटन अपयशी ठरलेला आहे.)

२) विशिष्ट शारीरिक वैशिष्ट्ये असणारी व्यक्ती विशिष्ट प्रकारचे गुन्हे करते. उदा. उंच व सडपातळ व्यक्ती खून व दरोडेखोरीकडे झुकते तर उंच व सशक्त व्यक्तीचा कल फसवणुकीकडे असतो. ठेंगू व सशक्त बांधा असणारी व्यक्ती चोरी, घरफोडी व लैंगिक गुन्हे करण्याकडे झुकते. मात्र जार्ज बी. व्हॉल्डने असे म्हटले आहे की हूटनने अभ्यासलेल्या गुन्हेगारांनी वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हे केलेले होते.

३) गुन्हेगारांच्यात अवयवात्मक न्यूनता असते.

४) शारीरिक व मानसिक न्यूनता असणाऱ्यांची नसबंदी (sterilization) करून गुन्हेगारी कमी करणे शक्य आहे.

५) प्रत्येक समाजात प्रतिभाशाली व्यक्ती थोड्याच असतात व सामान्य व्यक्तींचा मोठा जमाव असतो. ढीगभर मतीमंद असतात आणि बहुसंख्य गुन्हेगार असतात.

६) जीवशास्त्रीय न्यूनता असणाऱ्या व्यक्ती तीन प्रकारच्या असतात अ) जैविकदृष्ट्या अनुकूलन साधू न शकणारे, ब) मानसिकदृष्ट्या अविकसित असलेले, क) समाजशास्त्रीयदृष्ट्या विकृत (warped) असलेले.

कोहेने, लिंडस्मिथ, शूसलर इत्यादींनी हूटनच्या सिद्धांतावर टीका केली आहे. त्यांच्या मते हूटनने निवडलेल्या बिगर-गुन्हेगार व्यक्तींचा समूह लहान आकाराचा होता व तो मानसिकदृष्ट्या सुस्थितीत व शारीरिकदृष्ट्या बलवान असणाऱ्यांचे प्रतिनिधीत्व करणारा होता. गुन्हेगारांचा नमुना (sample) ही प्रातिनिधीक नव्हता कारण त्यामध्ये केवळ कैदीच होते. हूटनची संशोधन पद्धती सदोष होती. कारण त्याच्याकडे जैविक न्यूनतेचा निश्चित मानदंड नव्हता. तसेच शारीरिक न्यूनता आनुवंशिक असते याचा पुरावाही त्याने दिलेला नाही.

**ई) विल्यम एच. शेल्डन :**

याने गुन्हेगारीचा संबंध मानवाच्या शरीर प्रकृतीशी (Physical constitution) जोडला. त्या आधारे त्याने व्यक्तींचे तीन वर्ग पाडले.

**१) एन्डोमोर्फिक –** या गटातील व्यक्तींमध्ये लहान हाडे, लहान अंगकाठी, मऊ, चिकनी व मखमली त्वचा अशी शारीरिक वैशिष्ट्ये असतात. या व्यक्ती मूलतः बर्हिमुखी (extroverts) स्वभावाच्या असून त्या ऐषोरामी जीवन पसंत करतात.

**२) एक्टोमोर्फिक –** या गटातील व्यक्तींचे शरीर दुबळे व कोमल असते व हाडेही छोटी असतात. त्या अंतर्मूखी (introverts) असतात. गोंधळाविषयी ते संवेदनशील असतात. गर्दीपासून त्या दूर पळतात. आणि त्यांना नेहमीच थकवा जाणवतो.

३) **मेर्सोमोर्फिक** – या गटातील व्यक्तींची हाडे व मांसपेशी मजबूत असतात. छाती भरदार असते. हात व मनगट दणकट असते. या व्यक्ती क्रियाशील, गतिशील व आक्रमक असतात. हूटन म्हणतो गुन्हेगार व्यक्ती प्रामुख्याने या गटातील असतात.

**फ) जुळ्यांचा अभ्यास (Studies of twins)**

आनुवंशिकतेचा गुन्हेगारी वर्तनाशी असलेला संबंध तपासण्यासाठी **जोहान्स लेंज** (जर्मनी) यांनी जर्मनीतील तुरुंगातील जुळ्या मुलांची, तरुंग वा इतर कोणत्याही संस्थेत नसलेल्या जुळ्या मुलांशी तुलना केली असता त्यांना १५ पैकी १० समरूपी जुळ्यांमध्ये (identical twins) एकसारख्या गोष्टी वा समान गोष्टी (concordant) आढळल्या. याउलट समरूपी नसलेल्या जुळ्यांमध्ये (non-identical twins) १७ पैकी १५ जुळ्यांमध्ये एकसारख्या नसलेल्या गोष्टी किंवा असमान गोष्टी (discordant) आढळल्या. के. ओ. ख्रिस्तीयनसेन यांनी डेन्मॉर्कमधील ६००० जुळ्या जोड्यांचा अभ्यास केला. त्यामध्ये त्यांना असे आढळले की गुन्हेगारी वर्तनाच्या संदर्भात समरूपी जुळ्या मुलांमध्ये ६६.७ टक्के सादृश्य (एकसारखेपणा) होते तर भ्रातृक जुळ्या मुलांमध्ये ३०.४ टक्के सादृश्य होते. अशाप्रकारे आनुवंशिकता गुन्हेगारीस जबाबदार असते असे दाखविण्याचा प्रयत्न केला गेला. पण हा प्रयत्न वादग्रस्त ठरतो. कारण समरूपी जुळ्यांच्या वर्तनात जो एकसारखेपणा आढळला तो समान पर्यावरणात राहण्याचा परिणाम असू शकतो व त्यामुळे त्याचा संबंध आनुवंशिकतेशी आहे असे ठामपणे म्हणता येत नाही. दुसरी गोष्ट अशी की आनुवंशीकता गुन्हेगारीचे कारण मानल्यास समरूपी जुळ्यातील एक मूल गुन्हेगार आहे व दुसरे गुन्हेगार नाही असे असता कामा नये. परंतु तसे आढळते. त्यामुळे आनुवंशिकतेस गुन्हेगारीचे कारण मानणे कठीण जाते.

**२.३.३ मानसशास्त्रीय स्पष्टीकरण** (Psychological explanation)

गुन्हेगारी वर्तनास कांही मानसिक घटक जबाबदार असतात असे मानसशास्त्रीय स्पष्टीकरण मानते. व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्वांतर्गत असणारे दोष किंवा समस्या, व्यक्तीवर येणारे मानसिक दडपण, मनोविकृती इत्यादीमुळे गुन्हेगारी वर्तन घडते अशी या स्पष्टीकरणाची मध्यवर्ती कल्पना आहे. गुन्हेगारी वर्तनाचे मानसशास्त्रीय स्पष्टीकरण समजण्यासाठी कांही मान्यवर मानसशास्त्रज्ञांचे, मनोविकृतीतज्ज्ञांचे व मनोविश्लेषणवाद्यांचे विचार अभ्यासणे योग्य ठरेल.

### अ) मानसशास्त्रज्ञाचे विचार

**हेन्री गोदार्द** याने बुद्धिमत्ता चाचण्यांच्या अहवालाच्या आधारे असे स्पष्ट केले की मनोदुर्बलता (Feeblemindedness or mental deficiency) हे गुन्हेगारीचे तसेच बालगुन्हेगारीचे एवढेच नव्हे तर सर्वच उन्मार्गी वर्तनाचे (delinquency) एकमेव कारण आहे. ज्या व्यक्तींचा बुद्ध्यांक (I.Q.) कमी असतो त्यांना गोदार्द मनोदुर्बल मानतो. त्याच्या मते मनोदुर्बलता म्हणजेच मंद बुद्धिमता ही आनुवंशिक असते आणि जीवनातील घटनांचा तिच्यावर फारसा प्रभाव पडत नाही. गुन्हेगार जन्मानेच गुन्हेगार नसतात तर परिस्थितीमुळे ते गुन्हेगार बनत असतात असे त्याचे मत आहे. परंतु प्रत्येक मनोदुर्बल व्यक्ती ही गुन्हेगार बनेलच असे नाही तर ती गुन्हेगार बनण्याचा संभव असते. व्यक्तीचा स्वभाव व तिचे पर्यावरण या दोन घटकाद्वारे व्यक्तीच्या गुन्हेगारी प्रवृत्तीचे निर्धारण होते असे गोदार्द म्हणतो. म्हणूनच मनोदुर्बलता ही आनुवंशिक असली तरी गुन्हेगारी वृत्ती ही आनुवंशिक असत नाही. गोदार्दला त्याच्या अभ्यासात निम्मे गुन्हेगार हे मंद बुद्धिमत्तेचे आढळले होते. **गोरिंग**लाही त्याच्या अभ्यासात मनोदुर्बलता हेच सर्व प्रकारच्या (अपवाद फसवणुकीच्या गुन्ह्यांचा) गुन्ह्यांचे कारण असल्याचे आढळले होते.

**परीक्षण :** मनोदुर्बलता व गुन्हेगारी यांच्यात कांही संबंध आहे का हे पाहण्यासाठी अमेरिकन समाजशास्त्रज्ञ **सदरलँड** यांनी १९२८-२९ मध्ये सुमारे दोन लाख गुन्हेगारांच्या बुद्धिमत्ता चाचण्यांच्या ३५० अहवालांचे विश्लेषण केले. त्यांना त्यामध्ये पुढील बाबी आढळल्या -

१) १९१०-१४ या काळात अभ्यासलेल्या गुन्हेगारापैकी निम्मे गुन्हेगार मनोदुर्बल होते. मात्र १९२५-२८ या काळात अभ्यासलेल्या गुन्हेगारापैकी फक्त २० टक्के गुन्हेगार मनोदुर्बल होते.

२) सामान्य व्यक्ती व गुन्हेगार व्यक्ती यांच्या मानसिक वयातील फरक हा दुर्लक्षणीय होता.

३) उच्च व कनिष्ठ दर्जाची बुद्धिमत्ता असलेल्या कैद्यांमध्ये शिस्तीबाबतची जाणीव जवळपास सारखीच होती.

४) पॅरोलबाबतच्या अटींचे पालन मनोदुर्बल व सामान्य कैद्यांकडून सारख्याच प्रमाणात होत असे. यावरून **सदरलँड यांनी असा निष्कर्ष काढला की मनोदुर्बलता हे गुन्हेगारीचे महत्त्वपूर्ण कारण नाही.**

**मेरी वूडवर्ड** यांनीही मंद बुद्धिमत्ता व गुन्हेगारी यांच्यातील संबंधाबाबतच्या अभ्यासाचे परीक्षण करून असे मत मांडले आहे की मंद बुद्धिमत्ता हा घटक गुन्हेगारी वर्तनात कोणतीही महत्त्वपूर्ण भूमिका बजावीत नाही. यासंदर्भात आपणास एवढेच म्हणता येईल की मंद बुद्धिमत्ता ही गुन्हेगारी वर्तनात प्रत्यक्षपणे नव्हे तर अप्रत्यक्षपणे भूमिका बजावित असते. कारण मंदबुद्धिच्या व्यक्तींना सामाजिक समायोजन साधणे कठीण जाते व त्यामुळे तिच्याकडून विचलनात्मक किंवा गुन्हेगारी वर्तन घडत असते.

## ब) मनोविकृती चिकित्सक तज्ज्ञांचे विचार

मनोदुर्बलता हे गुन्हेगारीचे एकमेव कारण नाही हे सदरलँड व वूडवर्थ यांनी दाखवून दिल्यानंतर कांही मनोविकृती चिकित्सक तज्ज्ञांनी (Psychiatricts) मानसिक अव्यवस्था (impairment or mental disorder) ही गुन्हेगारी वर्तनास जबाबदार असते असे मत मांडले. शिकागो येथील **मनोविकृतीचिकित्सक तज्ज्ञ विल्यम हिले** यांना आपल्या अभ्यासात असे आढळले की **बिगर–गुन्हेगार व्यक्तींच्या तुलनेत गुन्हेगार व्यक्तिंमध्ये अधिक प्रमाणात व्यक्तिमत्त्व अव्यवस्था** (Personality disorder) **आढळली.** यावरून त्यांनी गुन्हेगारी वर्तनास शारीरिक घटक (शरीररचनेतील दोष) जबाबदार असतात हे मत नाकारले आणि मनोविकृती किंवा मानसिक अव्यवस्था (mental disorder) व भावनिक अस्वस्थता (emotional disturbances) हे गुन्हेगारीचे कारण मानले.

मनोविकृतीतज्ज्ञांच्या मते मानसिक अव्यवस्था (म्हणजेच मनोविकृती) तीन प्रकारची असते.

१) **विमनस्कता किंवा दुर्मनस्कता** (schizophrenia) या प्रकारात व्यक्तीचे विचार, भावभावना आणि कृती वा वर्तन यामध्ये अंतर पडते आणि व्यक्तीमध्ये वास्तविकतेपासून पलायन करण्याची प्रवृत्ती निर्माण होते.

२) **विक्षिप्त–विषण्णता अव्यवस्था** (Manic-depressive disorder) या प्रकारात व्यक्तीस उत्साह व विषण्णता यांचे आलटूनपालटून झटके येतात.

३) **सभ्रांती** (paranoia) **-** या प्रकारात व्यक्ती आपण खूपच थोर आहोत किंवा आपला खूपच छळ होतो यासारख्या निराधार कल्पना करीत राहते. अशाप्रकारच्या अव्यवस्थांमुळे व्यक्ती गुन्हे करते असे स्पष्टीकरण मनाविकृती तज्ज्ञांनी दिले आहे.

**परीक्षण** – मनोविकृतीमुळे गुन्हे घडतात हे स्पष्टीकरण अनुभवजन्य अभ्यासाच्या आधारे फारसे समर्थनीय ठरलेले दिसत नाही. उदा. डनहॅम यांनी १९३९ मध्ये इलिनोईस येथील दवाखान्यातील ५०० पुरुषांचा अभ्यास केला तेव्हा 'विमनस्कता' हा घटक गुन्हेगारीवर्तनामागे नगण्य स्वरूपात असल्याचे दिसून आले. १९३२ ते ३५ या काळात न्यूयॉर्क शहरातील महागंभीर गुन्हे केलेल्या १० हजार गुन्हेगारांचा अभ्यास केला. या अभ्यासात १.५ टक्के गुन्हेगार मनोविक्षिप्त (psychotic), ६.९ टक्के मानस नसविकृत (psycho-neurotic) आणि २.४ टक्के मतिमंद तर ६.९ टक्के मनोविकृतीमय (psychopathic) आढळले. अशाप्रकारे केवळ १७.७ टक्के गुन्हेगारांत मानसिक अव्यवस्था आढळली तर ८२.३ टक्के गुन्हेगार सामान्य असल्याचे आढळले. यावरून मनोविकृती चिकित्सक स्पष्टीकरण अतार्किक ठरते.

## क) मनोविश्लेषणवाद्यांचे विचार

**डॉ. सिग्मंड फ्रॉईड** (१८५६–१९३९) यांनी मांडलेल्या मनोविश्लेषणवादी सिद्धांतातील इद (Id), अहम् (ego) आणि पराहम् (super-ego) या तीन तत्त्वांचा वापर गुन्हेगारी वर्तनाच्या स्पष्टीकरणासाठी **आइछोर्न एडलर** आणि **अब्राहमसेन** या तीन विद्वानांनी केलेला आहे. 'इद' ही व्यक्तिची अव्यक्त अशी सहजप्रवृत्ती (raw instincts) किंवा इच्छा (desire) किंवा आवेग (urge) आहे. 'अहम्' ही वास्तविकता (reality) आहे तर पराहम् म्हणजे व्यक्तिची सद्सद्विवेकबुद्धी आहे.

पराहम् नेहमीच इदला दाबून टाकण्याचा प्रयत्न करतो. तर अहम हा इद व पराहम् यांच्यात संतुलन ठेवतो. इद् आणि पराहम् दोन्ही मूलतः अचेतन तर अहम हा व्यक्तिमत्त्वाचा चैतन्यमय भाग आहे.

मनोविश्लेषण सिद्धांतानुसार गुन्हेगारी वर्तन हे अचेतन अशा मानसशास्त्रीय-जैविक शक्तींमुळे किंवा सहजप्रवृत्तीमुळे उदयास येते. त्यांच्यातील संघर्ष हा गुन्हेगारी वर्तनास चालना देतो. समतोल व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्तिमध्ये इद, अहम् व पराहम् या तीन तत्त्वांचा समन्वय असतो. पण अपसामान्य स्वरूपाच्या (Neurotic) व्यक्तिंमध्ये त्यांचा असमतोल निर्माण होतो. जर पराहम्चा पुरेसा विकास झाला नाही तर दडपलेल्या सहजप्रवृत्ती उफाळून येतात. व व्यक्तीस गुन्हेगारीकडे वळवतात. अचेतन मनातील संघर्ष हा व्यक्तीमध्ये अपराधीपणाची भावना निर्माण करतो. परिणामी ही भावना नष्ट करण्यासाठी व पापाऐवजी पुण्याचे संतुलन निर्माण करण्यासाठी व्यक्तीमध्ये स्वतःला शिक्षा करण्याची इच्छा जागृत होते. त्यानंतर व्यक्ती गुन्हेगारी कृत्य करते आणि स्वतःस पकडले जावे व शिक्षा व्हावी म्हणून कांही पुरावा मागे सोडते.

**आईछोर्न** याने गुन्हेगारी वर्तनाच्या अभ्यासात सर्वप्रथम फ्राईडच्या सिद्धांताचा वापर केला. त्याला मज्जातंतुच्या विकारांने ग्रस्त असलेले (neurotic), आक्रमक असलेले, पराहम्चा विकास न झालेले, आपल्या सहजप्रवृत्तींचे दमन करण्याची क्षमता नसलेले, प्रेमलालसेची विकृती असलेले असे विभिन्न तऱ्हेचे गुन्हेगार आपल्या अभ्यासात आढळले.

**एलफ्रेड ॲडलरने** व्यक्तीमध्ये असलेली स्वतःबद्दलची हीन भावना गुन्हेगारीचे कारण मानले आहे. अशी व्यक्ती इतरांचे आपल्याकडे लक्ष वेधून घेण्यासाठी वा आपले अस्तित्व दाखवून देण्यासाठी म्हणजेच हीन भावना नष्ट करण्यासाठी गुन्हेगारी वर्तन करतात असे स्पष्टीकरण ॲडलरने दिलेले आहे. तथापि ॲडलरने व्यक्तीच्या वर्तनाच्या तर्कसंगत पैलूवर अधिक भर दिला असून अतिसरलीकरण केलेले आहे अशी टीका करण्यात आली आहे.

**डेव्हीड अब्राहमसेन** यांनी गुन्हेगारी वर्तनाचे स्पष्टीकरण प्रवृत्ती व परिस्थिती यांना व्यक्ती जो विरोध करते त्याच्या संदर्भात दिलेले आहे. त्याने याबाबतीत पुढील सूत्र विकसित केलेले आहे.

$$C = \frac{T + S}{R}$$

याठिकाणी सी म्हणजे crime (गुन्हा), टी म्हणजे tendencies (प्रवृत्ती), एस म्हणजे situation (परिस्थिती) आणि आर म्हणजे resistance (विरोध) होय.

जर व्यक्तिमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती प्रबळ असेल व ती रोखण्याची शक्ती कमी असेल तर गुन्हेगारी वर्तन घडून येईल असे अब्राहमसेन म्हणतात.

**परिक्षण :** गुन्ह्याचे कारण अबोध (unconscious) असते हे मनोविश्लेषणवादी स्पष्टीकरण समाजशास्त्रज्ञांना मान्य नाही. अब्राहमसेनने गुन्ह्याच्या कारणांना गणिती भाषेत केवळ तीन घटकापुरतेच सीमित करून गुन्ह्याचे स्पष्टीकरण अतिसरळ दिले आहे हे ही त्यांना मान्य नाही. तसेच गुन्हेगारामध्ये असलेल्या अपराधभावनेमुळे तो स्वतःस शिक्षा व्हावी असे अबोध पातळीवर मानतो व म्हणून गुन्हा करतो हे स्पष्टीकरण सर्वच गुन्ह्यांच्या बाबतीत स्वीकारता येत नाही. कारण कांही प्रकरणात व्यक्ती गुन्हा करते, गुन्हा केल्याचे कबुलही करते व तिला शिक्षाही होते.

मेनहाइम म्हणतो त्याप्रमाणे शिक्षा ही गुन्हा निवारण्याचे कार्य करीत नाही. मनोविश्लेषणवादी स्पष्टीकरणात पुढील त्रुटी आहेत.

१) मनोविश्लेषणवादी सिद्धांतात पद्धतीशास्त्रीय त्रुटी आहे.

२) इद, अहम व पराहम् या संज्ञा अस्पष्ट असून त्यांच्या कार्यात्मक व्याख्या दिलेल्या नाहीत.

३) प्रक्षेपित तंत्राचे विश्लेषण हे आत्मनिष्ठ असू शकते.

४) मनोविश्लेषणाचा अभ्यास हा लहान नमुन्यांवर व अपर्याप्त नियंत्रित समूहांवर आधारलेला आहे.

५) जोपर्यंत व्यक्ती ही दृष्टिकोनाचे केंद्र असते तोपर्यंत वर्तन प्रतिमानांविषयी सामान्यीकरण केले जाऊ शकते.

६) मनोविश्लेषणवादी स्पष्टीकरण हे गुन्ह्याच्या कारणाविषयी वस्तूतः कांहीही स्पष्ट करीत नाही.

### २.३.४ आर्थिक स्पष्टीकरण (Economic Explanation)

या घटकात शेवटी तुम्ही गुन्हेगारी वर्तनाचे आर्थिक स्पष्टीकरण समजावून घेणार आहात. इटालियन गुन्हेगारीशास्त्रज्ञ **फोर्नासरी** आणि डच गुन्हेगारीशास्त्रज्ञ **विल्यम ॲल्ड्रेन बोंजर** या दोघांनी गुन्हेगारी वर्तनाचे आर्थिक दृष्टिकोनातून स्पष्टीकरण दिलेले आहे. तसेच मार्क्सवादी विचारवंतदेखील गुन्हेगाराचे स्पष्टीकरण आर्थिक दृष्टिकोनातूनच करतात. या दोन गुन्हेगारीशास्त्रज्ञांचे व मार्क्सवाद्यांचे आर्थिक स्पष्टकरण तुम्ही थोडक्यात समजावून घेणार आहात.

**१) फोर्नासरी** यांच्या मते गुन्हेगारी वर्तनास आर्थिक घटक कारणीभूत आहेत. आर्थिक घटकांपैकी दारिद्र्य (Poverty) हे गुन्हेगारीचे कारण आहे असे ते म्हणतात. दारिद्र्यामुळेच लोक गुन्हे करण्यास प्रवृत्त होतात असे त्यांचे मत आहे. आपल्या मताच्याा समर्थनार्थ त्यांनी इटलीत आकडेवारी दिलेली आहे. १९८४ मध्ये त्यांनी इटलीतील गुन्हेगारांचा अभ्यास केला. या अभ्यासात त्यांना असे आढळून आले की इटलीतील सुमारे ६० टक्के लोकसंख्या ही दरिद्री (गरीब) असून या ६० टक्के लोकसंख्येतील सुमारे ८५ ते ९० टक्के लोक गुन्हेगार होते. याचाच अर्थ असा की, तेथील ८५ ते ९० टक्के गुन्हेगार हे आर्थिकदृष्ट्या दरिद्री वर्गात मोडणारे होते. अशाप्रकारे त्यांनी दारिद्र्य व गुन्हेगारी यांच्यात कारणकार्यसंबंध आहे असे दाखवून दिलेले आहे.

**२) विल्यम बोंजर** यांनी १९०१ ते १९५० या कालावधीत विविध राष्ट्रातील आर्थिक परिस्थिती व गुन्हेगारी यांच्यातील संबंधाचा संशोधनात्मक अभ्यास केला. या अभ्यासाच्या आधारे त्यांनी भांडवलशाही अर्थव्यवस्था ही गुन्हेगारीस कारणीभूत ठरते असा निष्कर्ष काढला आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत व्यक्ती ह्या स्वकेंद्रीत (egoistic) असतात. त्या केवळ स्वार्थ साधण्यावर भर देतात. अधिकाधिक नफा कमावण्याच्या उद्देशाने त्या उत्पादन करू इच्छितात. त्यामुळे उत्पादन साधनांवर मालकीहक्क असणारा भांडवलदार वर्ग हा कामगार वर्गाचे प्रचंड शोषण करतो. त्यामुळे कामगार वर्गात दारिद्र्य वाढत जाते. याचा परिणाम म्हणून कामगार गुन्हेगारी वर्तन करू लागतात. त्यांनी यासंदर्भात आकडेवारी गोळा करून असे दाखवून दिले आहे की, सुमारे ७९ टक्के गुन्हेगार हे नफा न मिळणाऱ्या वर्गातील (non-profitable class) म्हणजेच गरीब वर्गातील होते.

भांडवलशाहीमुळे समाजात आर्थिक विषमता निर्माण होते. भांडवलदार वर्ग कृत्रिम टंचाई निर्माण करतो. त्यातून बेरोजगारी निर्माण होते. बेरोजगार झालेले कामगार हे व्यवसाधिनता, उनाडक्या, भिक्षावृत्ती, चोरी, हिंसाचार अशी विपथगामी कृत्ये करू लागतात.

बोंजर पुढे असेही म्हणतात की भांडवलशाही अर्थव्यवस्थेत तेजी-मंदीचे चक्र सतत चालू असते. त्यामुळे समाजात महागाई, कर्जबाजारीपणा, दिवाळखोरी अशा घटना घडत राहतात. त्यांचा परिणाम म्हणून समाजात संपत्तीविषयक गुन्हे (उदा. चोरी, उचलेगिरी, लूटमार, दरोडा, घरफोडी इत्यादी) घडतात.

भांडवलशाहीत उत्पादक व व्यापारी या वर्गात स्पर्धा चालू असते. या स्पर्धेत जे अयशस्वी ठरतात ते लोक अवैध धंदे करू लागतात. यातून व्यापारी चिन्हांचा Trademarks) गैरवापर करणे, लोकप्रिय उत्पादनांची नक्कल करणे म्हणजेच बनावट (डुप्लिकेट) वस्तू बनविणे, भेसळ करणे, चोरटा व्यापार (तस्करी) करणे इत्यादी गुन्हे घडू लागतात. तसेच भांडवलदारवर्ग महिला व बालकांना कमी मजूरी देऊन राबवून घेतात व त्यांचे शोषण करतात.

थोडक्यात बोंजर यांच्या मते भांडवलशाही अर्थव्यवस्था ही समाजात विपथगामी वर्तनास व त्यातून गुन्हेगारी कृत्यांना प्रोत्साहीत करते. अर्थात भांडवलशाहीमुळे व्यक्ती स्वकेंद्रीत होऊन गुन्हे करण्यास प्रवृत्त होते असे बोंजर ठामपणे म्हणत नाहीत. मात्र भांडवलशाही गुन्हेगारी वर्तनासाठी प्रेरणादायी वातावरण (Climate of Motivation) निर्माण करते असे बोंजरना वाटते.

**३) मार्क्सवाद्यांचे स्पष्टीकरण :** मार्क्सवादी विचारवंतांच्या मते भांडवलशाही ही सर्वच दुरितांचे (evils) कारण आहे. समाजातील गुन्हेगारीचे कारण ही भांडवलशाही अर्थव्यवस्थाच आहे. या अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांवर मालकी असणारा वर्ग (आहे रे) व या साधनांवर मालकी नसणारा (नाही रे) असे दोन वर्ग असतात. त्यांनाच अनुक्रमे भांवलदार वर्ग व कामगार वर्ग असे म्हणतात. भांडवलदार वर्ग अधिकाधिक नफा मिळविण्यासाठी कामगार वर्गाचे शोषण करतो. त्याचा परिणाम म्हणून कामगार वर्गाचे दारिद्र्य वाढत जाते. दारिद्र्याने पिचलेला कामगार गुन्हे करण्यास प्रवृत्त होतो. **रिचर्ड क्विने** (Richard Quinney) हे मार्क्सवादी विचारवंत असे म्हणतात की, भांडवलशाही राज्य गुन्हेगारी प्रवृत्तीचा समाज निर्माण करते. या राज्यातील कायदे हे भांडवलदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण करतात. त्यामुळे गरीब असा कामगारवर्ग हा सतत दडपणाखाली राहतो. हे दडपण व असमाधान कामगारांना गुन्हे करण्यास प्रवृत्त करते.

अशाप्रकारे आर्थिक घटकांमुळे गुन्हे घडत असतात असे स्पष्टीकरण फोर्नासरी, बोंजर, मार्क्सवादी विचारवंत इत्यादींनी दिलेले आहे.

**आर्थिक स्पष्टीकरणाचे परीक्षण :** आर्थिक घटकांमुळे गुन्हे घडतात हे स्पष्टीकरण सामान्यतः चटकन स्वीकारणीय वाटते. तथापि, या स्पष्टीकरणावर अनेकांनी टीका केलेली आहे.

१) दारिद्र्यामुळे व्यक्ती गुन्हे करतात असे आर्थिक स्पष्टीकरणात प्रतिपादन केलेले आहे. तथापि, हे मत पूर्णतः खरे नाही. **चार्लस गोरिंग** यांनी तीन हजार गुन्हेगारांचा अभ्यास करून असे दाखवून दिले की दारिद्र्य व गुन्ह्यांची वारंवारीता यांच्यात सहसंबंध नाही. बोंजरच्या मतावर टीका करताना गोरिंग असे म्हणतात की, सापेक्ष आर्थिक संपन्नतेचा संबंध गुन्ह्याचे प्रमाण कमी होण्याशी आहे याचा खुलासा बोंजर करीत नाहीत.

२) **गॅब्रिएल तार्डे** (फ्रान्स) यांच्या मते अनेक गुन्हे हे केवळ औद्योगिक व व्यापारविषयक प्रगतीमुळे घडत नाहीत तर संपत्तीचे असमान वितरण व व्यक्तीची चैनीची वृत्ती यामुळे घडतात.

३) दारिद्र्यामुळे लोक गुन्हे करतात असे आर्थिक स्पष्टीकरण सांगते. मात्र समाजात केवळ दरिद्री व्यक्तीच तेवढ्या गुन्हे करीत असतात असे नाही. अनेक श्रीमंत व्यक्ती उदा. व्यापारी, उद्योजक, सावकार, विविध व्यावसायिक (डॉक्टर्स, इंजिनिअर्स) मंडळीही गुन्हे करीत असतात. उदा. कर चुकविणे, खोटे हिशोब ठेवणे, ग्राहकांना फसविणे, काळाबाजार व तस्करी करणे, साठेबाजी करणे इत्यादी. अशा गुन्ह्याचा संबंध हा दारिद्र्याशी नसतो याकडे हे स्पष्टीकरण दुर्लक्ष करते. यासंदर्भात **सदरलँड** यांनी मांडलेली पांढरपेशी गुन्हे (White Collar Crimes) ही संकल्पना विचारात घेण्यासारखी आहे. असे गुन्हे हे गरीब व्यक्ती नव्हे तर श्रीमंत व्यक्ती करताना दिसतात.

४) यासंदर्भात आणखीन एक मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे व तो म्हणजे जर व्यक्तीवर केलेले नैतिक व धार्मिक संस्कार हे अत्यंत प्रबळ असतील तर दारिद्र्य असूनही अशा व्यक्ती गुन्हे करण्यास प्रवृत्त होत नाहीत असे दिसून येते. उदा. कांही व्यक्ती या उपाशी मरतील पण इतरांच्या वस्तूंना हात लावीत नाहीत किंवा इतर वाममार्ग स्वीकारीत नाहीत.

## २.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (Check our Progress)

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. गुन्हेगारी वर्तनाचे अभिजात स्पष्टीकरण कोणी दिलेले आहे?

२. गुन्हेगारीशास्त्राचा जनक कोणास मानले जाते?

३. लोम्ब्रोसोने कोणता सिद्धांत मांडला?

४. हेन्री गोदार्दच्या मते गुन्हेगारीचे कारण कोणते आहे?

५. गुन्हेगारी वर्तनाचे आर्थिक स्पष्टीकरण देणाऱ्या विचारवंतांची नावे सांगा.

## २.५ सारांश (Let us sum up)

या घटकात आपण गुन्हेगारीशास्त्राच्या उदयाच्या प्रारंभिच्या काळातील गुन्हेगारी वर्तनाची कारणमीमांसा करणारी स्पष्टीकरणे अभ्यासलेली आहेत. सर्वप्रथम आपण अभिजात स्पष्टीकरण अभ्यासले आहे. व्यक्तीचे वर्तन हे सुखावादावर आधारलेले असते. त्यामुळे गुन्हा केल्याने व्यक्तीस कोणत्या ना कोणत्या सुखाची प्राप्ती होत असते म्हणून ती गुन्हा करते असे हे स्पष्टीकरण सांगते. बेकॅरिया याने हे स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यानंतर आपण प्रत्यक्षवादी स्पष्टीकरण अभ्यासले आहे. व्यक्तीची जीवशास्त्रीय वा शारीरिक वैशिष्ट्ये ही गुन्हेगारी वर्तनास कारणीभूत ठरतात असे हे स्पष्टीकरण सांगते. यासंदर्भात आपण इटालीयन शास्त्रज्ञ लोम्ब्रोसो, फेरी, गॅरोफॅलो ह्या तिघांची व त्यानंतर हूटन व शिल्डन यांची मते अभ्यासलेली आहेत. यानंतर आपण मानसशास्त्रीय स्पष्टीकरण अभ्यासलेले आहे. गोदार्दसारख्या मानसशास्त्रज्ञाने मनोदुर्बलता हे गुन्हेगारीचे कारण सांगितलेले आहे.

तर विल्यम हिले या मनोविकृती चिकित्सक तज्ज्ञाने व्यक्तिमत्त्व अव्यवस्था हे गुन्हेगारीचे कारण मानले आहे. तर ॲडलर व अब्राहमसेनसारख्या मनोविश्लेषणवाद्यांनी सहजप्रवृत्ती वा अविकसित अहममुळे गुन्हे घडतात असे स्पष्टीकरण दिलेले आहे. सर्वात शेवटी फोर्नसरी, बोंजर व मार्क्सवादी विचारवंत यांचे आर्थिक स्पष्टीकरण अभ्यासलेले आहे.

## २.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress)

१. 'बेकॅरिया' ह्या इटालियन विचारवंताने गुन्हेगारी वर्तनाचे अभिजात स्पष्टीकरण दिलेले आहे.

२. 'लोम्ब्रोसो' यास गुन्हेगारीशास्त्राचा जनक मानले जाते.

३. लोम्ब्रोसोने 'उत्क्रांतीवादी पूर्वजानुरूपता' हा सिद्धांत मांडला.

४. हेन्री गोदार्दच्या मते 'मतिमंदता किंवा मंद बुद्धिमत्ता' हे गुन्हेगारीचे कारण आहे.

५. फार्नेसरी, बोंजर व मार्क्सवादी विचारवंत यांनी गुन्हेगारी वर्तनाचे आर्थिक स्पष्टीकरण दिलेले आहे.

## २.६ स्वाध्याय/गृहपाठ (Exercise/Home assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. गुन्हेगारी वर्तनाचे अभिजात स्पष्टीकरण विशद करा.

२. गुन्हेगारी वर्तनाविषयीच्या प्रत्यक्षवादी स्पष्टीकरणाची चर्चा करा.

३. गुन्हेगारी वर्तनाविषयीच्या मानसशास्त्रीय स्पष्टीकरणाचे टिकात्मक परीक्षण करा.

**ब) टीपा लिहा.**

१. उत्क्रांतीवादी पूर्वजानुरूपता सिद्धांत.

२. आर्थिक स्पष्टीकरण

## २.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

तुमच्या समुदायातील किंवा आसपासच्या भागातील कारावासाची शिक्षा भोगून आलेल्या गुन्हेगारांचा शोध घ्या. त्यांच्याशी चर्चा करा आणि ते गुन्हेगार बनण्यास कोणते घटक जबाबदार होते हे समजावून घ्या आणि त्या घटकांची नोंद करा.

## २.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)

1. Criminology and Penology - 18th edition - Dr. N. V. Paranjape - Central Law Publications, Allahabad - 2008.
2. Criminology - 5th edition - Ahmad Siddique & S. M. A. Qadri - Eastern book company, Lucknow, 2005.
3. An Introduction to Sociology - Navendu K. Thakur - Central Law Publications - Allahabad, 2007.
4. Social problems in India Ram Ahuja - Rawat Publications, Jaipur, 2002.

❑❑❑

घटक ३

# गुन्हेगारी वर्तनाची समाजशास्त्रीय स्पष्टीकरणे

## (Sociological Explanations of Criminal Behaviour)

**घटक संरचना**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ विभेदित साहचर्य सिद्धान्त

  ३.२.२ उन्मार्गी उप-संस्कृती सिद्धान्त

  ३.२.३ प्रमाणकशून्यतेचा सिद्धान्त

  ३.२.४ कानफाट्या सिद्धान्त

३.३ सारांश

३.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ स्वाध्याय/गृहपाठ

३.६ चिंतन आणि कार्य

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० उद्दिष्टे :

- विभेदित साहचर्य सिद्धांन्त अभ्यासणे.
- उन्मार्गी उपसंस्कृती सिद्धान्त समजावून घेणे.
- प्रमाणकशून्यतेचा सिद्धान्त स्पष्ट करणे.
- कानफाट्या सिद्धान्त अभ्यासणे.

## ३.१ प्रस्तावना

मागील घटकात आपण गुन्हेगारी वर्तनाची प्रारंभिची स्पष्टीकरणे अभ्यासली. ही सर्व स्पष्टीकरणे सदोष आहेत. त्यामुळे अनेक समाजशास्त्रज्ञांनी गुन्हेगारी वर्तनाविषयीची वेगळी स्पष्टीकरणे दिलेली आहेत. ती स्पष्टीकरणे आता तुम्ही समजावून घेणार आहात. या ठिकाणी तुम्ही केवळ ४ स्पष्टीकरणे अभ्यासणार आहात.

## ३.२ विषय विवेचन :

गुन्हेगारी ही चिरंजीवी असून कोणताही समाज हा गुन्हेगारीयुक्त नाही हे आपण या आधी पाहिलेच आहे. प्राचीन काळामध्ये अतिमानवी शक्ती आणि धार्मिक गूढवादाचा प्रभाव होता. मानवी विचार हे अतिमानवी शक्तीशी निगडीत होते. साहजिकच गुन्हा आणि गुन्हेगाराकडे त्याच दृष्टिकोनातून पाहिले जात असे. परिणामी गुन्हेगारीला कारणीभूत असलेले विशिष्ट हेतू, इरादा (Intention) परिस्थितीजन्य, मानसशास्त्रीय वगैरे घटक दुर्लक्षितच राहिले. अर्थातच सतराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत गुन्हा आणि गुन्हेगारीच्या कारणांचे विश्लेषण शास्त्रीय दृष्टीने होऊ शकले नाही. तदनंतर कालौघामध्ये बेकारीया (१७३८-१९९४) यांनी गुन्हा आणि गुन्हेगारीच्या शास्त्रीय अभ्यासाचा पाया घातला. जेरेमी बँथम (१७८४-१८३२) ने बेकारीयाच्या पावलावर पाऊल ठेवत गुन्हेगारीतील मानसिक घटक अधोरेखित केले. (Free will of an individual / मुक्त इच्छा) त्या पाठोपाठ अनेक अभ्यासकांनी जन्मजात गुन्हेगार, मनोरूग्णता, मानसिक कमतरता, मनोविकृती, मेंदूनसजन्य, (Neurosis) अनुवंशिकता इ. घटकांचा गुन्हेगारीतील सहभाग स्पष्ट केला. या अभ्यासकांनी गुन्हेगारी वर्तनाचे स्पष्टीकरण करतांना प्रामुख्याने जीवशास्त्रीय, मानसिक व अन्य वैशिष्ट्यांवर लक्ष केंद्रित केल्याने याला 'व्यक्तिगत दृष्टिकोन' (Individual approach) म्हणतात.

दुसरा दृष्टिकोन गुन्हेगारी वर्तनाच्या कारणांचे स्पष्टीकरण हे समूह, समुदाय, सामाजिक संस्था व त्यांचा एखाद्याच्या व्यक्तिमत्वावर होणारा परिणाम या सामाजिक घटकांचे संदर्भात करतो याला ''समाजशास्त्रीय दृष्टिकोन'' म्हणतात. सामाजिक आंतरक्रियांचा परिपाक म्हणून गुन्हेगारीकडे हा दृष्टिकोन पाहतो.

सामाजिक मानसशास्त्रात पारंगत असलेले फ्रेंच ज्यूरी ग्रॅबिएल दी तार्द Gabriel de tarde यांनी गुन्हेगारीचे सामाजिक स्पष्टीकरण देण्याचा पहिल्यांदा प्रयत्न केला. गुन्हेगारी वर्तन हे शिकून आत्मसात केले जाते असे त्यांचे मत होते. सामाजीकरणाच्या प्रक्रियेमध्ये व्यक्ती जसे अन्य सामान्य वर्तन प्रकार शिकून आत्मसात करते तसेच गुन्हेगारी वर्तनही शिकून आत्मसात केले जाते. मानवी अनुकरणप्रियता हेच दर्शविते. स्थलांतर, गतिशीलता, नागरीकरण, झोपडपट्ट्या, टोळ्या, राजकीय गटबाजी, लोकसंख्येची घनता, दारिद्रय, बेकारी, व्यसनग्रस्त व तणावयुक्त कुटूंबे इ. चा गुन्हेगारीशी थेट संबंध असतो, यावर समाजशास्त्रीय सिद्धान्त भर देतात.

खाली काही समाजशास्त्रीय सिद्धातांचा उल्लेख केला आहे.

१) उपसंस्कृती सिद्धान्त

२) मॅटझा यांचा बालगुन्हेगारी आणि वहन सिद्धान्त

३) विभेदित संधी सिद्धान्त

४) परिस्थितीशास्त्रीय सिद्धान्त

५) संघर्ष सिद्धान्त

६) वांशिक सिद्धान्त

७) प्रमाणक शून्यतेचा सिद्धान्त

८) सामाजिक विघटन सिद्धान्त

९) कानफाट्या सिद्धान्त

१०) सदरलँड यांचा विभेदित साहचर्य सिद्धान्त

११) उन्मार्गी उप संस्कृती सिद्धान्त

या पैकी काही नामवंत समाजशास्त्रज्ञांच्या सिद्धान्ताचा आपण अभ्यास करू या.

### ३.२.१ विभेदित साहचर्य सिद्धान्त :

**एडविन सदरलँड** यांनी विभेदित साहचर्य सिद्धान्त मांडला.

**फ्रेडरिक थ्रॅशर** आणि **क्लिफोर्ड शॉ** यांनी अमेरिकेतील शिकागो शहरातील १३१३ समूहांचा अभ्यास केला. आकाराने मोठ्या असलेल्या शहरामध्ये अतिरिक्त गर्दी, दुय्यम-औपचारिक संबंधाचे प्राबल्य असते. अशा शहरांची सामाजिक नियंत्रणाचा अभाव किंवा सामाजिक नियंत्रणातील निष्क्रियता ही वैशिष्ट्ये असतात. परिणामी तेथे गुन्हेगारी निर्माण होते. शिकागो शहरातील बाल-गुन्हेगाराच्या टोळ्यांच्या अभ्यासावर फ्रेडरिक थ्रॅशर यांनी "The Gang (1937)" हे पुस्तक लिहिले. मुक्त इच्छा ही जीवंत उर्जास्त्रोत असून किशोरवयीन मुलांना बंधमुक्त जीवन जगायला, काहीही करायला उद्युक्त करते असे थ्रॅशर यांनी म्हटले आहे.

क्लिफोर्ड शॉ आणि हेन्री मॅकी यांनी १९२० साली सामाजिक विघटनाचे क्षेत्र निश्चित करण्याचा प्रयत्न केला. या क्षेत्राला त्यांनी 'उन्मार्गी क्षेत्र' Delinquency area असे नाव दिले. दारिद्रय, उच्च गतीशीलता आणि सामाजिक विविधतेमुळे सामाजिक नियंत्रण शिथिल होते. परिणामी, सामाजिक विघटन होते आणि त्यातून मोठ्या प्रमाणात बालगुन्हेगारी निर्माण होते.

शॉ आणि मॅकीच्या उपरोल्लेखित अभ्यासावर आधारित असा एडविन सदरलँड आणि त्यांचे विद्यार्थी डोनाल्ड क्रेसी यांनी विभेदित साहचर्याचा सिद्धान्त मांडला. (१९३९) इतर कोणतेही सामान्य वर्तन शिकले जाते तसेच गुन्हेगारी वर्तनही शिकले जाते या गृहितकावर हा सिध्दान्त आधारलेला आहे. १९४७ मध्ये सदरलँड यांनी या सिध्दान्ताचा विस्तार करून तो सर्व प्रकारच्या गुन्हेगारी वर्तनाला लागू केला. सदरलँड गुन्हेगारी वर्तनाचे स्पष्टीकरण दोन घटकांचे सहाय्याने करतात.

१. गुन्हेगारी वर्तनाचे परिस्थितीजन्य स्पष्टीकरण Dynamic or situational explanation of Crime

आणि

२. गुन्हेगारी वर्तनाचे जननशास्त्रीय/जनुकीय स्पष्टीकरण Genetical explanation of Crime

पहिले Dynamic स्पष्टीकरण हे परिस्थितीजन्य घटकावर भर देते. व्यक्तिभोवती असलेली सामाजिक सांस्कृतिक-आर्थिक परिस्थिती ही व्यक्तिमत्वाला आकार देत असते. म्हणून गुन्हेगार हा समाजाची निर्मिती असतो. (Criminals are product of society) व्यक्तीभोवती असलेली तात्कालिक अनुकूल परिस्थिती ही गुन्हेगारीला पोषक असते. एखादा गुन्हा घडते वेळी कार्यरत

असणाऱ्या प्रक्रियांना सदरलँड महत्व देतात. उदा. एखादा गुन्हा घडला त्यावेळी परिस्थिती कशी होती हे महत्त्वाचे असते.

सदरलँड यांनी गुन्हेगारी वर्तनाचे दुसरे स्पष्टीकरण जनुकीय Genetical घटकांचे सहाय्याने दिले आहे. यालाच ऐतिहासिक घटक असही म्हणतात. गुन्हेगाराला त्याच्या पूर्वायुष्यामध्ये आलेले अनुभव, घडलेल्या घटना असा ऐतिहासिक घटनांचा अर्थ घ्यायचा आहे. उदा. गुन्हेगाराची कौटुंबिक पार्श्वभूमी कशी आहे? त्याचे बालपण कसे गेले? त्याला बालपणी आई-वडील-भावडांच्या मायेचे प्रेम मिळाले का? तो कुसंगतीत वाढला का? याचा अर्थ गुन्हेगाराचा जीवनइतिहास हा त्याच्या गुन्हेगारीला पोषक असू शकतो.

उदा. एक भुकेला मुलगा बाजारपेठेतील पदपथावरून चालला आहे. एका मिठाईच्या दुकानातील काऊंटरवर मिठाईची पेटी ठेवलेली होती. दुकानात विक्रेता नाही हे पाहून त्याने मिठाईची पेटी उचलली अन निघून गेला.

अर्थातच सरळ सरळ ही उचलगिरी आहे किंवा कायद्याच्या भाषेत चोरी आहे. या घटनेचे तुम्ही कसे विश्लेषण कराल? परिस्थितीजन्य? की जनुकीय? परिस्थिती अनुकूल होती म्हणून त्याने मिठाईची पेटी उचलली का? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी द्यावे लागेल. त्या मुलाला भूक लागलेली होती. दुकानात पण कुणी नव्हते. पेटी पण सहजसाध्य होती म्हणून त्याने मिठाईची पेटी उचलली नाही. त्याने पेटी उचलली कारण 'चोरी करून भूक शमविता येते' हे तो पूर्वायुष्यात शिकलेला होता. याचा अर्थ परिस्थिती एखाद्याला चोरी करायची प्रेरणा देत नाही तर त्याने स्वत: शिकलेल्या अभिवृत्ती आणि विश्वासच देत असतात.

सदरलँड यांनी या दुसऱ्या म्हणजे जनुकीय स्पष्टीकरणाच्या आधारे आपला विभेदित साहचर्याचा सिद्धान्त विकसित केला आहे. १९३९ साली प्रकाशित झालेल्या आवृत्तीमध्ये सदरलँड यांनी आपली विभेदित साहचर्याची संकल्पना मांडली. घनिष्ठ संबंधयुक्त समूहामध्ये इतरांशी होणाऱ्या आंतरक्रियांमधून गुन्हेगारी वर्तन शिकले जाते असे सदरलँड यांचे म्हणणे आहे. जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती एकमेकांच्या सहवासात (साहचर्य) येतात तेव्हा एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचे गुण, सवयी, आवडी-निवडी, मूल्ये, जीवनशैली इ. नी प्रभावित होते. या साहचर्यामध्ये व्यक्ती या वर्तनशैलीचे अनुकरण करून आत्मसात करते. साहजिकच सर्वसामान्य (बिगर-गुन्हेगार व्यक्ती) व्यक्ती दारूडे, गुंड, चोर, दरोडेखोरांच्या साहचर्यामध्ये हळूहळू गुन्हेगारी वर्तन शिकतात. पोलीस आणि कारागृह कर्मचाऱ्यांचेही असेच निरीक्षण आहे.

उदा. किरकोळ गुन्ह्यासाठी अल्पशिक्षेवर कारागृहात गेलेला गुन्हेगार तेथे सराईत गुन्हेगाराच्या सहवासामध्ये म्हणजेच विभेदित साहचर्यामध्ये येतो. तेथे त्याचे इतर कैद्यांशी आपुलकीचे, जिव्हाळ्याचे, टिकाऊ संबंध निर्माण होतात. मग हे नवखे गुन्हेगार त्यांच्या सहवासात पाकीट मारणे, बनावट कागदपत्रे करणे, किल्ल्या तयार करणे इत्यादी गोष्टी शिकतात. तसेच गुन्हेगारी विषयक अभिवृत्तीही येथे तयार होते.

या जनुकीय स्पष्टीकरणाच्या आधारे सदरलँड यांनी खालील निष्कर्ष काढले.

१. गुन्हेगारी वर्तन शिकले जाते.

२. इतरांशी होणाऱ्या आंतरक्रियातून संप्रेषण प्रक्रियेतून हे वर्तन शिकले जाते.

३. ज्या समूहात वैयक्तिक, घनिष्ठ संबंध आहेत अशाच समूहातून बहुतांशी गुन्हेगारी शिक्षण मिळते.

४. या शिकण्यात (अ) गुन्हेगारी तंत्रे (ब) गुन्हेगारी अभिवृत्तींचा समावेश होतो.

५. गुन्हेगारी वर्तन आणि गुन्हेगारीविरोधी वर्तनाच्या बाबतीत या विभेदित साहयर्चाची वारंवारिता (Frequency) कालावधी Duration, प्राधान्य Priority आणि तीव्रता यात फरक पडू शकतो.

६. गुन्हेगारी व गुन्हेगारी विरोधी वर्तन शिकण्याच्या प्रक्रियेमध्ये इतर कोणतेही वर्तन शिकण्यामध्ये अंतर्भूत असणाऱ्या यंत्रणांचा समावेश होतो.

७. कायदेपालन आणि उल्लंघनाचे संयुक्तीकरण करणे पण शिकले जाते.

८. सामान्य गरजा आणि मूल्यांतून गुन्हेगारी वर्तन अविष्कृत होते. बिगरगुन्हेगारी वर्तन हे सुध्दा अशाच गरजा आणि मूल्यातून निर्माण होत असते. पण म्हणून काही गुन्हेगारी वर्तनाचे समर्थन करता येत नाही. (स्यू टायटस रीड : पृ. १८० वरून साभार उधृत)

**सदरलँड यांच्या विभेदित साहचर्य सिद्धान्ताचे मूल्यमापन :**

ग्ल्यूक (Glueck), शेल्डन (Sheldon), मेबेल (Mebel), इलियट, तपन (Tapan), जॉर्ज व्ही ओल्ड, जेफरी (Jeffery) इ. विद्वानांनी सदरलँडच्या या सिध्दान्तावर टीका केली. विभेदित साहचर्याची वारंवारिता, कालावधी,प्राधान्य आणि तीव्रता याची अनुभवाधिष्ठित चाचणी घेणे कठीण आहे. हा या विद्वानांच्या टीकेचा केंद्रबिंदू आहे.

१. गुन्हेगारांच्या सहवासात येणाऱ्या सर्वच व्यक्ती गुन्हेगार का होत नाहीत?

२. प्रत्येक व्यक्ती गुन्हेगार होईपर्यंत गुन्हेगारी अनिश्चितपणे का वाढत नाही?

३. विभेदित साहचर्याचा हा सिद्धान्त ग्रामीण गुन्हेगार, पांढरपेशीय गुन्हेगार, सामान्य गुन्हेगार, (non-habitual offender) खूनी, इ. च्या बाबतीत लागू करता येत नाही.

४. सदरलँडचा हा सिद्धान्त 'व्यक्तिमत्व विशेष' (Personality traits) ''व्यक्तिमत्व'', किंवा ''मानसशास्त्रीय चल'' (variables) इ. ची गुन्हेगारी वर्तना संदर्भात पुरेशी दखल घेत नाही.

सदरलँड यांनी गुन्हेगारी वर्तनातील व्यक्तिमत्व, जीवशास्त्रीय आणि मानसशास्त्रीय घटकांकडे दुर्लक्ष केले आहे असे पॉल तपन यांनी म्हटले आहे.

सदरलँड यांनी गुन्हेगार वर्तनातील औपचारिक समूह आणि दुय्यम संबंधांची दखल घेतली नाही असे जॉर्ज व्ही ओल्ड यांनी भाष्य केले आहे.

जेफरी, क्लॅरेन्स यांनी सदरलँडच्या या सिद्धान्तावर टिका करतांना असे म्हटले आहे की हा सिद्धान्त गुन्ह्याची उत्पत्ती Genesis of crime स्पष्ट करत नाही. इतरांच्या साहचर्यातून गुन्हेगारी शिकली जाते. याचा अर्थ मुळातच गुन्हेगारी कुठेतरी अस्तित्वात असली पाहिजे.

डोनाल्ड क्रेसी यांनी या टीकेला उत्तर दिले आहे. ते म्हणतात, सदरलँड यांच्या सिध्दान्तावरील ही सर्व टीका संशोधनाधारित नाहीत उलट ही टीका म्हणजे नव्या संशोधनाचे विषय (Proposal) आहेत.

### ३.२.२ उन्मार्गी उप-संस्कृती सिद्धान्त :

क्लिफोर्ड शॉ आणि हेन्री मॅकी; फ्रेड्रिक थ्रॅशर; हरमन मॅन्हिम; विल्यम फूट व्हाईट; अलबर्ट कोहेन इ. संशोधकांनी उन्मार्गी उपसंस्कृती सिद्धांताच्या विकासामध्ये योगदान दिले आहे.

एमिल डूर्खिम आणि रॉबर्ट मर्टन यांनी मांडलेल्या प्रमाणकशून्यतेच्या सिद्धान्ताने उन्मार्गी उपसंस्कृती बालगुन्हेगारी आणि गुन्हेगारीच्या सिद्धान्ताला अनुकूल अशी चौकट प्रस्थापित केली.

फ्रेड्रिक एम थ्रॅशर यांनी आपल्या The Gang (1937), क्लिफोर्ड शॉ आणि हेन्री मॅकी यांनी Juvenile Delinquency and Urban Areas (1942) विल्यम फूट व्हाईट यांनी आपल्या Street Corner Society, अलबर्ट कोहेन Delinquent Boys : The culture of the Gang (1955) या अभिजात ग्रंथामधून उन्मार्गी उपसंस्कृतीचे विवेचन केले आहे.

शिकागो शहराच्या विशिष्ट भागात गुन्हेगारीचा उच्च दर असल्याचे क्लिफोर्ड शॉ आणि हेन्री मॅकी यांच्या ध्यानात आले. त्या विशिष्ट विभागातील स्थानिक टोळ्यांनी (समूहांनी) तेथून स्थलांतर केले तरी गुन्हेगारीचे प्रमाण कमी न होता त्याचे सातत्य टिकून होतेच. त्या विशिष्ट भागामध्ये नव्याने आलेल्या मुलांना स्थानिक उन्मार्गी मुले गुन्हेगारी कृत्ये शिकवित होती आणि ही मुले ती आत्मसात करीत होती. आपली मुले स्थानिक उन्मार्गी मुलांच्या प्रभावाने उन्मार्गी होत असल्याचे त्यांच्या पालकांच्या लक्षात आले तेव्हा त्या पालकांनी तेथून स्थलांतर केले आणि मग तेथील गुन्हेगारीचे प्रमाण घटले. याचा अर्थ गुन्हेगाराची एक संस्कृती असते आणि उपसंस्कृतीही असते. विविध माध्यमातून ही संस्कृती संक्रमित होत असते. यालाच **'सांस्कृतिक संक्रमण सिद्धान्त'** असेही म्हणतात.

**फ्रेड्रिक थ्रॅशर** यांनी शिकागो शहरातील १३१३ टोळ्यांचा अभ्यास केला. संक्रमण विभागातील सामाजिक विघटनामुळे विशेषत: झोपडपट्टीतील विघटनामुळे तेथे बालगुन्हेगारांच्या टोळ्या निर्माण होत असल्याचे आढळून आले. स्वत: थ्रॅशर यांनी 'उपसंस्कृती' बद्दल विशेषत्वाने काही म्हटले नसले तरी त्यामुळे 'उपसंस्कृती सिद्धान्ताला मार्गदर्शक अशी पार्श्वभूमी निर्माण झाली.

**कोहेने यांचा मध्यमवर्गीय मोजमाप पट्टीचा सिद्धान्त :** (Cohen's Middle Class Measuring Rod) उन्मार्गी उपसंस्कृतीच्या सिध्दान्ताच्या अनुषंगाने आपल्याला अलबर्ट कोहेन यांचा 'मध्यमवर्गीय मोजमाप पट्टीचा सिद्धान्त' समजावून घ्यावा लागतो. अलबर्ट कोहेन यांचा Delinquent Boys: The culture of the Gang हे संशोधन १९५५ साली प्रसिद्ध झाले आणि तेव्हांपासून गुन्हेगारी उन्मार्गी वर्तनाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन विकसीत होऊ लागला.

कोहेन यांचा हा सिद्धान्त मुख्यतः कनिष्ठ वर्गातील मुलांच्या दर्जा समायोजनाशी संबंधित आहे. आपले मूल्यमापन इतरजण कसे करतात यावर मुलांच्या स्वत:बद्दलच्या भावना अवलंबून असतात. हे मूल्यमापन बहुधा शाळा, निवासस्थान किंवा क्रिडांगणे इ. संदर्भात होते. या सर्वच ठिकाणी मध्यमवर्गीय मूल्यांचा आणि मानदंडांचा (Standards) प्रभाव पडलेला असतो. दुसऱ्या शब्दात

शाळा किंवा ठिकाणे ही प्रभावी मूल्य व्यवस्था असतात आणि त्या आपल्या विद्यार्थ्यांकडून तशाच मूल्यांची किंवा ही मानदंडयुक्त वर्तनाची अपेक्षा करतात.

मध्यमवर्गीय मोजमापपट्टी लावून कनिष्ठ वर्गीय मुलांचे मोजमाप केले जाते असे कोहेन म्हणतात. कनिष्ठ वर्गातील मुले मध्यमवर्गीय उद्दिष्टाची आकांक्षा धरतात. पण मध्यमवर्गीय मुलांप्रमाणे त्यांचे समाजीकरण झालेले नसल्याने ही उद्दिष्ट्ये साध्य करणे त्यांना कठिण होते. मध्यमवर्गीयांच्या संस्थांची स्वत:ची अशी एक मूल्य व्यवस्था आणि वर्तन प्रतिमान (Behavioral Pattern) असते. कनिष्ठ वर्गातील मुलांचे मोजमाप या संस्था आपल्या मोजमापपट्टीने करतात. कनिष्ठ वर्गीय मुले मध्यमवर्गीय उद्दिष्टांच्या/आकांक्षा धरतात आणि त्यातून त्यांची अपसमायोजनाची समस्या निर्माण होते. या समस्येवर मात करण्यासाठी कनिष्ठ वर्गीय मुले मध्यमवर्गीय मूल्यांविरूद्ध वर्तन करू लागतात. त्यातून त्यांची उपसंस्कृती निर्माण होते असे कोहेन म्हणतात.

अल्बर्ट कोहेन यांचा हा सिद्धान्त भारतीय समाज व्यवस्थेच्या संदर्भात स्पष्ट करता येतो. पारंपरिक सोपान परंपरेमध्ये (Traditional Hierarchy) ब्राह्मणांना सर्वोच्च दर्जा होता. भारतीय ब्राह्मणांची एक नमुनेदार मूल्य व्यवस्था असून त्यांची एक स्वतंत्र वर्तन पद्धती, स्वच्छता, टापटीप, संकेत, शिष्टाचार, स्वच्छ वाणी, उच्च आकांक्षा, देशभक्ती इ. त्यांचे विशेष गुण आहेत.

स्वातंत्र्यपूर्व भारतामध्ये बहुसंख्य शिक्षणसंस्था या ब्राह्मणांनी स्थापन केल्या. ब्राह्मणेतरांच्या संस्थामध्ये ब्राह्मणांचा भरणा लक्षणीय असे. शाळेमध्ये येणारे विद्यार्थी मात्र भिन्न सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक पार्श्वभूमीचे प्रतिनिधित्व करणारे असतात. कनिष्ठ वर्गीय मुलांचा त्यात अपवाद नसे. या कनिष्ठ वर्गीय मुलांची स्वत:ची एक मूल्य व्यवस्था व वर्तनशैली असते. तसेच ही मुले शब्दोच्चार, स्वच्छता, शिष्टाचार, संकेत, पोशाख इ. बाबतीत मध्यमवर्गीय मुलांची बरोबरी करू शकत नाहीत. पण या मुलांचे मूल्यमापन शिक्षक मात्र मध्यम वर्गीय मूल्यांच्या निकषावर करतात. साहजिकच समाजव्यवस्थेतील आपले स्थान-दर्जा बळकट करण्याकरिता या मुलांना मध्यमवर्गीय मूल्यांशी झगडावे लागते. सोयी-सुविधा, साधने आणि संधीच्या अनुपलब्धतेमुळे, तसेच अनेक निर्बंधामुळे ही कनिष्ठ स्तरातील मुले उद्दिष्टे साध्य करण्यात, आपला दर्जा उंचाविण्यात अपयशी ठरतात. त्यामुळे त्यांची समस्या आणखीनच गंभीर बनते.

अशाप्रकारे आपल्या समस्येवर मात करण्याच्या प्रयत्नात या मुलांची उपसंस्कृती निर्माण होते.

अशी किशोरवयीन मुले प्रस्थापित प्रभावी व्यवस्था नाकारून स्वत:ची मूल्ये निर्माण करतात असे कोहेन प्रतिपादन करतात. ही मूल्ये म्हणजे किशोरवयीन उपसंस्कृतीची वैशिष्ट्येच होत. ही वैशिष्ट्ये खालील प्रमाणे

१. **निरूपयुक्तवादी मूल्य (**Non-Utilitarian) ही मुले निव्वळ काहीतरी कृत्य करायचे म्हणून करतात. अशा कृत्यापासून त्यांना कुठला आर्थिक लाभ मिळवायचा हेतू नसतो. उदा. एखादं पेन चोरतील अन फेकून देतील. कैऱ्यांचा सडा पाडतील पण एकही खाणार नाहीत. याचा अर्थ त्यांना गरज असते म्हणून ती अशी कृत्ये करत नाहीत तर केवळ चोरी करायची म्हणून करतात.

२. **द्वेषमूलकता** (Malicious) द्वेषमूलकता हे दुसरे वैशिष्ट्य. इतरांना जाणीवपूर्वक पिडण्यामध्ये त्यांना आनंद वाटतो. वर्तन निर्बंध किंवा निषिध्द वस्तूंविरोधी वर्तन करण्यात ही मुले आनंद मानतात.

३. **नकारात्मक वादी (**Negativistic) वर्तन उन्मार्गी वर्तनाचे तिसरे वैशिष्ट्य म्हणजे नकारात्मकवादी वर्तन होय. अधिकारी वर्गातील व्यक्ती किंवा वडिलधाऱ्या माणसांनी केलेल्या सूचनेच्या नेमके उलट हे वर्तन करतात उदा. अभ्यास कर, व्यायाम कर. असे म्हटल्यास ते करणार नाहीत. टी. व्ही बघू नका असे पालकांनी सांगितले तर ते नक्की बघणार. या नकारात्मक प्रतिक्रिया होत. अर्थातच हे नकारात्मक मूल्य मर्यादित असून ते सराईत गुन्हेगारासारखे असत नाही. अशाप्रकारच्या आपल्या उपसंस्कृतीची मूल्ये निर्माण करून ती प्रस्थापित मध्यमवर्गीय प्रभावी मूल्यव्यवस्थेला पर्याय निर्माण करून आपली ओळख, दर्जा निर्माण करून त्याला सामाजिक मान्यता मिळवायचा प्रयत्न करतात.

४. **तात्कालिक सुखवाद** (Short run hedonism) या व्यक्ती भावी काळातील आर्थिक किंवा समयबद्ध योजनांचा विचार न करता क्षणिक तात्कालिक सुखाला प्राधान्य देतात. कोणत्याही विशिष्ट ध्येय्याने प्रेरित न होता केवळ तात्कालीन सुखप्राप्तीसाठी या टोळ्यातील सदस्य एकत्र येऊन कृतीप्रवण होतात.

५. **स्वायतत्ता** (Autonomy) उन्मार्गी टोळ्यांच्या सदस्यांत व्यक्तिगत, अनौपचारिक संबंध निर्माण होऊन त्यांच्यात प्रबळ ऐकभाव वाढतो. या टोळ्यांचे इतर समूहांशी असणारे संबंध हे तटस्थ, शत्रुत्वाचे किंवा बेफिकिरीचे असतात. विशेष म्हणजे कुटूंब, शाळा, धार्मिक संस्था यासारख्या सामाजिक संस्थांनी अशा गुन्हेगारी टोळी सदस्यांना सुधरण्याचा प्रयत्न केला तर त्याला विरोध किंवा प्रतिकार करण्याची या उपसंस्कृतीतील गुन्हेगारी टोळ्यांची प्रवृत्ती असते.

कनिष्ठ वर्गातील मुलाला स्वत: स्वत:चे मूल्यमापन करतांना येणारे ताण व नैराश्य आणि मध्यम वर्गीयाकडून त्याचे होणारे मूल्यमापन यातील कलहातून उपसंस्कृती आकार घेते.

**कोहेनच्या सिद्धान्ताचे मूल्यमापन :**

**अल्बर्ट कोहेन** यांच्या **Delinquent Boys: The Culture of the Gang** या ग्रंथाला बालगुन्हेगारी आणि गुन्हेगारीशास्त्रामध्ये लक्षणीय स्थान आणि मान्यता मिळाली. समाजशास्त्रज्ञ व गुन्हेगारीशास्त्रज्ञांनी त्याचे चांगले स्वागत केले. पण हा सिद्धान्त टीकाकारांच्या नजरेतून सुटला नाही.

१. जॉन कित्स्यू आणि डेव्हिड डायेट्रिक यांनी कोहेनच्या सिद्धान्तावर आक्षेप घेत आपले म्हणणे मांडले. मध्यमवर्गीय मूल्यांच्या निकषाच्या आधारे कनिष्ठ वर्गीय मुलगा आपले मूल्यमापन करतो हेच त्यांना मान्य नाही. कनिष्ठ वर्गातील मुलांना मध्यम वर्गीय मुल्यांची फिकीर करायचे कारण नाही. उलट कनिष्ठ वर्गातील सदस्य हा मध्यमवर्गीय मूल्ये आणि मानदंड न स्वीकारता आपल्या गुन्हेगारी/उन्मार्गी वर्तनाचे संयुक्तीकरण करण्याचे तंत्र अवलंबतो.

२. कोहेन यांनी गुन्हेगारी उपसंस्कृतीच्या संदर्भात निरूपयुक्ततावादी, द्वेषमूलवादी आणि नकारात्मकतावादी मूल्यांसंबंधी केलेले विवरण चुकीचे आहे. उलट कोहेन यांनी कनिष्ठ वर्गीय

टोळ्यातील ज्या कृत्याचा किंवा कारवायांचा निर्देश केला आहे त्यापेक्षा किती तरी गंभीर स्वरूपाचे गुन्हे या टोळी सदस्यांकडून केले जातात.

३. कोहेन यांच्या सिद्धान्तावर टीका करतांना किटस्यू आणि डायेट्रिक यांनी कोहेन यांनी अवलंबिलेल्या सैद्धान्तिक आणि पद्धतीशास्त्रीय दृष्टिकोणावर आक्षेप घेतला आहे. उपसंस्कृती का निर्माण होते याच्या स्पष्टीकरणार्थ कोहेन यांनी ऐतिहासिक पध्दतीने संशोधन केले. त्यासाठी अर्थातच भूतकालीन लोकसंख्येच्या मानसशास्त्रीय प्रेरणांचे विश्लेषण करणे आवश्यक होते. व्यावहारिक दृष्ट्या ते अशक्य आहे.

४. कनिष्ठ वर्गीय मुले मध्यम वर्गीयांशी आपल्या जीवनपद्धतीची तुलना करतात. त्यातील तफावतीमुळे येणाऱ्या नैराश्यावर उपाय करण्याच्या प्रयत्नातून या मुलांची उपसंस्कृती निर्माण होते. टेनिसीमधील डेव्हिडसन देशातील सात ते बारा इयत्तेतील १२,५२४ विद्यार्थ्यांची एक प्रश्नावली भरून घेण्यात आली होती. काही थोड्याच मुलांना आपण दर्जापासून वंचित आहोत असे वाटले-असे अभ्यासकांना आढळले. याचा अर्थ 'दर्जा वंचितता आणि गुन्हेगारी वर्तन'' यातील संबंध नगण्य आहे.

५. उपसंस्कृतीचा उगम आणि त्यातील सातत्य यातील संबंधाबाबतचा कोहेनचा सिद्धान्त संदिग्ध आहे.

### **३.२.३ प्रमाणकशून्यतेचा सिद्धान्त** (The Theory of Anomie)

एमिल डूर्खीम (१८५८-१९१७) या सुप्रसिद्ध फ्रेंच समाजशास्त्रज्ञांनी मानवी वर्तन क्षेत्रामध्ये लक्षणीय योगदान दिले आहे. १८३९ साली त्यांचा The Division of Labour in society हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. या ग्रंथामध्ये त्यांनी आपल्या Anomie म्हणजे प्रमाणकशून्यतेची संकल्पना मांडली. Anomie या ग्रीक शब्दाचा अर्थ Condition of normlessness किंवा Lawlessness म्हणजे नियमनरहितता/'कायदेविरहितता' असा आहे. प्रमाणकशून्यतेची संकल्पना मांडणारे डूर्खीम हे पहिले समाजशास्त्रज्ञ नव्हते हे येथे ध्यानात घेतले पाहिजे. मात्र त्यांनी प्रमाणकशून्यता ही संकल्पना समाजशास्त्राचा अविभाज्य भाग बनविला तर काही प्रमाणात तो गुन्हेगारीशास्त्रातही अंतर्भूत केली.

डूर्खीम यांनी Anomie चे वर्णन Condition of normlessness म्हणजे 'नियमनरहितता' असे केले आहे. नियमनरहितता याचा अर्थ समाजात नियमनेच नसतात असे नाही. वास्तविक पाहता कोणताही समाज पूर्णपणे नियमनविरहित असूच शकत नाही. प्रत्येक समाजामध्ये मूल्ये आणि नियमने ही असतातच. पण त्यातली कोणती नियमने ही व्यक्तीवर बंधनकारक आहेत या बाबत स्पष्टता नसते. अशा व्यवस्थेत जी गोंधळाची परिस्थिती निर्माण होते तिला उद्देशून डूर्खीम यांनी 'प्रमाणकशून्यता' अशी संज्ञा योजली आहे.

डूर्खीम यांचा प्रमाणकशून्यतेचा हा सिद्धान्त समजून घेण्यासाठी आपणास त्यांची ऐक्यभावाची संकल्पना समजावून घेतली पाहिजे. सामाजिक सदसद्वीवेक बुद्धिचे प्रतिनिधीत्व करणारे सामाजिक ऐक्यभाव हे एक मूलभूत तत्व आहे असे डूर्खीम यांना वाटते. डूर्खीम यांनी सामाजिक ऐक्यभावाचे (१) यांत्रिक ऐक्यभाव Mechanical solidarity (२) सेंद्रिय ऐक्यभाव Organic solidarity असे दोन प्रकार सांगितले आहेत.

**आदिवासी समाजात यांत्रिक ऐक्यभाव असतो.** सामूहिक सदसद्विवेक बुद्धिने यांत्रिक प्रकारचा ऐक्यभाव प्रभावित झालेला असतो. आदिवासी समाज हे एकजिनसी आणि एकमेवाद्वितिय (Unique) असतात. आहार, जीवनशैली, व्यवसाय, बोली इ. बाबतीत त्यांची समानता दिसते. प्रत्येक व्यक्ती ही दुसऱ्या व्यक्तीसारखीच असते आणि त्यांच्यात असामान्यता किंवा पक्षपातीपणा नसतो. यातूनच त्यांच्यात एक प्रकारचा यांत्रिक ऐक्यभाव निर्माण होतो आणि तो सामूहिक सद्सद्विवेक बुद्धिने प्रभावित झालेला असतो. अशा समाजात कायदा हा दमनात्मक Retributive किंवा प्रायश्चित प्रधान असतो. सामूहिक सदसद्विवेक बुद्धिला धोका निर्माण करणाऱ्या व्यक्तिकडून भरपाई करून घेणे हा या कायद्याचा उद्देश असतो. उदा. आपल्या जमातीबाहेरील व्यक्तीशी विवाह करणाऱ्याला वाळीत टाकण्याची शिक्षा किंवा दंड म्हणून समाजाला (जमातीला) मेजवानी द्यावी लागते. इथे व्यक्तिविरूद्ध अपराध केला म्हणून शिक्षा नाही तर सामूहिक सद्सद्विवेक बुद्धी विरोधात अपराध केला म्हणून शिक्षा केली जाते. भरपाईच्या माध्यमातून ही शिक्षा केली जाते. डूर्खीम म्हणतात, ''व्यक्तींना अतित असणाऱ्या अशा शक्तीविरूद्ध अपराध हाच गुन्हा होय. (Crime is an offence against an authority in some way transcedent) जर गुन्हेगार शिक्षेविना राहिले तर ऐक्यभाव दुंभगण्याची शक्यता असते. त्यासाठीच गुन्हेगारांना शिक्षा होणे आवश्यक ठरते.''

या उलट समाज जसजसा अधिक संकीर्ण व गुंतागूंतीचा होत जातो तसतसे समाजातील श्रमविभाजन विकसीत व जटिल स्वरूपाचे होते. मोठी, दाट आणि सामाजिक वैविध्यतापूर्ण लोकसंख्या हे अशा समाजाचे वैशिष्ट्य असते. त्यातून 'सेंद्रिय ऐक्यभाव' निर्माण होतो. सामाजिक वैविध्ययुक्त लोकसंख्या असल्याने औपचारिक, दुय्यम संबंध व विषमतेचे प्राबल्य असते.

यांत्रिक ऐक्यभाव जेव्हा सेंद्रिय ऐक्यभावात रूपांतरित होतो तेव्हा श्रमविभाजनाची निकड निर्माण होते. त्यातून अनैसर्गिक वर्ग व विविध दर्जाची निर्मिती होऊन विषमता वाढते. सामाजिक नियमने, लोकरूढी, लोकनीती, नैतिकता इ. सामाजिक नियंत्रणाची पारंपरिक साधने मानवी वर्तन नियंत्रित करण्यामध्ये निष्प्रभ ठरतात. सामाजिक एकजिनसीपणाचे प्रमाण कमी होते. एकाकीपणा, सामाजिक पृथकता व आत्मभान हरविल्याची जाणीव होते. या परिस्थितीत ऐक्यभावाची जागा 'नियमनरहितता' घेते.

डूर्खीम यांच्या मते यांत्रिक ऐक्यभावाकडून सेंद्रिय ऐक्यभावाकडे होणाऱ्या संक्रमणावस्थेमध्ये गुन्हेगारी व समाज विघातक कृत्ये निर्माण होऊन फोफावू शकतात.

आधुनिक औद्योगिक समाजाच्या संदर्भात आपण हे चांगल्या प्रकारे समजू शकतो. आधुनिक औद्योगिक समाजामध्ये एखाद्याचे यशापयश मोजण्याचे मध्यवर्ती निकष म्हणजे भौतिकवादी आणि चंगळवादी वृत्ती होय. औद्योगिक क्रांतीमुळे घरगुती उद्योगधंदे बंद पडले. यांत्रिकीकरण, स्वयंचलीकरण आणि केंव्हा तरी येणारी मंदी इ. घटकांमुळे बेकारीची समस्या गंभीर बनली. वशिलेबाजीमुळे (Nepotism) महत्वाच्या पदावर अपात्र उमेदवारांची वर्णी लागते. गळेकापू स्पर्धेमुळे समाजमान्य पद्धतींनी अपेक्षित उद्दिष्टे गाठणे अशक्य होते. या परिस्थितीत चूक-बरोबर, पवित्र-अपवित्र, नैतिक-अनैतिक, योग्य-अयोग्य यातील सीमारेषा धूसर होतात. त्यातून मानसिक द्वंद्व किंवा संघर्ष निर्माण होतो. साहजिकच परंपरा, मूल्ये, नैतिकता, समाजिक नियमने, विश्वास इ. वरचा

सामान्य माणसाचा विश्वास डळमळीत होतो. डूर्खीम यांचे मते ही परिस्थिती प्रमाणकशून्यतेची असून ती गुन्हेगारीला अनुकूल असते.

**रॉबर्ट मर्टन यांचा प्रमाणकशून्यतेचा सिद्धान्त :**

अमेरिकेतील समाजशास्त्रज्ञ रॉबर्ट मर्टन हे द्युरखाईम यांच्या प्रमाणकशून्यतेच्या सिद्धाताने खूपच प्रभावित झाले. रॉबर्ट मर्टन यांनी गुन्हेगारी वर्तनाचे स्पष्टीकरण करण्यासाठी प्रमाणकशून्यतेच्या संकल्पनेचा व्यापक प्रमाणावर विस्तार केला. डूर्खीम यांचा हा अमूर्त सिद्धान्त होता. अमेरिकेच्या समाजजीवनातील वास्तववादी घटनाशी मर्टन यांनी प्रमाणकशून्यतेचा सिद्धान्त जोडला.

गुन्हेगारी वर्तनाच्या विश्वासार्हतेबाबत प्रश्न चिन्ह निर्माण करत मर्टन यांनी आधीच्या सिध्दान्ताबाबत असहमती दर्शवली. जीवशास्त्रज्ञ, मनोविकारतज्ञ यांचे मते आनुवंशिक गुणवैशिष्ट्ये ही गुन्हेगारीस कारणीभूत असतात. जीवशास्त्रीय गरजा आणि सामाजिक निर्बंध यांच्यातील अपरिहार्य कलह (Struggle) या सिद्धान्तकर्त्यांनी महत्वाचा मानला होता.

हे सिद्धान्त नाकारणारा व त्यावर टिका करणारा रॉबर्ट मर्टन यांचा लेख १९३८ साली American Sociological Review मध्ये प्रसिद्ध झाला. पुढे १९४९ आणि १९५७ मध्ये रॉबर्ट मर्टन यांनी आपल्या सिध्दान्ताची व्याप्ती वाढविली. रॉबर्ट मर्टन यांनी एक महत्वाचा प्रश्न उपस्थित केला. वेगवेगळ्या समाजसंरचनेत गुन्हेगारी वर्तनाच्या वारंवारितेचे प्रमाण तसेच स्वरूप आणि प्रतिमाने वेगवेगळी का असतात?

रॉबर्ट मर्टन यांनी या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. समाजसंरचनेतून व्यक्तींवर असे काही दबाव येतात की, जेणेकरून काही व्यक्तींना अनुचलनात्मक वर्तनापेक्षा विचलनात्मक वर्तनच करणे भाग पडते. मर्टनच्या मते कोणत्याही समाज-संस्कृतीमध्ये दोन वैशिष्ट्ये असतात. पहिले म्हणजे प्रत्येक समाजात काही उद्दिष्टे प्रस्थापित झालेली असतात. आणि ती साध्य करणे ही समाज सदस्यांची आकांक्षा असते. दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे ही उद्दिष्टे प्राप्तीची साधने किंवा पध्दती ही समाजमान्य असतात. सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्ट्यात फरक करणे फार कठीण आहे. काही समाजात उद्दिष्टांना महत्व दिले जाते तर काही समाजात ती उद्दिष्ट साध्य करण्याच्या साधने किंवा पद्धती महत्वाच्या मानतात. ही साधने संस्कृती ठरविते तर समाज त्यांना मान्यता देतो. जोपर्यंत सदस्य हे समाजातील उद्दिष्टांची प्राप्ती समाजमान्य मार्गाने करतात तोपर्यंत समाजात अनुचलन (Conformity) होत असते. पण जेंव्हा या उलट वर्तन होते तेंव्हा विचलन (deviance) घडते.

जेव्हा समाजामध्ये सामाजिक-सांस्कृतिकदृष्ट्या निश्चित केलेली उद्दिष्टे असतात पण ती प्राप्त करण्याची साधने समाजसदस्यांच्यात आवाक्यात नसतात तेव्हा साहजिक लोक ती उद्दिष्ट्ये प्राप्त करण्यासाठी समाजविरोधी वा अन्य पद्धतींचा अवलंब करतात.

उदा. वैद्यक/अभियांत्रिकी सारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळविण्यासाठी उच्च गुण प्राप्त करणे हे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी समाजमान्य पद्धतींचा म्हणजे अभ्यास करणे, परीक्षेला बसणे, पूर्ण पेपर सोडविणे इ. केले पाहिजे. पण समाजामध्ये असे काही जण असतात की जे यापैकी काही करूच शकत नाहीत मग ते अनैतिक मार्गाकडे वळतात.

या परिस्थितीत समाजाची प्रतिक्रिया काय असू शकते? रॉबर्ट मर्टन यांनी या प्रतिक्रियांचे एक प्रकारशास्त्रच दिले आहे. हे प्रकार म्हणजे एक प्रकारे अनुकूलनच (adaptation) आहे.

१. **अनुचलन** (Conformity) : व्यक्ती समाजमान्य उद्दिष्ट आणि ते प्राप्त करण्याच्या समाजमान्य पद्धती या दोन्हीचा स्वीकार करतात. उदा. लैंगिक समाधान हे समाजमान्य उद्दिष्ट आहे. एखादी व्यक्ती कायदेशीरपणे विवाहबद्ध होते आणि समाजमान्य पद्धतीने लैंगिक गरजेची पूर्तता करते. ही एक सर्वदूर असलेली लोकप्रिय प्रतिक्रिया आहे.

२. **आविष्कृतीजन्य वर्तन :** (Innovation) प्रमाणकशून्यतेची दुसरी प्रतिक्रिया किंवा अनुकुलन म्हणजे आविष्कृतीजन्य वर्तन होय. यामध्ये व्यक्ती उद्दिष्ट स्वीकारते आणि समाजमान्य पद्धती नाकारते. उदा. वर म्हटल्याप्रमाणे वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश हेणे हे उद्दिष्ट आहे. विद्यार्थी, पालक हे उद्दिष्ट स्वीकारतात. पण काही विद्यार्थी/पालक कॉपी करणे, तोतयागिरी (एकाच्या नावावर दुसऱ्याला परिक्षेस बसविणे) या सारख्या गैरमार्गांचा अवलंब करतात. म्हणजेच समाजमान्य साधने किंवा पद्धती नाकारतात.

विचलन आणि गुन्हेगारी वर्तनाचे कारण म्हणून रॉबर्ट मर्टन यांनी या प्रतिक्रियेचे विवरण केले आहे. उदा. विद्यार्थी/पालकांवर समाजसंरचनेचे दडपण/दबाव असतो. परीक्षेत चांगले यश मिळवावे म्हणून हितचिंतक,शिक्षक, नातेवाईक, शेजापाजारी इ. सातत्याने त्या विद्यार्थ्यावर दबाव आणत असतात. तर दुसरीकडे समाजमान्य साधने किंवा पद्धतींची वानवा असतो. उदा. आवश्यक साधने उपलब्ध असणे, तज्ञ शिक्षक-मार्गदर्शक, दळणवळण व वाहतूकीची साधने, स्वतंत्र अभ्यास खोली इ. नसणे. या समाज-संरचनात्मक मर्यादा होत. ही प्रतिकूल परिस्थिती विद्यार्थी/पालकांना वर्तन करायला भाग पाडते.

रॉबर्ट मर्टन म्हणतात, ''दारिद्र्यामुळे गुन्हेगारी वर्तन होत नाही. पण पैसा हेच सर्वोच्च उद्दिष्ट आहे असे सांस्कृतिक मूल्य ठसविले जावून त्याचा दारिद्र्याशी संबंध जोडला जातो तेव्हा स्वाभाविकच त्याची परिणती गुन्हेगारी वर्तनात होते.

३. **कर्मकांडवाद** Ritualism : हा प्रतिक्रियेचा तिसरा प्रकार असून यामध्ये समाजमान्य उद्दिष्टे नाकारली जातात पण ती साध्य करण्याची साधने/समाजमान्य पद्धती स्वीकारल्या जातात. अमेरिकेच्या समाज जीवनामध्ये रॉबर्ट मर्टन यांनी या प्रकाराचे निरीक्षण केले आहे. कनिष्ठ मध्यम वर्गाचे हे वैशिष्ट्य आहे. विशिष्ट उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी कनिष्ठ मध्यम वर्ग समाजमान्य पद्धतीची कास धरतो पण त्यामुळेच उद्दिष्टप्राप्ती आणखी कठीण होते. मर्टन यांचे हे निरीक्षण पांढरपेशीय मध्यमवर्गीनांना पण लागू होते. भारतीय मध्यमवर्गीय पालक आपल्या महत्वकांक्षा आपल्या मुलांच्या माध्यमातून पुऱ्या करून घेण्याबाबत आग्रही असतात. मुलांच्यात उच्च ध्येये व आकांक्षा रूजविल्या जातात. तथापि, पात्रता, गुणवत्ता व अन्य कारणाने या आकांक्षा उद्दिष्टे प्राप्त होऊ शकत नाहीत. अशा परिस्थितीत संभाव्य अपयश व त्याबरोबर येणारे अपयश विचारात घेऊन हे लोक आपली उद्दिष्ट्ये कनिष्ठ पातळीवर आणतात. परीक्षेला बसून नापास होण्यापेक्षा परीक्षेला न बसलेलेच बरे. महाविद्यालयात यायचे पण वर्गात बसायचे नाही हे आपण पाहतोच.

४. **प्रतिगमन** (Retreatism) : यालाच पलायनवादी असे ही म्हणता येईल. ही चौथ्या प्रकारची प्रतिक्रिया असून यामध्ये समाजमान्य उद्दिष्ट आणि ते प्राप्त करण्याची समाजमान्य पद्धत

किंवा साधने दोन्हीही नाकारली जातात. जेव्हा व्यक्ती उद्दिष्टे आणि साधने या दोन्हींचाही स्वीकार करते अशा विशिष्ट परिस्थितीत हे घडू शकते. कायदेशीर मार्गाचा अवलंब करूनही समाजमान्य पद्धती स्विकारून प्रयत्न करूनही व्यक्तीला उद्दिष्ट गाठण्यात अपयश येते. तर दुसरीकडे पूर्वायुष्यातील समाजीकरण, संस्कार आणि श्रम, प्रामाणिकता, कायद्याचा आदर करण्याची वृत्ती इ. त्याला गैर/बेकायदेशीर किंवा अनैतिक मार्गांचा अवलंबही करू देत नाही. अशी परिस्थिती ही व्यक्तीला उद्दिष्ट आणि साधने या दोघांचाही त्याग करायला भाग पाडते. उदा. समाजमान्य पद्धतीने परीक्षेस बसूनही पुन:पुन: अपयश आल्याने ही व्यक्ती शिक्षणालाच रामराम ठोकते. अशा वेळी व्यक्ती उद्दिष्ट आणि मार्गापासून मुक्तता करून घेऊन दारू, जुगारी अड्डे जवळ करते आणि मवाली बनते.

५. **बंडखोरी :** (Rebellion) मर्टन यांनी सांगितलेली ही पाचवी आणि अंतिम प्रतिक्रिया असून यामध्ये उद्दिष्टे आणि ती प्राप्त करण्याची साधने दोन्हीही नाकारलीच जात नाहीत तर त्यांना आव्हान दिले जाते. हे त्यांचे उद्दिष्ट असते. समाजातील परंपरा, मूल्य, विश्वास इ. बदलून प्रस्थापित समाजरचनाच बदलणे त्यांचे ध्येय असते. प्रस्थापित नियमने, नीतीमूल्ये न मानता स्वेच्छावर्तन करतात. त्यातून त्यांना नवीन उद्दिष्टे आणि साधनांचे संस्थीकरण करायचे असते.

उदा. क्रियाशील कार्यकर्ते (activist) चळवळीच्या माध्यमातून उद्दिष्ट साधायचा प्रयत्न करतात. मुंबईच्या गुन्हेगारी जगतातील एका ‘भाई’ ने तुरूंगातून मुक्तता होताच मंत्रालयावर मोर्चा काढला होता. त्याने राज्याच्या काही भागामध्ये आपल्या शाखा उघडल्या होत्या.

**रॉबर्ट मर्टन यांच्या सिद्धान्ताचे मूल्यमापन :**

रॉबर्ट मर्टन हे स्वत:च त्यांच्या सिद्धान्ताचे भाष्यकार होते. एका ऐवजी दुसरी प्रतिक्रिया माणूस का स्वीकारतो याचे सामाजिक मानसशास्त्रीय स्पष्टीकरण आपला सिद्धान्त देत नाही हे रॉबर्ट मर्टन मान्य करतात. ज्ञानाच्या विकासाच्या या टप्प्यावर कदाचित सर्व प्रकारच्या मानवी वर्तनाचे स्पष्टीकरणही करता येणार नाही असेही मर्टन म्हणतात. आपल्या सिद्धान्तातील सर्व उणीवा विचारात घेऊन विचलनात्मक वर्तनाच्या संरचनात्मक स्त्रोतावरील हा निबंध म्हणजे केवळ प्रस्तावना (नांदी) आहे. अलबर्ट कोहेन; क्लिनार्ड मार्शल बी., एडविन लेमेत इ नी. मर्टन यांच्या प्रमाणकशून्यतेच्या सिद्धान्तावर टीका केली त्यांच्या टीकेतील केंद्रीभूत मुद्दे असे.

१. कोण उद्दिष्टांचा स्वीकार करील अथवा कोण नाकारील हे मर्टनच्या सिध्दान्तावरून स्पष्ट होत नाही.

२. तणावपूर्वक संबंधांची परिणती विचलनात्मक वर्तनात होतेच असे नाही.

३. मर्टन यांनी समाजसंरचनेला महत्व देतांना व्यक्तिमत्वाकडे मात्र दुर्लक्ष केले.

४. बालगुन्हेगारांच्या निरुपयुक्ततावादी मूल्यांचे मर्टनचा सिद्धान्त स्पष्टीकरण करत नाही. उदा. काही मुले केवळ कुतुहलापोटी गंमत म्हणून दुचाक्या पळवून फिरवतात आणि इंधन संपले की सोडून देतात.

### ३.२.४ कानफाट्या सिद्धान्त: (Labeling Thery)

**एडविन लेमर्ट** यांनी १९५५ साली गुन्हेगारी वर्तनाच्या स्पष्टीकरणार्थ कानफाट्या सिद्धान्त मांडला. तोपर्यंत गुन्हेगारी वर्तनाबाबत शरीरशास्त्रीय, जनुकीय, रासायनिक, भौगोलिक, मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून स्पष्टीकरणे देण्यात येत होती. ही सगळी स्पष्टीकरणे गुन्हेगारीचे ''कारण'' देण्याचा प्रयत्न करीत होती. एखादी व्यक्ती गुन्हा का करते किंवा गुन्ह्याची कारणे कोणती हाच त्यांच्या अन्वेषणाचा केंद्रबिंदू होता.

गुन्ह्याच्या कारणाचा शोध घेणे हे या सिध्दान्ताचे वैशिष्ट्ये नाही तर एखाद्या व्यक्तिला 'गुन्हेगार' असे का म्हटले जाते त्याचे अन्वेषण करणे हे या सिद्धान्ताचे खास वैशिष्ट्य आहे. **गुन्हेगारी वर्तन हा या कानफाट्या सिद्धान्ताचा मध्यवर्ती मुद्दा नसून एखाद्या वर्तनाला तसे लेबल का लावले जाते हा आहे.**

लेबल म्हणजे काय? बाजारामध्ये वेगवेगळ्या वस्तूंवर त्याचे वजन, उत्पादक, किंमत इ. दर्शविणारी चिठ्ठी लावलेली असते. त्याला लेबल म्हणतात. थोडक्यात, त्या वस्तूचे वर्णन दर्शविणारी परिचय वैशिष्ट्यदर्शक चिठ्ठी म्हणजे लेबल. समाजामध्ये पण विविध व्यक्तींना काही विशेषणे उदा. 'पुढारी', 'खलनायक', 'नायक', 'चोर', 'दरोडेखोर', 'पाकीटमार', '४२०' इ. लेबल्स लावलेली आपण पाहतो. यापैकी कांही लेबल्स ही नकारात्मक वृत्ती दर्शविणारी असतात. कधी काळी काही व्यक्ती, समूहांकडून जाणते अजाणतेपणी, हेतूत: सामाजिक नियमनांचे, मूल्यांचे, नैतिकतेचे उल्लंघन झालेले असते. त्यांच्या हातून काही अनैतिक, बेकायदेशीर वर्तन घडलेले असते. इंग्रजांच्या राजवटीमध्ये काही जमातींवर 'गुन्हेगार जमाती' असा शिक्का बसला होता ते ही लेबलच होय. आजही गुन्ह्यांचा तपास करतांना पोलीस अशा जमातींच्या वसतिस्थानावर छापे मारतात. पोलीस, कायदा, समाज त्यांच्याकडे संशयानेच पाहतो. एखाद्या व्यक्तीने सामाजिक नियमनांप्रमाणे वर्तन करून स्वत:मध्ये सुधारणा घडविली तरी समाज त्यांच्याकडे विचलित, लफंगा किंवा गुन्हेगार म्हणूनच पाहतो. याचा अर्थ एकदा 'कानफाट्या' असा शिक्का बसला की तो कायमस्वरूपी चिकटतो, आणि त्यापासून त्याची सुटका होत नाही. अर्थातच गुन्हेगारी जीवनाचा त्याग करूनही त्यांच्यात सुधारणा होणे किंवा त्याच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलणे शक्य होत नसते. परिणामी, त्याच्या गुन्हेगारी कारवाया चालूच राहतात.

**गुन्हेगारी वर्तनाचे स्पष्टीकरण करणाऱ्या या सिद्धान्ताचा केंद्रबिंदू गुन्हेगार व्यक्ती नसून ज्या समाजिक प्रक्रियेद्वारे हे लेबल चिकटविले जाते ती प्रक्रिया आहे** हे येथे आवर्जन ध्यानात घेतले पाहिजे. तसेच येथे हे ही ध्यानात घेतले पाहिजे सगळ्याच गैरवर्तन करणाऱ्यांना हे लेबल लावले जात नाही उदा. खूप लोक मद्यपान करतात पण त्या सगळ्यांनाच 'बेवडा' म्हणत नाहीत. अपसामान्य वर्तन करणाऱ्यापैकी काहीनाच इस्पितळात भरती करतात. इतरांना नाही. का? या प्रश्नाचे उत्तर समाजाच्या अशा व्यक्तीकडे पाहण्याच्या दृष्टिकोणात म्हणजे समाजाचे त्याच्या प्रती असलेल्या प्रतिसादात आहे. समाज अशा व्यक्तीकडे कसा पाहतो आणि कशी प्रतिक्रिया व्यक्त करतो? समाजाने जर एखाद्याला 'बेवडा' ठरवले तर तो 'बेवडा' होतो म्हणजे त्याला 'बेवडा' असे लेबल चिकटणे. याचा अर्थ एखाद्याला लेबल लावतांना त्याचे व्यक्ती विशेष पाहिले जात नाहीत तर समूहाचे/समाजाचे प्रतिसाद किंवा प्रतिक्रिया पाहिल्या जातात.

उदा. एका किशोरवयीन मुलीवर ती उन्मार्गी आहे असा शिक्का तिच्या शाळेकडून बसला. मग तिचे वर्गमित्र, शिक्षक इ. तिच्याकडे 'उन्मार्गी' म्हणूनच पाहू लागतात. हळूहळू तिच्याशी अबोला धरणे, मौन पाळणं, तिची संगत टाळणं, आणि तिच्याशी आंतरक्रिया करणेच थांबविल जाते. तिने कितीही प्रयत्न केला तरी या दूषणापासून तिची सुटका होत नाही. ही परिस्थिती तिला अनुचलन नव्हे तर विचलन करायला भाग पाडते. डेनिस रॉनेक Dennis Roneck म्हणतात, ''आपल्या संस्कृतीत एखाद्याला लेबल चिकटवण्याचे वैशिष्ट्य म्हणजे एकदा लेबल चिकटले की, त्यापासून मुक्तता नाही''.

**हॉवर्ड एस. बेकर** म्हणतात, **''विचलित व्यक्ती म्हणजे अशी की जिला पक्के लेबल लागले आहे. विचलित वर्तन म्हणजे असे वर्तन की जे समाज तसे मानतो''** याचाअर्थ एखादी कृती किंवा वर्तन हे गुन्हेगारी वर्तन नसते तर इतर व्यक्ती जेव्हां ते वर्तन विचलीत आहेत असं ठरवतात त्या व्यक्तीशी अशा वर्तनाची सांगड घालतात तेव्हा ते विचलित वर्तन होते.

एम. हरलँबॉस यांनी एक उदाहरण दिले आहे. शयनगृहात पती-पत्नींनी नग्न असण्यात गैर काहीही नाही. ते एक सामान्य वर्तन आहे. अनुचलन किंवा विचलन असे काही नसते. पण समाज जेव्हां या वर्तनाला 'तसा' अर्थ देतो तेव्हा ते 'विचलन', 'गुन्हेगारी' वर्तन होते. या संदर्भात कोण, केव्हा, कुठे, कसे, का? हे प्रश्न महत्वाचे ठरतात.

हॉवर्ड  बेकर यांनी आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ तरूणांच्या मारामारीचे उदाहरण दिले आहे. ही मारामारी जर झोपडपट्टीसारख्या ठिकाणी चालले असेली तर पोलीसांच्यादृष्टीने तो अमुक एका कलमाखाली गुन्हा होतो. हीच मारामारी किंवा भांडण समाजाच्या उच्चभ्रु, श्रीमंताच्या वसाहतीमध्ये चालली असेल तर समाज त्याकडे ''तारूण्यावस्थेतील चैतन्यात्मक वर्तन'' (Youthful high spirit) म्हणून पाहतात. घटना तीच आहे. पण दोन भिन्न सामाजिक स्तरावर तिचे भिन्न प्रकारे विश्लेषण केले जाते.

बेकर यांच्या शब्दात सांगायचे झाले तर ''ते फक्त त्यांना जे योग्य आणि आवश्यक'' वाटते तेच करत असतात. पण शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, पोलीस त्याकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहतात'' उदा. एखादा तुरूंगात जाऊन आला की त्याला तसे लेबल लावले जाते. बेकर म्हणतात, ''विचलन हे वर्तनातच अंगभूत नसते तर ते करणारी व्यक्ती आणि त्याला प्रतिसाद देणारी व्यक्ती यांच्या आंतरक्रियेत असते. काहीच व्यक्तींना लेबल लावले जाते आणि काहीना नाही. असे का? या प्रश्नाचे उत्तर खालील घटकांशी निगडित आहे.

**१. उल्लंघित नियमांना असलेले महत्त्व :**

समाजामध्ये असंख्य सामाजिक नियमने असतात आणि त्याप्रमाणे समाजसदस्यांनी वर्तन करावे अशी अपेक्षा असते. यातील काही नियमने ही दुय्यम स्वरूपाची असून त्यांचे उल्लंघन क्षम्य मानले जाते. उदा. 'नो पार्किंग' च्या ठिकाणी वाहन लावणे.

तर काही सामाजिक नियमने अतिमहत्वाची मानली जातात आणि नैतिकदृष्ट्या ती लक्षणीय समजली जातात. अशा नियमनांचे उल्लंघन हे दखल आणि शिक्षापात्र असते उदा. खूनी, बलात्कारी, व्यभिचारी अशी लेबल्स संबंधितांना चिकटविली जातात.

थोडक्यात, उल्लंघन केल्या जाणाऱ्या सामाजिक नियमनांना किती महत्व आहे हा घटक लेबल चिकटविण्यात महत्वाचा ठरतो.

**२. व्यक्तीचे सामाजिक स्थान :**

लेबल चिकटविण्याच्या प्रक्रियेमध्ये गुन्हेगारी वर्तन करणारी व्यक्ती कोण आहे? आणि त्या गुन्हेगारी कृत्याचा बळी कोण आहे? हा घटकही महत्वाचा ठरतो. उदा. नीटनेटका पोशाख केलेल्या उच्च दर्जा भूषविणाऱ्या, शिष्टाचार पाळणाऱ्या व्यक्तीने गुन्हेगारी वर्तन किंवा मद्यपान केले, उचलेगिरी केली तर तिकडे दुर्लक्ष केले जाते. त्याचे मद्यपान हे ''सामाजिक शिष्टाचार'' (Party Manners) म्हणून खपून जाईल किंवा ताण असतो (Tension) म्हणून पितो असे म्हटले जाईल. याचा अर्थ लेबल चिकटविण्यामध्ये एखाद्याची सामाजिक प्रतिमा किंवा दर्जा या घटकाची भूमिका पण महत्वाची असते. हेच त्या गुन्हेगारी कृत्याच्या बळीबाबत ही म्हणता येते.

**३. सामाजिक संदर्भ**

एखादे वर्तन किंवा कृत्य कोणत्या सामाजिक संदर्भात घडते याचा व्यक्तीवर विशिष्ट शिक्का मारण्याशी संबंध आहे. उदा. आदिवासींमध्ये मद्यपान विशेषत: सणवार-समारंभामध्ये ही एक सामाजिक प्रथा मानली जाते. पण तेच जर एखादा खूप मद्यपान करून धिंगाणा घालत बाजारपेठेत सार्वजनिक शांततेचा भंग करू लागला तर हेच ते सामाजिक-कायदेशीर उल्लंघन होऊन शिक्षापात्र वर्तन ठरते. याचसाठी ज्या ठिकाणी एखादी घटना-कृत्य घडते ते भौगोलिक ठिकाण नव्हे तर ज्या समाजिक संदर्भात जे वर्तन घडते तो सामाजिक संदर्भ विचारात घ्यावा लागतो. एखादे कृत्य हे गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन आहे किंवा नाही हे अंशत: त्या कृत्याच्या स्वरूपावर आणि अंशत: इतरांच्या त्या बाबत प्रतिक्रियावर अवलंबून राहते.

थोडक्यात, प्राथमिक स्वरूपाच्या विचलनाबद्दल एखाद्याला तसे लेबल लावले जाते. वास्तविक पाहता अशी व्यक्ती ही सराईत गुन्हेगार नसते. First offender म्हणजे पहिल्यादांच गुन्हा केलेली असू शकते. पण त्याला तसे लेबल चिकटविल्यामुळे ती सराईत गुन्हेगार होऊ शकते.

काही अनुभवाधिष्ठित अभ्यासांच्या आधारे आपल्याला हा कानफाट्या किंवा लेबलिंग सिद्धान्त समजावून घेता येतो.

रिचर्ड शॉट्झ (Richard Schwartz) आणि जेरोमी सॉलनिक (Jerome Skolnick) यांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या संभाव्य नोकरांबाबत मालकांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी एक पाहणी केली (reactions of employer to potential employee). पंचवीसपैकी चोवीस मालकांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या संभाव्य नोकरीमध्ये आपल्याला स्वारस्य नसल्याचे सांगितले.

स्यू टायटस रीड यांनी कानफाट्या सिद्धान्ताच्या परिणामाचे १९७० साली सर्वांचे लक्ष वेधून घेणारे उदाहरण दिले आहे. या प्रयोगामध्ये अमेरिकेच्या वेगवेगळ्या भागातील इस्पितळांच्या मनोरूग्ण विभागामध्ये विविध पार्श्वभूमी असलेली 'शहाणी' आठ माणसं भरती केली होती. या 'रूग्णां'नी आपण मनोरूग्ण (Pseudopatient) असल्याचे सोंग केले होते. वास्तविक पाहता या चारचौघांसारख्या सामान्य व्यक्ती होत्या. आश्चर्यकारकरीत्या ही बाब कोणत्याही इस्पितळाच्या लक्षात आली नाही. त्यांचे मनोविकृत (schizophrenia) असे निदान करण्यात आले आणि

इस्पितळात असेपर्यंत तेच लेबल त्यांना चिकटले. एकदा हे लेबल चिकटल्यावर त्यांच्याशी रोज आंतरक्रिया करणाऱ्या कर्मचारी पण त्यांना मनोरूग्णच समजू लागले. याचा अर्थ केवळ लेबलमुळेच ते मनोरूग्ण ठरले.

**मूल्यमापन :** विचलनात्मक किंवा गुन्हेगारी वर्तनाचे स्पष्टीकरण करण्यामध्ये कानफाट्या सिद्धान्ताचे योगदान आहे. तथापि, हाही सिद्धान्त टीकाकारांच्या नजरेतून सुटला नाही.

समाज विशिष्ट व्यक्तिंच्याच बाबतीत लेबलिंग का करतो आणि का करत नाही याचे स्पष्टीकरण या सिद्धान्ताने मिळते. तथापि, प्राथमिक विचलनाचे समाधानकारक स्पष्टीकरण हा सिद्धान्त करत नाही. याचा अर्थ हा सिद्धान्त विचलनात्मक वर्तनाचे अंशत: स्पष्टीकरण करतो.

- लेबलिंग सिद्धान्त हा खऱ्या अर्थाने सिद्धान्त नाही तर एक दृष्टिकोण approach आहे. चाचणीयोग्य गृहीतकांची निर्मिती ही एक सिद्धान्ताची पूर्व अट असते. कानफाट्या सिध्दान्ताची अनुभवाधिष्ठित चाचणी घेणे अशक्य आणि हास्यास्पद आहे अशी टीका या सिद्धान्तावर झाली.
- हा सिद्धान्त गुन्हेगारी वर्तनाची कारणमीमांसा करीत नाही अशी एक सर्वसामान्य टीका केली जाते. गुन्हेगारी वर्तनाचे लेबलिंग हे स्पष्टीकरण असले तरी एखादी व्यक्ती जेव्हा केव्हा पहिले गुन्हेगारी कृत्य विशेषत: हे गंभीर स्वरूपाचे कृत्य करते तेव्हां ती का करते हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.
- गुन्हेगारी वर्तनाचे स्पष्टीकरण करतांना हा सिद्धान्त एखाद्याचे व्यक्तिमत्व विशेष (Personality truits) किंवा व्यक्तिमत्व हा घटक विचारात घेत नाही.
- लेबलिंगचे नकारात्मक परिणाम होतात असे म्हटले जाते. पण ते खरे नाही. वास्तविक पाहता लेबलिंगचे सकारात्मक आणि नकारात्मक असे दोन्ही परिणाम होऊ शकतात. एखाद्या व्यक्तिला गुन्हेगार किंवा विचलित असे लेबल लावण्याने अशी व्यक्ती भीती किंवा दहशतीपोटी आणखी निर्ढावण्यापासून किंवा गुन्हेगारी वर्तन आत्मसात करण्यापासून परावृत होऊ शकते असाही युक्तीवाद केला जातो.
- एखाद्याला लेबल लावण्यामध्ये इतरांच्या तसेच समाजाच्या प्रतिक्रिया आणि प्रतिसादाला तितकेच महत्व आहे. त्यावरच सकारात्मक किंवा नकारात्मक लेबल ठरत असते. हितचिंतक मित्र, नातेवाईक यांनी एखाद्याबाबत सकारात्मक आधार देण्याची वृत्ती असेल तर ती व्यक्ती सुधारण्याची शक्यता असते. लेबलिंगच्या सिद्धान्तकारांनी ही शक्यता विचारात घेतलेली नाही.

## ३.३ सारांश :

या प्रकरणामध्ये आपण गुन्हेगारी वर्तनाचे स्पष्टीकरण करणाऱ्या समाजशास्त्रीय सिद्धान्तांचे परीक्षण केले. गुन्हेगारी वर्तन चांगल्या प्रकारे समजून घेण्यामध्ये हे सिद्धान्त सहाय्यभूत आहेत. आपण अभ्यासलेला पहिला सिद्धान्त म्हणजे सदरलँड यांचा विभेदित साहचर्याचा सिद्धान्त होय. इतरांच्या साहचर्यामध्ये व्यक्ती गुन्हेगारी वर्तन शिकते असे या सिद्धान्ताचे प्रतिपादन आहे. सदरलँड यांनी परिस्थितीजन्य आणि जनुकीय घटकांचे आधारे गुन्हेगारी वर्तनाचे स्पष्टीकरण दिले आहे.

फ्रेंच समाजशास्त्रज्ञ एमिल डूर्खीम यांनी स्पष्ट केलेला आणि अमेरिकन समाजशास्त्रज्ञ रॉबर्ट मर्टन यांनी विकसित केलेला सिद्धान्त गुन्हेगारी वर्तनाचे स्पष्टीकरण हे प्रमाणकशून्यतेच्या संदर्भात करतो. डूर्खीम यांनी यांत्रिक व सेंद्रिय या दोन प्रकारचा ऐक्यभाव कथन केला आहे. यांत्रिक ऐक्य भाव जेव्हां सेंद्रिय ऐक्यभावाकडे संक्रमित होतो तेव्हा समाजात वर्ग तसेच दर्जांचे विभेदीकरण निर्माण होते. त्यातून निर्माण होणारा एकाकीपणा, सामाजिक अलिप्तता किंवा पृथक्ता ही गुन्हेगारीला पोषक असते.

रॉबर्ट मर्टन यांनी नियमनरहिततेच्या अवस्थेला अनुचलनशीलता, अविष्कृतिजन्य वर्तन, कर्मकांडवाद, प्रतिगमन आणि बंडखोरी या पाच प्रकारच्या प्रतिक्रिया निर्माण होऊ शकतात असे स्पष्ट केले आहे.

उन्मार्गी उपसंस्कृतीच्या सिद्धान्ताच्या विकासामध्ये क्लिफोर्ड शॉ आणि हेन्री मॅकी, फ्रेडरिक थ्रॅशर, मॅन्हिम, अलबर्ट कोहेन इ. विद्वानांनी योगदान दिले आहे. या विद्वानांच्या मते गुन्ह्याचे संस्कृतीद्वारे संक्रमण होते. गुन्हेगारांची एक संस्कृती आणि उपसंस्कृती असते. कष्टकरी किंवा कनिष्ठ वर्गीय मुलांच्या दर्जा समायोजनाशी निगडित असा अल्बर्ट कोहेनचा मध्यमवर्गीय मोजमाप पट्टीचा सिद्धान्त आहे. मध्यमवर्गीय आपल्या वर्तन पद्धती व मानवाच्या दृष्टीने कनिष्ठ वर्गीय मुलांच्या वर्तनाचे मूल्यमापन करतात. त्यातून त्या मुलांची समायोजनाची समस्या निर्माण होते. परिणामी अशा किशोरवयीन मुलांच्या उपसंस्कृतीची निरूपयुक्ततावादी, द्वेषमूलक, नकारात्मक, तात्कालीक सुखवाद इ. वैशिष्ट्ये सांगितली आहेत. या सर्व सिद्धान्तावर टीका झाली.

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–१**

**खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्यायावर ✓ अशी खूण करा**

१) प्राचीन काळी मानवी वर्तन कशावर आधारीत होते?

अ) विज्ञानवाद — क) आधुनिकता

ब ) अतिमानवी शक्ती — ड) तर्कशास्त्र

२) सतराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत गुन्हेगारी वर्तनाचे स्पष्टीकरण कसे होते?

अ) शास्त्रीय — ब) मानसशास्त्रीय

ब ) अशास्त्रीय — ड) धार्मिक

३) गुन्हेगारीच्या शास्त्रीय अभ्यासाचा पाया कुणी घातला?

अ) मार्चीस द बेकारिया — क) एमिल द्युरखाईम

ब ) राबर्ट मर्टन — ड) एडविन सदरलॅंड

४) खालीलपैकी कशाचा परिणाम म्हणून गुन्हेगारी वर्तनाचे समाजशास्त्रीय दृष्टिकोन पाहतो?

अ) कर्मसिद्धान्त — क) सामाजिक आंतरक्रिया

ब) अनुवंशिकता — ड) मानसिक दुर्बलता

५) गुन्हेगारी वर्तनाचे सामाजिक स्पष्टीकरण पहिल्यांदा कुणी दिले?

अ) बेकारिया ब) ग्रॅबिएल दी तार्द

ब) एडविन लेमर्ट ड) जेरेमि बेंथम

६) विभेदित साहयर्चाचा सिद्धान्त कुणी मांडला?

अ) नेल्स अँडरसन क) एडविन सदरलँड

ब) विल्यम फूट व्हाईट ड) हेन्री मॅकी

७) गुन्हेगारीचे सदरलँड यांनी दिलेले गतिशील (Dynamic) स्पष्टीकरण कशावर भर देते?

अ) ऐतिहासिक घटक क) भौगोलिक घटक

ब) परिस्थितीजन्य घटक ड) मानसशास्त्रीय घटक

८) सदरलँड यांच्या सिद्धान्ताप्रमाणे गुन्हेगारी वर्तन हे –

अ) शिकले जाते क) शिकविले जाते.

ब) आनुवंशिक असते ड) यापैकी नाही.

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–२**

**खालील दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्यायावर ✓ अशी खूण करा.**

१) जेव्हा व्यक्ती उद्दिष्टे आणि साधने दोन्हींचा स्वीकार करते तेव्हा ती कोणती प्रतिक्रिया असते?

अ) अनुचलनशीलता क) कर्मकांडवाद

ब) आविष्कृतिजन्य वर्तन ड) बंडखोर

२) जेव्हां उद्दिष्टे स्वीकारली जातात आणि साधने नाकारली जातात तेव्हां कोणती प्रतिक्रिया असते?

अ) अनुचलनशीलता क) प्रतिगमन

ब) अविष्कृतिजन्य वर्तन ड) बंडखोर

३) जेव्हां उद्दिष्टे नाकारली जातात आणि साधने स्वीकारली जातात तेव्हा ती कोणती प्रतिक्रिया असते?

अ) अनुचलनशीलता क) प्रतिगमन

ब) कर्मकांडवाद ड) बंडखोर

४) जेव्हां उद्दिष्टे आणि साधने दोन्ही नाकारली जातात तेव्हां कोणती प्रतिक्रिया असते?

अ) प्रतिगमन क) बंडखोर

ब) अविष्कृतिजन्य ड) कर्मकांडवाद

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–३**

**खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्यायावर ✓ अशी खूण करा**

१) डूर्खीम आणि रॉबर्ट मर्टन यांनी विकसित केलेल्या प्रमाणकशून्यतेच्या सिद्धान्ताने कोणत्या सिद्धान्ताची चौकट निर्माण केली?

अ) उन्मार्गी उपसंस्कृती सिद्धान्त क) कानफाट्या सिद्धान्त

ब ) पांढरपेशीय गुन्हेगारी ड) यापैकी नाही

२) The Gang या ग्रंथाचे लेखक कोण आहेत?

अ) क्लिफोर्ड शॉ व हेन्री मॅकी क) डोनाल्ड क्रेसी

ब ) पॉल तपन ड) नेल्स ॲडरसन

३) Street corner society या ग्रंथाचे लेखक कोण आहेत?

अ) तपन पॉल क) विल्यम फूट व्हाईट

ब ) डोनाल्ड क्रेसी ड) नेल्स अँडरसन

४) Delinquent Boys: The Culfure of the Gang या ग्रंथाचे लेखक कोण आहेत.

अ) अलबर्ट कोहेन क) जहांगिर सेठना

ब) फ्रेडरिक थ्रॅशर ड) डोनाल्ड क्रेसि

५) मध्यमवर्गीय मोजमाप पट्टीचा सिद्धान्त कुणी मांडला?

अ) सदरलँड ब) अल्बर्ट कोहेन

ब) फ्रेडरिक थ्रॅशर ड) सुरेश खोपडे

६) निरूपयुक्तवादी मूल्य हे कशाचे वैशिष्ट्य आहे?

अ) किशोरवयीन ब) वृद्धावस्था

ब) शैशव ड) सराईत गुन्हेगार

## ३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

★ **स्वयं अध्ययन प्रश्न–१ ची उत्तरे**

१) अतिमानवी शक्ती

२) अशास्त्रीय

३) मार्चीस द बेकारिया

४) सामाजिक आंतरक्रिया

५) ग्रॅबिएल दी तार्द

६) एडविन सदरलँड

७) परिस्थितीजन्य किंवा परिस्थितीशास्त्रीय घटक

८) शिकून घेतले जाते.

★ **स्वयं अध्ययन प्रश्न–२ ची उत्तरे**

१) अनुचलनशीलता

२) अविष्कृतीजन्य वर्तन

३) कर्मकांडवाद

४) प्रतिगमन

★ **स्वयं अध्ययन प्रश्न–३ ची उत्तरे**

१. उन्मार्गी उप–संस्कृती

२. क्लिफोर्ड शॉ व हेन्री मॅकी

३. विल्यम फूट व्हाइट

४. अल्बर्ट कोहेन

५. अल्बर्ट कोटेन

६. किशोरवयीन उपसंस्कृती

## ३.५ सरावासाठी स्वाध्याय

१) सदरलँड यांच्या 'विभेदिन साहयर्चाच्या सिद्धान्ता' ची चर्चा करा.

२) 'उन्मार्गी उपसंस्कृती सिद्धान्ता'ची चर्चा करा.

३) द्यूरखाईम यांच्या ''प्रमाणकशून्यते''च्या सिद्धान्ताचे चर्चा करा.

४) रॉबर्ट मर्टन यांच्या 'प्रमाणकशून्यते'च्या सिद्धान्ताची चर्चा करा.

### ३.६ क्षेत्रकार्य

१. तुमच्या कॉलेजमधील विचलित वर्तन करणाऱ्यांचे निरीक्षण करा. विभेदित साहचर्याचा सिद्धान्त त्यांच्या वर्तनाला कसा लागू होतो ते पहा.

२. सध्याची परिस्थिती प्रमाणकशन्यू सदृश आहे का ?गटचर्चा करा.

३. तुमच्या भोवती असणाऱ्या जास्ती जास्त लेबल्सची यादी करा.

❑❑❑

## घटक ४

# बालगुन्हेगारी

## (Juvenile Delinquency)

### अनुक्रमणिका


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

  ४.२.१ बालगुन्हेगारीचा अर्थ व प्रकार

  ४.२.२ बालगुन्हेगारीची कारणे

  ४.२.३ संस्थात्मक आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना

४.३ सारांश

४.४ स्मरणार्थ संज्ञा

४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


### ४.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास-

- बालगुन्हेगारीचा अर्थ आणि प्रकार सांगता येतील.
- बालगुन्हेगारीची कारणे स्पष्ट करता येतील.
- बालगुन्हेगारीवरील संस्थात्मक व प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे आकलन होईल.

### ४.१ प्रास्ताविक

गुन्हेगारी वर्तनासंबंधीची समाजशास्त्रीय स्पष्टीकरणे अभ्यासल्यानंतर आता तुम्ही बालगुन्हेगारी या गुन्हेगारीच्या विशेष प्रकारचे अध्ययन करणार आहात. गुन्हेगार व्यक्तीचे वय विचारात घेऊन गुन्हेगारीचे प्रौढ गुन्हेगारी व बालगुन्हेगारी असे वर्गीकरण करता येते. प्रौढ गुन्हेगारी हा प्रकार प्राचीनकाळापासून आढळून येतो. त्याच्या तुलनेत बालगुन्हेगारी हा प्रकार अलिकडील काळात उदयास आलेला आहे. औद्योगिक क्रांतीनंतर औद्योगिक-नागर समाज उदयास येऊन त्यांची वाढ व विस्तार मोठ्या प्रमाणावर झाला. अशा या समाजात प्रौढांच्या गुन्हेगारीबरोबरच बालगुन्हेगारीचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत आलेले आहे आणि आज बालगुन्हेगारी ही अत्यंत गंभीर समस्या बनलेली आहे.

त्यामुळे गुन्हेगारीवर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ तसेच समाजशास्त्रज्ञ इत्यादींनी बालगुन्हेगारीचा अभ्यास करण्यास सुरुवात केली आहे. याठिकाणी तुम्ही बालगुन्हेगारीचा अर्थ, वैशिष्ट्ये, प्रकार, कारणे आणि बालगुन्हेगारीवरील संस्थात्मक व प्रतिबंधात्मक उपाययोजना इत्यादी बाबींचा अभ्यास करणार आहात.

## ४.२ विषय विवेचन

विवेचनाच्यादृष्टीने या घटकाचे तीन विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात बालगुन्हेगारीचा अर्थ व प्रकार स्पष्ट केलेले आहेत. दुसऱ्या विभागात बालगुन्हेगारीच्या कारणांचे विवेचन केलेले आहे. तर तिसऱ्या विभागात बालगुन्हेगारीवरील संस्थात्मक उपाययोजना तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजना यांची चर्चा केलेली आहे.

### ४.२.१ बालगुन्हेगारीचा अर्थ व प्रकार

साधारणतः प्रचलित कायद्याचा भंग करणाऱ्या कृत्यास किंवा वर्तनास गुन्हा किंवा गुन्हेगारी (Crime) असे म्हणतात तर असे कृत्य करणाऱ्या व्यक्तीस गुन्हेगार असे म्हणतात. गुन्हेगार व्यक्ती ही जर बालक असेल तर तिला बालगुन्हेगार व तिच्या कायदेभंग करणाऱ्या कृत्यास किंवा वर्तनास बालगुन्हेगारी असे म्हणतात. बालगुन्हेगारीस इंग्रजीत Juvenile Delinquency असे म्हणतात. Juvenile म्हणजे युवक (Youth) किंवा कायदेशीरदृष्ट्या वयात न आलेली व्यक्ती असे मानले जाते. Delinquency हा शब्द लॅटिन भाषेतील delinequer म्हणजे to omit या शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ एखाद्या गोष्टीची उपेक्षा किंवा हेळसांड करणे, तिच्यापासून दूर जाणे असा अर्थ होतो. त्यामुळे Delinquency म्हणजे कायद्याची किंवा नियमाची उपेक्षा करणे, हेळसांड करणे, त्यापासून दूर जाणे असा अर्थ घेता येतो. रोममध्ये Delinquency हा शब्द निर्धारित कर्तव्य किंवा कार्य पार पाडण्यात आलेले अपयश या अर्थाने वापरला जाई. **विल्यम कॉझ्सन** या विचारवंताने प्रथात्मक कायद्याचा भंग करणाऱ्या व्यक्तीसाठी Delinquent हा शब्द वापरला. त्यानंतर समाजसंमत प्रमाणकांचे (Norms) उल्लंघन किंवा उपेक्षा करणे या अर्थाने Delinquency ही संज्ञा वापरली जाऊ लागली. आज युवकाचे किंवा बालकाचे कायदेभंग करणारे कृत्य म्हणजे Juvenile Delinquency असा अर्थ घेतला जातो. भारतातील बाल (न्याय) अधिनियम २००० मध्ये बालगुन्हेगार या शब्दाऐवजी ‘‘कायद्याच्या कचाट्यात सापडलेले बालक (Juvenile in Conflic with law) अशी संज्ञा वापरली आहे.

**बालगुन्हेगारीची व्याख्या :** बालगुन्हेगारीचा अर्थ स्पष्टपणे समजण्यासाठी तिच्या विविध दृष्टिकोनातून केलेल्या व्याख्या विचारात घेऊया.

१) **फ्रेडलँडर :** कायदेशीर कारवाईस पात्र ठरणारे बालकाचे दुर्वर्तन म्हणजे बालगुन्हेगारी होय.

२) **डॉ. एम. जे. सेठना :** एखाद्या ठिकाणच्या कायद्याने निर्देशित केलेल्या वयाच्या आतील बालकाने किंवा युवकाने तेथील प्रचलित कायद्याच्या विरुद्ध केलेले कृत्य म्हणजे बालगुन्हेगारी होय.

वरील दोन्ही व्याख्या ह्या कायदेशीर दृष्टिकोनातून केलेल्या आहेत.

**३) एस. व्ही. राव :** मानसिक विकृती असलेली व बालपणापासूनच मानसिक ताणतणाव असलेली मुले जे अपसामान्य वर्तन करतात ते बालगुन्हेगारी वर्तन ठरते.

ही व्याख्या मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून केलेली आहे.

**४) विल्यम शेल्डन :** रास्त अपेक्षांचा भंग करणाऱ्या बालकाच्या वर्तनास बालगुन्हेगारी असे म्हणतात.

**५) डॉ. सुशीलचंद्र :** बालकांच्या समाजविरोधी वर्तनास बालगुन्हेगारी असे म्हणतात.

वरील दोन्ही व्याख्या ह्या समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून केलेल्या आहेत.

थोडक्यात बालकाने कायद्याच्या किंवा सामाजिक नियमनांच्या विरोधात केलेल्या वर्तनास बालगुन्हेगारी असे म्हणतात. तथापि, बालगुन्हेगाराची वयोमर्यादा ही वेगवेगळ्या देशात वेगवेगळी आहे. उदा. अमेरिकेत ७ ते १६ वयोगटातील, इंग्लंडमध्ये १७ वर्षाच्या आतील, जपानमध्ये २० वर्षाच्या आतील तर भारतात बालन्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम २००० नुसार १८ वर्षाच्या आतील बालकास बालगुन्हेगार मानले जाते.

**बालगुन्हेगारीचे प्रकार**

बालगुन्हेगारीचा अर्थ समजावून घेतल्यानंतर आता तुम्ही बालगुन्हेगारीचे प्रकार समजावून घेणार आहात. **हॉवर्ड बेकर** यांनी बालगुन्हेगारीचे पुढील ४ प्रकार पाडलेले आहेत.

**१) वैयक्तिक बालगुन्हेगारी :** एखादे बालक जेंव्हा एकटेच गुन्हेगारी कृत्य करीत असेल तर त्याच्या या कृत्यास वैयक्तिक गुन्हेगारी असे म्हणतात. वैयक्तिक बालगुन्हेगारीचे कारण बालकाच्या व्यक्तिमत्त्वात व कौटुंबिक संबंधात आढळते. एखाद्या बालकास जेंव्हा असे वाटते की, त्याचे मातापिता त्याच्याकडे लक्ष देत नाहीत, इतर भावंडापेक्षा आपणास दुय्यम स्थान देतात तेंव्हा त्याच्या मनात असंतोष निर्माण होतो व ते बालक असंतोषास वाट करून देण्याच्या उद्देशाने गुन्हे करण्यास प्रवृत्त होते.

**२) समुहाधारीत बालगुन्हेगारी :** जेंव्हा कांही बालके एकत्र येऊन आपला एक समूह (टोळी) तयार करतात व समूहाच्या माध्यमातून परस्परांच्यामदतीने गुन्हेगारी वर्तन करतात तेंव्हा त्यास समुहाधारीत बालगुन्हेगारी असे म्हणतात. या प्रकारच्या गुन्हेगारीस समूहाचे समर्थन व साहाय्य लाभत असते. या प्रकारच्या बालगुन्हेगारीचे कारण बालकाच्या कुटुंबात व सभोवतालच्या सांस्कृतिक पर्यावरणात आढळते.

**३) संघटीत बालगुन्हेगारी :** जेंव्हा कांही बालके एकत्र येऊन आपला एक संघटीत समूह तयार करतात व त्याच्या माध्यमातून संघटीतपणे गुन्हे करतात तेंव्हा त्यास संघटीत बालगुन्हेगारी म्हणतात. या संघटीत समूहाची गुन्हे करण्यासंबंधीची कांही नियमने, मूल्ये व विशिष्ट अशी गुन्हेप्रणाली विकसित झालेली असते. ही बालके समाजातील सर्वसामान्य मूल्ये व नियमने न पाळता आपल्या संघटीत समूहाची मूल्ये व नियमने पाळत असतात.

**४) परिस्थितीजन्य बालगुन्हेगारी :** जेंव्हा बालके विशिष्ट परिस्थितीत गुन्हे करतात तेंव्हा ती परिस्थितीजन्य बालगुन्हेगारी ठरते. या प्रकारात बालकांच्या मनात गुन्हे करण्याची प्रवृत्ती दृढ स्वरूपात नसते. तसेच गुन्हे करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्रेरणाही त्यांच्यामध्ये नसतात किंवा असल्याच तर त्या प्राथमिक अवस्थेत असतात. अशा बालकांच्या कुटुंबातील नियंत्रण यंत्रणा शिथिल असते.

### ४.२.२ बालगुन्हेगारीची कारणे

बालगुन्हेगारीचा अर्थ व प्रकार अभ्यासल्यानंतर आता तुम्ही बालगुन्हेगारीची कारणे किंवा बालगुन्हेगारीस जबाबदार असणारे घटक कोणते आहेत हे समजावून घेणार आहात. बालगुन्हेगारी ही एक संकीर्ण अशी सामाजिक घटना असून तिला अनेक घटक किंवा कारणे जबाबदार असतात. या घटकांचे आपणास-

१) आर्थिक घटक किंवा कारणे

२) मानसिक घटक किंवा कारणे

३) कौटुंबिक घटक किंवा कारणे

४) सामाजिक घटक किंवा कारणे

अशा चार विभागात विभाजन करता येईल. या प्रत्येक घटकाचे थोडक्यात स्वरूप समजावून घेऊ या.

**१) आर्थिक घटक :** समाजातील आर्थिक दुरावस्था किंवा दारिद्र्य बालगुन्हेगारीस कारणीभूत ठरते. **फोर्नासरी** या शास्त्रज्ञाने गुन्हेगारी व दारिद्र्य यांच्यातील घनष्ठि संबंध दाखवून दिलेला आहे. १९८४ मध्ये इटली देशात ६०% लोक दरिद्री होते व तेथील ९० ते ९५% गुन्हे हे दरिद्री लोकांकडून घडलेले होते असे त्यांनी नोंदवून ठेवलेले आहे. २००१ मध्ये भारतात पकडलेल्या एकूण बालगुन्हेगारापैकी सुमारे ७० टक्के बालगुन्हेगार हे गरिब वर्गातील होते. **विल्यम बोंजर** या शास्त्रज्ञाच्या मते भांडवलशाही अर्थव्यवस्था ही बालगुन्हेगारीस जबाबदार आहे. कारण या अर्थव्यवस्थेत मातापिता हे उद्योग-व्यवसायात सतत गुंतलेले असतात व त्यांचे आपल्या मुलांबाळांकडे दुर्लक्ष होते. कामगार वर्गातील व्यसनाधिनता, जुगारी व वेश्यागमन वृत्ती यांचा बालकांवर वाईट प्रभाव पडून ते गुन्हेगारीकडे वळतात.

अर्थात कांही अभ्यासकांच्या मते दारिद्र्य हे बालगुन्हेगारीचे एकमेव कारण नाही. जर नैतिक मूल्यांचा प्रभाव जबरदस्त असेल तर दारिद्र्य असूनही गुन्ह्यांचे प्रमाण कमी असू शकते. यासंदर्भात आपणास एवढेच म्हणता येईल की गरीब वर्गातील मुलांच्या जीवनावश्यक गरजांची पूर्तता न झाल्यास ती गुन्हा करण्यास प्रवृत्त होऊ शकतात.

**२) मानसिक घटक :** बालगुन्हेगारीस मानसिक घटक कारणीभूत ठरतात असे अनेक शास्त्रज्ञांनी दाखवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. **गोरिंगच्या** मते दुर्बल मनाची बालके अधिक गुन्हे करतात. तर **गोदार्द** यांच्या मते मंदबुद्धीच्या बालकात गुन्हेगारीचे प्रमाण अधिक असते. मनोदुर्बल बालकांना आपल्या कृत्याचे होणारे परिणाम समजू शकत नाहीत. त्यामुळे ते गुन्हेगारी कृत्ये करतात.

बालपणात आलेले वाईट अनुभव, कडक शिस्त, अपयश, नैराश्य, उपेक्षा, न्यूनगंड इत्यादी घटकांचा प्रभाव पडून मुलांच्या मनावर ताण येतो व तो कमी करण्याच्या उद्देशाने मुले गुन्हेगारीकडे वळतात.

३) **कौटुंबिक घटक :** बालगुन्हेगारीस कौटुंबिक घटक मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहेत. कुटुंबात मुलांचे सुयोग्य समाजीकरण न झाल्यास मुले गुन्हेगार बनण्याची दाट शक्यता असते. यासंदर्भात पुढील घटक महत्त्वाचे आहेत.

**अ) कुटुंबाचा आकार :** कुटुंबाचा आकार जर खूपच मोठा असेल तर पालकांचे मुलांकडे पुरेसे लक्ष नसते. मुलांच्या गरजा व्यवस्थितपणे पूर्ण होत नाहीत. परिणामी ती गुन्हेगारीकडे वळू शकतात.

**ब) कुटुंबातील ताणतणाव :** कुटुंबातील वातावरण हे जर ताणतणावाचे असेल, म्हणजे आईवडीलाची सतत भांडणे होत असतील तर मुलांना कुटुंबात गुदमरल्यासारखे होते. ती घराबाहेर राहू इच्छितात. आईलडीचांचा द्वेष करू लागतात. यातूनच ती कळतनकळतपणे गुन्हे करावयास लागतात.

**क) उध्वस्त कुटुंब :** आई किंवा वडिल यापैकी एकाची उणीव असेल तर मुलांचे संगोपन व्यवस्थित होत नाही. मृत्यू, घटस्फोट, न्यायालयीन फारकत, घरातून निघून जाणे इत्यादी घटकांमुळे आईवडील यापैकी एकाच्या प्रेमास मुले पारखी होतात. ती कुटुंबात स्वतःला असुरक्षित समजू लागतात. परिणामी ती गुन्हे करण्यास प्रवृत्त होतात.

**ड) अनैतिक वातावरण :** कुटुंबातील वातावरण अनैतिक असेल तर मुले गुन्हेगारी वर्तनाकडे वळू शकतात. कुटुंबातील प्रौढ व्यक्ती जर जुगारी, व्यसनी, भ्रष्टाचारी, चोरी करणाऱ्या, अवैध व्यवसाय करणाऱ्या, विवाहबाह्य लैंगिक संबंध ठेवणाऱ्या असतील तर अशा अनैतिक गोष्टींचा प्रभाव पडून मुले गुन्हे करण्यास प्रवृत्त होऊ शकतात.

**ई) शिस्त :** कांही पालक मुलांना लाडावून ठेवतात. प्रेमापोटी त्यांच्या बेशिस्त वर्तनाकडे दुर्लक्ष करतात, त्यांच्या वर्तनावर पुरेसे नियंत्रण ठेवीत नाहीत. त्यामुळे मुले स्वैर वर्तन करू लागतात व त्यातूनच गुन्हेगारीकडे वळतात. याउलट कांही पालक मुलांना कडक शिस्तीत वाढवितात. त्यांच्यावर कडक नियंत्रणे घालतात. साध्या चुकांसाठी कडक शिक्षा देतात. याचा विपरित प्रभाव पडून कांही मुले मुद्दाम गैरवर्तन करतात आणि यातूनच गुन्हेगार बनतात.

**फ) भावनिक उपेक्षा :** जर आईवडील हे सतत नोकरी-धंद्यात गुरफटलेले असतील, मुलाबाळांना नोकरचाकरांच्या हाती सोपवित असतील, मुलांपेक्षा स्वतःकडे अधिक लक्ष देत असतील तर मुले ही आईवडीलांच्या प्रेमापासून वंचित राहतात. भावनिकदृष्ट्या ती उपेक्षित राहतात. घरात स्वतःला उपेक्षित व असुरक्षित समजू लागतात. घराबाहेरील कुसंगतीत सापडतात. परिणामी गुन्हेगार बनतात.

४) **सामाजिक घटक :** बालगुन्हेगारीस कांही सामाजिक घटकही मोठ्या प्रमाणावर जबाबदार ठरतात.

**अ) शेजारी :** कुटुंबानंतर मुलांवर शेजाऱ्यांचा घनिष्ठ प्रभाव पडतो. जर शेजारी हे अनैतिक व गुन्हेगारी वर्तन करणारे असतील तर मुले त्यांच्या वर्तनाचे अनुकरण करून अनैतिक व गुन्हेगारी वर्तन करावयास लावतात.

**ब) कुसंगत :** अनेक मुले ही कुसंगतीमुळे गुन्हेगारी वर्तन करावयास लागतात. अमेरिकन समाजशास्त्रज्ञ **सदरलँड** यांनी असे दाखवून दिले आहे की, मुलांचे मित्र हे गुन्हेगार असतील तर त्यांच्या दबावामुळे किंवा अनुकरणामुळे मुले गुन्हेगारी वर्तन करू लागतात. शाळा चुकविणे, धुम्रपान व मद्यपान करणे, चोरी व मारामारी करणे, उनाडकी करीत भटकणे इ. कृत्ये मूले ही कुसंगतीतूनच करू लागतात. **क्लिफोड शॉ व हेन्रि मॅके** यांना ७८ टक्के बालगुन्हेगार हे परस्परांच्या संगतीतून गुन्हे करावयास शिकलेले होते असे आढळले.

**क) शिक्षणाचा अभाव :** शिक्षणाचा अभाव हे देखील बालगुन्हेगारीचे महत्त्वाचे एक कारण आहे. शिक्षणाच्याद्वारे मुलांवर समाजमान्य पद्धतीने वागण्याचे संस्कार करता येतात. मात्र ज्यांना शिक्षण मिळत नाही ती मुले अशा संस्कारापासून वंचित राहतात. परिणामी, गुन्हेगारी वर्तनाकडे वळतात. इ.स. २००१ मध्ये भारतात पकडलेल्या एकूण बालगुन्हेगारापैकी सुमारे ७१% बालगुन्हेगार हे अशिक्षित किंवा केवळ प्राथमिक शिक्षण घेतलेले होते.

**ड) शहरीकरण व गलिच्छ वस्त्या :** शहरीकरणाच्या प्रक्रियेत सभोवतालच्या प्रदेशातील लोक शहरांकडे स्थलांतर करतात. परिणामी, शहरांत प्रचंड गर्दी होते. गर्दीत मुलांना स्वैर वर्तन करण्याची संधी मिळते. शहरीकरणामुळे शहरात गलिच्छ वस्त्यांची (झोपडपट्ट्यांची) वाढ होते. या वस्त्यांमध्ये गुन्हेगार व्यक्तींचा मोठा भरणा असतो. रोजगारासाठी आईवडिलांना घराबाहेर राहावे लागते. साहजिकच मुले ही गुन्हेगार व्यक्तींच्या संगतीत येतात व गुन्हे करावयास शिकतात.

**ई) संप्रेषण साधने :** आज संप्रेषण साधनांचा (वृत्तपत्रे, रेडिओ, टी.व्ही., चित्रपट, इंटरनेट इ.) बालकांवर/युवावर्गावर मोठा प्रभाव आहे. अनैतिकता, गुन्हेगारी, हिंसा, अश्लिलता इत्यादीशी संबंधित बातम्या व कार्यक्रम यांचे प्रसारण ही साधने अत्यंत भडकपणे करतात. त्यामुळे मुलांच्या कोवळ्या मनावर याचे अनिष्ट परिणाम होतात. मुले या गोष्टींचे अनुकरण करतात. अमुक साहित्य वाचून किंवा तमूक चित्रपट पाहून आपण गुन्हे करण्यास प्रवृत्त झालो असे सांगणारे अनेक बालगुन्हेगार आढळतात. यावरून संप्रेषण साधनांचा बालकांवर होणारा प्रभाव लक्षात येतो.

**फ) चंगळवाद :** आज पारंपरिक मूल्यांचा ऱ्हास होत असून त्याजागी चंगळवादी, भोगवादी मूल्यांचा प्रभाव वाढत चालला आहे. त्यामुळे चैन करण्यासाठी पैसा मिळावा म्हणून अनेक मुले ही गुन्हेगारी कृत्ये करू लागली आहेत. चंगळवादाच्या प्रभावामुळेच कांही मुली वेश्याव्यवसायाकडे वळलेल्या आढळतात. श्रीमंत कुटुंबातील मुलेदेखील चैनीसाठी चोऱ्या करताना आढळतात.

**ग) प्रदूषित सामाजिक परिस्थिती :** आज बालकाच्या सभोवतालची सामाजिक परिस्थिती ही अत्यंत प्रदूषित बनलेली आहे. मुलांच्या सभोवतालची प्रौढ मंडळी ही अनेक गैरकृत्ये करताना दिसतात. भ्रष्ट, दुर्गुणी, गुंड, अप्रामाणिक व्यक्ती सत्ता व संपत्ती मिळविताना दिसतात तर सज्जन व्यक्तींची सर्वत्र पिछेहाट होत असल्याचे आढळते. सर्वच क्षेत्रातील नेतृत्व हे भ्रष्ट असल्याचे जाणवते. त्यामुळे सभोवतालची सर्वच प्रौढ मंडळी गैरकृत्ये करतात. मग आपणही तशीच गैरकृत्ये केली म्हणून काय बिघडले अशी मुलांची मानसिकता बनते आणि ते गुन्हेगारी वर्तन करू लागतात.

अशाप्रकारे बालगुन्हेगारीस विविध घटक (कारणे) जबाबदार असल्याचे आढळते.

### ४.२.३ बालगुन्हेगारीवरील संस्थांत्मक आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना (Institutional and Preventive Measures to Juvenile Delinquency)

बालगुन्हेगारीच्या कारणाचा अभ्यास केल्यानंतर आता तुम्ही बालगुन्हेगारीवरील संस्थात्मक व प्रतिबंधात्मक उपाययोजना समजावून घेणार आहात.

**संस्थात्मक उपाययोजना**

बालगुन्हेगारांच्या वर्तनात सुधारणा करून त्यांचे समाजात पुनर्वसन करण्यासाठी भारतात पुढील संस्थात्मक उपाययोजना केलेल्या आहेत.

**१) बाल न्यायालय :** बालगुन्हेगारीवरील खटले चालविण्यासाठी स्थापन केलेल्या न्यायालयास बाल न्यायालय असे म्हणतात. जगात सर्वप्रथम बाल न्यायालय हे अमेरिका या देशात १८२४ मध्ये स्थापन केले. भारतात पहिले बालन्यायालय १९२२ मध्ये कोलकता (कलकत्ता) या शहरात स्थापन झाले. त्यानंतर १९२७ मध्ये मुंबईत तर १९३० मध्ये चेन्नईत (मद्रास) आणि पुढे इतरही अनेक शहरांमध्ये स्थापन झाली. सध्या बालन्यायालयास बाल न्याय मंडळ (Juvenile Justice Board) असे म्हणतात. प्रत्येक जिल्ह्यात एक किंवा एकापेक्षा अधिक बाल न्यायमंडळे राज्य सरकार स्थापन करू शकते. या मंडळात एक महानगर न्यायदंडाधिकारी किंवा न्यायदंडाधिकारी वर्ग-१ आणि दोन समाजसेवक ज्यामध्ये किमान एक महिला असते असे एकूण तीन सदस्य असतात. बाल निरीक्षणगृहात किंवा त्याच्या आसपासच्या एखाद्या संस्थेत या मंडळाची बैठक आठवड्यातून किमान तीन दिवसांसाठी भरते. बैठकीच्या वेळचे वातावरण हे न्यायालयासारखे नसते. पोलीस, वकील ही मंडळी नागरी पोशाखात उपस्थित असतात. बालगुन्हेगारीच्या संदर्भातील प्रकरणे या मंडळासमोर येतात. बालगुन्हेगारास शिक्षा करण्याऐवजी त्याच्या वर्तनात सुधारणा करण्याच्या उद्देशाने या मंडळाचे कामकाज अत्यंत अनौपचारिकपणे चालते. बालकाने केलेल्या गुन्ह्याचे स्वरूप, गांभीर्य, गुन्ह्याच्यावेळची परिस्थिती इत्यादी बाबी विचारात घेऊन बालकासंबंधी निर्णय घेतला जातो. गुन्हा शाबीत झाल्यास बालकास सुधारणागृहात पाठविले जाते.

**२) बालनिरीक्षण गृह :** ज्या बालगुन्हेगारावरील खटल्याचा अद्याप निकाल लागलेला नाही अशांना बालनिरीक्षण गृहात ठेवले जाते. (पूर्वी अशा गृहांना रिमांड होम म्हणत.) राज्यसरकारद्वारे असे गृह स्वतः किंवा एखाद्या स्वयंसेवी संस्थेच्या व्यवस्थापनाखाली स्थापन केले जाते. प्रत्येक जिल्ह्यात किंवा कांही जिल्ह्यात मिळून एक बालनिरीक्षण गृह असते. मुलांसाठी व मुलींसाठी वेगवेगळे गृह असते. एक अधीक्षक किंवा परीविक्षा अधिकारी, शिक्षक, क्लार्क व कांही काळजीवाहक व्यक्ती असा कर्मचारी वर्ग या गृहात असतो. बाल न्याय मंडळाच्या निर्णयानुसार गुन्हा केलेल्या बालकांना या गृहात ठेवले जाते. परीविक्षा अधिकारी त्यांच्या वर्तनावर देखरेख ठेवतो. या गृहात बालकाच्या निवासाची, भोजनाची व्यवस्था केली जाते.

**३) बोर्स्टल शाळा :** ही शाळा म्हणजे सौम्य अशाप्रकारचा तुरुंगच असते. १९०२ मध्ये इंग्लंडमधील **बोर्स्टल** या गावातील रोचेस्टर तुरुंगाचे रुपांतर बाल सुधारगृहात केले. म्हणून अशा सुधारगृहांना बोर्स्टल स्कूल्स किंवा शाळा असे म्हटले जाऊ लागले. पुढे इतर देशातील अशा शाळांनाही बोर्स्टल शाळाच म्हटले जाऊ लागले. १६ ते २१ वर्षे वयोगटातील ज्या युवक गुन्हेगारांना

तीन वर्षापेक्षा अधिक काळासाठी सुधारसंस्थेत ठेवावे असा निर्णय बाल न्यायालयाने दिलेला असतो. अशांना या शाळेत २ ते ५ वर्षासाठी ठेवले जाते. इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन या अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणाखाली या शाळेचे कामकाज चालते. प्रत्येक शाळेची एक निरीक्षण समिती असून तिच्यामध्ये सत्र न्यायाधीश, जिल्हा न्यायाधीश, जिल्हा स्तरावरील शिक्षणाधिकारी व कांही बिगरशासकीय सभासद असतात. ही समिती शाळेला भेट देऊन तेथील कामकाजाचे अवलोकन करते व आवश्यक त्या सुधारणा सुचविते. प्रत्येक शाळेत कांही कर्मचारी असतात. त्यामध्ये अधीक्षक, उपतुरुंगाधिकारी, सहाय्यक तुरुंगाधिकारी, डॉक्टर, तीन ते चार निर्देशक, कांही शिक्षक व कांही वार्डन्स इत्यादींचा समावेश होतो. या शाळेत गरजेनुसार कांही बराकी व प्रत्येक बराकीत कांही कोठड्या असतात. या कोठड्यात बालगुन्हेगारांना ठेवले जाते. शाळेत दाखल केलेल्या बालगुन्हेगाराच्या वर्तनाचे कांही दिवस निरीक्षण केले जाते. त्याच्यावर स्वच्छता व बागकाम अशी कामे सोपविली जातात. त्याला व्यावसायिक प्रशिक्षण (उदा. सुतारकाम, विणकाम इ.) दिले जाते. वर्षातून १५ दिवसाची सुट्टी देऊन बालगुन्हेगारांना त्यांच्या कुटुंबात सुट्टीसाठी पाठविले जाते. शाळेतील कालावधी संपल्यानंतर त्यांच्या पुनर्वसनाची व पश्चात संगोपनाची जबाबदारी परीविक्षा अधिकाऱ्यावर सोपविली जाते. बालगुन्हेगाराचे त्याच्या कुटुंबात व समाजात पुनर्वसन करणे व त्याला एखादा कामधंदा मिळवून देणे ही कामे हा अधिकारी करतो.

**४) सुधारशाळा किंवा प्रमाणित शाळा :** जे बालगुन्हेगार हे खूपच बिघडलेले असतात व त्यामुळे त्यांना फक्त ताकीद देऊन भागणार नसते अशा १८ वर्षे वयापर्यंतच्या बालगुन्हेगारांना ३ ते ७ वर्षासाठी या शाळेत पाठविले जाते. या शाळेत त्यांना प्राथमिक शिक्षण दिले जाते. पुढील शिक्षणासाठी मात्र बाहेरील शाळेत पाठविले जाते. प्राथमिक शिक्षणाबरोबरच त्यांना या शाळेत विविध व्यवसायांचेही शिक्षण दिले जाते.

**५) परीविक्षा वसतीगृह :** बाल न्यायालयातून परीविक्षेवर सुटलेल्या अनाथ तसेच ज्यांच्या आईवडिलांचा पत्ता नसतो अशा बालगुन्हेगारांना परीविक्षा वसतीगृहात ठेवले जाते. तेथे त्यांना खाणेपिणे, राहाणे, कपडेलत्ते, औषधोपचार इत्यादी सोयी दिल्या जातात. त्यांच्या वर्तनावर देखरेख ठेवण्यासाठी एक परीविक्षा अधिकारी असतो. बालगुन्हेगारांच्या पुर्वायुष्याचा अभ्यास करून त्यांना गुन्हे करण्यास कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीपासून दूर ठेवण्याचे काम हा अधिकारी करतो.

**६) पालनगृहे :** ज्या बालगुन्हेगारांना आईवडील व इतर जवळचे नातेवाईक नसतात त्यांना कुटुंबातील प्रेम, माया, जिव्हाळा, मिळावा या उद्देशाने समाजातील एखाद्या सभ्य कुटुंबात कांही काळासाठी ठेवले जाते. स्वयंसेवी संस्था अशा कुटुंबाचा शोध घेतात व त्यामध्ये अशा मुलांना ठेवतात. या कुटुंबात मुलांवर सुसंस्कार होतील व ती सभ्य बनतील अशी अपेक्षा असते.

**७) बालग्राम योजना : डॉ. हरमन मायनर** यांनी ऑस्ट्रीया या देशात ही योजना सुरू केली. उद्धस्त कुटुंबामुळेच बालके गुन्हेगार होतात. म्हणून जर त्यांना उत्तम कौटुंबिक जीवन मिळाले तर ती सुधारतील हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत कांही कुटुंबे निवडून त्यामध्ये बालगुन्हेगारास ठेवले जाते. त्यांना आईची माया देणारी एक सेवाभावी वृत्तीची स्त्री माता म्हणून नियुक्त केली जाते. भारतात १९६७ मध्ये हरियाणा राज्यात ही योजना सुरू केली.

**प्रतिबंधात्मक उपाययोजना**

रोग झाल्यावर त्यावर उपचार करीत बसण्यापेक्षा रोग होऊच नये यादृष्टीने अगोदरच कांही खबरदारी (काळजी) घेणे हे अधिक योग्य ठरते. या तत्त्वानुसार बालगुन्हेगार निर्माणच होणार नाहीत यासाठी अगोदरच कांही उपाय करणे योग्य ठरते. अशा उपायांनाच प्रतिबंधात्मक उपाययोजना असे म्हणतात. बालगुन्हेगारीसाठी पुढील प्रतिबंधात्मक उपाययोजना आपणास सुचविता येईल.

१) **समुपदेशन केंद्रांची स्थापना :** उध्वस्त कुटुंब, अनैतिक कुटुंब, मोठ्या आकाराचे कुटुंब, एक पालक कुटुंब, सावत्र माता किंवा पिता असलेले कुटुंब इत्यादी प्रकारच्या कुटुंबातील मुलांचे संगोपन नीट होत नाही. ती कौटुंबिक प्रेमापासून वंचित राहातात. परिणामी गुन्हेगारी वर्तनाकडे वळतात. म्हणून अशा मुलांचे व त्यांच्या पालकांचे समुपदेशन करून त्यांच्यात प्रेमाचे नाते निर्माण करण्यासाठी वैवाहिक व कौटुंबिक समुपदेशन केंद्रे स्थापन करावीत. यासाठी शासन, बिनशासकीय संस्था (NGOs), सामाजिक कार्यकर्ते, समाजशास्त्रज्ञ, बालमानसशास्त्रज्ञ, इत्यादींनी सामूहिकपणे प्रयत्न करावेत.

२) **दारिद्र्य व बेकारीचे निर्मूलन** : पालकांचे दारिद्र्य व बेकारी यामुळे अनेक बालके गुन्हेगारीकडे वळतात. म्हणून बालगुन्हेगारीस प्रतिबंध करण्यासाठी दारिद्र्य व बेकारी या समस्यांचे निर्मूलन केले पाहिजे. गरिब कुटुंबांना पर्याप्त रोजगार मिळवून देणाऱ्या योजना सुरू केल्या पाहिजेत. युवकांनाही व्यावसायिक शिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करून दिले पाहिजेत. त्यामुळे ते गुन्हेगारीपासून दूर राहतील.

३) **सुधारणसंस्थांची स्थापना :** अनाथ, दुर्लक्षित, आईवडिलांनी टाकून दिलेली, घरातून पळालेली मुले गुन्हेगार होण्याची शक्यता खूप असते. त्यामुळे अशा मुलांचा शोध घेऊन त्यांना सुधारसंस्थात वेळीच भरती करावे. अशा मुलांना निपुत्रिक जोडप्यांनी दत्तक घ्यावे. त्यासाठी सेवाभावी संस्था व व्यक्तींनी पुढाकार घ्यावा.

४) **मानसोपचार केंद्रांची स्थापना :** भावनिक किंवा मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असणाऱ्या मुलांचा शोध घेऊन त्यांच्यावर मानसोपचार करावेत त्यासाठी अशा केंद्रांची संख्या वाढवावी. या केंद्रात अशा मुलांच्या वर्तनविषयक समस्यांची सोडवणूक करावी. यासाठी मानसोपचार तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, सेवाभावी संस्था, शासकीय कर्मचारी यांनी एकत्रितपणे कार्य करावे.

५) **व्यक्तिमत्त्व विकास :** मुलांच्या सर्वांगिण विकासाचे प्रयत्न करावेत. मुलांना गुंतवूण ठेवण्यासाठी व त्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम सुरू करावेत. मुलांवर सुसंस्कार करणारे साहित्य व चित्रपट प्रसारित करावे. तसेच मुलांच्या मनोरंजनासाठी विविध कला व खेळ यांच्या पर्याप्त सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

६) **शिक्षणप्रसार :** बालगुन्हेगारांपैकी बहुसंख्यांक मुले अशिक्षित असतात. त्यामुळे प्रत्येक मूल शाळेत गेलेच पाहिजे व सुशिक्षित झालेच पाहिजे याची काळजी घ्यावी. मुलांच्या शिक्षणात मूल्यशिक्षणावर विशेष लक्ष द्यावे. समाजात शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी सरकार, शिक्षणसंस्था, पालक, शिक्षक इत्यादींनी प्रयत्न केले पाहिजेत.

७) **कायद्यांची कडक अंमलबजावणी :** गुन्हेगारीस व बालगुन्हेगारीस प्रतिबंध करण्यासाठी केलेल्या कायद्यांची अत्यंत कडकपणे अंमलबजावणी करावी. प्रौढ गुन्हेगार मुलांचा दुरुपयोग करणार नाहीत, त्यांना गुन्हेगारीकडे आकर्षित करणार नाहीत, याची काळजी घेतली जावी. याकामी पोलीस यंत्रणेने सतत दक्ष राहावे. लोकांनीही याकामी पोलिसांना मदत करावी. बालकांचे शोषण होणार नाही व त्यांचे हक्क अबाधित राहावेत यासाठी सर्वांनी जागरूप राहिले पाहिजे.

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१) ................ हा एक बालगुन्हेगारीचा प्रकार आहे.

अ) समुहाधारित बालगुन्हेगारी　　ब) लैंगिक बालगुन्हेगारी

क) पांढरपेशीय बालगुन्हेगारी　　ड) असंघटीत बालगुन्हेगारी

२) सद्या भारतात ................. वर्षे वयोमर्यादेखालील बालकास बालगुन्हेगार समजले जाते.

अ) १४　　ब) १६　　क) १८　　ड) २०

३) चंगळवाद हा बालगुन्हेगारीस जबाबदार असणारा ........... प्रकारचा घटक आहे.

अ) मानसिक　　ब) आर्थिक　　क) कौटुंबिक　　ड) सामाजिक

४) भारतात पहिले बालन्यायालय ............... शहरात स्थापन झाले.

अ) मुंबई　　ब) चेन्नई　　क) कोलकत्ता　　ड) दिल्ली

५) बोर्स्टल स्कूलमध्ये ............. वर्षे वयोगटातील बालगुन्हेगारास ठेवले जाते.

अ) १० ते १२　　ब) १६ ते १८　　क) १६ ते २१　　ड) १८ ते २१

## ४.३ सारांश

या चौथ्या घटकात तुम्ही बालगुन्हेगारीचा अर्थ, प्रकार, कारणे व उपाययोजना या बाबींचा अभ्यास केलेला आहे. बालगुन्हेगारी हा गुन्हेगारीचा एक विशेष प्रकार आहे. कायदेशीरदृष्ट्या बालगुन्हेगारी म्हणजे कायद्याने निर्देशित केलेल्या वयोमर्यादेच्या आतील बालकाने/युवकाने प्रचलित कायद्याचा भंग करणारे कृत्य आहे. मानसशास्त्रीयदृष्ट्या बालगुन्हेगारी हे बालकाचे अपसामान्य वर्तन आहे. तर समाजशास्त्रीयदृष्ट्या बालगुन्हेगारी हे बालकाचे समाजविरोधी वर्तन आहे. हॉवर्ड बेकर यांनी बालगुन्हेगारीचे १) वैयक्तिक बालगुन्हेगारी, २) समुहाधारित बालगुन्हेगारी, ३) संघटीत बालगुन्हेगारी, ४) परिस्थितीजन्य बालगुन्हेगारी असे चार प्रकार पाडलेले आहेत. यानंतर तुम्ही बालगुन्हेगारीस कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा किंवा कारणांचा अभ्यास केलेला आहे. बालगुन्हेगारीस आर्थिक, मानसिक, कौटुंबिक व सामाजिक असे चार घटक जबाबदार आहेत. सर्वात शेवटी तुम्ही बालगुन्हेगारीसाठीच्या संस्थात्मक व प्रतिबंधात्मक उपाययोजना समजावून घेतलेल्या आहेत. संस्थात्मक उपाययोजनांतर्गत तुम्ही बाल न्यायालय, बालनिरीक्षण गृह, प्रमाणित किंवा सुधारित

शाळा, बोर्स्टल स्कूल, परीविक्षा गृहे, पालनगृहे इत्यादी संस्थांचे स्वरूप व कार्य समजावून घेतलेले आहे. बालगुन्हेगारीस प्रतिबंध करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांतर्गत पुढील बाबींची चर्चा केलेली आहे. १) वैवाहिक व कौटुंबिक समुपदेशन केंद्रे स्थापन करणे. २) दारिद्र्य व बेकारीचे निर्मूलन करणे, ३) व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम राबविणे, ४) मुलांवर मानसोपचार करणे, ५) शिक्षण प्रसार करणे, ६) कायद्यांची कडक अंमलबजावणी करणे इत्यादी.

## ४.४ स्मरणार्थ संज्ञा

- **गुन्हेगारी :** प्रचलित कायद्याचा भंग करणारे कृत्य.
- **गुन्हेगार :** प्रचलित कायद्याचा भंग करणारी व्यक्ती.
- **बालगुन्हेगारी :** प्रचलित कायद्याचा बालकाद्वारे भंग होणारे कृत्य.
- **समूह :** समान उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एकत्र आलेल्या व्यक्तींचा गट.
- **अपसामान्य वर्तन :** सर्वसाधारण नसलेले/विकृत वर्तन.
- **शहरीकरण :** सभोवतालच्या लोकसंख्येचे शहराकडे होणारे स्थलांतर.
- **गलिच्छ वस्ती :** अनियोजितपणे वसलेली व नागरी सुविधांचा अभाव असलेली कच्च्या घरांची वसाहत.
- **संप्रेषण साधने :** विचार, कल्पना, ज्ञान, माहिती इत्यादींचे एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे संक्रमण करणारी साधने. उदा. रेडिओ, टी.व्ही. चित्रपट, वृत्तपत्रे इत्यादी.
- **कुसंगत :** वाईट किंवा दुर्गुणी व्यक्तींची सोबत.
- **चंगळवाद :** अधिकाधिक चैन करण्याचा/उपभोग घेण्याचा पुरस्कार करणारी विचारसरणी.
- **समुपदेशन :** समस्येच्या निर्मूलनासाठी समस्याग्रस्त व्यक्तीस तज्ज्ञ व्यक्तीने केलेले मार्गदर्शन.
- **दारिद्र्य :** मूलभूत गरजादेखील पूर्ण होऊ शकत नाहीत अशी स्थिती.
- **बेकारी :** प्रचलित वेतनावर काम करण्याची तयारी असूनही काम (रोजगार) न मिळणारी स्थिती.
- **मानसोपचार :** मानसिक आजारावरील उपचार.

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) अ  २) क  ३) ड  ४) क  ५) क

## ४.६ स्वाध्याय

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) बालगुन्हेगारीची व्याख्या व प्रकार स्पष्ट करा.

२) बालगुन्हेगारीच्या कारणांची चर्चा करा.

३) बालगुन्हगारीसाठी केलेली संस्थात्मक उपाययोजना विशद करा.

**प्रश्न २ : टीपा लिहा.**

१) बालगुन्हेगारीचा अर्थ

२) बालगुन्हेगारीचे प्रकार

३) बालगुन्हेगारीची कौटुंबिक कारणे

४) बालगुन्हेगारीची सामाजिक कारणे

५) बालगुन्हेगारीवरील प्रतिबंधात्मक उपाययोजना

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


- Ahuja Ram J. : Social Problems in India, Rawat, Jaipur – 1997.
- Paranjape N. V. : Criminology and Penology, Central Law Agency, Allahabad-1980.
- Sethna J.M.J. : Society and Criminal, 4th edition, N. M. Tripathi Pvt. Ltd. Delhi – 1980.
- Siddique Ahmad and S.M.A. Qudri : Criminology, 5th edition, Eastern Book Company, Lucknow-2005.
- माने माणिक : गुन्हेगारीशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९९.
- खंडागळे चंद्रकांत : इ. १२ वी समाजशास्त्र, प्रकाशिका सौ मायादेवी खंडागळे-सांगली २००७.


❑❑❑

# घटक १

# दंडशास्त्र

## (Penology)

**अनुक्रमणिका**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

- १.२.१ दंडशास्त्राची व्याप्ती व स्वरूप
- १.२.२ शिक्षा : अर्थ व प्रकार
- १.२.३ शिक्षेविषयीचे सिद्धांत

१.३ सारांश

१.४ स्मरणार्थ संज्ञा

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## १.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास–

- दंडशास्त्राची व्याप्ती व स्वरूप स्पष्ट करता येईल.
- शिक्षेचा अर्थ व प्रकार सांगता येतील.
- शिक्षेविषयीच्या सिद्धांतांचे आकलन होईल.

## १.१ प्रास्ताविक

मागील सत्रात तुम्ही गुन्हेगारीशास्त्र या विज्ञानशाखेचा अभ्यास केलेला आहे. आता या सत्रात तुम्ही गुन्हेगारीशास्त्राशी घनिष्ठपणे संबंधित असलेल्या दंडशास्त्र या विज्ञानशाखेचा अभ्यास करणार आहात. अनेक अभ्यासक ही दोन्ही शास्त्रे वेगवेगळी न मानता एकच मानून त्यांची चर्चा करताना दिसतात. कारण ही दोन्ही शास्त्रे ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. याठिकाणी मात्र आपण दंडशास्त्राची एक स्वतंत्र विज्ञानशाखा म्हणून विचार करणार आहोत. कारण या सत्राच्या अभ्यासक्रमाची अशीच अपेक्षा दिसते. गुन्हेगारांना दंड किंवा शिक्षा देण्याची तरतूद प्राचीनकाळापासून मानव समाजात केलेली आढळते. तथापि, गुन्हेगारास करावयाच्या दंडाचे किंवा शिक्षेचे प्रकार

वेगवेगळे आढळतात. गुन्हेगारास शिक्षा का करावयाची यासंदर्भात विद्वानांनी वेगवेगळे सिद्धांत मांडलेले आहेत. अलिकडील काळात गुन्हेगारास सुधारण्याच्यादृष्टीने प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी विविध यंत्रणा निर्माण करून निश्चित अशा उपाययोजना राबविल्या जात आहेत. या सर्व बाबींचा ऊहापोह स्थुलमानाने दंडशास्त्रात केला जातो. या पहिल्या घटकात तुम्ही दंडशास्त्राची व्याप्ती व स्वरूप, शिक्षेचा अर्थ व प्रकार आणि शिक्षेविषयीचे सिद्धांत या बाबी अभ्यासणार आहात.

## १.२ विषय विवेचन

या घटकात तुम्ही दंडशास्त्र किंवा शिक्षाशास्त्र, शिक्षेचा अर्थ व प्रकार तसेच शिक्षेचे सिद्धांत अभ्यासणार आहात. विवेचनाच्यादृष्टीने या घटकाचे तीन विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात दंडशास्त्राची व्याख्या, व्याप्ती व स्वरूप यांचे विवेचन केलेले आहे. दुसऱ्या विभागात शिक्षेचा अर्थ व प्रकार आणि तिसऱ्या विभागात शिक्षेविषयीचे विविध सिद्धांत याची चर्चा केलेली आहे.

### १.२.१ दंडशास्त्राची व्याप्ती व स्वरूप

प्रत्येक समाजात गुन्हे करणाऱ्या व्यक्ती असतात. त्यांच्या अशा कृत्यांमुळे सार्वजनिक हितास व सामाजिक सुव्यवस्थेस बाधा येत असते. त्यामुळे गुन्हेगार व्यक्तींना शिक्षा किंवा दंड (Punishment) करण्याची तरतूद प्राचीन काळापासून प्रत्येक समाजात केलेली दिसून येते. अशा या शिक्षांचा किंवा दंडाचा अभ्यास करण्यासाठी एका स्वतंत्र विज्ञान शाखेचा उदय झालेला आहे. यासच स्थुलमानाने दंडशास्त्र किंवा शिक्षाशास्त्र असे म्हणतात.

**दंडशास्त्राचा अर्थ आणि व्याख्या**

दंडशास्त्राला इंग्रजीत Penology असे म्हणतात. Penology हा शब्द ग्रीक भाषेतील Poine (म्हणजे दंड किंवा शिक्षा) आणि Logos (म्हणजे शास्त्र किंवा पद्धतशीर अभ्यास) या दोन शब्दापासून बनलेला आहे. यावरून व्युत्पत्तीशास्त्रीयदृष्ट्या Penology म्हणजे दंडासंबंधीचे किंवा शिक्षेसंबंधीचे शास्त्र (विज्ञान) किंवा दंडाचा वा शिक्षेचा पद्धतशीर अभ्यास (Science or systemactic study of punishment) असा अर्थ होतो. दंडशास्त्राचा अर्थ अधिक स्पष्ट होण्यासाठी त्याच्या कांही व्याख्या विचारात घेऊया.

**१) चंद्रकांत खंडागळे** – गुन्हा प्रतिबंध व गुन्हा नियंत्रण करण्याच्या दृष्टीने गुन्हेगारास द्यावयाची शिक्षा आणि वागणूक यांचा वैज्ञानिक अभ्यास म्हणजे दंडशास्त्र होय.

**२) एच. पी. फेअरचाईल्ड** – दंडशास्त्र हे उपयोजित समाजशास्त्राचे असे अभ्यास क्षेत्र आहे की, ज्यामध्ये गुन्हेगारांना करावयाच्या शिक्षा किंवा दंड याविषयीचे सिद्धांत व पद्धती यांचा अभ्यास होतो.

**३) फ्रान्सिस लायबर** – दंडशास्त्र ही गुन्हेगारीशास्त्राची एक शाखा असून या शाखेत गुन्हेगारांना दिल्या जाणाऱ्या दंडाचा (किंवा शिक्षेचा) वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास होतो. (लायबर यांनी प्रथम Penology ही संज्ञात वापरली.)

**३) वेबस्टर शब्दकोशानुसार** – दंडशास्त्र ही गुन्हेगारी शास्त्रांची एक शाखा असून तिच्यामध्ये तरूंग व्यवस्थापन आणि गुन्हेगारीवरील उपचार यांची चर्चा होते.

**४) डंकन मिचेल** – आधुनिक अर्थानुसार दंडशास्त्र ही गुन्हेगारी शास्त्राची शाखा असून ती गुन्हेगारांना दिले जाणारे प्रशिक्षण आणि उपचार (म्हणजेच सुधारणा) आणि गुन्हा प्रतिबंध व गुन्हा नियंत्रण यांच्याशी संबंधित आहे.

**५) विल्यम स्कॉट** – विविध समाजातील आणि विविध ऐतिहासिक कालखंडातील गुन्हेगारांना द्यावयाची शिक्षा व वागणूक व त्या वागणुकीचे होणारे विभिन्न प्रकारचे परिणाम यांचा अभ्यास करणारी गुन्हेगरीशास्त्राची शाखा म्हणजे दंडशास्त्र होय.

**दंडशास्त्राची व्याप्ती** (Scope of Penology)

वरील व्याख्यांवरून दंडशास्त्रीची व्याप्ती आपणास पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) शिक्षेचा अभ्यास** (Study of Punishment): दंडशास्त्रात शिक्षेचा म्हणजेच दंडाचा पद्धतशीर अभ्यास केला जातो. शिक्षेचा अर्थ, शिक्षेचे प्रकार, शिक्षा करण्याच्या पद्धती, शिक्षेची परिणामकारकता, शिक्षा करण्यामागचे उद्देश स्पष्ट करणारे विविध सिद्धांत इत्यादी बाबींचा सविस्तर ऊहापोह दंडशास्त्रात केला जातो.

**२) गुन्हेगारावील उपचार**(Treatment of offenders): दंडशास्त्रात केवळ गुन्हेगारांना करावयाच्या दंडाची किंवा शिक्षेचीच चर्चा केली जात नाही तर गुन्हेगारावर करावयाचे उपचार किंवा गुन्हेगारांना द्यावयाची वागणूक याचाही अभ्यास केला जातो. यादृष्टीने विचार करता शिक्षा भोगणाऱ्या कैद्यांना द्यावयाच्या सोयीसवलती, उदा. पॅरोल पद्धती, प्रोबेशन पद्धती, गुन्हेगाराच्या वर्तनात सुधारणा करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धती (Correctional methods), गुन्हेगार हा जर विकृत किंवा मनोरूग्ण असेल तर त्यावर करावयाचे मानसोपचार इत्यादींचा सांगोपांग अभ्यास दंडशास्त्र करते.

**३) तुरूंग व्यवस्थापन** (Prision Management): दंडशास्त्रात तुरूंग किंवा कारागृह या यंत्रणेचा व तिच्या व्यवस्थापनाचाही अभ्यास केला जातो. गुन्हेगारास करावयाच्या विविध शिक्षा प्रकारापैकी तुंरूगवासाची किंवा कारावासाची (Imprisonment) शिक्षा हा एक महत्वाचा प्रकार आहे. प्राचीनकाळापासून मानव समाजात तुरूंगवासाची शिक्षा दिली जाते. त्यामुळे तुरूंगव्यवस्थेचा इतिहास, गरज, रचना, तुरूंगातील कैद्यांना मिळणारी वागणूक, तुरूंगाचे व्यवस्थापन व कैदी यांचे संबंध, कैद्यांचे हक्क वा अधिकार, तुरूंगव्यवस्थेचे गुणदोष, तुरूंगव्यवस्थेत करावयाच्या सुधारणा इत्यादी बाबींची सांगोपांग चर्चा दंडशास्त्रात केली जाते. तसेच मुक्त तुरूंग (Open Prision) या संकल्पनेचाही अभ्यास या शास्त्रात होतो. तुरूंगाच्या जोडीने गंभीर गुन्हे केलेल्या बाल किंवा युवा गुन्हेगारांसाठी असलेल्या बोर्स्टल स्कूल या संस्थेचाही अभ्यास दंडशास्त्र करते.

**४) गुन्हेगारांचे पुनर्वसन** (Rehabilitation of Criminals): गुन्हेगाराचे पुनर्वसन याचाही अभ्यास दंडशास्त्र करते. व्यक्तीवरील गुन्ह्याचा आरोप सिद्ध झाल्यानंतर त्याला शिक्षा होते. शिक्षा भोगून झाल्यावर अशा व्यक्तीचे व्यवस्थितपणे त्याच्या कुटुंबात व समाजात पुनर्वसन होणे गरजेचे असते. अन्यथा तो परत गुन्हे करण्याची शक्यता असते. मात्र असे पुनर्वसन होणे अवघड असते. कारण सदर व्यक्तीवर गुन्हेगार हा 'शिक्का' बसलेला असतो. तिचे व्यक्तिमत्व कलंकित झालेले असते. त्यामुळे समाज तिच्याकडे संशयाने पाहात असतो. त्यामुळे तिला समाजात कामधंदा मिळणे अवघड होते. यातून तिची आर्थिक कोंडी होते. या सर्व परिस्थितीचा सारासार विचार करून

गुन्हेगाराचे मानसिक, आर्थिक व सामाजिक पुनर्वसन होणे आवश्यक असते. गुन्हेगाराच्या पुनर्वसनासी निगडीत असलेल्या सर्व बाबींचा ऊहापोह दंडशास्त्रात केला जातो.

**५) न्यायव्यस्थेचा अभ्यास** (Study of Juicial System)ः दंडशास्त्रात गुन्हेगारास द्यावयाच्या शिक्षेचा अभ्यास होतो. शिक्षा सुनवण्याचे काम समाजातील न्यायव्यवस्था करीत असते. त्यामुळे न्यायव्यवस्थेचे स्वरूप, तिची रचना, कार्यपद्धती, न्यायालयीन प्रक्रिया, न्यायालयांचा दृष्टिकोन, न्यायालयाची शिक्षेसंबंधीची धोरणे, न्यायव्यवस्थेतील सुधारणा अशा विविध बाबींचाही अभ्यास दंडशास्त्र करते. त्याचबरोबर गुन्हेगारीस प्रतिबंध करणे व गुन्हे नियंत्रण करणे यामध्ये न्यायव्यवस्थेची भूमिका काय आहे याचीही चर्चा हे शास्त्र करते.

**६) पोलीस व्यवस्थेचा अभ्यास** (Study of Police System)ः न्यायव्यवस्थेप्रमाणेच पोलीस व्यवस्थेचा किंवा यंत्रणेचा अभ्यासही दंडशास्त्र करते. कारण गुन्हेगारास पकडणे, त्याच्यावर आरोपपत्र ठेवणे, त्याला न्यायालयासमोर उभे करणे, गुन्हेगारास शिक्षा व्हावी म्हणून आवश्यक ते पुरावे उपलब्ध करून देणे, न्यायालयीन शिक्षेची अंमलबजावणी करण्यात आवश्यक ते सहकार्य करणे अशी विविध कार्ये पोलीस यंत्रणा पार पाडीत असते. महत्वाचे म्हणजे गुन्हेगारीस प्रतिबंध करणे, गुन्हे नियंत्रण करणे यामध्येही पोलीस यंत्रणा महत्वाची भूमिका पार पाडीत असते. त्यामुळे गुन्हा व शिक्षा या दोन्हीशी घनिष्ठपणे संबंधित असलेल्या पोलीस यंत्रणेचा अभ्यास गुन्हेगारीशास्त्राबरोबरच दंडशास्त्र ही करते. यासंदर्भात पोलीस व्यवस्थेचा इतिहास व विकास, पोलीस यंत्रणेची रचना व कार्ये, पोलीस प्रशासनात करावयाचा सुधारणा, पोलीस गुन्हेगार व नागरिक यांच्यातील परस्परसंबंध इत्यादीचे शास्त्रीय विवेचन दंडशास्त्रात केले जाते. कोणत्याही समाजात राज्यसंस्था ही सार्वभौम सत्ता असलेली सामाजिक संस्था असते. कोणत्याही विषयावरील अंतिम धोरणे ठरविण्याची सत्ता राज्यसंस्थेकडे असते. त्यामुळे शिक्षेसंबंधीची धोरणे ठरविण्याची सत्ता ही राज्यसंस्थेकडेच असते. म्हणून शिक्षेविषयीची राज्यसंस्थेची असलेली धोरणे व त्या धोरणांची योग्यायोग्यता याचीही चर्चा दंडशास्त्र करते. यासंदर्भात **डॉ. पी. के. सेन** म्हणतात की, दंडशास्त्रात अशा मूलभूत तत्वांचा शोध घेतला पाहिजे की, जी राज्यसंस्थेस मार्गदर्शक ठरतील. शिक्षेच्या संदर्भात राज्यसंस्थेस मार्गदर्शन करण्याचे कार्य दंडशास्त्र करते. त्या अनुषंगाने दंडशास्त्र शिक्षेबाबतच्या धोरणांचा विचार करते.

अशाप्रकारे शिक्षा, शिक्षा पद्धती, शिक्षेचे सिद्धांत, गुन्हेगारीवरील उपचार, गुन्हेगाराचे पुनर्वसन, गुन्हा व शिक्षा यांच्याशी संबंधीत असलेल्या विविध व्यवस्था (तुरुंग, पोलीस, न्यायालय इ.), शिक्षाविषयीची सार्वभौमसत्तेची म्हणजेच, राज्यसंस्थेची धोरणे इत्यादी बाबींचा अभ्यास दंडशास्त्रात होतो. त्यामुळे या शास्त्राची व्याप्ती अत्यंत विस्तृत आहे. महत्त्वाचे म्हणजे त्याची व्याप्ती ही स्थितीशिल नसून गतिशील स्वरूपाची आहे. कारण बदलत्या परिस्थितीनुसार शिक्षेसंबंधीच्या पद्धतीत, दृष्टिकोनात व धोरणात बदल होत असतो. आणि या बदलांची दखल दंडशास्त्रास घ्यावी लागते. त्यामुळे या शास्त्राच्या व्याप्तीत नवनवीन अध्ययन घटक समाविष्ट होत राहतात. म्हणून त्याची व्याप्ती गतिशील ठरते.

### १.२.२ शिक्षा : अर्थ आणि प्रकार (Punishment : Meaning and Types)

दंडशास्त्राची व्याख्या, व्याप्ती व स्वरूप अभ्यासल्यानंतर आता तुम्ही शिक्षेचा अर्थ व प्रकार समजावून घेणार आहात.

**शिक्षेचा अर्थ :** गुन्हेगारास करावयाची शिक्षा (दंड) हा दंडशास्त्राचा अभ्यासविषय आहे. त्यामुळे 'शिक्षा' ही दंडशास्त्रातील मध्यवर्ती संकल्पना आहे. त्यामुळे शिक्षेचा अर्थ, प्रकार, सिद्धांत इत्यादी बाबींचा अभ्यास दंडशास्त्र करते. शिक्षा किंवा दंड हा शब्द आपल्या नित्य परिचयाचा आहे. शाळा बुडविल्याबद्दल शिक्षकांनी वर्गात उभे करणे, गोंधळ केल्यास आईने मारणे, विनापरवाना वाहन चालविणाऱ्यास पोलिसाने शंभर रुपये दंड करणे, कामावर गैरहजर राहिल्यास मालकाने पगार कापणे, चोरी वा पॉकेटमार करणाऱ्यास न्यायालयाने तुरुंगात डांबणे, खून करणाऱ्यास जन्मठेप वा फाशी देणे इत्यादी शिक्षेची उदाहरणे आहेत. या उदाहरणावरून शिक्षा किंवा दंड म्हणजे काय याचा अर्थबोध आपणास होतो. पण शिक्षा या संज्ञेचा नेमका अर्थ स्पष्ट करणे मात्र कठीण जाते. शिक्षा ही गैरकृत्य किंवा नियमभंग करणाऱ्या व्यक्तीस दिली जाते. अशा व्यक्तीला क्लेश किंवा पीडा (Pain) देणे, तिचे नुकसान करणे हा हेतू शिक्षा देण्यामागे असतो. समाजातील विविध समूह, संस्था, संघटना या आपल्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सदस्यांना शिक्षा करीत असतात. शिक्षेमुळे जो क्लेश वा नुकसान होते. त्यामुळे ती व्यक्ती पुन्हा कायदेभंग करण्यास धजावणार नाही, शिक्षा झाल्यामुळे तिच्या वर्तनात सुधारणा होईल अशीही अपेक्षा असते. आधुनिक काळात राज्यसंस्था ही सार्वभौम मानली जाते व न्यायालयीन प्रक्रियेद्वारे विनयभंग करणाऱ्यास किंवा गुन्हेगारास शिक्षा करण्याचा अंतिम अधिकार तिला आहे. राज्यसंस्थेशिवाय इतर संस्था व संघटना शिक्षा करण्याचा अधिकार असला तरी त्यांचा हा अधिकार मर्यादित स्वरूपाचा आहे. राज्यसंस्थेस मात्र शिक्षा करण्याचा अधिकार अमर्याद स्वरूपात आहे. त्यामुळेच अत्यंत गंभीर गुन्हे करणाऱ्यास ती मृत्यूदंडाची शिक्षाही देऊ शकते. वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की ''शिक्षा म्हणजे नियमभंग वा कायदेभंग करणाऱ्या व्यक्तीस पीडादायक व नुकसानकारक होईल अशी वागणूक देणे असा अर्थ होतो.'' या अर्थाने निंदा किंवा टीका करणे, संपर्क तोडणे, अर्थदंड देणे, तुरुंगात डांबणे, मृत्यूदंड देणे इत्यादी सर्व शिक्षेचीच उदाहरणे आहेत. शिक्षेचा अर्थ अधिक स्पष्ट होण्यासाठी तिच्या कांही व्याख्या विचारात घेऊ.

**१) चंद्रकांत खंडागळे :** न्यायालयीन प्रक्रियेद्वारे गुन्हेगारास शारीरिक किंवा प्रतिकात्मक स्वरूपात दिली जाणारी पीडादायक किंवा नुकसानकारक वागणूक म्हणजे शिक्षा होय.

**२) विल्यम स्कॉट :** शिक्षा ही एक नकारात्मक मान्यता असून तिच्यात नापसंतीचे आक्रमक रूप अंतर्भूत असते आणि ती सामाजिक नियंत्रणाचे एक साधन म्हणून कार्य करते. (A negative sanction constituting an agreessive form of disapproval which functions as a device for social control.)

**३) वेबस्टर शब्दकोशानुसार** ''न्यायीक प्रक्रियेद्वारे गुन्हेगारावर जबरदस्तीने दंड लादणे (a penalty inflicted on an offender through judicial procedure) म्हणजे शिक्षा होय.

वरील विवेचनावरून शिक्षेविषयी पुढील मुद्दे स्पष्ट होतात.

- शिक्षा ही कायदेभंग करणाऱ्या व्यक्तीस (गुन्हेगारास) केलेले शासन किंवा दंड आहे.
- शिक्षा ही शारीरिक किंवा प्रतिकात्मक स्वरूपात पीडादायक (क्लेशदायक) किंवा नुकसानकारक अशी असते.
- शिक्षा ही न्यायालयीन प्रक्रियेद्वारे गुन्हेगारावर जबरदस्तीने लादली जाते.

- शिक्षेमध्ये गुन्हेगारावर सूड उगविण्याची भावना आणि त्याला तसेच इतरांनाही दहशत बसविण्याचा उद्देश अंतर्भूत आहे.
- शिक्षेस समाजातील सार्वभौम सत्तेची म्हणजेच राज्यसंस्थेची मान्यता असते.

शिक्षेचा वरील अर्थ हा नकारात्मक (negative) स्वरूपाचा आहे. आधुनिक काळात मात्र शिक्षेकडे विधायक किंवा सकारात्मक (positive) दृष्टिकोनातून पाहिले जाते. गुन्हेगारास शिक्षा करावयाची ती सूड भावनेने किंवा दहशत बसविण्यासाठी नव्हे तर, गुन्हेगाराच्या वर्तनात सुधारणा करण्यासाठी असा सकारात्मक अर्थ घेतला जातो. आधुनिकदृष्ट्या या अर्थानुसार शिक्षा म्हणजे गुन्हेगारास शिक्षण देऊन तिच्यावर सुसंस्कार करून तिच्या वर्तनात अपेक्षित बदल किंवा सुधारणा घडवून आणणे असा अर्थ होतो.

**शिक्षेचे प्रकार** (Types of Punishment)

गुन्हेगारास शिक्षा देण्याची तरतूद प्राचीन काळापासून सर्व समाजात आढळते. मात्र वेगवेगळ्या समाजात वेगवेगळ्या शिक्षा दिल्या जातात. तसेच बदलत्या परिस्थितीनुसार व कालानुसार शिक्षेच्या प्रकारात बदल होत आलेले आहेत. त्यामुळे सर्वमान्य होईल असे शिक्षेचे वर्गीकरण देणे किंवा शिक्षेचे प्रकार पाडणे अवघड आहे. तथापि, वेगवेगळ्या कालखंडात व वेगवेगळ्या समाजात दिल्या जाणाऱ्या शिक्षा विचारात घेऊन शिक्षेचे (अ) आर्थिक शिक्षा, (ब) शारीरिक शिक्षा, (क) तुरुंगवासाची शिक्षा आणि (ड) इतर शिक्षा असे चार प्रकार पाडता येतात. या चार प्रकारच्या शिक्षांचे स्वरूप समजावून घेऊ या.

**अ) आर्थिक शिक्षा :** गुन्हेगारास आर्थिक स्वरूपाची शिक्षा करणे हा शिक्षेचा सर्वत्र आढळणारा प्रकार आहे. या प्रकारात गुन्हेगारास रोख रक्कमेच्या स्वरूपात दंड भरावा लागतो. या प्रकारात खालील शिक्षांचा समावेश होतो.

**१) अर्थदंड** (Fine) : साधारणतः सौम्य गुन्ह्यांसाठी (उदा. वाहतुकीच्या कायद्याचा भंग करणे, कर चुकविणे, इत्यादी) अर्थदंड केला जातो. तसेच इतर प्रकारच्या शिक्षाबरोबरच अर्थदंडाचीही शिक्षा केली जाते. उदा. अमूक अमूक दिवसांचा किंवा महिन्यांचा किंवा वर्षांचा तुरुंगवास किंवा अमूक अमूक रक्कमेचा दंड किंवा दोन्हीही अशा स्वरूपात शिक्षा देण्याची तरतूद आढळते. अनेक गुन्ह्यामध्ये अर्थदंड भरण्याची गुन्हेगाराची कुवत नसेल तर त्यास तुरुंगवासाची शिक्षा (पर्याय म्हणून) देण्याची तरतूद केलेली दिसते. अर्थदंडाच्या संदर्भात दंडाची रक्कम किती व कशी ठरवावयाची व त्याची वसुली कसी करावयाची हे दोन प्रश्न महत्त्वाचे ठरतात. यासंदर्भात दंडाची रक्कम ठरविताना न्यायालयाने गुन्हेगाराचे उत्पन्न लक्षात घेणे, दंडाची रक्कम हप्त्याने भरण्याची सोय करणे, दंडाच्या रक्कमेची कमाल व किमान मर्यादा निश्चित करणे इत्यादी गोष्टींचा विचार झाला पाहिजे असे अभ्यासक म्हणतात.

**२) नुकसान भरपाई देणे :** गुन्हेगारामुळे ज्या व्यक्तीचे शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक नुकसान होते त्या व्यक्तीस नुकसान भरपाई देण्यासाठी गुन्हेगारास दंड करून तो दंड किंवा त्यातील कांही हिस्सा संबंधित व्यक्तीस दिला जातो. उदा. एखाद्या मोटार चालकाच्या चुकीमुळे

अपघात होऊन एखाद्या व्यक्तीचा पाय मोडला तर न्यायालय त्या चालकास दंड करून त्या दंडाची रक्कम अपघातग्रस्त व्यक्तीस देण्याची शिक्षा सुनावतात.

**३) संपत्ती जप्त करणे :** अतिगंभीर गुन्ह्याचा आरोप असलेल्या व्यक्ती (उदा. राज्याच्या विरुद्ध कटकारस्थान करणे, जनतेला अंतर्गत युद्धासाठी भडकावणे, शासकीय मालमत्तेचा अपहार करणे, बँक घोटाळा करणे इत्यादी.) न्यायालयीन प्रक्रियेस साहाय्य न करता फरार होतात, देशात किंवा देशाबाहेर लपून बसतात व अटक चुकवितात. अशा आरोपींची संपत्ती जप्त करण्याचा आदेश न्यायालये देतात. अर्थात अशा जप्तीस तत्त्वतः शिक्षा म्हणता येत नाही. पण व्यावहारिकदृष्ट्या सदर आरोपीचे नुकसान होते, तिला आपल्या संपत्तीस मुकावे लागते व ही तिच्यासाठी अप्रत्यक्षपणे एक शिक्षाच ठरते.

**४) खटल्याचा खर्च देणे :** कांही व्यक्ती सुडभावनेने, एखाद्यास नाहक त्रास देण्याच्या उद्देशाने, एखाद्याची बदनामी करण्याच्या उद्देशाने त्याच्यावर खोटे आरोप करून खटले दाखल करतात. असा आरोप हा खोटा असल्याचे सिद्ध झाल्यास न्यायालय सदरच्या फिर्यादीस म्हणजे खटला दाखल करणाऱ्यास खटल्याचा झालेला खर्च भरून देण्याची शिक्षा देतात.

**ब) शारीरिक शिक्षा :** गुन्हेगारास शारीरिक त्रास देण्यासाठी केलेल्या शिक्षेस शारीरिक शिक्षा असे म्हणतात. या प्रकारात खालील शिक्षांचा समावेश होतो.

**१) फटके मारणे** (Flogging) : गुन्हेगारास चाबकाने किंवा चमड्याच्या पट्ट्याने फटके मारण्याची शिक्षा प्राचीन काळापासून जगातील विविध देशात प्रचलीत होती. प्राचीन व मध्ययुगीन काळात चोरी वा मारामारी करणे, रस्त्यावर गोंधळ घालणे, स्त्रियांची छेडछाड करणे, दारू पिऊन रस्त्यावर गडबड गोंधळ करणे इत्यादी गुन्ह्यांसाठी व्यक्तीस जाहीरपणे फटके मारले जात. बऱ्याचवेळा आरोपीने गुन्हा कबूल करावा म्हणूनही फटके मारले जात. तथापि, फटक्याच्या भीतीने किंवा वेदना असहय्य झाल्याने निरपराध व्यक्तीसुद्धा अनेकदा आरोप कबूल करीत असत. हा एकप्रकारचा अन्यायच होता. इराण, इंग्लंड, अमेरिका, भारत इत्यादी अनेक देशात, अशी शिक्षा दिली जाई. भारतात १९५५ मध्ये ही शिक्षा कायद्याने रद्द केली.

**२) अवयव कापणे** (Mutilation) : गुन्हेगार व्यक्तीस शिक्षा म्हणून त्याच्या शरीराचा एखादा अवयव कापण्याची वा तोडण्याची पद्धती प्राचीन काळापासून अनेक देशात (उदा. इंग्लंड, डेन्मार्क, कांही युरोपियन देश, भारत इत्यादी) रूढ होती. उदा. चोरी करणाऱ्याचा हात कापणे, बलात्कार करणाऱ्या पुरुषाचे लिंग कापणे. अशा शिक्षामागे गुन्हेगारास तशाच प्रकारचा गुन्हा परत करता येऊ नये हा उद्देश असे.

**३) डाग देणे** (Branding) : गुन्हेगारास शिक्षा म्हणून त्याच्या शरीरावर किंवा एखाद्या अवयावर तापवलेल्या लोखंडी सळईने किंवा त्यासारख्याच एखाद्या धातुने डाग देण्याची प्रथा देखील अनेक देशातून प्रचलित होती. कांही देशात गुन्हेगाराच्या शरीरावर विशिष्ट चिन्ह कोरले जाई. रोममध्ये गुन्हेगाराच्या कपाळावर विशिष्ट खूण कोरली जाई. अमेरिकेत प्रथमच घरफोडी करणाऱ्याच्या हातावर 'T' हे अक्षर तर दुसऱ्यांदा घरफोडी करताना पकडल्यास कपाळावर 'R' हे अक्षर कोरले जाई. अमेरिकेतील मेरिलँड राज्यात ईश्वरनिंदा हा गुन्हा करणाऱ्याच्या कपाळावर 'B' हे

अक्षर कोरले जाई. अशा डागामुळे किंवा खुणेमुळे गुन्हेगार व्यक्ती सहजपणे ओळखता येते व लोक त्यांची निंदा करीत, त्यांच्यापासून सावध राहात.

**४) मानखोडा** (Pillory) : शिक्षेचा हा अत्यंत क्रूर प्रकार असून तो १९ व्या शतकापर्यंत अनेक देशात रूढ होता. या प्रकारात गुन्हेगाराची मान व हात लोखंडी चौकटीत अशाप्रकारे अडकविले जात की, त्याला अजिबात हालचाल करता येणार नाही. अशा अवस्थेत त्या गुन्हेगारास फटके मारले जात किंवा दगड फेकून मारले जात. कांही वेळा गुन्हेगारास भिंतीस उभे करून त्याच्या हातापायात खिळे ठोकून त्याला जायबंदी केले जाई व मग त्यास फटके वा दगड मारले जात.

शारीरिक शिक्षेचे वरील प्रकार हे अत्यंत अमानुष, क्रूर व रानटी मानून आज बहुतेक देशांतून ते बंद केले आहेत. मात्र कांही मध्य-पूर्व राष्ट्रांत फटक्यांची शिक्षा आजही प्रचलित आहे.

**क) तुरुंगवासाची शिक्षा** (Imprisonment) : आधुनिक काळात सर्वच देशात प्रचलित असलेला शिक्षेचा एक सामान्य प्रकार म्हणजे गुन्हेगारांना तुरुंगात किंवा कारागृहात (Jail or Prision) डांबणे म्हणजेच कैदेत टाकणे हा होय. न्यायालयाने शिक्षा सुनावलेल्या गुन्हेगारांना ठराविक कालावधीसाठी तुरुंगवासाची (कारावासाची) शिक्षा दिली जाते. हा कालावधी किती असावा हे गुन्ह्याचे स्वरुप, तीव्रता, गांभीर्य यावर अवलंबून आहे. तुरुंगवासाच्या शिक्षेचे तीन प्रकार आहेत.

**१) साधा तुरुंगवास** (Simple Imprisonment)ः सौम्य किंवा किरकोळ स्वरुपाचे गुन्हे केलेल्या व्यक्तींना साध्या तुरुंगवासाची शिक्षा दिली जाते. उदा. सरकारी नोकर खाजगी व्यवसाय करीत असेल, न्यायालयाने न्यायालयात हजर राहण्यासाठी पाठविलेले पत्र एखाद्याने स्वीकारले नसेल, आरोपी फरार झाला असेल, न्यायालयाने मागविलेली कागदपत्रे न्यायालयात सादर करण्यास टाळाटाळ केली असेल, न्यायालयाचा अवमान केला असेल, वाहतुकीस अडथळा आणला असेल इत्यादी गुन्ह्यासाठी साध्या तुरुंगवासाची शिक्षा दिली जाते.

**२) कठोर किंवा सश्रम तुरुंगवास** (Rigourous Imprisonment)ः गंभीर गुन्हे केलेल्या गुन्हेगारास कठोर किंवा सश्रम तुरुंगवासाची शिक्षा केली जाते. शिक्षा झालेल्या गुन्हेगाराकडून कठोर श्रमाची (कष्टाची) कामे (उदा. खडी, फोडणे, विहीर खोदणे, शेतातील कष्टाची कामे करणे इत्यादी) करवून घेतात. न्यायालयात शपथपूर्वक खोटी साक्ष देणे, खुनाचा आरोप आहे पण प्रत्यक्षात खुनात सहभाग नसणे, घरफोडी किंवा दरोडा घालणे यासारख्या गुन्ह्यासाठी सश्रम तुरुंगवासाची शिक्षा दिली जाते.

**३) आजन्म तुरुंगवास** (Life- Imprisonment)ः खुन करणे, खुन करणाऱ्यास मदत करणे, राजद्रोह करणे, राष्ट्राची गुपिते परकीयांना पुरविणे, चोरटा व्यापार करणे, स्त्रियांचा अनैतिक व्यापार करणे यासारख्या अतिगंभीर गुन्ह्यांसाठी आजन्म तुरुंगवासाची म्हणजेच जन्मठेपेची शिक्षा दिली जाते. बऱ्याचवेळा मृत्यूदंडाच्या शिक्षेला पर्याय म्हणून आजन्म तुरुंगवासाची शिक्षा दिली जाते.

**ड) इतर शिक्षा**ः वर वर्णन केलेल्या आर्थिक, शारीरिक व तुरुंगवास या शिक्षा वगळता उरलेल्या प्रकारच्या शिक्षा इतर प्रकारच्या शिक्षा ठरतात. त्यामध्ये पुढील शिक्षा अंतर्भूत करता येतील.

**१) तडीपार करणे** (Externment): या प्रकारात गुन्हेगारास विशिष्ट भूप्रदेशाबाहेर (उदा. जिल्ह्याबाहेर) कांही काळासाठी हाकालले जाते. या हकालपट्टीसच तडीपार करणे असे म्हणतात. मुंबई पोलिस अधिनियम कलम ५६ आणि ५७ नुसार ग्रामीण भागात उपविभागीय दंडाधिकारी तर पोलिस आयुक्ताच्या हद्दीत सहायक पोलिस आयुक्त हा अधिकारी गुन्हेगारांना विशिष्ट जिल्ह्याबाहेर ठराविक काळासाठी तडीपार करतो. कलम ५६ नुसार ज्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे पण अद्याप शिक्षा झाली नाही अशा व्यक्तीस आणि कलम ५७ नुसार शिक्षा भोगून आलेल्या गुन्हेगारास तडीपारीची कारवाई केली जाते. या शिक्षेमार्ग विशिष्ट सामाजिक कारण आहे. गुन्हेगार, गुंड, मवाली अशी मंडळी स्वतःच्या गावात, तालुक्यात, जिल्ह्यात प्रभावशाली असतात. तेथे त्यांच्या दरारा व वचक असतो. त्यामुळे सामान्य लोक त्यांना भिऊन त्यांच्याविरोधात तक्रार करण्यास धजावत नाही. त्यामुळे अशा मंडळीच्या गुन्हेगारी कृत्यास मोठा वाव मिळतो. मात्र जर त्यांना त्यांच्या प्रभावक्षेत्राच्या बाहेर हाकलल्यास त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांवर आपोआपच मर्यादा येतात. कारण नव्या प्रदेशात ते अपरिचित असल्याने तेथील लोक त्यांना घाबरत नाहीत. तसेच त्यांच्या अवैध कृत्यास पाठींबा देत नाहीत.

**२) हद्दपार करणे** (Banishment or Transportation of Criminal): या प्रकारच्या शिक्षेत गुन्हेगारास त्याच्या देशाबाहेर दूर अशा ठिकाणी म्हणजेच परदेशात पाठविले जाते. एका शतकापूर्वी जगातील अनेक देशात हद्दपारीची शिक्षा प्रचलित होती. अत्यंत खतरनाक गुन्हेगार, सुधारण्यापलिकडे गेलेले अट्टल गुन्हेगार, राजकीय गुन्हेगार इत्यादींसाठी ही शिक्षा दिली जाई. रशियामध्ये अशा गुन्हेगारांना सैबेरियात पाठविले जाई. इंग्लंडमध्ये युद्धकैद्यांना दूर आस्ट्रेलिया वा आफ्रिकेतील वसाहतीत हद्दपार केले जाई. फ्रान्समध्ये गुन्हेगारांना गियानामधील वसाहतीत पाठवित. ब्रिटिश सरकार भारतातील राजकीय गुन्हेगारांना अंदमान निकोबार बेटांवर हद्दपार करीत असे. या शिक्षेस 'काळया पाण्याची शिक्षा' असे म्हणत. हद्दपार केलेल्या गुन्हेगारांना गुलामासारखे किंवा वेठबिगारासारखे राबवून घेतले जाई. आज या शिक्षा बंद करण्यात आल्या आहेत.

**३) एकांतवासाची शिक्षा** (Solitary Confinement): या प्रकारात गुन्हेगारास पूर्णपणे एकांतात ठेवले जाते. मध्ययुगात सराईत गुन्हेगारांना अशी शिक्षा दिली जाई. या प्रकारात गुन्हेगाराचा इतर कोणत्याही व्यक्तीशी संपर्क येऊ दिला जात नाही. मनुष्य हा समाजशिल प्राणी (Social animal) असल्याने समूहाबाहेर वा समाजाबाहेर पूर्ण एकांतात राहाणे ही त्याच्यादृष्टीने मोठीच शिक्षा ठरते. प्राचीन भारतीय दंडव्यवस्थेत एकांतवासाच्या शिक्षेची तरतूद होती. एकांतवासात गुन्हेगाराने आत्मपरिक्षण करावे, आपल्या गुन्हेगारीवृत्तीचा त्याला पश्चाताप व्हावा, त्याने आपल्या वर्तनात सुधारणा करावी हा उद्देश एकांतवासाच्या शिक्षेमागे होता. तथापि, या शिक्षेमुळे व्यक्ती अकाली मरण पावणे, तिला वेड लागणे किंवा ती मनोरुग्ण होणे असे दुष्परिणाम होऊ लागल्याने ही शिक्षा बंद केली.

**४) मृत्यूदंडाची किंवा देहदंडाची शिक्षा** (Capital punishment) शिक्षेचा हा सर्वोच्च असा कठोर प्रकार आहे. अतिभयंकर गुन्ह्यासाठी मृत्युदंडाची शिक्षा दिली जाते. यालाच देहडंड वा देहांत शासन असेही म्हणतात. इंग्रजीत याला Capital punishment असे म्हणतात. Capital शब्दाचा अथे डोके (शीर) असा आहे. तसेच स्तरीकरणातील सर्वोच्च प्रमुख असा ही Capital शब्दाचा अर्थ

आहे. या अर्थानुसार Capital punishment म्हणजे डाके उडविण्याची (शीर कापण्याची) शिक्षा असा अर्थ होतो. तसेच शिक्षेच्या प्रकारातील सर्वोच्च प्रकारची शिक्षा असाही अर्थ होतो. मृत्युदंडाची शिक्षा अनेक पद्धतीने दिली जाते. पूर्वी तलवारीने डोके उडविणे, भिंतीत चिणून मारणे, डोंगरावरून खाली ढकलणे (कडेलोट करणे), हत्तीच्या पायाखाली देणे, विष पाजणे, फासावर लटकावणे, जमिनीत जिवंत पुरणे इत्यादी पद्धती वापरत. आधुनिक काळात बंदुकीची गोळी घालणे, विजेचा तीव्र धक्का देणे, विषारी इंजेक्शन देणे, विषारी वायूच्या दालनात (गॅस चेंबरमध्ये) कोंडणे इत्यादी पद्धतीने मृत्यूदंड दिला जातो. भारतात फाशी देऊन मृत्यूदंड दिला जातो. त्यामुळे मृत्यूदंडास फाशीची शिक्षा असे म्हणतात. भारतीय दंडसंहितेत (Indian Penal Code - IPC)१) खून करणे २) भारत सरकारविरूद्ध युद्ध पुकारणे ३) लष्करी बंडास चेतावणी देणे ४) निरपराध व्यक्तीस फाशी व्हावी म्हणून खोटा पुरावा देणे वा तयार करणे ५) जन्मठेपेच्या कैद्याने खून करणे ६) जन्मठेपेच्या कैद्याने सुनाचा प्रयत्न करणे ७) लहान मुल किंवा वेडी व्यक्ती यांना आत्महत्येस प्रवृत्त करणे ८) खुनासह दरोडा टाकणे या आठ प्रकारच्या गुन्ह्यांसाठी फाशीची शिक्षा देण्याची तरतूद केलेली आहे. फाशीची शिक्षा देण्यामागे दोन उद्देश आढळतात. १) अतिगंभीर गुन्हा केल्यास मृत्यूदंडच मिळतो हे समजल्याने लोकांच्या मनावर दहशत बसून ते असे गुन्हे करण्यास धजावणार नाहीत. २) ज्या व्यक्तीने मृत्यूदंड देण्याइतपत गंभीर गुन्हा केला असेल व तो जर जिवंत राहिला तर समाजाला गंभीर धोका निर्माण होईल त्यामुळे त्यास जिवंत न ठेवणेच योग्य ठरते. तथापि, आज मृत्यूदंडाची शिक्षा नसावी असे म्हणणरे लोक खूपच आहेत. त्यांच्या मते १) मृत्यूदंडाच्या शिक्षेची जाणीव असूनही कांही लोक गंभीर गुन्हे करतातच. त्यामुळे मृत्यूदंडाच्या तरतूदीमुळे दहशत बसतेच असे नाही. २) मृत्यूदंडामुळे गुन्हेगारास सुधारण्याची संधी मिळत नाही. ३) बऱ्याचवेळा गुन्हेगार परिस्थितीच्या दबावामुळे गुन्हे करीत असतो. त्यामध्ये त्याचा फारसा दोष नसतो. ४) बऱ्याचवेळा खऱ्या गुन्हेगारऐवजी निरपराध्यास मृत्यूदंड होण्याची शक्यता असते. ५) केवळ गरीबांनाच मृत्यूदंडाची शिक्षा होते व श्रीमंत लोक पैशाच्या जोरावर मृत्यूदंड टाळू शकतात. ६) खतरनाक गुन्हेगारांना मृत्यूदंडाऐवजी जन्मठेपेची शिक्षा देऊन त्यांचा धोका टाळता येऊ शकतो. ७) मृत्यूदंड हा अहिंसेच्या व मानवतेच्या विरोधी आहे. ८) मृत्यूदंड म्हणजे सरकारने केलेला खूनच ठरतो. त्यामुळे तो रानटीपणाच आहे इत्यादी. वरील कारणास्तव मृत्यूदंडाची शिक्षा नसावी असे मत मांडले जाते. या मताचा प्रभाव पडून जगातील अनेक देशांनी मृत्यूदडांची शिक्षा रद्द केलेली आहे. भारतासह ५८ देशात मृत्यदंडाची तरतूद असून त्यापैकी ३३ देशात फाशी दिली जाते व ऊर्वरीत देशांत इतर मार्गांनी मृत्यूदंड दिला जातो.

### **१.२.३ शिक्षेसंबंधीचे सिद्धांत** (Theories of Punishment)

शिक्षेचे प्रकार अभ्यासल्यानंतर आता तुम्ही शिक्षेसंबंधीचे विविध सिद्धांत समजावून घेणार आहात. गुन्हेगारास शिक्षा का करावयाची याचे समर्थन करण्यासाठी जे सिद्धांत मांडलेले आहेत त्यांना शिक्षेसंबंधीचे सिद्धांत म्हणतात. या ठिकाणी तुम्ही कांही प्रमुख सिद्धांत अभ्यासणार आहात.

**अ) दहशतीचा सिद्धांत** (Deterrent Theory)ः या सिद्धांतानुसार गुन्हेगारास शिक्षा अशासाठी करावयाची की, त्याने पुन्हा गुन्हा करू नये. शिक्षेद्वारे गुन्हेगारास अशी अद्दल घडवावयाची, अशी जरब बसवावयाची की ज्यामुळे ती गुन्हेगारी वर्तन करण्यापासून परावृत्त होईल. दुसरी गोष्ट अशी की,

एखाद्या गुन्हेगारास झालेली शिक्षा पाहून इतर लोकांनाही जरब बसावी, त्यांच्या मनात दहशत निर्माण व्हावी जेणे करून समाजात लोक गुन्हे करण्यास धजावणार नाहीत. थोडक्यात गुन्हेगार व्यक्तीस तसेच इतरांनाही दहशत बसविण्यासाठी शिक्षा केली पाहिजे असे हा सिद्धांत सांगतो. याचाच अर्थ असा होतो की, गुन्हेगारास शिक्षा अशासाठी करावयाची की, ज्यामुळे समाजात गुन्हे होऊ नयेत व समाजाचा फायदा व्हावा म्हणून त्यामुळे हा सिद्धांत उपयुक्ततावादी स्वरूपाचा आहे. मेंढया चोरलेलल्या एका गुन्हेगारास शिक्षा सुनाविताना न्यायाधीश म्हणाले की, ''तू मेंढया चोरल्यास म्हणून मी तुला शिक्षा सुनावत नाही, तर मेंढ्या चोरल्या जाऊ नयेत यासाठी मी तुला शिक्षा सुनावत आहे.'' न्यायाधीशाच्या या कथनात दहशतीच्या सिद्धांताचे प्रतिबिंब आढळते. एकंदरीत संभाव्य गुन्ह्यांचे निवारण व्हावे म्हणून गुन्हेगारास शिक्षा करावी असे या सिद्धांताचे प्रतिपादन आहे. म्हणून या सिद्धांतास निवारणवादी सिद्धांत असेही म्हणतात.

**परीक्षण**: या सिद्धांतावर पुढीलप्रमाणे टीका केली जाते.

**१) दहशत बसतेच असे नाही**: कठोर स्वरूपाची शिक्षा केल्याने गुन्हेगाराच्या तसेच इतर लोकांच्या मनात दहशत किंवा भीती निर्माण होऊन ते गुन्हे करण्यापासून परावृत्त होतात हे कांही व्यक्तींच्या बाबतीत खरे ठरते. एखाद्यास झालेली शिक्षा पाहून अनेकजन गुन्हे करण्यापासून परावृत्त होतात असे अनुभवास येते. तथापि, हा अनुभव सार्वत्रिक स्वरूपाचा नाही. कारण अनेक गुन्हेगार शिक्षा भोगून आल्यावर परत नव्या जोमाने गुन्हे करताना आढळतात. उदा. इंग्लंडमध्ये जेंव्हा गुन्हेगारास जाहीरपणे फाशी दिली जात होती तेंव्हा तेथे जमलेल्या गर्दीत खिसे कापले जात होते. याचाच अर्थ असा की, शिक्षेमुळे दहशत निर्माण होऊन लोक गुन्हे करण्यापासून परावृत्त होतात. म्हणजेच भावी गुन्ह्यांना आळा बसतोच असे नाही.

**२) अन्यायकारक सिद्धांत**: हा सिद्धांत न्यायाला धरून नाही अशी टीका केली जाते. कारण इतर व्यक्तींचा किंवा समाजाचा कांहीतरी फायदा व्हावा या उद्‌देशाने एखाद्यास (गुन्हेगारास) शिक्षा करणे हे न्यायाला धरून नाही. इतरांच्या किंवा समाजाच्या भल्यासाठी एखाद्यास बळी देणे अन्यायकारक ठरते. इतरांना दहशत बसावी म्हणून एखाद्यास शिक्षा करावी हे तत्व योग्य मानल्यास त्यामुळे कांहीवेळा गंभीर प्रसंग उद्‌भवू शकतो. उदा. एखाद्याचा खून झाला आहे पण खूनी व्यक्ती सापडत नाही. अशावेळी इतरांना दहशत बसावी म्हणून एखाद्या निरपराधी व्यक्तीच्या विरोधात खोटा पुरावा उभा करून तिला फाशी दिली जाण्याची शक्यता आहे. परंतु असे घडणे योग्य ठरणार नाही. थोडक्यात समाजाच्या फायद्यासाठी एखाद्याचा बळी देणे अन्यायकारक ठरते.

३) या सिद्धांतावर अशीही टीका केली जाते की, दहशतीच्या दडपणाखाली लोकांना सज्जन बनविणे हे अनैतिकच ठरते. लोकांना भीती दाखवून सक्तीने सज्जन बनविणे अयोग्य ठरते.

**ब) सूडाचा सिद्धांत** (Retributive Theory) या सिद्धांतानुसार गुन्हेगारास शिक्षा अशासाठी करावयाची की, त्याच्या गुन्हेगारी कृत्यामुळे ज्या व्यक्तींवर अन्याय होतो, त्यांचे नुकसान होते, त्या अन्यायाचा किंवा नुकसानीचा सूड किंवा बदला घेण्यासाठी म्हणून. गुन्हेगाराच्या कृत्यामुळे समाजात असमतोल निर्माण होतो. हा असमतोल दूर करून पुन्हा समतोल निर्माण करण्यासाठी गुन्हेगारास शिक्षा केली पाहिजे असे हा सिद्धांत सांगतो. हा सिद्धांत 'जशास तसे' किंवा 'ठोशास ठोसा' (Tit for tat) या तत्वावर आधारलेला आहे. म्हणजे एखाद्याने तुमचा डोळा फोडल्यास तुम्हीही त्याचा

डोळा फोडला पाहिजे. एखाद्या गुन्हेगाराने एखाद्याचा हात तोडल्यास त्या गुन्हेगाराचाही हात तोडला पाहिजे असा या सिद्धांताचा अर्थ आहे. इम्यनुअल कांट, ब्रॅडले हे तत्वज्ञ या सिद्धांताचे पुरस्कर्ते आहेत. कांट म्हणतात की, गुन्हेगारास शिक्षा द्यावयाची ती त्याने गुन्हा केला आहे एवढ्यासाठीच द्यावयाची. त्या शिक्षेने समाजाचा काय फायदा होतो हे विचारात घेण्याची गरज नाही. यासंदर्भात ॲरिस्टॉटल व हेगेल हे तत्वज्ञ म्हणतात की, शिक्षा हे व्यक्तीस नियमभंगाबद्दल मिळणारे बक्षीस आहे व ते तिला मिळालेच पाहिजे. जेम्स स्टिफन म्हणतात की, विवाह जसे प्रेमाचे प्रतीक आहे तसेच शिक्षापद्धती ही रागाचे वा संतापाचे प्रतीक आहे. थोडक्यात गुन्हेगार हा शिक्षेस पात्र आहे व त्याला शिक्षा देणे हे इतरांचे कर्तव्य आहे आणि जर ते आपल्या कर्तव्यात कसूर करतील तर तो गुन्हेगारावरील अन्याय ठरेल. गुन्हा हा एक कलंक असून तो शिक्षा देऊन पुसून टाकला पाहिजे असे या सिद्धांताचे प्रतिपादन आहे.

**परिक्षण** – या सिद्धांतावर पुढीलप्रमाणे टीका केली जाते.

१) गुन्हा करणाऱ्या व्यक्तीचा सूड घेणे ही प्रवृत्ती असभ्यतेचे लक्षण आहे. सभ्य किंवा सुसंस्कृत समाजात अशा प्रवृत्तीस स्थान दिले जात नाही. ही प्रवृत्ती अयोग्य मानली जाते.

२) एखाद्याने माझा डोळा फोडल्यास मी ही त्याचा डोळा फोडणे हे योग्य मानल्यास किंवा ‘खूनाचा बदला खून’ हे तत्व योग्य मानल्यास समाजात कधीही न संपणारे सूडचक्र चालू राहिली व समाजव्यवस्था टिकू शकणार नाही.

३) गुन्हेगारास शिक्षा द्यावयाची ती त्याचा सूड घेण्यासाठी आणि सूड घेणे म्हणजे त्याला पीडा देणे, त्याचे नुकसान करणे होय. पण पीडा देणे, नुकसान करणे ही देखील एक वाईट गोष्ट आहे. त्यामुळे गुन्हा या वाईट गोष्टीचा परिणाम म्हणून शिक्षा ही दुसरी वाईट गोष्ट घडेल. म्हणजेच मूळच्या वाईट गोष्टीत आणखीन एका वाईट गोष्टीची भर पडेल आणि समाजात वाईट गोष्टींचे प्रमाण वाढत राहिल आणि त्याचे नैतिक समर्थन आपणास करता येणार नाही.

अर्थात सूड सिद्धांताचे पुरस्कार करणारे हे सूड भावनेचा पुरस्कार करीत नाहीत. सूडातील भावनेचा भाग काढून टाकण्यासाठी समाजाने न्यायव्यवस्था निर्माण केलेली आहे. न्यायाधीशाच्या मनात सूडाची भावना नसते. समाजातील नैतिक विवेक हा न्यायाधीशाच्या तोंडातून शिक्षा सुनावत असतो. म्हणून सूड सिद्धांताचा पुरस्कार करणे म्हणजे असंस्कृतपणाचा स्वीकार करणे असे होत नाही. सूड सिद्धांत एवढेच सांगतो की, केवळ गुन्हा घडला आहे म्हणूनच गुन्हेगारास शिक्षा केली पाहिजे. शिक्षेमुळे समाजाचा काय फायदा होतो हे ध्यानात घेण्याची गरज नाही.

**३) सुधारणावादी सिद्धांत** (Reformative Theory) शिक्षेविषयीचा हा आधुनिक सिद्धांत आहे. या सिद्धांतानुसार गुन्हेगारास शिक्षा करावयाची ती त्याच्या वर्तनात सुधारणा करण्यासाठी होय. गुन्हेगार सुधारला पाहिजे, त्याने समाजसंमत नियमानुसार वागावयास शिकले पाहिजे आणि त्यासाठी त्याला शिक्षा केली पाहिजे असे हा सिद्धांत सांगतो. मराठीतील शिक्षा हा जो शब्द आहे तो ‘शिक्ष’ या धातुपासून बनला असून त्याचा अर्थ शिकविणे असा आहे. (हिंदी भाषेत शिक्षा म्हणजे शिक्षण असा अर्थ आहे हे लक्षात घ्यावे.) यावरून शिक्षा करणे म्हणजे गुन्हेगारास शिकविणे, त्याच्यावर सुसंस्कार करणे असा अर्थ होतो. हाच अर्थ सुधारणावादी सिद्धांतात अभिप्रेत आहे.

या सिद्धांतानुसार शारीरिक रोग झालेल्या व्यक्तीचा रोग बरा करण्यासाठी आपण तिच्यावर औषधोपचार करतो, तिची काळजी घेतो, शुश्रूषा करतो आणि तिला सुधारतो. गुन्हेगारी प्रवृत्ती हा ही एकप्रकारचा रोग आहे. माणूस मूलतः चांगला असतो. सभोवतालच्या परिस्थितीमुळे किंवा अज्ञानामुळे किंवा कांही मानसिक दोषांमुळे तो गुन्हेगार बनतो. जर आपण ही परिस्थिती बदलली, अज्ञान दूर केले, मानसिक दोष काढून टाकले तर व्यक्तीची गुन्हेगारी प्रवृत्ती नष्ट होईल. ती सुधारेल व चांगले वर्तन करू लागेल. म्हणून गुन्हेगारास योग्य ते शिक्षण देऊन सुधारण्यासाठी त्याला शिक्षा केली पाहिजे असे हा सिद्धांत सांगतो. म्हणून तुरुंग ही बंदीशाळा न राहता संस्कारशाळा झाली पाहिजे. गुन्हेगारास दहशत (भीती) बसविण्यासाठी किंवा गुन्हेगारावर सूड उगविण्यासाठी त्याला शिक्षा करणे हे अमानवी व रानटीपणाचे लक्षण आहे असे हा सिद्धांत मानतो. या सिद्धांताचा प्रभाव पडून आज कैद्यांना तुरुंगात शिक्षण देणे, त्यांच्यावर नैतिक संस्कार करणे, योगसाधना करणे, त्यांना एखाद्या व्यवसायाचे प्रशिक्षण देणे, त्यांना खेळ व मनोरंजन सुविधा पुरविणे, त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव देणे, तुरुंगवासाची शिक्षा भोगून झाल्यावर गुन्हेगारांचे समाजात पुनर्वसन करणे, इत्यादी उपाययोजना राबविल्या जाऊ लागल्या आहेत. यातूनच मुक्त तुरुंग (Open prision) ही संकल्पना राबविली जाऊ लागली आहे.

**परीक्षण**- हा सिद्धांत चांगला, नैतिक, योग्य वाटत असला तरी त्यावरही पुढीलप्रमाणे टीका केली जाते.

१) या सिद्धांतामुळे व्यक्तीची नैतिक जबाबदारी नष्ट होते. कारण प्रत्येक गुन्हेगार अज्ञानी, मनोरूग्ण व परिस्थितीचा बळी आहे असे मानले जाते. गुन्हेगाराबद्दल अनुकंपा (दया) बाळगावयाची, त्याचा निषेध करावयाचा नाही असा ही या सिद्धांताचा अर्थ होतो. लहान मुले, मनोरूग्ण किंवा वेडया व्यक्ती यांच्याबाबतीत हे मान्य होऊ शकते. पण सर्वांनाच हा न्याय लावला तर योग्य-अयोग्य, नीती-अनिती, सज्जन-दुर्जन यातील भेदच समाप्त होईल. व्यक्ती ही स्वतंत्र असते व ती आपल्या वर्तनास जबाबदार असते या तत्वावर हा भेद केलेला असतो. सुधारणावादी सिद्धांत व्यक्तीवरील ही जबाबदारीची कल्पना काढून टाकतो. त्यामुळे नीतिशास्त्राचा आधारच नष्ट होतो. म्हणून सुधारणावादी सिद्धांत पूर्णपणे स्वीकारता येत नाही.

२) या सिद्धांतावर अशीही टीका केली जाते की, हा सिद्धांत खरे तर शिक्षविषयीचा सिद्धांतच नाही. कारण 'शिक्षा' ही जी संकल्पना आहे तिच्यात व्यक्तीला (गुन्हेगाराला) पीडा वा त्रास देणे अंतर्भूत आहे. मात्र सुधारणेच्या प्रक्रियेत पीडा वा त्रास या गोष्टीस स्थान असणार नाही. त्यामुळे शिक्षसंबंधी कोणताही प्रश्न उपस्थित होणार नाही व शिक्षेविषयीचा सिद्धांत मांडण्याचीही गजर भासणार नाही.

३) अनेक सराईत किंवा निर्ढावलेले गुन्हेगार हे सुधारण्यापलीकडे असतात असा व्यवहारातील अनुभव आहे. त्यांच्यासाठी हा सिद्धांत कुचकामी ठरतो असे कांहीचे मत आहे.

**४) सामाजिक ऐक्यभाव जोपसना सिद्धांत** (Theory of Maintencance of Social Solidarity) या सिद्धांतानुसार व्यक्तीला शिक्षा करावयाची ती समाजातील ऐक्यभावाचे जतन किवा जोपासना करण्यासाठी होय. गुन्हेगाराचा सूड घेणे वा त्याला व इतरांना दहशहत बसविणे याऐवजी समाजातील ऐक्यभाव टिकून राहावा म्हणून त्याला शिक्षा करावी असे हा सिद्धांत सांगतो. फ्रेंच

समाजशास्त्रज्ञ **एमिल डूर्खीम** यासंदर्भात म्हणतात की, सामाजिक ऐक्यभाव टिकवून ठेवणे हे शिक्षेचे खरे कार्य आहे. आपल्यावर अन्याय होत असूनही जे लोक नियमपालन करीत असतात त्यांचे संरक्षण करण्यासाठी गुन्हेगारास शिक्षा झाली पाहिजे असे या सिद्धांताचे प्रतिपादन आहे.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न**

योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.

१) ..... यांनी सर्वप्रथम Penology ही संज्ञा वापरली.

अ) मिचेल ब) लायबर क)स्कॉट ड) फेअरचाइल्ड

२) बोर्स्टल ही संस्था .... साठी असते.

अ) युवा गुन्हेगार ब) प्रौढ गुन्हेगार क) लैंगिक गुन्हेगार ड) आर्थिक गुन्हेगार

३) ..... संस्था ही सार्वभौम सत्ता असलेली संस्था आहे.

अ) धर्म ब) शिक्षण क) अर्थ ड) राज्य

४) ....... साली भारतात फटके मारण्याची शिक्षा रद्द केली.

अ) १९४७ ब) १९५० क) १९५५ ड) १९६०

५) सामाजिक ऐक्यभाव टिकविणे हे शिक्षेचे खरे कार्य आहे असे ............ म्हणतात.

अ) डूर्खीम ब) मार्क्स क) महात्मा गांधी ड) बेंथम

## १.३ सारांश

या प्रथम घटकात तुम्ही शिक्षाशास्त्राची किंवा दंडशास्त्राची व्याख्या, व्याप्ती व स्वरूप शिक्षेचे प्रकार, शिक्षेविषयीचे सिद्धांत या बाबींचा अभ्यास केलेला आहे. गुन्हेगारास द्यावयाची शिक्षा व वागणूक यांचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रास दंडशास्त्र असे म्हणतात. दंडशास्त्राच्या व्याप्तीत शिक्षेचा अर्थ, प्रकार व सिद्धांत, गुन्हेगारावर करावयाचे उपचार, तुरुंगव्यवस्थापन, गुन्हेगारांचे पुनर्वसन, शिक्षेविषयीची धोरणे, पोलीस व्यवस्था, न्यायव्यवस्था, इत्यादींचा समावेश होतो. दंडशास्त्राच्या स्वरूपाबाबत मतभिन्नता आढळते. कांही विचारवंत दंडशास्त्रास गुन्हेगारीशास्त्राची शाखा मानतात तर कांहीजण त्यास समाजशास्त्राची शाखा मानतात. दंडशास्त्र हे उपयोजित विज्ञान असून त्यातील ज्ञानाचा वा सिद्धांताचा उपयोग गुन्हेगारास करावयाच्या शिक्षेच्या संदर्भातील प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी गुन्हेगारांचे पुनर्वसन करण्यासाठी तसेच शिक्षेबाबतची धोरणे ठरविण्यासाठी उपयुक्त ठरतो. दंडशास्त्राचे स्वरूप अभ्यासल्यांनतर तुम्ही शिक्षेचा अर्थ व विविध प्रकार अभ्यासलेले आहेत. न्यायालयीन प्रक्रियेद्वारे गुन्हेगारास शारीरिक किंवा प्रतिकात्मक स्वरूपात दिली जाणारी पीडादायक किंवा नुकसानकारक वागणूक म्हणजे शिक्षा होय. अर्थात आधुनिक काळात शिक्षेकडे केवळ नकारात्मक स्वरूपात न पाहता सकारात्मक दृष्टीकोनातून पाहिले जाते. शिक्षा ही गुन्हेगारास दहशत बसविण्यासाठी कृती आहे असे आधुनिक विचारवंत म्हणतात. शिक्षेचे आपण एकूण ४ प्रकार पाडलेले आहेत. १) आर्थिक शिक्षाः या प्रकारात अर्थदंड करणे, नुकसान भरपाई देणे संपत्ती जप्त

करणे, खटल्याचा खर्च देणे अशा शिक्षा येतात. २) शारीरिक शिक्षा : यामध्ये फटके मारणे, अवयव कापणे, डाग देणे, मानखोडा घालणे अशा शिक्षा येतात. ३) तुरुंगवासाची शिक्षाः या प्रकारात साधा तुरुंगवास, कठोर वा सश्रम तुरुंगवास आजन्म तुरुंगवास अशा शिक्षा समाविष्ट आहेत. ४) इतर प्रकारः यामध्ये तडीपार करणे, हद्दपार करणे, एकांतवासात ठेवणे, मृत्यूदंड देणे इत्यादी शिक्षा अंतर्भूत आहेत. यानंतर शिक्षेविषयीचे विविध सिद्धांत तुम्ही अभ्यासले आहेत. त्यामध्ये सूड सिद्धांत, दहशतीचा सिद्धांत, सुधारणावादी सिद्धांत, सामाजिक ऐक्य जोपासना सिद्धांत इत्यादी सिद्धांताची चर्चा केलेली आहे.

## १.४ स्मरणार्थ संज्ञा

- **दंडशास्त्रः** गुन्हेगारांना द्यावयाची शिक्षा (दंड) व वागणूक यांचा वैज्ञानिक अभ्यास.
- **शिक्षाः** गुन्हेगारास शारीरिक वा प्रतिकात्मक स्वरूपात पीडादायक वा नुकसानकारक होईल अशी दिली जाणारी वागणूक.
- **तुरुंगः** गुन्हेगारांना ठेवण्याचे ठिकाण. ज्यांच्यावर खटला चालू आहे अशा आरोपींनाही या ठिकाणी ठेवतात.
- **सार्वभौम सत्ताः** प्रजा व नागरीक यांच्यावर चालणारी सर्वोच्च सत्ता.
- **उपयुक्ततावादः** कोणत्याही गोष्टीचा विचार तिच्या उपयुक्ततेच्या संदर्भात करणारी विचारसरणी.
- **तडीपारः** विशिष्ट भूप्रदेशाबाहेर ठराविक काळासाठी गुन्हेगारांना हाकालणे.
- **हद्दपारः** खतरनाक गुन्हेगारांना देशाबाहेर दूर ठिकाणी ठेवणे.
- **मृत्युदंडः** ठार मारण्याची शिक्षा.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) ब २) अ ३) ड ४) क ५) अ

## १.६ स्वाध्याय

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) दंडशास्त्राची व्याख्या देऊन त्याची व्याप्ती स्पष्ट करा.

२) शिक्षेच्या विविध प्रकारांची चर्चा करा.

३) शिक्षेच्या विविध सिद्धांतांचे टिकात्मक परीक्षण करा.

**ब) टीपा लिहा.**

१) दंडशास्त्राची व्याप्ती

२) आर्थिक शिक्षा

३) मृत्यूदंडाची शिक्षा

४) सुधारणावादी सिद्धांत

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


- Paranjape N. V. : Criminology and Penology, Central, Law Agency, Allahabad, 1980.
- Sethna J. M. J. : Society and Criminal, 4th edition, N. M. Tripathi Pvt. Ltd., Delhi-1980.
- Siddique Ahmad & S. M. A. Qudri : Criminology, 5th edition, Eastern Book, Company Lucknow – 2005.
- माने माणिक : गुन्हेगारीशास्त्र – फडके प्रकाशन, कोल्हापूर १९९९.


❑❑❑

**घटक २**

# सुधारणा पद्धती

**(Correctional Methods)**

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ तुरुंगाधिष्ठीत सुधारणा पद्धती

  २.२.२ समुदायाधिष्ठीत सुधारणा पद्धती

  २.२.३ मुक्त तरुंग

२.३ सारांश

२.४ स्मरणार्थ संज्ञा

२.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## २.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास-

- तुरुंगाधिष्ठीत सुधारणा पद्धती समजावून घेता येतील.
- समुदायाधिष्ठीत सुधारणा पद्धतींचे आकलन होईल.
- मुक्त तुरुंगाचे स्वरूप स्पष्ट करता येईल.

## २.१ प्रास्ताविक

दंडशास्त्रात गुन्हेगारांना करावयाच्या दंडाचा किंवा शिक्षेचा जसा अभ्यास केला जातो तसाच गुन्हेगारांच्या वर्तनात सुधारणा घडवून आणण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सुधारणा पद्धतींचाही अभ्यास केला जातो. त्यामुळे या घटकात तुम्ही गुन्हेगारांना सुधारण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध पद्धतींचा अभ्यास करणार आहात. पूर्वी गुन्हेगारांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कठोर स्वरूपाचा होता. गुन्हेगारांना दयामाया दाखविणे, त्यांच्याकडे सहानुभूतीने पाहणे, त्यांच्यात सुधारणा करणे इत्यादी बाबींकडे दुर्लक्ष केले जाई. आधुनिक काळात मात्र गुन्हेगारांकडे मानवतावादी दृष्टिकोनातून पाहू जाऊ लागले. गुन्हेगार ही देखील माणूस असून माणूस हा स्खलनशील प्राणी आहे. त्याच्या हातून

कळतनकळतपणे चुका होऊ शकतात. तसेच बऱ्याचवेळा केवळ परिस्थितीच्या दबावाखाली माणसाच्या हातून गुन्हे घडतात. त्यामुळे गुन्ह्यासाठी स्वतः व्यक्ती (गुन्हेगार) जबाबदार नसते तर तिच्या सभोवतालची परिस्थिती जबाबदार असते. त्यामुळे गुन्हेगारास कठोर दंड देण्यापेक्षा त्याला सुधारण्याची पर्याप्त संधी दिली पाहिजे. तसेच त्याच्यावर लागलेला गुन्हेगारीचा कलंक पुसून टाकून त्याचे समाजात पुनर्वसन करणे आवश्यक आहे असा उदारमतवादी दृष्टिकोन आज स्वीकारला जात आहे. त्यानुसार गुन्हेगारांना सुधारण्यासाठी विविध पद्धती रूढ झाल्या आहेत. या पद्धतींचे स्वरूप तुम्ही या घटकात समजावून घेणार आहात.

## २.२ विषय विवेचन

प्रास्ताविकेत नमूद केल्याप्रमाणे या घटकात तुम्ही गुन्हेगारांना सुधारण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धती समजावून घेणार आहात. विवेचनाच्यादृष्टीने या घटकाचे तीन विभाग पाडले आहेत. पहिल्या विभागात तुरुंगात शिक्षा भोगत असताना कैद्यांना (गुन्हेगारांना) सुधारण्यासाठी ज्या पद्धतीचा अवलंब केला जातो त्यांचे विवेचन केलेले आहे. दुसऱ्या विभागात समुदायावर आधारलेल्या सुधारणा पद्धतींची चर्चा केलेली आहे. तर तिसऱ्या विभागात मुक्त किंवा खुला तरुंग या पद्धतीचे स्वरूप स्पष्ट केलेले आहे.

### २.२.१ तुरुंगाधिष्ठीत सुधारणा पद्धती (Prision Based Correctional Methods)

न्यायालयात आरोप सिद्ध झालेल्या व्यक्तीला गुन्हेगार मानले जाते व त्याने केलेल्या गुन्हेगारी कृत्यासाठी त्याला विविध प्रकारच्या शिक्षा दिल्या जातात. त्यापैकी एक महत्वाची शिक्षा म्हणजे त्याला कारागृहात / तुरुंगात कांही काळासाठी डांबणे होय. यालाच तुरुंगवासाची किंवा कारावासाची शिक्षा असे म्हणतात. गुन्ह्याचे गांभीर्य/ तीव्रता विचारात घेऊन न्यायालय अल्प मुदतीच्या, मध्यम मुदतीच्या, प्रदीर्घ मुदतीच्या किंवा आयुष्यभराच्या (जन्मठेप) तुरुंगवासाची शिक्षा ठोठावतात. जगातील बहुतेक सर्वच देशात तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे. पूर्वीच्या काळी गुन्हेगारास तुरुंगात कठोर पद्धतीने वागविले जाई. त्याने केलेल्या गुन्ह्याचा सूड घेणे, त्याला अद्दल घडविणे, त्यासाठी त्याला शारीरिक मानसिक त्रास देणे या उद्देशाने गुन्हेगारांना तुरुंगात डांबले जाई. आधुनिक काळात मात्र तुरुंगवासाच्या शिक्षेच्या संदर्भात पूर्वीचा दृष्टिकोन बदलला आहे. गुन्हेगारास तुरुंगात असताना म्हणजे शिक्षा भोगत असताना त्याच्याकडे मानवी दृष्टिकोनातून पाहिले जाते. त्याच्या गुन्हेगारी प्रवृत्तीत व वर्तनात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. कोणतीही व्यक्ती मूलतः चांगली असते. सभोवतालच्या प्रतिकूल परिस्थिच्या दबावामुळे व्यक्ती गुन्हे करण्यास प्रवृत्त होते. म्हणजेच गुन्हेगारी वर्तनास सभोवतालची सामाजिक परिस्थिती जबाबदार असते. त्यामुळे गुन्हेगारास शिक्षा देण्याचा उद्देश त्याचा सूड घेणे हा नसावा तर त्याला सुधारण्याची संधी देणे हा असावा असा दृष्टिकोन आज सर्वत्र स्वीकारलेला आहे. त्यामुळे तुरुंगात शिक्षा भोगत असताना गुन्हेगारावर पुढील सुधारणात्मक पद्धतींचा अवलंब केला जातो.

**१) शिक्षण देणे**: गुन्हेगारांना सुधारण्यासाठी तुरुंगात त्यांना शिक्षण देण्याची पद्धती बहुतेक सर्वत्रच अवलंबलेली दिसते. बहुसंख्य गुन्हेगार हे तरुण असतात. त्यामध्य कांही अशिक्षित तर कांही अल्पशिक्षित असतात. गुन्हा घडून तरुंगात आल्यानंतर कांहीचे सुरू असलेले शिक्षण बंद पडते.

त्यामुळे तुरुंगात अशा कैद्यांना किमान प्राथमिक व मूलभूत शिक्षण दिले जाते. कांही कैद्यांना मुक्त विद्यापीठ किंवा दूर शिक्षण केंद्रातून प्रवेश देऊन त्यांचे उच्च शिक्षण म्हणजेच महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले जाते. शिक्षण हे व्यक्तीच्या वर्तनात अपेक्षित बदल घडवून आणण्याचे सर्वात प्रभावी साधन आहे. शिक्षणाद्वारे व्यक्तीवर सुसंस्कार करता येतात, तिला समाजमान्य पद्धतीने वागण्याचे वळण लावता येते. तसेच दुष्कृत्ये वा गुन्हे केल्याने होणाऱ्या दुष्परिणामांची व्यक्तीला जाणीव करून देता येते. जेणेकरून ती समाजाचा जबाबदार सदस्य म्हणून वागण्यास प्रवृत्त होईल अशी मनोवृत्ती शिक्षणाद्वारे विकसित करता येते. म्हणून तुरुंगातील कैद्यांना शिक्षण देण्याची पद्धती सर्वत्र वापरली जात आहे.

२) **प्रशिक्षणः** गुन्हेगारांना सुधारण्यासाठी त्यांना जसे शिक्षण देणे गरजेचे आहे तसेच त्यांना कोणत्यातरी व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षण देणे ही आवश्यक असते. गुन्हेगार जेंव्हा शिक्षा भोगण्यासाठी तरुंगात येता तेंव्हा त्याचा रोजगार, किंवा नोकरी धंदा वा व्यवसाय बंद पडतो. महत्वाचे म्हणजे तुरुंगात आल्यांनतर त्याच्यावर कैदी किंवा गुन्हेगार म्हणून शिक्का बसतो. सामाजिकदृष्टया तिला वाईट माणूस हा कलंक लागतो. त्यामुळे अशा कंलकीत व्यक्तीकडे समाज संशयाने पाहतो. तिला सहसा कोणी जवळ करीत नाही. त्यामुळे तुरुंगातून सुटून आल्यावर तिला नोकरीधंदा मिळणे अवघड होते. त्यातून तिच्या निर्वाहाचा प्रश्न गंभीर होतो. परिणामी, अशी व्यक्ती पुन्हा गुन्हेगारीकडे वळण्याची दाट शक्यता असते. म्हणून गुन्हेगारांना सुधारावयाचे असेल तर त्यांना तुरुंगात असताना वेगवेगळया व्यवसायाचे प्रशिक्षण (Training) देण्याची व्यवस्था केली जाते. उदा. विणकाम, सुतारकाम, लोहारकाम, शिलाईकाम, बागकाम, यासारख्या व्यवसायांचे प्रशिक्षण दिले जाते. शिक्षा भोगून तुरुंगातून बाहेर पडल्यानंतर असा एखाद्या व्यवसाय करून तो स्वतःचा व आपल्या कुटुंबाचा व्यवस्थितपणे निर्वाह चालवू शकेल हा असे प्रशिक्षण देण्यामागे उद्देश आहे. असा समाजमान्य व्यवसाय उपलब्ध झाल्याने गुन्हेगार गुन्हेगारी वर्तनाचा त्याग करून सन्मानाचे जीवन जगू शकतात असा अनुभव आहे. त्यामुळेच आज गुन्हेगांराना सुधारण्यासाठी त्यांना तुरुंगात व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची पद्धती मोठया प्रमाणावर वापरली जाते.

३) **नैतिक व धार्मिक संस्कारः** गुन्हेगारांना सुधारण्यासाठी तुरुंगात आणखीन एक पद्धती वापरली जाते ती म्हणजे त्यांच्यावर नैतिक व धार्मिक संस्कार करणे होय. बहुसंख्य व्यक्ती या गुन्हेगारीकडे वळण्याचे एक महत्वाचे कारण म्हणजे त्यांच्यावर विशेषतः बालपणात नैतिक मूल्यांचे संस्कार झालेले नसतात. जर व्यक्तीवर बालपणापासूनच सुसंस्कार केलेले असतील, तिच्या मनावर नैतिक व धार्मिक मूल्ये बिंबवली असतील तर ती गुन्हेगारीकडे सहसा वळत नाही. यासंर्भात विल्यम बोंजर म्हणतात की, नैतिक व धार्मिक मूल्ये वा संस्कार बळकट असतील तर व्यक्ती दारिद्रयात असूनही गुन्हे करण्यास सहसा प्रवृत्त होत नाही. हाच उद्देश बाळगून आज तुरुंगात कैद्यांसाठी नैतिक व धार्मिक संस्कार वर्ग चालविले जातात. या वर्गात विविध धर्मातील चांगली तत्वे, मूल्ये, विचार, मते, कल्पना, दृष्टिकोन इत्यादी कैद्यांच्या मनावर रूजवून त्यांना सज्जन बनविण्याचे प्रयत्न केले जातात. प्रेम प्रामाणिकपणा, दया, सहानुभूती, अहिंसा, बांधिलकी, देशप्रेम, शांतता अशी मूल्ये सुखी जीवनासाठी व सर्वांच्या हितासाठी कशी आवश्यक आहेत हे त्यांना पटवून दिले जाते. त्यासाठी विविध धर्मातील संत, महंत, तत्वज्ञ, साधू, समाजसुधारक, सामाजिक कार्यकर्ते इत्यादींची प्रवचने व व्याख्याने तुरुंगात कैद्यासाठी आयोजित केली जातात. तसेच थोर विचारवंत, साहित्यिक राजकीय

नेते, कलावंत यांच्याही भेटी कैद्यासाठी आयोजित केल्या जातात. त्यामुळे अशा व्यक्तींच्या व्यक्तिमत्वाचा व विचारांचा कैद्यांच्या मनावर प्रभाव पडून आपण देखील असेल सभ्य, प्रतिष्ठित जीवन जगावे अशी प्रेरणा त्यांना मिळू शकते.

४) **अर्थार्जनाची संधी**: गुन्हेगांराना सुधारण्यासाठी त्यांना औपचारिक, धार्मिक, नैतिक शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण देणे या पद्धतींबरोबरच आणखीन एक पद्धती वापरली जाते ती म्हणजे त्यांना तुरुंगात शिक्षा भोगत असतानाच अर्थाजन करण्याची संधी उपलब्ध करून देणे ही होय. पूर्वी कैद्यांना शिक्षा म्हणून तुरुंगात अधिकाधिक अशी कठोर श्रमाची कामे करावयास लावली जात. उदा. घाण्यास जुंपणे, काथ्या कुटणे, खड्डे खोदणे, खडी फोडणे इत्यादी. कांही कैद्यांना अशा शिक्षा तुरुंगात दिल्या जात. यासच 'सश्रम कारावासाची शिक्षा' असे म्हणतात. तुरुंगात कैद्यांना असे कठोर श्रम करावयास लावले जात. महत्वाचे म्हणजे या श्रमाचा मोबदला दिला जात नये. आज मात्र यामध्ये बदल झाला आहे. तुरुंगात कैद्यांना विविध प्रकारची उत्पादक स्वरूपाची कामे करावयास लावली जातात व त्याचा मोबदलाही त्यांना दिला जातो. कामाचा मोबदला म्हणून मिळणाऱ्या रक्कमेतील कांही हिस्सा बचत म्हणून ठेवला जातो व कांही हिस्सा कैद्यांच्या कुटुंबाकडे पाठविला जातो. त्यामुळे कैद्यावर अवलंबून असलेले त्याचे आईवडील, बहिणभाऊ, पत्नी व मुले किंवा अन्य नातलग यांच्या निर्वाहाची सोय होते. शिवाय कैद्यालाही त्यांच्याविषयी वाटणारी चिंता व काळजी कांही प्रमाणात तरी दूर होते. त्यामुळे तुरुंगातही तो निश्चितपणे, आनंदाने राहू शकतो. कैद्यांना अर्थार्जनाची संधी देणे ही पद्धती केवळ भौतिक/ आर्थिक दृष्टयाच उपयुक्त नसून कैद्याच्या मानसिक आरोग्याच्या दृष्टिनेही उपयुक्त ठरते.

५) **कलागुणांना वाव देणे**: तुरुंगात असताना कैद्यांना सुधारण्यासाठी आज आणखीन एक पद्धती वापरली जाते ती म्हणजे त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव देणे होय. त्यासाठी तुरुंगात कैद्यासाठी विविध उपक्रम/ कार्यक्रम राबविले जातात. त्यांना विविध खेळ खेळावयास लावले जातात. त्यांचे संघ (Team) तयार करून त्यांच्या क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात. तसेच वाचन करणे, गांणी म्हणणे, गोष्टी सांगणे, नकला करणे, नाटक बसविणे, कलाकुसरींच्या वस्तू बनविणे इत्यादी उपक्रम राबवून कैद्यांच्या कलागुणांना वाव दिला जातो. यासंदर्भात देखील पहिली महिला आय. पी. एस. (IPS) अधिकरी असलेल्या किरण बेदी यांनी दिल्लीच्या 'तिहार' नावाच्या तुरुंगात कैद्यांसाठी राबविलेले असे उपक्रम निश्चितच फलदायी ठरलेले होते.

६) **मनोरंजन**: गुन्हेगारांना सुधारण्यासाठी त्यांच्या मनोरंजनाची व्यवस्था करण्याची पद्धतीही तुरुंगात सर्वत्र वापरली जाते. कैद्यांचे तुरुंगातील वास्तव्य म्हणजेच शिक्षेचा कालावधी सुसहय व्हावा, त्यांना उदास वाटू नये म्हणून त्यांच्यासाठी मनोरंजनाची साधने पुरविली जातात. तसेच कांही कलाकारांचे मनोरंजनाचे कार्यक्रमही तुरुंगात आयोजित केले जातात. आज बहुतेक तुरुंगात वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन संच पुरविलेले आढळतात. तसेच संस्कारक्षम असे चित्रपटही कैद्यांना दाखविले जातात.

७) **ध्यान धारणा**: गुन्हेगारांना सुधारण्यासाठी तुरुंगात ध्यानधारणेचे, योगसाधनेचे वर्गही आयोजित केले जातात. तुरुंगात शिक्षा भोगणारे बहुतेक कैद्यी हे मानसिकदृष्ट्या चिंताग्रस्त, अस्वस्थ, वैफल्यग्रस्त असतात. कांहीना अपराधीपणाची तर कांहीना पश्चात्तापाची भावना सतावत

असते. एकंदरीत कैद्याचे चित्त ठिकाणावर नसते. अशा विचलित स्थितीतून त्यांना बाहेर काढण्यासाठी व त्यांची मनाची एकाग्रता वाढावी म्हणून तुरुंगात त्यांच्यासाठी ध्यानधारणेचे व योगसाधनेचे वर्ग आयोजित केले जातात. ध्यान आणि योगसाधना करण्याचे प्रशिक्षण त्यांना दिले जाते. कैद्यांना मनःशांती मिळवून देण्याच्यादृष्टीने याचा खूपच चांगल्या फायदा होतो.

अशाप्रकारे गुन्हेगारांना सुधारण्यासाठी तुरुंगात विविध पद्धतींचा अवलंब केला जातो.

## २.२.१ समुदायाधिष्ठीत सुधारणा पद्धती

गुन्हेगारांना सुधारण्यासाठी ज्या विविध पद्धती वापरल्या जातात त्यापैकी कांही तुरुंगाधिष्ठीत तर कांही समुदायाधिष्ठीत आहेत. त्यापैकी तुरुंगाधिष्ठीत पद्धती तुम्ही यापूर्वी अभ्यासलेल्या आहेत. आता समुदायाधिष्ठीत पद्धतीचा अभ्यास तुम्ही करणार आहात. या पद्धतीमध्ये गुन्हेगारास समुदायामध्ये ठेवून त्याला सुधारण्याचा प्रयत्न केला जातो. समुदायाधिष्ठीत पद्धती पुढीलप्रमाणे आहेत.

१) परीविक्षा पद्धती (Probation Method)

२) अभिवचन पद्धती (Parole Method)

३) शिक्षा माफी (Granting Pardon)

४) शिक्षा निलंबन (Suspension of Punishment)

५) अनिश्चित शिक्षा (Indeterminate Punishement)

वरील पद्धतीमध्ये स्वरूप थोडक्यात समजावून घेऊ.

### १) परीविक्षा पद्धती

गुन्हेगारांना सुधारण्यासाठी वापरली जाणारी परीविक्षा पद्धती अनेक देशात वापरली जाते.

**१) परीविक्षेचा अर्थ –** पीरविक्षा हा शब्द Probation या इंग्रजी शब्दासाठी मराठी पर्याय म्हणून वापरला जातो. Probation हा शब्द लॅटिन भाषेतील Probare चा शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ चाचणी घेणे (to test) किंवा सिद्ध करणे (to prove) असा आहे. यावरून Probation म्हणजे गुन्हेगार सुधारण्यास पात्र आहे की नाही याची चाचणी घेणे असा होतो. तसचे मी सुधारण्यास पात्र आहे असे गुन्हेगाराने सिद्ध करून दाखविणे असा ही अर्थ Probation चा होतो. यावरून Probation किंवा परीविक्षा म्हणजे गुन्हेगारास शिक्षा न करता त्याला कांही काळा सुधारण्याची संधी देऊन तो सुधारू शकतो की नाही याची चाचणी घेणे होय. सुधारण्यासाठी दिलेल्या कालावधीत गुन्हेगाराने मी सुधारण्यास पात्र आहे हे सिद्ध करून दाखवावयाचे असते. जर त्याने ते सिद्ध करून दाखविले तर त्याला शिक्षा म्हणून तुरुंगात न डांबता समुदायातच त्याचे पुनर्वसन केले जाते. मात्र या काळात तो सुधारला नाही तर मात्र त्याचे काय करावयाचे याचा निर्णय न्यायालय घेते. ही सर्व प्रक्रिया न्यायालयाच्या वा त्याने नेमलेल्या पर्यवेक्षकाच्या देखरेखीखाली पार पाडली जाते.

**परीविक्षेच्या व्याख्या**

**१) चंद्रकांत खंडागळे :** न्यायालयात कायदेभंगाचा आरोप सिद्ध झालेल्या व्यक्तीस तुरुंगवासाची शिक्षा न देता चांगले वर्तन करण्याच्या हमीवर तिला समुदायात राहण्याची सशर्थ परवानगी न्यायालयाने देणे म्हणजे परीविक्षा होय.

**२) डोनाल्ड तफ्तः** परीविक्षा म्हणजे फौजदारी प्रकरणातील अंतिम निकालपत्र किंवा शिक्षा पुढे ढकलणे की जेणेकरून गुन्हेगाराला स्वतःमध्ये सुधारणा करण्याची व समुदायात पुनर्समायोजन साधण्याची संधी मिळेल. ही संधी बहुधा न्यायालयीन अटींच्या अधीन राहून न्यायालयीन अधिकाऱ्यांच्या पर्यवेक्षणाखाली व र्मादर्शनाखाली दिली जाते.

**३) सदरलँडः** चांगले वागण्याच्या अटींवर गुन्हेगाराची शिक्षा तात्पुरती स्थगित ठेऊन त्याला मोकळे ठेवणे म्हणजे परीविक्षा होय. परीविक्षा काळात गुन्हेगारावर व्यक्तिगत पर्यवेक्षण ठेवून त्याला चांगले वागता यावे म्हणून शासनाद्वारे मदत केली जाते.

**४) संयुक्त राष्ट्रांच्या सामाजिक व्यवहार विभागाने केलेली व्याख्याः** परीविक्षा ही कायदेभंग करणाऱ्या व्यक्तीवर उपचार करणारी पद्धती असून ती न्यायालयाद्वारे निर्देशीत केली जाते. न्यायालय किंवा तत्सम अधिकाऱ्यांनी लादलेल्या अटींच्या अधीन राहून ती व्यक्ती समुदायात राहाते. या कालावधीत परीविक्षा अधिकरी त्या व्यक्तीवर देखरेख ठेवतो.

**परीविक्षेची वैशिष्ट्ये–**

**१) गुन्हा सिद्ध होणेः** एखाद्या व्यक्तीने गुन्हा केलेला आहे हा आरोप न्यायालयात सिद्ध झाला पाहिजे व ती व्यक्ती शिक्षा देण्यास पात्र आहे असे न्यायालयास वाटत असते.

**२) शिक्षेस स्थगितीः** तथापि, सदर व्यक्तीस शिक्षा देऊन तुरुंगात पाठविण्याऐवजी तिला समुदायातच ठेवून सुधारण्याची संधी देणे अधिक योग्य ठरेल असेही न्यायलयास वाटते व त्यामुळे त्या व्यक्तिची शिक्षा कांही काळ स्थगित ठेवली जाते.

**३) न्यायालयीन अटीः** अशा गुन्हेगार व्यक्तीवर न्यायालय कांही अटी लादते. या अटींचे पालन करूनच तिला समुदायात राहावे लागते. या काळात आपण सुधारलो आहोत हे तिला सिद्ध करून दाखवावे लागते.

**४) पर्यवेक्षणः** शिक्षा स्थगित ठेवलेली गुन्हेगार व्यक्ती जेंव्हा समुदायात राहात असते तेंव्हा तिच्या वर्तनावर पर्यवेक्षण म्हणजे देखरेख ठेवण्यासाठी एक अधिकारी नेमला जातो. त्यास परीविक्षा अधिकारी म्हणतात. हा अधिकरी गुन्हेगार न्यायालयीन अटींचे पालन करतो की नाही तसेच त्याचे वर्तन सुधारते की नाही यावर देखरेख ठेवतो.

**५) अंतिम निर्णयः** परीविक्षा कालावधीत गुन्हेगाराचे वर्तन सुधारल्याचे सिद्ध झाल्यास त्याची शिक्षा रद्द केली जाते व त्याचे समुदायात पुनर्समायोजन केले जाते. मात्र त्याचे वर्तन सुधारले नाही, त्याच्या हातून परत एखादा गुन्हा घडला किंवा न्यायालयीन अटींचे त्याने पालन केले नाही तर त्याबाबत अंतिम निर्णय काय घ्यावयाचा हे न्यायालय ठरविते.

**परीविक्षेचा उद्‌देश–**

परीविक्षेचा मुख्य उद्‌देश गुन्हेगारास सुधारण्याची संधी देणे हा असतो. एखाद्या व्यक्तीकडून जेंव्हा प्रथमच गुन्हा घडतो किंवा अनावधानाने (नकळत) गुन्हा घडतो किंवा परिस्थितीच्या दबावामुळे गुन्हा घडतो अशा व्यक्तीस शिक्षा देऊन तुरुंगात डांबणे हे तुलनेने अधिक नुकसानकारक ठरते. कारण त्या व्यक्तीवर गुन्हेगार असा शिक्का बसतो. तिचे व्यक्तिमत्व गुन्हेगार म्हणून कलंकित होते. तुरुंगात गेल्याने तिचा नोकरीधंदा सुटतो. तिच्या कुटुंबियांच्या निर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो. त्या व्यक्तीस आपल्या प्रियजनांच्या सहवासास मुकावे लागते. या गोष्टीचा तिच्या मनावर ताण येतो. महत्वाचे म्हणजे तुरुंगात जाणारा नवखा गुन्हेगार तेथील अट्टल / सराईत गुन्हेगारांच्या सहवासात येऊन आणखीन जास्त बिघडण्याची शक्यता असते आणि तुरुंगातून सुटून बाहेर आल्यावर अधिक गंभीर गुन्हे करण्याची शक्यता असते. ''तुरुंगवासाच्या शिक्षेचे हे सर्व संभाव्य दुष्परिणाम टाळणे व गुन्हेगारास सुधारण्याची संधी देऊन त्याचे समाजात एक सन्मानयीय व्यक्ती म्हणून पुनर्समायोजन करणे हा परीविक्षेचा उद्‌देश आहे.'' यासंदर्भात **होमर एस. कनिंग्ज** म्हणतात की, परीविक्षा ही शिस्त व उपचाराशी संबंधित असणारी बाब आहे. परीविक्षेसाठी गुन्हेगारांची काळजीपूर्वक निवड करून समंजसपणे व बुद्धिचातुर्याने त्यांच्यावर देखरेख ठेवली तर आपण पुनर्वसन क्षेत्रात चमत्कार करू शकतो.

**परीविक्षा पद्धतीचे फायदे/महत्व/उपयुक्तता**

परीविक्षा पद्धती ही गुन्हेगारास सुधारण्याची समुदायाधिष्ठीत अशी महत्वाची पद्धती आहे. या पद्धतीचे पुढील फायदे होतात.

**१) कलंकापासून सुटकाः** परीविक्षेमुळे कायदेभंग/ गुन्हा करणाऱ्या व्यक्तीस तुरुंगवास होत नाही. त्यामुळे तिला गुन्हेगार/कैदी हा कलंक लागत नाही. असा कलंक लागल्याने होणारे दुष्परिणाम तिला भोगावे लागत नाही.

**२) गुन्हेगारी विश्वाचा संपर्क टळतोः** परीविक्षेमुळे गुन्हेगारास तुरुंगात डांबले जात नाही. त्यामुळे तुरुंगातील इतर गुन्हेगारांची संगत टळते. गुन्हेगारांच्या विश्वापासूनचा त्याचा संपर्क टळतो. गुन्हेगारी विश्वाचा प्रभाव त्याच्यावर पडत नाही.

**३) पुनर्समायोजनः** परीविक्षेमुळे गुन्हेगारास आपल्या समुदायात, कुटुंबात राहावयास मिळते. आप्तमित्रांशी असलेला संपर्क तुटत नाही. आपला व्यवसाय करता येतो. त्यामुळे गुन्हा करूनही व्यक्तीचे समाजात पुनर्समायोजन व्यवस्थितपणे होते. असे पुनर्समायोजन तुरुंगवासाची शिक्षा दिल्याने सहजासहजी होऊ शकत नाही.

**४) वर्तनात सुधारणाः** परीविक्षेमुळे गुन्हेगारास आपल्या वर्तनात सुधारणा करण्याची संधी मिळते. परीविक्षेच्या काळात त्याच्यावर न्यायालयीन अटी पाळण्याचे दडपण असते. शिवाय परीविक्षा अधिकाऱ्याची देखरेख असते. त्यामुळे त्याचे पाऊल पुन्हा वाकडे पडत नाही. परीविक्षा काळात आपले वर्तन न सुधारल्यास आपणास कडक शिक्षा भोगावी लागेल याची जाणीव असल्याने गुन्हेगार सुधारण्याचा मनापासून प्रयत्न करतो.

**परीविक्षा अधिकाऱ्याची भूमिका–**

गुन्हेगारांना सुधारण्याची परीविक्षा ही अत्यंत उपयुक्त पद्धती असून या पद्धतीत परीविक्षा अधिकाऱ्याची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. कारण तो पुढील कार्ये पार पाडीत असतो.

**१) अन्वेषणः** ज्या गुन्हेगारास परीविक्षा द्यावयाची त्याचा जीवनेतिहास (Life-History) पूर्वचरित्र कौटुंबिक पार्श्वभूमी इत्यादीचे अन्वेषण करणे व त्याबाबतचा अहवाल न्यायालयास देणे हे कार्य परीविक्षा अधिकारी करतो. हा अहवाल न्यायालयास गुन्हेगाराबाबतचा निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शक ठरतो.

**२) पर्यवेक्षणः** न्यायालयाने परीविक्षा मंजूर केलेल्या गुन्हेगारांच्या समुदायातील वर्तनावर पर्यवेक्षण/ देखरेख करणे, तो न्यायालयीन अटींचे पालन करतो की नाही हे पाहाणे, त्याचे वर्तन सुधारते की नाही याचे निरीक्षण करणे इत्यादी कार्येही हा अधिकरी पार पाडतो.

**३) व्यावसायिक नियंत्रणाचा वापरः** गुन्हेगाराच्या वर्तनात सुधारणा करण्यासाठी व्यावसायिक नियंत्रणाचा वापर करणे हे ही या अधिकाऱ्याचे एक महत्वाचे कार्य आहे. यामध्ये गुन्हेगाराचा परीविक्षा कालावधी रद्द करणे, त्याच्या गैरवर्तनाचा अहवाल न्यायालयास देणे, नियमभंगाबद्दल गुन्हेगारास शिक्षा करण्याची शिफारस करणे, गुन्हेगाराच्या घरी भेटी देणे, गरज भासल्यास गुन्हेगारास अटक करण्यासाठी पोलिसांना मदत करणे इत्यादी कार्यांचा समावेश होतो.

**परीविक्षा पद्धतीचा उदय व विकास–**

अमेरिकेतील **जॉन ऑगुस्तस** (John Augustus) या पादत्राणे विक्रेता असलेल्या व मद्यपानविरोधी चळवळीत कार्य करणाऱ्या व्यक्तीस परीविक्षा पद्धतीचा जनक म्हणतात. एका दारूड्या व्यक्तीस न्यायालयात शिक्षा होणार होती. ऑगुस्तस यांना हा दारूडा सुधारू शकतो याची खात्री होती. म्हणून त्यांनी न्यायालयास विनंती केली की मी या दारूड्यास जामीन राहून त्याच्या वर्तनात सुधारणा करू इच्छितो तरी त्याला शिक्षा देऊ नये. न्यायालयाने ही विनंती मान्य करून दारूड्यास त्याच्या हवाली केले. त्याची शिक्षा टळली. ऑगुस्तसच्या प्रयत्नाने तो दारूडा सुधारला. यातून प्रेरणा घेऊन ऑगुस्तसने १८४१ ते १८५७ या काळात सुमारे २००० गुन्हेगारांना जामीन राहून त्यांच्या वर्तनात सुधारणा घडवून आणली. पुढे बोस्टनमधील **फादर कुक** यांनी ''गुन्हेगार परिस्थितीमुळै गुन्हे करतात, जर त्यांना योग्य मार्गदर्शन व संधी मिळाली तर ते सुधारू शकतात.'' असे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. याचा परिणाम म्हणून मॅसस्यॉच्युएट्स राज्याने १८७८ मध्ये प्रथम परीविक्षासंबंधीचा कायदा संमत केला. त्यानंतर इंग्लंड (१८८७), स्वीडन, फ्रान्स (१८९१), जपान इत्यादी देशांनी असे कायदे संमत केले. १९५३ पर्यत ४५ देशात परीविक्षेबाबतचे कायदे संमत झाले. प्रारंभी प्रथमच गुन्हा करणाऱ्यास परीविक्षा दिली जाई. पुढे सर्वांसाठी ही तरतूद लागू केली. सर्वच न्यायालयात परीविक्षा अधिकारी नेमण्याची तरतूद केली गेली.

भारतात फौजदारी कार्यप्रणाली संहिता १८९८ च्या कलम ५६२ नुसार परीविक्षेला मान्यता दिली व दोन वर्षापर्यंत शिक्षा होऊ शकते अशा गुन्ह्यातील प्रथमच गुन्हा करणाऱ्या गुन्हेगारास परीविक्षा देण्याचा अधिकार न्यायालयास दिला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ''गुन्हेगारांचा परीविक्षा अधिनियम (The Probation of Offenders Act) १९५८ मध्ये केला.'' या कायद्यानुसार १) देहदंडाची शिक्षा

झालेली खूनी व्यक्ती, राष्ट्रद्रोह करणारी व्यक्ती, दरोडेखोर, व्यावसायिक गुन्हेगार इत्यादींना सोडून ऊर्वरीत गुन्हेगारांना परीविक्षा देता येते. २) परीविक्षा कालावधी कमाल ३ वर्षाचा आहे. ३) या संदर्भात तपासाची जबाबदारी परीविक्षा अधिकाऱ्यावर आहे. ४) परीविक्षा रद्द करणे किंवा अकाली समाप्त करण्याचा हक्क परीविक्षा अधिकाऱ्यास आहे. ५) परीविक्षा कालावधीत सदर व्यक्तीकडून गुन्हा घडल्यास न्यायालय तिला शिक्षा करू शकते.

**२) अभिवचन पद्धती** (Parole Method)

परीविक्षेप्रमाणेच अभिवचन(पॅरोल) ही गुन्हेगारांना सुधारण्याचा समुदायाधिष्ठीत अशी एक पद्धती आहे. या पद्धतीत गुन्हेगाराने कांही काळ तुरुंगवासाची शिक्षा भोगल्यानंतर त्याला कांही दिवस आपल्या समुदायात /कुटुंबात राहण्यासाठी परत तुरुंगात ऊर्वरीत शिक्षा भोगण्यासाठी येण्याच्या अटीवर पाठविले जाते. या पद्धतीचे स्वरूप पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

**अभिवचनची व्याख्या –**

**१) चंद्रकांत खंडागळे :** तुरुंगवासाच्या शिक्षेचा ठराविक कालावधी पूर्ण केलेल्या कैद्यास चांगले वर्तन करणे व ऊर्वरीत शिक्षा भोगण्यासाठी परत तुरुंगात येणे या अटीवर कांही काळासाठी तुरुंगातून मुक्त करून समुदायात राहण्यासाठी पाठविण्याची पद्धती म्हणजे अभिवचन होय.

**२) डोनाल्ड तफ्तः** कांही काळ शिक्षा भोगल्यानंतर कैद्याची तुरुंगातून सुटका करणे म्हणजे अभिवचन होय. पण या सुटकेच्या कालावधीतही कैद्यावर तुरुंगाधिकाऱ्याचे नियंत्रण असते व जर कैद्याने सुटकेच्या अटींचा भंग केला तर परत त्याला तुरुंगात आणले जाते.

**३) गिलीन आणि गिलीनः** अभिवचन ही दंड किंवा सुधारसंस्थेतून गुन्हेगाराला मुक्त करण्याची पद्धती असून अशा गुन्हेगारावर सुधार अधिकाऱ्याचे नियंत्रण असते. पर्यवेक्षणाशिवाय तो समाजात राहण्यास योग्य आहे का हे पाहण्याचा त्यामागे उद्देश असतो.

**४) सदरलँड आणि क्रेसीः** आपल्या शिक्षेचा जास्तीत जास्त भाग पूर्ण केल्यानंतर राज्याने मान्यता दिलेल्या एखाद्या संस्थेमार्फत चांगल्या वर्तनाची हमी देऊन सुटका होईपर्यंत गुन्हेगाराला मुक्त करण्याच्या पद्धतीला अभिवचन म्हणतात.

**अभिवचन पद्धतीची वैशिष्ट्ये–**

**१) दीर्घ शिक्षाः** दीर्घ मुदतीची तुरुंगवासाची शिक्षा झालेल्या गुन्हेगारास सुधाण्यासाठी अभिवचन पद्धती वापरली जाते.

**२) अभिवचन म्हणजे रजाः** आपल्या शिक्षेच्या मुदतीतील कांही काळ शिक्षा भोगून झालेल्या गुन्हेगारास कांही कालावधीसाठी तुरुंगात बाहेर सोडले जाते. म्हणजेच त्याला एकप्रकारे रजेवरच पाठविले जाते. या रजेच्या कालावधीत त्याला आपल्या कुटुंबात राहाता येते. म्हणजेच अभिवचन पद्धती ही कैद्याला रजेवर पाठविण्याची पद्धती आहे असे म्हणता येते.

**३) अटींचे पालनः** अभिवचन मंजूर करताना कैद्यांवर कांही अटी घातल्या जातात. या अटींचे पालन कैद्याने करणे बंधनकारक असते. महत्वाची अट म्हणजे या काळात त्याच्या हातून कोणताही

गुन्हा घडता कामा नये. अभिवचन कालावधी पूर्ण होताच कैद्यास पुन्हा तुरुंगात आपली ऊर्वरीत शिक्षा भोगण्यासाठी परत येणे बंधनकारक असते. या अटींचा भंग केल्यास कैद्याला पकडून परत तुरुंगात आणले जाते.

**४) नियंत्रणः** अभिवचन कालावधीत कैद्यावर तुरुंगाधिकारी किंवा सुधारसंस्था किंवा परीविक्षा अधिकरी किंवा पोलीस अधिकारी यापैकी कोणातरी एकाचे नियत्रंण असते.

**५) चांगल्या वर्तनाची हमीः** अभिवचन कालावधीत कैदी समुदायात वावरताना चांगले वर्तन करील, कोणाच्याही पर्यवेक्षणाशिवाय तो समुदायात योग्य पद्धतीने राहील याची हमी एखाद्या संस्थेस द्यावी लागते.

**अभिवचन पद्धतीचे उद्देश–**

दीर्घ मुदतीची शिक्षा झालेल्या कैद्याच्या मनावर एकप्रकारचा ताण येतो. त्याला आपल्या आप्तमित्रांच्या सहवासास/प्रेमास मुकावे लागते. त्याची लैंगिक उपासमारही होते. यामुळे त्याला वैफल्य/ नैराश्य येऊ शकते. हे टाळण्यासाठी त्याला आपल्या शिक्षेचा ठराविक कालावधी भोगून पूर्ण केल्यानंतर चांगले वर्तन करण्याच्या अटीवर त्याच्या समुदायात / कुटुंबात राहण्यासाठी पाठविले जाते. त्यामुळे शिक्षेमुळे येणारा ताण कमी होतो. शिक्षा भोगणे सुसह्य होते. तसेच आपले वर्तन सुधारण्याची त्याला प्रेरणा मिळते. महत्वाचे म्हणजे शिक्षेची अंतिम मूदत संपल्यानंतर तुरुंगातून बाहेर आल्यानंतर समुदायात समायोजन साधणे त्याला शक्य होते. महत्वाचे म्हणजे अभिवचन मंजूर करून तुरुंग व्यवस्थेने म्हणजेच सरकारने आपल्यावर विश्वास दाखविला आहे. त्यामुळे आपण चांगले वर्तन केले पाहिजे. जर अयोग्य वर्तन केल्यास पकडून आणून परत तुरुंगात डांबले जाईल. शिक्षेचा कालावधी आणखीन वाढविला जाईल याची जाणीव कैद्याला करून दिली जाते. त्यामुळे कैदी आपल्या वर्तनात सुधारणा करण्यास प्रवृत्त होईल असा उद्‌देश असतो.

**अभिवचन मंजूर करण्याची पद्धती–**

कैद्याला अभिवचन पद्धतीद्वारे रजा मंजूर करण्याची निश्चित अशी पद्धती आहे. त्यासाठी एक मंडळ असते त्याला अभिवचन मंडळ (Parole Board) म्हणतात. कैदी ज्या पोलीस ठाण्याच्या हद्‌दीत राहात असतो त्या पोलीस ठाण्याचा तसेच तो ज्या तुरुंगात शिक्षा भोगत असतो तेथील तुरुंगाधिकाऱ्याचा अहवाल विचारात घेऊन कैद्याला अभिवचन रजा मंजूर करावयाची की नाही याचा निर्णय हे मंडळ घेत असते. साधारणतः कैद्याला सुनावलेल्या शिक्षेच्या एकूण कालावधीपैकी १/३ कालावधी शिक्षा भोगून पूर्ण केलेल्या कैद्यास अभिवचन रजा मंजूर केली जाते. तत्पूर्वी कैद्याची कौटुंबिक सामाजिक पार्श्वभूमी, त्याचे तुरुंगातील वर्तन, त्याची सुधारण्याची क्षमता, त्याच्याकडून पुन्हा एखाद्या गुन्हा घडण्याची शक्यता, त्याच्या रजेमुळे कोणाला धोका होऊ शकतो का, समाजात कायदा व सुव्यवस्थेची समस्या उद्‌भवू शकते का इत्यादी बाबींचा सारासार विचार केला जातो आणि मगच त्याला अभिवचन रजेवर पाठविण्याचा निर्णय घेतला जातो.

**अभिवचन पद्धतीतील अटी–**

भारतात एखाद्या कैद्यास अभिवचन रजेवर पाठविताना त्याच्यावर पुढील अटी घातल्या जातात. १) व्यसनांपासून दूर राहाणे २) शस्त्र न बाळगणे ३) तुरुंगातील इतर कैद्यांशी कोणताही संपर्क न

ठेवणे ४) रात्री १० वाजण्यापूर्वी घरात परतणे ५) आपल्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तिंची काळजी घेणे ६) आदेश दिल्यावर वैद्यकीय तपासणी करून घेणे ७) पूर्वपरवानगी शिवाय राज्याबाहेर न जाणे इत्यादी.

अभिवचन पर्यवेक्षक, सामाजिक कार्यकर्ता, अभिवचन मंडळ सदस्य, संबंधित पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी इत्यादी अभिवचन रजेवर असलेल्या कैद्यावर देखरेख ठेवतात. वरील अटींचा भंग केल्यास कैद्यास पकडून आणून तुरुंगात डांबले जाते.

**अभिवचन पद्धतीचे महत्व/ उपयुक्तता–**

गुन्हेगारास समुदायात राहून सुधारण्याची संधी देणे हा अभिवचन पद्धतीचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे ही पद्धती महत्वाची व उपयुक्त आहे. या पद्धतीची उपयुक्तता सिद्ध झालेली आहे. त्यामुळे अनेक देशात ती गुन्हेगारांना सुधारण्यासाठी वापरली जाते. भारतातील सर्वोच्च न्यायालयाने या पद्धतीचे महत्व पुढील शब्दात स्पष्ट केलेले आहे. ''कैदी व त्याचे कुटुंबीय यांच्यात संबंध प्रस्थापित करणे ही कैद्यावरील ताण कमी करण्याची एक चांगली पद्धती आहे. कुटुंबापासून कैदी दुरावल्याने त्याचे अधःपतन होते तर समाजापासून अलग राहील्याने तो पशूसमान होतो. म्हणून कैद्यास सुधारण्यासाठी त्याला अभिवचन रजेवर पाठविणे इष्ट ठरते.'' अभिवचन पद्धतीमुळे तुरुंगातून अंतिम सुटका झाल्यावर कैद्याचे समाजात समायोजन/ पुनर्वसन होणे सुलभ होते.

**परीविक्षा व अभिवचन यातील भेद / फरक–**

परीविक्षा व अभिवचन या दोन्हीचाही उद्देश समान आहे व तो म्हणजे गुन्हेगारास समुदायात ठेवून त्याला सुधारण्याची संधी देणे हा होय. दोन्ही पद्धतीत कैद्यावर देखरेख ठेवली जाते. कांही अटीही घातल्या जातात. तथापि, या दोन्हीत पुढील भेद आहेत.

१) परीविक्षा पद्धतीत आरोप सिद्ध झालेल्या व्यक्तीस तुरुंगात न पाठविता चांगले वर्तन करण्याच्या हमीवर समुदायात राहण्यासाठी सशर्थ परवानगी दिली जाते. याउलट अभिवचन पद्धतीत कैद्याने त्याच्या एकूण तुरुंगवासाच्या शिक्षेच्या कालावधीपैकी किमान १/३ शिक्षा भोगून पूर्ण केल्यावर त्याला अभिवचन रजा सशर्थपणे मंजूर केली जाते.

२) परीविक्षावर मुक्त करण्याचे काम न्यायालय करते तर अभिवचनावर मुक्त करण्याचे काम अभिवचन मंडळ करते.

३) परीविक्षेवर असलेल्या गुन्हेगारावर देखेरेख ठेवण्याचे काम परीविक्षा आधिकार करतो तर अभिवचनवर सुटलेल्या कैद्यावर देखरेख ठेवण्याचे काम अभिवचन पर्यवेक्षक करतो.

४) परीविक्षा काळात गुन्हेगार हा न्यायालयाच्या ताब्यात आहे असे मानतात तर अभिवचन रजेच्या काळात कैदी हा तुरुंगाधिकाऱ्याच्या ताब्यात आहे असे मानतात.

५) परीविक्षेवर सोडलेल्या व्यक्तीस गुन्हेगार हा कलंक लागत नाही. मात्र अभिवचनवर सोडलेल्या कैद्यास हा कलंक लागलेला असतो.

६) **गिलीन** म्हणतात की, परीविक्षा ही गुन्हेगार सुधारण्याची पहिली पायरी आहे तर अभिवचन ही शेवटची पायरी आहे.

७) **सदरलँड** म्हणतात की, परीविक्षेवर असलेला कैदी हा सुधारण्यासाठी उपचार (treatment) घेत असतो. त्याने अटीचा भंग केला तर शिक्षा होऊ शकते. याउलट अभिवचनवर सुटलेला कैदी हा शिक्षा ही भोगत असतो व सुधारण्यासाठी उपचारही घेत असतो. त्याने अटीचा भंग केल्यास त्याला अधिक कडक शिक्षा होऊ शकते.

### ३) शिक्षा माफी

गुन्हेगारास समुदायातच ठेवून सुधारण्याची आणखीन एक पद्धती म्हणजे त्याला शिक्षा माफ करणे ही होय. शिक्षेमुळे गुन्हेगार सुधारतोच असे नाही. उलट तो अधिक बिघडण्याचीच शक्यता असते असे अनेक दंडशास्त्रज्ञांना वाटते. म्हणून न्यायालयांनी सद्सद्विवेकबुद्धीचा वापर करून शिक्षा सुनावतांना गुन्हेगार कसा सुधारेल याचाही विचार करावा अशी अपेक्षा केली जाते. बऱ्याच वेळा व्यक्तीकडून रागाच्या भरात, क्षणीक मोहापायी किंवा नकळतपणे वा अनवधानाने गुन्हा घडतो व त्याला शिक्षा होते. कांही काळ शिक्षा भोगल्यानंतर तिला पश्चात्ताप होतो व तिच्या वर्तनात सुधारणा होते. अशावेळी तिला ऊर्वरीत शिक्षा माफ करून त्याची सुटका करून त्याला परत समुदायात राहण्याची संधी देणे अधिक योग्य ठरते. भारतात राज्यपाल व राष्ट्रपतींना गुन्हेगारास दया दाखवून त्याची शिक्षा रद्द वा कमी करण्याचा अधिकार आहे. त्यामागे गुन्हेगार सुधारावा हाच उद्देश आहे. शिक्षा माफ केल्याने गुन्हेगारास सुधारण्याची संधी मिळते. त्याला गुन्हेगार हा कलंक लागत नाही. शिक्षेमुळे होणाऱ्या दुष्परिणामास तोंड द्यावे लागत नाही. म्हणून शिक्षा माफी द्यावी असे प्रतिपादन केले जाते.

### ४) निलंबित शिक्षा

गुन्हेगारास सुधारण्याची आणखीन एक समुदायाधिष्ठीत पद्धती म्हणजे आरोप सिद्ध झालेल्या गुन्हेगारास दिलेली शिक्षा लगेच अंमलात न आणता तिची अंमलबजावणी कांही कालावधीसाठी निलंबित करणे होय. शिक्षा निलंबनामुळे गुन्हेगार तुरुंगात न जाता समुदायातच राहतो व आपले वर्तन सुधारण्याची त्याला संधी मिळते. निलंबन काळात जर तिने परत गुन्हा केला नाही तर तिची शिक्षा कायमचीच रद्द केली जाते. पण गुन्हा घडला तर मात्र तिला शिक्षा दिली जाते. फ्रान्स, जर्मनी व इतर कांही राष्ट्रांत गुन्हेगारास सुधारण्यासाठी ही पद्धती वापरतात. तथापि, मृत्यूदंड, हद्दपारी, प्रदीर्घ कारावास अशा शिक्षा मात्र निलंबित ठेवल्या जात नाहीत. परीविक्षा पद्धती व निलंबित शिक्षा यात असा फरक आहे की, परीविक्षा पद्धतीत शिक्षेचा कालावधी जाहीर केला जात नाही. होणारी शिक्षा कांही अटीवर स्थगित ठेवली जाते व अटींचा भंग केल्यास शिक्षा दिली जाते. याउलट निलंबित शिक्षेत शिक्षेचा कालावधी किंवा अर्थदंड जाहीर केलेला असतो. फक्त त्याची अंमलबजावणी कांही काळासाठी कांही अटीवर निलंबित केली जाते. अटींचा भंग केल्यास मात्र शिक्षेची अंमलबजावणी केली जाते.

### ५) अनिश्चित शिक्षा

गुन्हेगारांना सुधारण्यासाठी अनिश्चित शिक्षा देण्याची पद्धतीही अमेरिका, फ्रान्स इत्यादी देशात वापरतात. कांही शास्त्रज्ञांनीही (उदा. जेम्स हॅनवे, गॅरोफॅलो) या पद्धतीचा पुरस्कार केलेला आहे.

साधारणपणे गुन्हेगारास कायद्याच्या अधीन राहून किमान व कमाल शिक्षा न्यायालयाद्वारे दिली जाते. अनिश्चित शिक्षा पद्धतीत मात्र शिक्षेचा कालावधी हा अनिश्चित ठेवला जातो. एखाद्या गुन्हेगाराने किती काळ तुरुंगात शिक्षा भोगावी याचा निर्णय न्यायालय तुरुंग प्रशासनावर (दंडव्यवस्थेवर) सोपविते. समजा एखाद्या गुन्हेगारास तुरुंगवासात ठेवले व तेथे त्याच्या वर्तनात योग्य ती सुधारणा झाली आहे याची खात्री तुरुंगाधिकाऱ्यांना झाली तर अशावेळी त्याला तुरुंगातून मुक्त करण्याचा निर्णय त्यांनी घ्यावा असे या पद्धतीत अपेक्षित आहे.

गुन्हेगारांना सुधारावयाचे असेल तर त्यांना निश्चित काळासाठी तुरुंगात डांबण्याऐवजी त्यांच्या तुरुंगवासाचा कालावधी हा अनिश्चित ठेवावा. म्हणजेच तुरुंगवासाच्या शिक्षेबाबात लवचिक धोरण ठेवावे. त्यामुळे लवकर सुधारणाऱ्या गुन्हेगारांना विनाकारण तुरुंगात डांबून ठेवण्यापेक्षा त्याला मुक्त करून समुदायात परत पाठविणे हे अधिक उचित ठरते अशी विचारसरणी या पद्धतीमागे आहे.

### २.२.३ मुक्त तुरुंग (Open prison)

गुन्हेगारांना सुधारण्याची आणखीन एक महत्वाची पद्धती म्हणजे मुक्त किंवा खुला तुरुंग ही होय. गुन्हेगारांना सुधारण्यासाठी वापलल्या जाणाऱ्या तुरुंगाधिष्ठीत पद्धतीकडून समुदायधिष्ठीत पद्धतीकडे जाण्याच्या मार्गातील एक महत्वाचा टप्पा म्हणून मुक्त तुरुंगाकडे पाहिले जाते.

**मुक्त तुरुंगाचा अर्थ–**

**१) चंद्रकांत खंडागळे :** मुक्त तुरुंग ही कैद्यांवर पहारा ठेवण्यासाठी कोणत्याही भौतिक व शारीरिक साधनांचा वापर न करता त्यांच्यात स्वयंशिस्त व स्वयंजबाबदारीची जाणीव निर्माण करून त्यांच्या वर्तनात सुधारणा करणारी दंडसंस्था आहे.

२) संयुक्त राष्ट्रांच्या १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या ''गुन्हे प्रतिबंध व गुन्हेगारावरील उपचार'' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेने मुक्त तुरुंगाची संकल्पना पुढीलप्रमाणे मांडलेली आहे. ''मुक्त तुरुंग ही संस्था खालील वैशिष्ट्यांनी युक्त असते. या संस्थेत गुन्हेगार पळून जाऊ नये म्हणून तुरुंगााच्या उंच उंच भिंती, लोखंडी जाळया, खोल्यांना कुलपे, सशस्त्र पहारेकरी इत्यादी भौतिक व शारीरिक सावधगिरी घेणाऱ्या साधनांचा अभाव असतो आणि ही व्यवस्था स्वयंशिस्त व समूहाविषयीच्या जबाबदारीची आत्मसंवेदना यावर आधारलेली असते.''

**३) सर लायनल फॉक्सः** सर्व प्रकारच्या सुधार पद्धतींचा वापर करून कैद्यांच्या मनात स्वाभिमान व स्वजबाबदारीची भावना रूजवून त्यांना समाजात तर्कसंगत जीवन जगण्यासाठी तयार करणारी संस्था म्हणजे मुक्त तुरुंग होय.

४) **सर अलेक्झांडर पालेरसनः** मुक्त तुरुंग ही कमीत कमी सुरक्षा असलेली संस्था आहे.

वरील व्याख्यांवरून हे स्पष्ट होते की मुक्त तुरुंग ही कैद्यावर पहारा ठेवण्यासाठी कोणत्याही भौतिक व शारिरीक साधनांचा वापर न करणारी संस्था असून या संस्थेत कैद्यात स्वयंशिस्त व स्वजबाबदारीची जाणीव निर्माण केली जाते, जिच्यामुळे या संस्थेतून सुटका झाल्यानंतर गुन्हेगारांचे समाजात योग्य असे समायोजन व पुनर्वसन होण्यास मदत होते.

**मुक्त तुरुंगाची वैशिष्ट्ये**

१) **विस्तृत जागेवर उभारणी:** मुक्त तुरुंग हा विस्तृत अशा जागेवर उभारलेला असतो. त्यामध्ये कैद्यांच्या राहण्यासाठी इमारत असते. मात्र तिच्याभोवती उंचउंच तटबंधी, तारेचे कुंपण, खोल्यांना कुलपे, पहारा देण्यासाठी सशस्त्र शिपाई या गोष्टी नसतात. विस्तृत जागेत कैदी मोकळेपणाने वावरत असतात.

२) **स्वयंशिस्त व जबाबदारीची जाणीव:** मुक्त तुरुंगात कांही निवडक कैद्यांनाच ठेवले जाते. हे कैदी पळून जाणार नाहीत, ते शिस्तबद्धपणे व जबाबदारीने वागतील, कायदेपालन करून सभ्य माणसासारखे मोकळया वातावारणात राहतील असा त्यांच्यावर विश्वास टाकला जातो. आपण कैद्यांवर विश्वास टाकल्यास तेही विश्वासाने वागतील अशा गृहितावर मुक्त तुरुंग उभारलेला असतो.

३) **रोजगार:** मुक्त तुरुंगात कैद्यांना रोजगार दिला जातो. त्यातून मजूरी म्हणून मिळालेल्या रक्कमेचा कांही भाग कैदी स्वतःसाठी खर्च करू शकतो व ऊर्वरीत भाग आपल्या कुटुंबियांकडे पाठवू शकतो. उदा. पुण्यात येरवडा येथे १०७ एकर जागेत मुक्त तुरुंग असून तेथे शेतीवर कैदी काम करतात. औरंगाबाद जिल्ह्यात पैठण येथे १९६८ मध्ये मुक्त तुरुंग उभारला व तेथील कैद्यांना जायकवाडी धरणावर काम दिले होते.

४) **मुक्त संपर्क:** मुक्त तुरुंगातील कैद्यांना आपले कुटुंबिय, आप्तमित्र तुरुंगातील इतर कैदी तसेच तेथील कर्मचारी इत्यांदीशी संपर्क ठेवण्याची, आंतरक्रिया करण्याची परवानगी असते. त्यामुळे संपर्कविरहितमुळे येणारा ताण त्यांना सहन करावा लागत नाही. त्यांच्या मानसिक आरोग्याच्यादृष्टीने ते उपयुक्त ठरते.

५) **सोयी सुविधा:** मुक्त तुरुंगात कैद्यांना सर्व भौतिक सोयीसुविधा पुरविल्या जातात. त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा याविषयीच्या गरजा तर पूर्ण केल्या जाततच शिवाय आजारपणात त्यांना औषधोपचार पुरवून त्यांची योग्य ती काळजी घेतली जाते. शिवाय त्यांच्यासाठी मनोरंजनाची साधने पुरविली जातात. तसेच विविध खेळ खेळण्याचीही सोय केली जाते.

६) **प्रबोधन:** मुक्त तुरुंगात कैद्यांचे मनः परिवर्तन व्हावे, त्यांनी गुन्हेगारी प्रवृत्ती सोडावी, समाजाचा सन्मानीय सदस्य बनावे, शिक्षा समाप्तीनंतर समाजात जाऊन योग्य पद्धतीने समायोजन साधावे इत्यादी उद्दशाने त्यांचे प्रबोधन केले जाते, त्यांच्यावर धार्मिक व नैतिक मूल्यांचे संस्कार केले जातात. त्यासाठी भजन, कीर्तन, प्रवचन, सामूहिक प्रार्थना इत्यादी प्रबोधनपर कार्यक्रम घेतले जातात.

७) **सुधारणात्मक दुष्टिकोन:** मुक्त तुरुंगाची कल्पना ही शिक्षेविषयीच्या सुधारणावादी दृष्टिकोनावर आधारलेली आहे. गुन्हेगारास शिक्षा म्हणून तुरुंगात डांबणे, त्याला कडक शिस्तीत ठेवणे, त्याचावर अविश्वास दाखवून सशस्त्र पहारा ठेवणे, त्याला अमानवी वागणूक देणे या उपचारांमुळे गुन्हेगार सुधारत तर नाहीच उलट तो अधिक बिघडण्याचीच शक्यता असते असा अनुभव आहे. त्यामुळे त्याच्यावर विश्वास टाकून, त्याला सुधारण्याची संधी देऊन, त्याचे मनःपरिवर्तन करून, त्याला तुरुंगातून सुटल्यानंतर समाजात योग्य पद्धतीने जगता यावे यासाठी त्याचा सामाजिक संपर्क कायम ठेवून त्याचे पुनर्वसन करणे या दृष्टिकोनातून मुक्त तुरुंग उभारलेले आहेत.

८) **किमान बंधने**: मुक्त तुरुंग हा मुक्त असला तरी तेथे कैदी पूर्णपणे बंधनविरहीत असतात असे नाही. त्यांच्यावर कांही बंधने असतात. मात्र ती कमीत कमी, हितकारक व सौम्य स्वरूपाची असतात. महत्वाचे म्हणजे कैद्यांनी ही बंधने इतरांच्या दबावामुळे नव्हे तर स्वयंस्फूर्तीने व आपल्या हिताचीच आहेत या भावनेतून पाळावयाची असतात.

९) **अटी :** मुक्त तुरुंगात कोणत्याही कैद्यास प्रवेश दिला जात नाही. साधारणतः शिक्षेचा किमान १/४ कालावधी तुरुंगात घालवलेल्या, शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असलेल्या, स्वेच्छेने मुक्त तुरुंगात येऊ इच्छिणाऱ्या, चांगले, वर्तन असलेल्या, सराईत गुन्हेगार नसलेल्या, गंभीर गुन्हा न केलेल्या कैद्यांना मुक्त तुरुंगात प्रवेश दिला जातो.

**मुक्त तुरुंगाचा उदय आणि विकास**

१८९१ मध्ये स्वित्झर्लंड या देशात 'विट्झविल (witzwill)' या नावाने अर्ध-मुक्त तुरुंगसंस्था (Semi-open Prison Institute) स्थापन करण्यात आली. तथापि, पूर्णतः सुधारणावादी विचारावर आधारलेला पहिला आधुनिक मुक्त तुरुंग हा १९३० मध्ये इंग्लंडमध्ये स्थापन झाला. त्यानंतर १९४० मध्ये अमेरिकेतही मुक्त तुरुंग स्थापन केला गेला. पुढे १९५० मध्ये नेदरलँडमध्येही असा तुरुंग स्थापण्यात आला. त्यानंतर ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, हाँगकाँग, न्यूझिलंड, चीन, जपान, मलेशिया, फिलिपाईन्स, पाकिस्तान, थायलंड इत्यादी अनेक देशांत मुक्त तुरुंग स्थापण्यात आले.

भारतात १९०५ मध्ये तत्कालीन मुंबई प्रांतात म्हणजेच आजच्या महाराष्ट्र राज्यात ठाणे येथील मध्यवर्ती तुरुंगात मुक्त तुरुंग स्थापन केला गेला. पण तो १९१० मध्येच बंद झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर उत्तर प्रदेशाचे तत्कालीन गृहमंत्री डॉ. स्वरुपानंद यांच्या कल्पनेतून १९५२ मध्ये बनारस (वाराणसी) जवळ चाकीया येथे चंद्रभागा नदीच्या धरणावर मुक्त तुरुंग वसाहत (शिबीर) उभारून तेथे कैद्यांना काम दिले. पुढे आंध्रप्रदेशात हैद्राबाद (१९५४), राजस्थानात दुर्गापूर येथे (१९६५), उत्तरांचलमध्ये सितारगंज (१९६०), राजस्थानात संगनेर (१९६३), व सुरतगढ येथे (१९६४), उत्तर प्रदेशात मिर्झापूर (१९५६), तामिळनाडूत सिंगनलूर (१९५६), हिमाचल प्रदेशात बिलासपूर (१९६२), केरळात नेटव्हकेठेरी (१९६२), आंध्रप्रदेशात अनंतपूर (१९६४), आसामात बागमोटा (१९६४), कर्नाटकात सौंदत्ती (१९६८), पंजाबात नाभा (१९७०), मध्यप्रदेशात मुंगौळी (१९७३) व लक्ष्मीपूर येथे (१९७५) मुक्त तुरुंग स्थापण्यात आले. महाराष्ट्रात येरवडा (पुणे) येथे १९५० मध्ये व पैठण (जि. औरंगाबाद) येथे १९६८ मध्ये मुक्त तुरुंग स्थापण्यात आले.

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१. ............ यास परीविक्षा पद्धतीचा जनक म्हणतात.

अ) सदरलँड	ब) किरण बेदी

क) जॉन ऑगुस्तस	क) गिलीन व गिलीन

२. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात गुन्हेगारांचा परीविक्षा अधिनियम ............ साली संमत झाला.

अ) १९४८ ब) १९५८ क) १९६८ ड) १९७८

३. गुन्हेगारास परीविक्षेवर मुक्त करण्याचे काम ........... करते.

अ) परीविक्षा अधिकारी ब) तुरुंगाधिकारी क) पोलीस अधिकारी ड) न्यायालय

४. गुन्हेगारांना सुधारण्यासाठी अनिश्चित शिक्षा देण्याची पद्धती .......... देशात वापरतात.

अ) भारत ब) इंग्लंड क) जपान ड) फ्रान्स

५. महाराष्ट्रात मुक्त तुरुंग .............. येथे आहे.

अ) पैठण ब) औरंगाबाद क) मुंबई ड) नागपूर

६. पहिला आधुनिक मुक्त तुरुंग ............ देशात सुरू केला.

अ) अमेरिका ब) इंग्लंड क) जपान ड) भारत

## २.३ सारांश

या दुसऱ्या घटकात तुम्ही गुन्हेगारांना सुधारण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या विविध पद्धती समजावून घेतल्या आहेत. या पद्धती स्थलमानाने तुरुंगाधिष्ठीत सुधारणा पद्धती व समुदायाधिष्ठीत सुधारणा पद्धती अशा दोन प्रकारात विभागता येतात. तुरुंगाधिष्ठीत सुधारणा पद्धतीत कैद्यांना तुरुंगात असताना (१) शिक्षण देऊन साक्षर/सुशिक्षित करणे तसेच त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे. (२) त्यांच्यावर नैतिक व धार्मिक संस्कार करणे. (३) तुरुंगात त्यांना रोजगार/काम देऊन त्यांना अर्थार्जनाची संधी देणे. (४) त्यांच्या अंगच्या कलागुणांना वाव देणारे विविध उपक्रम राबविणे. (५) त्यांना मनोरंजन सुविधा पुरविणे. (६) त्यांचे मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी योगसाधनेचे वर्ग चालविणे इत्यादींचा समावेश होतो. समुदायाधिष्ठीत सुधारणा पद्धतीत (१) परीविक्षा, (२) अभिवचन, (३) शिक्षा माफी, (४) शिक्षा निलंबन, (५) अनिश्चित शिक्षा यांचा समावेश होतो. परीविक्षा पद्धतीत आरोप सिद्ध झालेल्या व्यक्तीस तुरुंगात न पाठवता चांगले वर्तन करण्याच्या अटीवर समुदायात राहण्याची परवानगी दिली जाते तर अभिवचन पद्धतीत कैद्याने, तुरुंगात कांही काळ शिक्षा भोगल्यानंतर त्याला सशर्थपणे समुदायात राहण्यासाठी कांही काळ रजेवर पाठविले जाते. शिक्षा माफी पद्धतीत गुन्हेगाराने शिक्षाा भोगत असताना चांगले वर्तन केल्यास त्याची ऊर्वरीत शिक्षा माफ करून त्याला समुदायात राहण्यासाठी पाठविले जाते. निलंबित शिक्षा या पद्धतीत गुन्हेगारास दिलेल्या शिक्षेची लगेच अंमलबजावणी न करता शिक्षेची अंमलबजावणी कांही काळ पुढे ढकलली जाते. दरम्यानच्या काळात गुन्हेगाराचे वर्तन सुधारण्यास त्याची शिक्षा माफ केली जाते. मात्र त्याच्या हातून गुन्हे घडल्यास त्याला सुनावलेली शिक्षा अंमलात आणली जाते. अनिश्चित शिक्षा पद्धतीत गुन्हेगारास किती काळ तुरुंगात ठेवावयाचे याचा निर्णय तुरुंग प्रशासनावर सोपविला जातो. तुरुंगात कैद्याचे वर्तन चांगले असल्यास त्याला तुरुंगातून मुक्त केले जाते. गुन्हेगारास सुधारण्यासाठी आणखीन एक पद्धती वापरली जाते व ती म्हणजे मुक्त तुरुंग होय. मुक्त तुरुंगात कैद्यांना बंदिस्त कारागृहात न ठेवता कमीत कमी सुरक्षा व्यवस्था व पहारेकरी असलेल्या इमारतीत ठेवले जाते. तेथील कैदी स्वयंशिस्त पाळतील स्वतःहून चांगले वर्तन ठेवतील अशी अपेक्षा असते. तसेच त्यांना आप्तमित्रांना भेटण्याची परवानगी

दिली जाते. त्यांना रोजगार, खेळ, मनोरंजन अशा सुविधा पुरविल्या जातात. कैद्यावर कमीत कमी बंधने असतात. मुक्त तुरुंगामुळे कैद्यांना सुधारण्याची संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होते. अशाप्रकारे कैद्यांना सुधारण्यासाठी विविध पद्धतींचा वापर केला जातो.

## २.४ स्मरणार्थ संज्ञा

- **दंडशास्त्र :** गुन्हेगारांना करावयाच्या दंडाचा/शिक्षेचा वैज्ञानिक अभ्यास
- **स्खलनशील :** चुकणारा
- **अर्थार्जन :** काम करून पैसा/संपत्ती मिळविणे
- **आय.पी.एस. :** इंडियन पोलीस सर्व्हिसेस
- **योगसाधना :** चित्तवृत्तींचा निरोध करण्यासाठी करावयाची साधना
- **अन्वेषण :** एखाद्या गोष्टीचे संशोधन करणे.
- **किमान :** कमीत कमी
- **सशस्त्र पहारा :** हातात शस्त्र/हत्यार घेऊन पहारा ठेवणाऱ्या व्यक्ती.
- **प्रबोधन :** एखाद्या विषयाविषयी जाणीव जागृती निर्माण करणे.
- **स्वयंशिस्त :** स्वतःहून शिस्त पाळणे.

## २.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) क २) ब ३) ड ४) ड ५) अ ६) ब

## २.६ स्वाध्याय

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. तुरुंगाधिष्ठीत सुधारणा पद्धतींची चर्चा करा.

२. मुक्त तुरुंगाचा अर्थ सांगून त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३. परीविक्षा पद्धतीची चर्चा करा.

४. अभिवचन पद्धतीचे स्वरूप स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. परीविक्षा व अभिवचन यातील फरक

२. शिक्षा माफी आणि निलंबित शिक्षा

३. मुक्त तुरुंग

४. परीविक्षा पद्धतीचे महत्त्व

५. अभिवचन पद्धतीचे उद्देश व महत्त्व

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


- Paranjape N. V. : Criminology and Penology, Central Law Agency, Allahabad – 1980.
- Sethna J. M. J. : Society and Criminal, 4th edition, N. M. Tripathi Pvt. Ltd. Delhi – 1980.
- Siddique Ahmad and S. M. A. Qudri : Criminology 5th edition, Eastern Book, Company Lucknow – 2005.
- माने माणिक : गुन्हेगारीशास्त्र – फडके प्रकाशन, कोल्हापूर १९९९.
- पी. के. कुलकर्णी : गुन्हेगारीचे समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर २०१३.


❑❑❑

## घटक ३

# भारतातील तुरुंग (कारागृह) व्यवस्था

# (Prision System in India)

### अनुक्रमणिका


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ तुरुंग : अर्थ, वैशिष्ट्ये आणि भूमिका

  ३.२.२ तुरुंग : उदय आणि विकास

  ३.२.३ भारतातील तुरुंगविषयक सुधारणा

३.३ सारांश

३.४ स्मरणार्थ संज्ञा

३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


### ३.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास–

- तुरुंगाचा अर्थ, वैशिष्ट्ये व भूमिका स्पष्ट करता येईल.
- तुरुंगाचा उदय आणि विकास सांगता येईल.
- भारतातील तुरुंगविषयक सुधारणा समजावून घेता येईल.

### ३.१ प्रास्ताविक

गुन्हेगारास विविध प्रकारच्या शिक्षा केल्या जातात. तुरुंगात टाकणे (Imprisonment) हा एक शिक्षेचा प्रकार असून प्राचीन काळापासून तो जवळपास सर्वच देशांत रूढ आहे. त्यामुळे तुरुंग व्यवस्थेचा अभ्यास दंडशास्त्रात केला जातो. आधुनिक काळात सर्वात जास्त प्रमाणात शिक्षेचा हा प्रकार म्हणजे तुरुंगवास अंमलात आणला जातो. जगात सर्वत्र कोणत्या ना कोणत्या स्वरूपात तुरुंगव्यवस्था आढळते. तथापि, वेगवेगळ्या देशात ही व्यवस्था वेगवेगळ्या स्वरूपात आढळते. तसेच तुरुंगव्यवस्थेत बदलत्या परिस्थितीनुसार बदल/सुधारणा होत आलेल्या आहेत. त्यामुळे तुरुंग व्यवस्थेचे स्वरूप समजावून घेताना तुरुंगाचा अर्थ, वैशिष्ट्ये, भूमिका किंवा कार्ये, तुरुंगव्यवस्थेची

गरज, परिणाम, तिच्यात होत असलेले बदल/सुधारणा इत्यादी बाबींचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

## ३.२ विषय विवेचन

या घटकात तुम्ही तुरुंग व्यवस्थेचा अभ्यास करणार आहात. विवेचनाच्या दृष्टीने या घटकाचे तीन विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात तुरुंगाचा अर्थ, वैशिष्ट्ये व भूमिका स्पष्ट केलेली आहे. दुसऱ्या विभागात तुरुंगव्यवस्थेचा उदय व विकास स्पष्ट केलेला आहे. तर तिसऱ्या विभागात भारतातील तुरुंग व्यवस्थेत वेळोवेळी केलेल्या सुधारणांचा आढावा घेतलेला आहे.

### ३.२.१ तुरुंग : अर्थ, वैशिष्ट्ये आणि भूमिका

(Prision : Meaning, Characteristics and Role)

**तुरुंगाचा अर्थ :** तुरुंग ही गुन्हेगारांना बंदिवासात / कैदेत ठेवणारी शासकीय संस्था आहे. प्रत्येक देशात तेथील प्रचलित कायद्यानुसार व न्यायालयीन प्रक्रियेद्वारे गुन्हा सिद्ध होऊन बंदिवासाची शिक्षा झालेल्या गुन्हेगारांना निर्दिष्ट काळापर्यंत ताब्यात ठेवणारी सरकारी संस्था म्हणजे तुरुंग होय. तुरुंगात जसे शिक्षा झालेल्या गुन्हेगारांना ठेवले जाते तसेच ज्यांच्यावर न्यायालयात अद्याप खटला चालू आहे अशाही कांही आरोपींना न्यायालयाच्या आदेशानुसार ठेवले जाते.

**तुरुंगाची व्याख्या:** तुरुंगाचा अर्थ अधिक स्पष्ट होण्यासाठी त्याच्या कांही व्याख्या विचारात घेऊ.

१) **चंद्रकांत खंडागळे:** तुरुंग ही राज्याद्वारे चालविली जाणारी दंडसंस्था असून तिच्यामध्ये न्यायालयाने शिक्षा सुनावलेल्या प्रौढ गुन्हेगारांना तसेच न्यायालयात ज्यांच्यावर खटला चालू आहे अशा प्रौढ आरोपींनाही न्यायालयीन आदेशानुसार निश्चित कालावधीसाठी ठेवले जाते. गुन्हेगारांना समाजापासून अलग करणे तसेच त्यांच्या वर्तनात सुधारणा घडवून आणणे हे तुरुंगाची मुख्य उदिष्टे आहेत.

२) **एम. जे. सेठना:** तुरुंग (म्हणजेच पिंजरा) हे स्थानबद्धांना ठेवण्याचे ठिकाण आहे. ज्यांच्यावर अद्याप खटला चालू आहे अशांनाही तुरुंगांमध्ये ठेवले जाते. तुरुंग ही अशी ठिकाणे आहेत, जेथे गुन्हेगारांना सुधारण्यासाठी कांही काळासाठी ठेवले जावू शकते.

३) **हेन्री फेअरचाईल्ड:** तुरुंग ही अशी दंडात्मक संस्था आहे की, जिथे केवळ प्रौढ गुन्हेगारांना ठेवले जाते व ही संस्था एकतर राज्याद्वारे किंवा स्वायत्त शासनाद्वारे चालविली जाते.

४) **डॉ. आर. एन. शर्मा:** तुरुंग हे असे ठिकाण आहे की जेथे विशिष्ट प्रकारच्या गुन्हेगारांना ठेवले जाते. त्यांचा तुरुंगातील कालावधी हा न्यायालयीन आदेशावर अवलंबून असतो.

५) **तुरुंग अधिनियम-१८९४ नुसार:** तुरुंग म्हणजे कैद्याच्या तात्पुरत्या किंवा कायमच्या बंदीवासासाठी राज्यसरकारने निश्चित केलेली जागा होय.

**तुरुंगाची वैशिष्ट्ये** (Characteristics of Prision)

वरील व्याख्यांच्या आधारे तुरुंगाची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतात.

**१) दंडसंस्था** (Penal Institution): तुरुंग ही एक दंडसंस्था आहे. ज्या व्यक्तीवरील गुन्हा केल्याचा आरोप न्यायालयात सिद्ध झालेला आहे अशा व्यक्तींनाच म्हणजेच गुन्हेगारांना न्यायालयीन आदेशानुसार निश्चित कालावधीसाठी या संस्थेत स्थानबद्ध केले जाते. याचाच अर्थ असा की, न्यायालयाने ठोठावलेल्या शिक्षेची/ दंडाची अंमलबजावणी तुरुंग ही संस्था करीत असते. त्यामुळे तुरुंग ही एक दंडसंस्था ठरते.

**२) गुन्हेगारांना ठेवण्याचे ठिकाण:** तुरुंग हे शिक्षा झालेल्या गुन्हेगारांना ठेवण्याचे ठिकाण आहे. तथापि, तुरुंगामध्ये केवळ प्रौढ गुन्हेगारांनाच ठेवले जाते. बालगुन्हेगारांना तुरुंगात ठेवले जात नाही. त्यांना प्रामुख्याने सुधारगृहात ठेवले जाते. तुरुंगात पुरुष गुन्हेगार व स्त्री गुन्हेगार यांच्यासाठी वेगवेगळी व्यवस्था असते. कांही देशात महिलांसाठी वेगळे तुरुंग आहेत. तसेच सामान्य गुन्हे केलेले व गंभीर गुन्हे केलेले गुन्हेगार यांच्यासाठीही वेगवेगळी व्यवस्था असते.

**३) आरोपींना ठेवण्याचेही ठिकाण:** तुरुंग हे मुख्यतः न्यायालयाने शिक्षा सुनावलेल्या गुन्हेगारांना स्थानबद्ध करण्याचे ठिकाण आहे. तथापि, त्यामध्ये ज्यांच्यावर न्यायालयात खटला चालू आहे व ज्यांना अद्याप शिक्षा सुनावलेली नाही अशा कांही आरोपींनाही न्यायालयीन आदेशानुसार ठेवले जाते. तुरुंगात ठेवलेल्या व्यक्तींना कैदी असे म्हणतात. हे कैदी दोन प्रकारचे असतात. ज्यांना न्यायालयाने शिक्षा सुनावलेली आहे त्यांना पक्के कैदी म्हणतात. तर ज्यांच्यावर खटला चालू आहे अशा ज्या आरोपींना न्यायालयाच्या आदेशानुसार तुरुंगात ठेवले जाते त्यांना कच्चे कैदी म्हणतात. थोडक्यात तुरुंग हे शिक्षा झालेले गुन्हेगार व खटला चालू असलेले कांही आरोपी म्हणजेच अनुक्रमे पक्के कैदी व कच्चे कैदी यांना ठेवण्याचे ठिकाण आहे.

**४) राज्याद्वारे चालविली जाणारी संस्था:** तुरुंग ही राज्याद्वारे चालविली जाणारी संस्था आहे. तुरुंगाचे व्यवस्थापन व प्रशासन हे राज्याने केलेल्या कायद्यानुसार चालते. तुरुंगाचे प्रशासन चालविण्यासाठी लागणारे कर्मचारी हे राज्याद्वारे नेमले जातात. त्यांचे अधिकार, कर्तव्ये, सेवाशर्थी, वेतन, भत्ते व इतर लाभ या सर्व गोष्टी राज्याच्या कायद्याद्वारे निर्धारित केलेल्या असतात. त्यामध्ये बदल/ सुधारणा करण्याचा अधिकारही राज्यासच असतो. परंपरागत समाजात सरंजामदार, जमीनदार अशा खाजगी व्यक्तींचे तुरुंग होते. आधुनिक काळात मात्र सर्वच देशात तुरुंग उभारणे व ते चालविणे हा अधिकार केवळ राज्यसंस्थेसच आहे. खाजगी व्यक्ती व संघटना यांना तुरुंग उभारण्याचा व चालविण्याचा अधिकार नाही.

**५) सुधार संस्था** (Reformatory Institution): पारंपरिक दृष्टिकोनातून तुरुंग ही दंडसंस्था आहे. न्यायालयाने दिलेल्या शिक्षेची / दंडाची अंमलबजावणी ही संस्था करीत असते. तथापि, आधुनिक काळात मात्र तुरुंगास केवळ दंडसंस्था न मानता ती गुन्हेगारांना सुधारणारी संस्था आहे असे मानले जाते. त्यामुळे तुरुंगात गुन्हेगारांना सुधारण्यासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. उदा. त्यांना शिक्षण देणे, एखाद्या व्यवसायाचे प्रशिक्षण देणे, शिक्षा भोगत असतानाच त्यांना एखादे काम देऊन अर्थाजनाची संधी देणे, त्यांच्यावर धार्मिक व नैतिक मुल्यांचे संस्कार करणे, त्यांनी गुन्हेगारी प्रवृत्ती

सोडावी व समाजमान्य पद्धतीने सभ्य नागरीक म्हणून जीवन जगावे यादृष्टीने त्यांचे प्रबोधन करणे, इत्यादी. आज तुरुंगातही गुन्हेगारांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्यावर भर दिला जातो. तसेच त्यांच्या मूलभूत गरजा व्यवस्थितपणे पूर्ण करणे, त्यांना वैद्यकीय व मनोरंजन सुविधा पुरविणे यावरही भर दिला जातो. तुरुंगातून सुटका झाल्यानंतर गुन्हेगारांचे समाजात योग्य पुनर्वसन कसे होईल यादृष्टीने आवश्यक असणारे प्रयत्न तुरुंगात केली जाते.

**तुरुंगाची भूमिका / कार्ये** (Role / Functions of Prision)

तुरुंगाचा अर्थ व व्याख्या अभ्यासल्यानंतर आता तुम्ही तुरुंगाची भूमिका समजावून घेणार आहात. त्यासाठी प्रथम भूमिका म्हणजे काय हे थोडक्यात समजावून घेऊ या. एखाद्या व्यक्तीची किंवा संस्थेची भूमिका म्हणजे तिची समाजाकडून अपेक्षित असलेली कार्ये, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या होय. **मर्फी** या शास्त्रज्ञाच्या मते व्यक्तींकडून पार पाडले जाणारे सामाजिक कार्य म्हणजे त्यांची भूमिका होय. या अर्थानुसार तुरुंगाची भूमिका म्हणजे तुरुंग या संस्थेकडून समाजाला अपेक्षित असलेली कार्ये, कर्तव्ये व जबाबदाऱ्या होय. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येते की, तुरुंगाकडून पार पाडली जाणारी सामाजिक कार्ये म्हणजे तुरुंगाची भूमिका होय. थोडक्यात तुरुंगाने पार पाडावयाच्या कार्यांचा, कर्तव्यांचा, जबाबदाऱ्यांचा तुरुंगाच्या भूमिकेत समावेश होतो. साधारणपणे तुरुंगाच्या भूमिकेत पुढील कार्यांचा समावेश होतो.

**१) शिक्षेची किंवा दंडाची अंमलबजावणी** (Implementation of punishment): न्यायालयाने गुन्हेगारास सुनावलेल्या शिक्षेची / दंडाची अंमलबजावणी करणे हे तुरुंगाचे एक कार्य आहे. कायदेभंगाचे कृत्य म्हणजेच गुन्हा केल्याचा आरोप न्यायालयात सिद्ध झाला की, न्यायालय कायद्याच्या अधिन राहून संबंधित व्यक्तीस म्हणजेच गुन्हेगारास विविध प्रकारच्या शिक्षा देते. गुन्हेगारास विशिष्ट कालावधीसाठी तुरुंगात ठेवावे असा एक शिक्षेचा प्रकार आहे. कांही गुन्ह्यांसाठी न्यायालये गुन्हेगारास तुरुंगवासाची शिक्षा सुनावतात आणि त्यानुसार गुन्हेगारास तुरुंगात पाठविले जाते. तेथे तुरुंगव्यवस्थापन या शिक्षेची अंमलबजावणी करते. न्यायालयाने ठरवून दिलेल्या मुदतीपर्यंत गुन्हेगारास तुरुंगवासाची शिक्षा भोगावयास लावण्याचे कार्य किंवा भूमिका तुरुंग पार पाडते.

**२) सामाजिक अलगीकरण** (Social Isolation): तुरुंगवासाची शिक्षा ही गुन्हेगाराचे समाजापासून अलगीकरण करण्याच्या उद्देशाने दिलेली असते. मानव हा समाजशील प्राणी (Social animal) आहे. त्याला समाजात राहणे आवडते. त्यामुळे समाजापासून / सामाजिक संपर्कापासून अलग होणे (एकांतवासात जाणे) ही एक मोठी शिक्षा ठरते. त्यामुळे व्यक्तीने केलेल्या गुन्ह्यासाठी त्याला समाजापासून अलग करण्याचे कार्य तुरुंगव्यवस्थेमुळे पार पाडले जाते. तुरुंगवासाची शिक्षा झालेल्या व्यक्तीचा सामाजिक संपर्क तुटतो. ती आपल्या प्रियजनांच्या सहवासास मुकते. याचा परिणाम म्हणून तिला आपण केलेल्या गुन्हेगारी कृत्याचा पश्चाताप होतो. यापुढे आपण गुन्हा करू नये, अन्यथा परत आपणास समाजापासून अलग केले जाईल ही भीती तिच्या मनात निर्माण होते व ती गुन्हा करण्यास धजावत नाही अशी अपेक्षा तुरुंगवासाची शिक्षा देण्यामागे असते. त्यामुळे गुन्हेगारास समाजापासून अलग करून त्याच्या मनात पश्चातापाची भावना निर्माण करणे व त्याला गुन्हेगारी प्रवृत्तीपासून दूर करणे हे एक तुरुंगाचे कार्य ठरते. अर्थात सर्वच गुन्हेगारांच्या बाबतीत हे

कार्य यशस्वी होतेच असे मात्र नाही. कारण सराईत गुन्हेगार हे परत- परत गुन्हा करून वारंवार तुरुंगात येत असतात.

**३) संरक्षणः** कांही व्यक्ती ह्या अत्यंत खतरनाक / धोकादायक गुन्हेगार असतात उदा. खूनी, दरोडेखोर, दहशतवादी इ. त्यांच्यापासून समाजाला धोका असतो. कांही गुन्हेगार समाजात मोकळे राहिल्यास ते कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणू शकतात. समाजहितासच धोका निर्माण करू शकतात. अशा गुन्हेगारापासून समाजाचे संरक्षण करणे आवश्यक असते. त्यामुळे त्यांना तुरुंगात डांबणे आवश्यक मानले जाते. याचाच अर्थ असा की तुरुंग व्यवस्था ही गुन्हेगारी व्यक्तींपासून इतरांचे संरक्षण करण्याचे कार्य पार पाडीत असते. यापूर्वीच आपण नमूद केल्याप्रमाणे तुरुंगात कांही आरोपींनाही (कच्चे कैदी) न्यायालयाच्या आदेशानुसार ठेवले जाते. कारण असे आरोपी जर समाजात राहिले तर ते प्रतिपक्षास, त्याच्या साक्षीदारास धमकावू शकतात, त्यांना त्रास देऊ शकतात, आपल्या विरोधीचे पुरावे नष्ट करू शकतात, न्यायालयीन कामाकाजात (खटल्यात) अडथळे आणू शकतात. त्यामुळे खटल्याचा निर्णय लागेपर्यंत त्यांना समाजापासून अलग करून खटल्याशी संबंधित व्यक्तींचे संरक्षण करणे गरजेचे असते. ही गरज पूर्ण करण्याचे कार्य तुरुंगाद्वारे पार पाडले जाते.

**४) सुधारणाः** तुरुंग ही केवळ न्यायालयाने दिलेल्या शिक्षेची अंमलबजावणी करणारी संस्था नाही तर ती गुन्हेगाराच्या वर्तनात व प्रवृत्तीत सुधारणा घडवून आणणरी संस्था आहे असे आधुनिक काळात सर्वच देशांत मान्य केलेले आहे. त्यानुसार गुन्हेगारांना सुधारण्याचे कार्यही तुरुंगाद्वारे पार पाडले जाते. त्यादृष्टीने तुरुंगात अनेक उपक्रम राबविले जातात. निरक्षर गुन्हेगारांना साक्षर करणे, शिक्षण अर्धवट राहिलेल्या गुन्हेगारांनी शिक्षण पूर्ण करण्याची संधी देणे, तुरुंगातून बाहेर पडल्यानंतर गुन्हेगारांनी एखादा व्यवसाय करून आपला व आपल्या कुटुंबाचा निर्वाह चालवावा यासाठी त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे, गुन्हेगारांचे मनःपरिवर्तन व्हावे म्हणून त्यांच्यावर धार्मिक व नैतिक मुल्यांचे संस्कार करणे, समाजात त्यांचे पुनर्समायोजन / पुनर्वसन व्हावे यासाठी त्यांची पूर्वतयारी करवून घेणे इत्यादी उपाययोजना गुन्हेगारांना सुधारण्यासाठी तुरुंगात राबविल्या जातात. थोडक्यात आधुनिक दृष्टिकोनातून तुरुंग ही सुधारसंस्था मानली जाते.

वरील प्रमाणे तुरुंगाची भूमिका आहे.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न क्रमांक १**

योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१) पारंपरिक दृष्टिकोनातून तुरुंग ही केवळ ....... संस्था आहे.

अ) सुधारसंस्था ब) दंडसंस्था क) राजकीय संस्था ड) प्रशासन संस्था

२) तुरुंगात ....... गुन्हेगारांना ठेवले जाते.

अ) बाल ब) महिला क) प्रौढ ड) पुरूष

३) तुरुंग ही ...... द्वारे चालविली जाणारी संस्था आहे.

अ) खाजगी व्यक्ती ब) न्यायालय क) पोलीस ड) राज्य

४) मानव हा ....... प्राणी आहे.

अ) समाजशील ब) एकांतप्रिय क) समाजविरोधी ड) गुन्हेगार

५) आधुनिक दृष्टिकोनातून तुरुंग ही ....... मानली जाते.

अ) दंडसंस्था ब) शिक्षासंस्था क) सुधारसंस्था ड) शिक्षणसंस्था

### ३.२.२ तुरुंगाचा उदय आणि विकास (Origin and Development of Prison)

तुरुंगाचा अर्थ, वैशिष्ट्ये व भूमिका अभ्यासल्यानंतर आता तुम्ही तुरुंगव्यवस्थेचा उदय व विकास कसा झाला हे समजावून घेणार आहात. त्यासाठी आपण भारतात प्राचीन काळापासून ब्रिटिश राजवट प्रस्थापित होईतोपर्यंत तुरुंगव्यवस्था कशी होती हे समजावून घेणार आहोत. ब्रिटिश राजवटीत जी आधुनिक तुरुंगव्यवस्था भारतात सुरू झाली ती समजावून घेण्यासाठी आपण या तुरुंगव्यवस्थेवर ज्या पाश्चात्य देशांतील (उदा. इंग्लंड, युरोपियन देश, अमेरिका, आस्ट्रेलिया इ.) तुरुंगव्यवस्थेचा प्रभाव पडला हे अगोदर समजावून घेणार आहोत.

**ब्रिटिशपूर्व भारतातील तुरुंगव्यवस्था–**

तुरुंग किंवा कारागृह ही संस्था जगातील सर्व देशात प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्याचे आढळते. तथापि, या संस्थेचा उदय नेमका कधी आणि कोठे झाला हे सांगणे मात्र अत्यंत कठीण आहे. भारतात सर्वप्रथम महाकाव्यांच्या काळापासून तुरुंग अस्तित्वात असल्याचे उल्लेख आढळतात. रामायणात तुरुंगाचा उल्लेख आढळतो रावणाने अनेक राजांना तुरुंगात डांबले होते व रावणास ठार केल्यानंतर रामाने या राजांना मुक्त केले असा उल्लेख आहे. महाभारतातही तुरुंगाचा उल्लेख आहे. श्रीकृष्णाचा जन्म तुरुंगातच झाला होता. तसेच जरासंधाने अनेक राजांना तुरुंगात ठेवले होते व कृष्णाने जरासंधास ठार करून या राजांना मुक्त केले होते. बौद्धकाळातही तुरुंग होते. हे तुरुंग म्हणजे अंधारकोठडी असत व त्यामध्ये कैद्यांना साखळदंडानी बांधून ठेवले जाई व चाबकांचे फटके दिले जात. मौर्यकाळातही तुरुंग व्यवस्था होती व तिचे वर्णन कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात आढळते कौटिल्य म्हणतात की, तुरुंग हे मुख्य रस्त्यांच्या बाजूला व सार्वजनिक बागा, मंदिरे, धर्मशाळा इत्यादींच्या जवळपास असावेत. कारण त्यामुळे तुरुंगातील कैद्यांची दैन्यावस्था व हाल लोकांच्या नजरेस पडेल व ते गुन्हे करण्यापासून परावृत्त होतील. हर्षवर्धन राजाच्या कारकिर्दीत राजाविरूद्ध बंड करणे, खून करणे यासारख्या गंभीर गुन्ह्यांसाठी आजन्म तुरुंगवासाची शिक्षा दिली जाई. मध्ययुगात भारतात मुस्लिम राजवट होती या राजवटीतही तुरुंग होतेच. मात्र हे तुरुंग अत्यंत भयानक स्वरूपाचे होते. एकाच खोलीत सर्व प्रकारच्या गुन्हेगारांना प्राण्यांसारखे कोंडले जाई व त्यांना अत्यंत अमानुष पद्धतीने वागविले जाई.

भारतात ब्रिटिश राजवटीच्या काळात आधुनिक तुरुंगव्यवस्था उदयास आली. इंग्लंड, अमेरिका ऑस्ट्रेलिया इत्यादी पाश्चात्य देशांतील दंडशास्त्रीय विचारांचा प्रभाव भारतातील या आधुनिक तुरुंग व्यवस्थेवर पडला. म्हणून या देशांतील तुरुंगव्यवस्थेची थोडक्यात ओळख करून घेऊ.

**इंग्लंडमधील तुरुंगव्यवस्थाः** इंग्लंडमध्ये १२ व्या शतकापासून तुरुंगाचा उपयोग हा सुनावणीपूर्व मुदतीत गुन्हेगारांना बंदिवासात (कैदेत) ठेवण्यासाठी केला जाऊ लागला. पुढे १६ व्या शतकात

इंग्लंड व कांही युरोपियन देशांत तुरुंग व सुधारगृहे अस्तित्वात आली. १५५३ मध्ये लंडन येथे सुरु झालेला 'ब्राइडवेल' नावाचा तुरुंग व १७७५ मध्ये 'गेंट' हे सुधारगृह प्रसिद्ध आहेत. तथापि, या तुरुंगात व सुधारगृहात स्वच्छता तसेच कैद्यांसाठी आवश्यक त्या सुविधा पुरेशा प्रमाणात नव्हत्या. त्यानंतर १७०३ मध्ये रोम येथे **पोप क्लेमेंट** यांनी कैद्यांना मानवतावादी वागणूक देण्याचा सल्ला दिला त्यानुसार तुरुंगात कैद्यांसाठी खोल्या बांधण्यात आल्या व प्रत्येक कैद्यास अलग-अलग ठेवले जाऊ लागले. या तुरंगातील कैद्यांना कष्टाची कामे करावयास लावली जात. अठराव्या शतकापर्यंत हीच स्थिती होती. युरोपमधील विचारवंत **कैसर बेकॅरिया** (१७३८-१७९४), **जेरिमी बेंथम** (१७४८-१८३२) **जॉन हावर्ड** इत्यादी विचारवंतांनी गुन्हेगार, कैदी इत्यांदींना देण्यात येणाऱ्या निदर्य वागणुकीविरूद्ध आवाज उठविला आणि कायदेव्यवस्था, न्यायव्यवस्था, तुरुंगव्यवस्था इत्यादींमध्ये मानवतावादी दृष्टिकोनातून सुधारणा करण्याविषयीचे विचार मांडले. याचा प्रभाव पडून १७७८ मध्ये इंग्लंडच्या पार्लमेंटने तुरुंग सुधारणा कायदा संमत केला आणि तुरुंगातील कैद्यांना चांगली वागणूक देण्यासंबंधीचे नियम करण्यात आले. उदा. कैद्याना २४ तास कोंडून न ठेवता दिवसा काम करावयास लावणे व रात्री तुरुंगात ठेवणे. १८३३ मध्ये कैद्यांना आपल्या आप्तमित्रांना भेटण्याची संमती देणे, तसेच तुरुंगास भेट देणे, कैद्यांची मुलाखत घेणे इत्यादीसही परवानगी देण्यात आली. १८९४ मध्ये ग्लॅडस्टोन समितीने तुरुंगात कैद्यांना अनुत्पादक कष्टाची कामे देण्याची प्रथा बंद केली. तसेच बालगुन्हेगारांसाठी वेगळा कायदा संमत करण्याची शिफारस केली. त्यानुसार १९०८ मध्ये बालअधिनियम १९०८ संमत केला. १९२५ मध्ये **सर आर्थर वालर** या समितीने सर्व सभासद राष्ट्रांतील कैद्यांसाठी समान नियम करण्याची सूचना आंतरराष्ट्रीय दंड व तुरुंग कॉंग्रेसला केली. पुढे **सर लायनल फॉक्स** या तुरुंग आयोगाचा प्रथम सचिव व नंतर अध्यक्ष असलेल्या अधिकाऱ्यांने तुरुंगातील घडामोडींची माहिती जनतेस देणे, वार्ताहार व सामजिक कार्यकर्त्यांना तुरुंगास भेट देऊ देणे अशा सुधारणा सुचविल्या. १९८२ मध्ये 'इंग्लिश जास्टिस ॲक्ट' नुसार तुरुंगातील कैद्यांची संख्या कमी करून त्याऐवजी पॅरोल पद्धती अधिक उदार करण्यात आली. आज इंग्लंडमधील तुरुंगव्यवस्थेत कैद्यांना शिक्षण देणे, त्याच्या वर्तनात प्रामुख्याने समुदायात ठेवूनच सुधारणा करणे, तुरुगांतून सुटलेल्या कैद्यांचे सुयोग्य समाजीकरण व पुनर्वसन करणे, कैद्यांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करणे इत्यादी गोष्टींवर भर दिला जातो.

**अमेरिकेतील तुरुंगव्यवस्था**: अमेरिकेतील वसाहतवादी मध्ययुगीन कालखंडात तुरुंगव्यवस्था ही अत्यंत रानटी होती. तुरुंगात कैद्यांचा छळ केला जाई. बालगुन्हेगारसही देहदंड देणे, कैद्यांना डाग देणे, चाबकाने मारणे अशा शिक्षा दिल्या जात. १८३२ साली पेन सनद (Panns Charter) जाहीर झाली व या सनदेनुसार अमेरिकन तुरुंगव्यवस्थेत पुढील सुधारणा केल्या १) कैद्यांना जामिनवर सोडणे, २) प्रशासनाच्या चुकीमुळे एखाद्यास नाहक शिक्षा झाल्यास तो मागेल त्याच्या दुप्पट नुकसान भरपाई त्यास देणे, ३) अन्न व निवारा यांची निवड करण्याची संधी कैद्यांना देणे, ४) सार्वजनिक ठिकाणी कोलदांडा घालण्याची शिक्षा रद्द करणे इत्यादी.

अमेरिकेतील तुरुंगव्यवस्थेत कैद्यांचे वर्गीकरण करून ज्यांच्यात सुधारणा होणे शक्य नाही अशा निष्ठूर व हाताळण्यास कठीण असलेल्या गुन्हेगारांना एकांतवासाच्या कोठडीत ठेवले जाई तर ज्यांच्यात सुधारणा होणे शक्य आहे अशा साधारण गुन्हेगारांना एकाच खोलीत ठेवून दिवसा

त्यांच्याकडून एखादे काम करवून घेतले जाई. पुढे तुरुंगात कैद्यांची गर्दी वाढली. त्यातून दोन प्रकारच्या तुरुंगव्यवस्था उदयास आल्या.

**अ) पेनसिल्व्हेनिया तुरुंग व्यवस्थाः** अमेरिकेतील फिलाडोल्फिया प्रांतातील वालनट स्ट्रीट तुरुंगात ही व्यवस्था उदयास आली. या व्यवस्थेत कैद्यांना दिवस-रात्र एकांतवासात स्वतंत्र कोठडीत कोंडून ठेवले जाई. म्हणून तिला विभक्त पद्धती असेही म्हणतात. अशा शिक्षेमुळे कैदी सुधारतील अशी अपेक्षा होती. मात्र एकांतवासास कंटाळून अनेक कैदी आत्महत्या करू लागले. कांही वेडे झाले तर कांही अधिकच बेजबाबदार बनले. त्यामुळे पुढे कैद्यांना कोठडीतच कांही तरी काम दिले जाऊ लागले. कैद्यांना बाहेर घेऊन जाण्याचा प्रसंग आला तर त्यांचे चेहरे झाकून टाकीत. या व्यवस्थेत कैद्यांना तुरुंग कर्मचारी, पाद्री, समाजकल्याण संघटनेचे प्रतिनिधी इत्यादीशिवाय इतरांना एवढेच नव्हे तर आप्तमित्रांनाही कैद्यांना भेटू दिले जात नसे.

**ब) ऑबर्न तुरुंग व्यवस्थाः** अमेरिकेतील न्यूयॉर्क राज्यातील ऑबर्न या ठिकाणी १९१८-१९ मध्ये एक नवीन तुरुंग व्यवस्था उदयास आली. या व्यवस्थेत कैद्यांना पूर्णपणे एकांतवासात न ठेवता त्यांना दिवसा एखादे काम देऊन इतरांबरोबर मिसळण्याची संधी दिली जाई. मात्र त्यांना आपसात बोलण्याची परवानगी नव्हती. म्हणून या पद्धतीस मौन पद्धती (Silent System) म्हणतात. इतरांसी बोलल्यास चाबकाने मारले जाई. तुरुंगातील कर्मचारीही कैद्यांशी बोलत नसत.

**एलमिरा सुधारगृहः** १८७० पर्यंत अमेरिकेत वरील दोन तुरुंगव्यवस्था होत्या. पुढे या दोन्हीच्या जागी न्यूर्यार्क शहरातच 'एलमिरा' सुधारगृह सुरू झाले. यामध्ये परीविक्षा व पॅरोल या पद्धती सुरू केल्या. पुढे तुरुंगात कैद्यांना सुधारण्यासाठी त्यांना शिक्षण देणे, त्यांच्या पुनर्वसनासाठी त्यांना विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देणे सुरू झाले.

१८ व्या शतकाच्या अखेरीस **जेरिमी बेंथम** यांनी मांडलेल्या योजनेची अंमलबजावणी करणारी व्यवस्था अमेरिकेत विसाव्या शतकात इलिनॉय या राज्यात निर्माण झाली. या योजनेनुसार तुरुंगाची इमारत वर्तुळाकार बांधून तिच्यात कैद्यासाठी स्वतंत्र व बंदिस्त खोल्या जवळजवळ बांधल्या व वर्तुळाच्या केंद्रस्थानी उंचावर पहारेकऱ्यांचे ठाणे उभारण्यात आले.

पुढे इलिऑनस येथे बंदिस्त व कोंदट खोल्यांऐवजी हवेशीर खोल्या बांधल्या. त्यामध्ये प्रकाश योजना केली. तुरुंगात स्वच्छता ठेवली जाऊ लागली. कैद्यांना वाचन-लेखन, शिक्षण, करमणूक, खेळ अशा सुविधा दिल्या जाऊ लागल्या. एकंदरीत तुरुंग ही दंडसंस्था न राहता सुधारगृह बनले असे म्हणता येते.

**आस्ट्रेलियातील तुरुंग व्यवस्थाः** आस्ट्रेलियाच्या पूर्वेस असलेल्या नॉरफॉक बेटावर १८४० च्या सुमारास आणखीन एक नवीन तुरुंग व्यवस्था उदयास आली, तिला गुण व्यवस्था असे म्हणतात. या पद्धतीत कैद्यांना न्यायालयाने ठोठावलेली संपूर्ण शिक्षा भोगावी लागत नसे. जर त्याने चांगले वर्तन केले तर त्याची ऊर्वरीत शिक्षा रद्द करून त्याला लवकर तुरुंगातून मुक्त केले जाई. त्यामुळे कैद्यांना चांगले वर्तन करण्याची प्रेरणा मिळेल अशी अपेक्षा होती. कैद्यांचे वर्तन पाहून त्यांना गुण दिले जात. चांगले वर्तन केल्यास जास्त गुण दिले जात व वाईट वर्तन केल्यास मात्र त्यांचे गुण कमी केले जात. त्यानुसार शिक्षेची मुदत कमी केली जाई किंवा तिच्यात वाढ केली जाई.

**आधुनिक भारतातील तुरुंगव्यवस्था:**

या विभागाच्या प्रारंभी तुम्ही ब्रिटिशपूर्व भारतात तुरुंग व्यवस्था कशी होती हे संक्षिप्त स्वरूपात अभ्यासलेले आहेच. आता ब्रिटिश राजवटीत भारतात आधुनिक तुरुंगव्यवस्था कशी उदयास येऊन विकसित झाली हे अभ्यासणार आहात.

इ.स. १७८७ मध्ये भारतात ब्रिटिशांनी सुमात्रा बेटावर 'बँकूलन' या ठिकणी पहिला तुरुंग स्थापन केला. ही कैद्यांची वसाहत होती. पुढे १८२३ मध्ये ही वसाहत पेनांग येथे हलविण्यात आली. अंदमान बेटावरही अशा वसाहती स्थापन केल्या. ब्रिटिश सत्तेविरूद्ध कटकारस्थाने करणाऱ्यांना येथील वसाहतीत डांबले जाई. या शिक्षेस काळया पाण्याची शिक्षा म्हटले जाई. स्वातंत्र्यवीर सावरकरांना याच तुरुंगात जन्मठेप देऊन डांबले होते. पुढे १९४५ मध्ये या वसाहती नष्ट केल्या. कैद्यांच्या या वसाहतीत कैद्यांना अमानवी वागणूक दिली जाई. काथ्या कुटणे, तेलाच्या घाण्यास जुंपणे अशा शिक्षा कैद्यांना दिल्या जात. चोरी, खून व इतर गुन्हे केलेल्या कैद्यांना तुरुंगात कठोर श्रमाची कामे (उदा. खडी फोडणे, खाणी खोदणे, रस्ते बांधणे, पूल बांधणे इ.) करावी लागत. कामात कुचराई करणाऱ्यांना कठोर शिक्षा (चाबकाने मारणे, उपाशी ठेवणे) दिल्या जात. खतरनाक कैद्यांना साखळदंडाने बांधत. हातापायात बेड्या घालत. १८३६ नंतर मात्र या परिस्थितीत सुधारणा होऊ लागली व ब्रिटिश सरकारने तुरुंगव्यवस्थेत अनेक सुधारणा करण्यास सुरूवात केली. १९०७ मध्ये युवा गुन्हेगारांसाठी स्वतंत्र बोर्स्टल स्कूल्स सुरू केली. १९४७ ला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तर तुरुंगव्यवस्थेत आमूलाग्र बदलास प्रारंभ झाला. तुरुंग ही केवळ दंडसंस्था न राहता गुन्हेगारांना सुधारणारी, त्यांचे पुनर्वसन करणारी संस्था मानली जाऊ लागली. यातूनच मुक्त तुरुंगाची कल्पना राबविली जाऊ लागली. कैद्यांच्याही मानवी हक्कांचे संरक्षण झाले पाहिजे या दृष्टिकोनातून त्यांना तुरुंगात विविध सोयीसुविधा दिल्या जात आहेत. तसेच परीविक्षा, पॅरोल, फर्लो या पद्धतींचा अवलंब केला जात आहे.

**स्वयअध्ययनासाठी प्रश्न**

योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.

१) भारतात सर्वप्रथम ..... काळापासून तुरुंगव्यवस्था अस्तित्वात असल्याचे उल्लेख आढळतात.

अ) वैदिक ब) महाकाव्य क) बौद्ध ड) मौर्य

२) ...... यांनी रोम येथे कैद्यांना मानवतावादी वागणूक देण्याचा सल्ला दिला.

अ) पोप क्लेमेंट ब) कैसर बेकॅरिया क) जेरिमी बेंथम ड) जॉन हावर्ड

३) १८६२ मध्ये...... सनदेनुसार अमेरिकन तुरुंगव्यवस्थेत सुधारणा केल्या.

अ) पेन ब) वॉशिंग्टन क) जेफरसन ड) अटलांटिक

४) ऑबर्न तुरुंग व्यवस्था ही अमेरिकेच्या ...... राज्यात उदयास आली.

अ) फिलाडोल्फिया ब) न्युयार्क क) कॅलिफोर्निया ड) अलास्का

५) १७८७ मध्ये भारतात ..... बेटावर पहिला तुरुंग स्थापन केला.

अ) सुमात्रा ब) जावा क) अंदमान ड) निकोबार

### ३.२.३ भारतातील तुरुंग सुधारणा (Prison Reforms in India)

तुरुंग व्यवस्थेचा उदय व विकास अभ्यासल्यानंतर आता तुम्ही भारतातील तुरुंग व्यवस्थेत वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांचा अभ्यास करणार आहात. या सुधारणा दोन विभागात समजावून घेता येतील. अ) ब्रिटिश राजवटीतील सुधारणा व ब) स्वातंत्र्योत्तर काळातील सुधारणा.

**अ) ब्रिटिश राजवटीत तुरुंगव्यवस्थेत केलेल्या सुधारणाः** गुन्हेगारांना बंदिवासात ठेवण्यासाठी तुरुंगाचा वापर भारतात फार पूर्वीपासून करण्यात येतो. तथापि, शिक्षा म्हणून तुरुंगाचा उपयोग १७७३ पासून होऊ लागला व १८६० मध्ये संपूर्ण भारतात एकसूत्रीपणे त्याचा अंमल सुरू झाला. ब्रिटिश शासनपद्धतीचा एक भाग म्हणून तुरुंगव्यवस्था सुरू केली. मात्र तुरुंगाचा उपयोग गुन्हेगारांना दहशत बसावी म्हणून केला जाई. त्यासाठी त्यांना कठोर श्रमाची कामे दिली जात. पुरुष, महिला, बालके अशा सर्व गुन्हेगारांना एकत्रच ठेवले जाई. तुरुंगातील वातावरण आरोग्यास घातक असे होते. अनेक गुन्हेगार तुरुंगातच मरण पावत. १८३५ मध्ये **लॉर्ड मेकॉले** यांनी तुरुंगातील या वाईट स्थितीकडे ब्रिटिश सरकारचे सर्वप्रथम लक्ष वेधले. त्यांच्या शिफारसशीनुसार तुरुंगातील स्थितीचा अभ्यास करण्यासाठी एका समिती नेमली. या समितीने पुढील शिफारसी केल्या १) एका वर्षापेक्षा अधिक शिक्षा झालेल्या गुन्हेगारांसाठी मध्यवर्ती तुरुंग उभारावेत व प्रत्येक तुरुंगात १००० पेक्षा जास्त कैदी ठेवू नयेत. २) सर्व प्रांतात तुरुंग महानिरीक्षक हा अधिकारी नेमावा. ३) सर्व कैद्यांना सामावून घेण्यासाठी प्रत्येक तुरुंगात पुरेशा इमारती उपलब्ध करून द्याव्यात. समितीच्या या शिफारसींची अंमलबजावणी अनेक प्रातांत झाली.

त्यानंतर १८६४ मध्ये दुसरी समिती नेमली. तिने प्रत्येक कैद्यासाठी पुरेसी जागा, भोजन व्यवस्था, कपडेलत्ते, वैद्यकीय सुविधा इत्यादी द्याव्यात तसेच बालगुन्हेगारांना प्रौढ गुन्हेगारांपासून अलग ठेवावे व त्यांना शिक्षण द्यावे अशीही शिफारस केली.

१८७७ मध्ये तिसरी तुरुंग समिती नियुक्त केली. तिने तुरुंगव्यवस्था, हिशेब ठेवण्याची पद्धती व वस्तूंचा पुरवठा इत्यादीबाबतचे नियम तयार केले.

१८८९ मध्ये चौथी तुरुंग समिती नेमली. तिने पुढील शिफारसी केल्या. १) तुरुंग प्रशासनाचे नियम तयार करावेत. २) न्यायालयीन चौकशी सुरू असलेले गुन्हेगार व शिक्षा झालेले गुन्हेगार यांना अलग ठेवावे. ३) तसेच नैमत्तिक कैदी व नेहमीचे गुन्हेगार यांनाही वेगळे ठेवावे. ४) तुरुंगात दवाखाना उभारावा इत्यादी शिफारसी केली.

**तुरुंग अधिनियम १८९४** – १८९२ मध्ये अखिल भारतीय तुरुंग परिषद भरविण्यात आली. या परिषदेच्या प्रयत्नातूनच १८९४ मध्ये तुरुंग अधिनियम संमत झाला. या अधिनियमात पुढील तरतूदी केल्या.

१) प्रत्येक राज्यात एक तुरुंग महानिरीक्षक असावा. प्रत्येक तुरुंगात एक प्रमुख अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी व गरजेनुसार इतर कर्मचारी नेमावेत.

२) स्त्री गुन्हेगार व पुरुष गुन्हेगार यांना वेगवेगळे ठेवावे. प्रौढ गुन्हेगार व बालगुन्हेगार यांनाही वेगवेगळे ठेवावे.

३) शिक्षा झालेल्या कैद्यांना एकाच खोलीत किंवा स्वतंत्र ठेवावे. अधिकाऱ्यांशी कैद्याला कोणत्याही वेळी संपर्क साधता येईल अशाच खोल्यांचा वापर कैद्यासांठी करावा. वैद्यकीय अधिकाऱ्याने दिवसातून एकदातरी कैद्यांशी संपर्क साधावा.

४) कैद्यांना फटके मारणे, एकांतवासात ठेवणे, उपाशी ठेवणे इत्यादी शिक्षा नियंत्रित केल्या. तसेच त्यांना दिवसातून ९ तासापेक्षा अधिक काम देऊ नये. कामावर कैद्यांची वेळोवेळी वैद्यकीय तपासणी करावी. १५ दिवसातून त्यांचे वजन तपासावे. वैद्यकीय अधिकाऱ्याच्या मतानुसार कैदी जर श्रम करण्यास पात्र नसेल तर त्यांच्या मतानुसार योग्य ते काम कैद्यास द्यावे.

५) आजारी कैद्यांची ताबडतोब खबर द्यावी. शिस्त व उपचार याबाबत वैद्यकीय अधिकाऱ्याने केलेल्या सुचनांचे पालन व्हावे.

६) तुरुंगातील कैद्यांची कांही कृत्ये उदा. नियमभंग करणे, हल्ला करणे, धमकी देणे, असभ्य वर्तन करणे, काम न करणे, हातातील व पायातील बेड्या कापणे, तुरुंगाच्या संपत्तीचे नुकसान करणे इ. गुन्हा ठरवून त्याबद्दल त्यांना तुरुंग अधिक्षक कायद्यानुसार शिक्षा देऊ शकेल.

**भारत तुरुंग समिती १९१९–२०: अलेक्झांडर काड्र्यू** यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या या समितीने भारत, हाँगकाँग, सिंगापूर, ब्रह्मदेश (म्यानमार), फिलिपाईन्स इत्यादी देशांतील तुरुंगाचे सर्वेक्षण करून सरकारला पुढील शिफारशी केल्या.

१) एक वर्षापेक्षा कमी शिक्षा झालेल्या कैद्यांना तुरुंगात सौम्य व दर्याद्र स्वरूपाची वागणूक द्यावी.

२) तुरुंगात कैद्यांचे योग्यप्रकारे वर्गीकरण करावे.

३) कैद्यांना एकमेकांत मिसळण्याची संधी द्यावी. मात्र वेगळया प्रकारचे गुन्हे करणाऱ्यांना एकत्र ठेवू नये.

४) तुरुंगात कैद्यांना अशा व्यक्तींच्या प्रभावाखाली आणावे की, ज्यामुळे ते गुन्हे करण्यापासून परावृत्त होतील व त्यांच्या वर्तनात सुधारणा होईल.

एकंदरीत या समितीचा दृष्टिकोन सुधारणावादी होता. परंतू, तिच्या शिफारशीकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. त्यामुळे १९४६ मध्ये पुन्हाः एक तुरुंग सुधारणा समिती नेमली. या समितीने पुढील शिफारशी केल्या.

१) बालगुन्हेगारांना प्रौढ गुन्हेगारांपेक्षा वेगळी वागणूक द्यावी.

२) गुन्हेगारांना सुधारण्यासाठी आदर्श तुरुंग स्थापन करावेत.

३) गुन्हेगारांचे वैज्ञानिक निकषांच्या आधारे वर्गीकरण करावे.

अशाप्रकारे ब्रिटिश राजवटीत तुरुंगव्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी वेळोवेळी वेगवेगळ्या समित्या नेमण्यात आल्या व त्यांच्या कांही शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आली. त्यामुळे तुरुंग व्यवस्थेत कांही महत्त्वपूर्ण बदल घडले. तुरुंग ही केवळ बंदीशाळा किंवा दंडसंस्था न राहता ती सुधारसंस्था मानली जाऊ लागली.

**ब) स्वातंत्र्योत्तर काळातील तुरुंगव्यवस्थेत केलेल्या सुधारणा**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तुरुंगव्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी कांही अभिनव उपक्रम सुरू करण्यात आले.

**१) आदर्श तुरुंग** (Model Prision) - १९४९ मध्ये लखनौच्या (उत्तर प्रदेश) मध्यवर्ती तुरुंगाचे आदर्श तुरुंगात रुपांतर केले. कैद्यांना स्वावलंबी बनविणे हा मुख्य उद्देश होता. प्रत्येक कैद्याचा वैयक्तिक अभ्यास करून त्याच्या अंगच्या कलागुणांचा विकास करण्यासाठी त्याला ६ महिन्याच्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रशिक्षणाला पाठविले जाते. जर त्याच्यामध्ये उद्योजकता, प्रामाणिकपणा असे गुण आढळल्यास त्यास आदर्श तुरुंगात पाठवितात. तेथे त्याला कुटिरोद्योग, शेतीकाम, बागकाम इत्यादी कामे दिली जातात व त्याचा मोबदलाही देतात. कैद्यावर विश्वास टाकून त्याला तुरुंगाबाहेर देखरेखीशिवाय काम करण्याची परवानगी दिली जाते. चांगले वर्तन असणाऱ्या कैद्यांना पर्यटनाचीही संधी दिली जाते. तुरुंगात गीत, संगीत, चित्रपट, खेळ, सणसमारंभ याबाबतचे उपक्रम राबविले जातात. यामुळे कैद्यांचे शिक्षेनंतर समाजात सुयोग्य समायोजन व पुनर्वसन होण्यास मदत होते.

**२) मुक्त तुरुंग शिबीर** (Open Prision Camp) १९५२ मध्ये उत्तर प्रदेशाचे तत्कालीन गृहमंत्री डॉ. संपूर्णानंद यांनी गुन्हेगारावर उपचार करण्याच्या संदर्भात मुक्त तुरुंग शिबीराची किंवा वसाहतीची कल्पना मांडली. आणि चंद्रभागा धरण प्रकल्पावर असे शिबीर सुरू करून ते २००० कैद्यांना कामावर पाठविले. राज्यातील सर्व तुरुंगातील कैदी निवडून त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे या धरण प्रकल्पावर काम दिले. त्यांच्यासाठी खुल्या जागेवर तंबू उभारले. त्यांच्यावर पहारेकरी नेमले नाहीत. तुरुंगरक्षक केवळ मार्गदर्शन करीत. कैद्यांना चांगले भोजन, दवाखाना, मनोरंजन अशा सुविधा दिल्या. तुरुंगाचे कर्मचारीही कैद्याबरोबरच राहत. काम केल्याबद्दल कैद्यांना योग्य मजूरी दिली जाई. तसेच चांगले वर्तन असल्यास शिक्षेतून सुटही दिली जाई. अशा हा मुक्त तुरुंगाचा प्रयोग यशस्वी झाला. त्यामुळे कैद्यांना बंदीस्त इमारतीत डांबून त्यांच्याकडून केवळ अनुत्पादक कठोर काम करवून घेणे हा दृष्टिकोन मागे पडला. यातून प्रेरणा घेऊन १९५६ मध्ये मिरजापूर जिल्ह्यातील शासकीय सिमेंट कारखान्यावर व १९६० साली नैनिताल जिल्ह्यात सितरगंजला येथे मुक्त तुरुंग शिबीरे सुरू केली. महाराष्ट्रात पैठण (जि. औरंगाबाद) येथे इ.स. १९६८ मध्ये मुक्त तुरुंग उभारून तेथील कैद्यांना जायकवाडी धरणावर काम देण्यात आले.

**३) रेकलेस अहवाल :** गुन्हेगारांचे पुनर्वसन करणे, त्यांच्यात सुधारणा करणे इत्यादीबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी अमेरिकेतील प्रसिद्ध गुन्हेगारीविषयक तज्ज्ञ डॉ. वाल्टर सी. रेकलेस यांचा १९५४ मध्ये भारत सरकारने आमंत्रित केले. त्यांनी भारतातील तुरुंग व्यवस्थेचा अभ्यास करून एक अहवाल सादर केला. हा अहवाल ''भारतातील तुरुंग प्रशासनावरील संयुक्त राष्ट्रांचा अहवाल'' म्हणून प्रसिद्ध आहे. या अहवालात पुढील शिफारशी केल्या होत्या. १) देशातील सर्व तुरुंगांना समान

स्तरावर आणणे, २) कैद्यांच्या वर्तनात सुधारणा करण्यासाठी समाजसेवक व मानसशास्त्रज्ञांची मदत घेणे, ३) तुरुंगात कैद्यांना नैतिक, धार्मिक, सांस्कृतिक, व्यावसायिक शिक्षण देणे, ४) तुरुंगात तळमळीचे प्रशिक्षण अधिकारी नेमणे. ५) सर्व कैद्यांना कठोर श्रमाची कामे न देता त्यांच्या स्थितीनुसार वेगवेगळी कामे देणे. ६) तुरुंगात कैदी कल्याण अधिकारी नेमणे, ७) कैद्यांच्या लैंगिक गरजांच्या तृप्तीची व्यवस्था करणे. इत्यादी.

**४) अखिल भारतीय तरुंग समिती :** १९५७ मध्ये भारतातील तुरुंग महानिरीक्षकांची एक समिती नेमण्यात आली. या समितीने गुन्हे प्रतिबंध, गुन्ह्यांचे निवारण, पश्चात संगोपन सेवा, गुन्हेगारांचे प्रशिक्षण व कल्याण इत्यादीबाबत कांही शिफारशी केल्या. त्यापैकी कांही शिफारसी भारत सरकारने स्वीकारल्या व त्यांची अंमलबजावणी केली. तसेच या समितीने आदर्श तरुंग नियम पुस्तिका तयार केली. ही पुस्तिका १९६० मध्ये मंजूर केली. या पुस्तिकेच्या आधारेच कैद्यांच्या वर्तनाबाबतचे नियम तयार केले आहेत.

**५) गुन्हेगाराची परीविक्षा अधिनियम–१९५८ :** गुन्हेगारांमध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने गुन्हेगाराची परीविक्षा अधिनियम हा कायदा १९५८ मध्ये संमत केला. या कायद्यानुसार गुन्हेगारास सक्त ताकीद देऊन व चांगल्या वर्तनाचे हमीपत्र घेऊन परीविक्षेवर सोडता येते. मात्र देहांत शासन झालेली खुनी व्यक्ती, राष्ट्रद्रोही, दरोडेखोर, व्यावसायिक गुन्हेगार यांना परीविक्षेवर सोडता येत नाही. परीविक्षा काळात गुन्हेगाराच्या वर्तनावर परीविक्षा अधिकाऱ्याची देखरेख असते. परीविक्षेच्या तरतुदीमुळे गुन्हेगारास वर्तन सुधारण्याची संधी मिळते, त्याला गुन्हेगार हा कलंक लागत नाही. तसेच तुरुंगातील गर्दी टाळता येते.

**६) मुल्ला समिती –** १९८० मध्ये भारत सरकारने न्यायमूर्ती ए. एन. मुल्ला यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय तुरुंग समिती नेमली. या समितीने पुढील शिफारसी केल्या. १) तुरुंगात कैद्यांना पर्याप्त अन्न, कपडे, आरोग्य सुविधा पुरवाव्यात. २) तुरुंग कर्मचाऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण द्यावे. ३) तुरुंग सेवेचा अंतर्गत भाग म्हणून तुरुंगातून सुटलेल्या कैद्यांची काळजी घेणे, त्यांचे पुनर्वसन करणे याबाबतच्या सेवा सुरू कराव्यात. ४) प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी व सामान्य जनता यांना तुरुंगात भेट देण्याची परवानगी द्यावी, ज्यामुळे जनतेची तुरुंगाविषयीची भीती व गैरसमज दूर होण्यास मदत होईल व कैद्यांचे पुनर्वसन करणेही सुलभ होईल. ५) ज्यांच्यावर अद्याप खटला चालू आहे अशा कैद्यांचे (undertrials) तुरुंगातील वास्तव्य कमीत कमी असावे व त्यांना शिक्षा झालेल्या कैद्यांपासून वेगळे ठेवावे. ६) शासनाने तुरुंग सुधार कार्यक्रमासाठी पुरेसा पैसा व साधनसामग्री उपलब्ध करून द्यावी. इत्यादी.

**७) अय्यर समिती :** महिला कैद्यांचा विचार करण्यासाठी भारत सरकारने न्यायमूर्ती व्ही. आर. कृष्णा अय्यर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने १९८८ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला. या अहवालात पुढील शिफारशी केल्या. १) स्त्री गुन्हेगार व बालगुन्हेगार यांना हाताळण्यासाठी पोलिस दलात विविध पदावर महिलांना नियुक्त करण्यास प्राधान्य द्यावे. २) समितीने असे नमूद केले की पुरुष पोलिसापेक्षा महिला पोलिसांमध्ये अधिक स्थिरवृत्ती, निःपक्षपातीपणा व सक्ती न करता एखादे काम करवून घेण्याची क्षमता अधिक असते. म्हणून महिला भरतीस प्राधान्य द्यावे. ३) महिला पोलिस यंत्रणेचा महत्त्वाचा घटक बनवावा व बालगुन्हेगारांवर देखरेख ठेवण्याचे

काम त्यांच्याकडे द्यावे. ४) महिला या दयाळू व हळव्या असल्याने त्या आंदोलन करणाऱ्या व्यक्ती तसेच भावनिक उद्रेक होणाऱ्या व्यक्ती यांना अधिक चांगल्याप्रकारे हाताळू शकतात. म्हणून त्यांना याबाबतचे प्रशिक्षण द्यावे. इत्यादी

★ **स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक–३**

**योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१) १८३५ मध्ये .................. यांनी तुरुंगातील वाईट स्थितीकडे ब्रिटिश सरकारचे लक्ष वेधले.

अ) लॉर्ड बेंटिंग ब) लॉर्ड मेकॉले क) लॉर्ड कर्झन ड) लॉर्ड वेलस्ली

२) ब्रिटिश राजवटीत तुरुंग अधिनियम ................ साली संमत केला?

अ) १८९० ब) १८९२ क) १८९४ ड) १८९६

३) १९१९–२० मध्ये .................... यांच्या अध्यक्षतेखाली भारत तुरुंग समिती नेमली.

अ) अलेक्झांडर कार्ड्यू ब) अलेक्झांडर फ्लेमिंग

क) लॉर्ड मॅकाले ड) डॉ. संपूर्णानंद

४) १९४९ मध्ये ................... येथील मध्यवर्ती तुरुंगाचे आदर्श तुरुंगात रुपांतर केले.

अ) अलाहाबाद ब) मिरजापूर क) पैठण ड) लखनौ

५) १९५२ मध्ये ..................... यांनी मुक्त तुरुंगाची कल्पना मांडली.

अ) महात्मा गांधी ब) पंडीत नेहरू क) डॉ. संपूर्णानंद ड) विनोबा भावे

## ३.३ सारांश

या घटकात तुम्ही भारतातील तुरुंग व्यवस्था अभ्यासलेली आहे. सर्वप्रथम तुम्ही तुरुंगाचा अर्थ, वैशिष्ट्ये व भूमिका समजावून घेतलेली आहे. तुरुंग ही कैद्याच्या तात्पुरत्या किंवा कायमच्या बंदिवासासाठी राज्याने निश्चित केलेली जागा असते. तुरुंगाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत. १) तुरुंग ही एक दंडसंस्था आहे. २) तुरुंगात प्रौढ गुन्हेगारांना स्थानबद्ध केले जाते. ४) गुन्हेगाराबरोबरच तुरुंगात आरोपींनाही ठेवले जाते. ४) तुरुंग ही राज्याद्वारे चालविली जाणारी संस्था आहे. ५) आधुनिक दृष्टिकोनानुसार तुरुंग ही गुन्हेगारांनी सुधारणारी संस्था मानली जाते. यानंतर तुम्ही तुरुंगाची भूमिका समजावून घेतलेली आहे. तुरुंगाच्या भूमिकेत तुरुंगाच्या कार्यांचा समावेश होतो. तुरुंगाची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत. १) न्यायालयाने दिलेल्या शिक्षेची अंमलबजावणी तुरुंग करते. २) तुरुंग गुन्हेगारांचे समाजापासून अलगीकरण करते. ३) तुरुंग गुन्हेगारांपासून समाजाचे संरक्षण करते. ४) तुरुंग गुन्हेगारांना सुधारण्याचेही कार्य करते. यानंतर तुम्ही तुरुंगाचा उदय व विकास समजावून घेतलेला आहे. भारतात प्राचीनकाळापासून तुरुंग व्यवस्था आढळते. तथापि, आधुनिक तुरुंगव्यवस्थेचा पाया भारतात ब्रिटिश राजवटीत घातला गेला. इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशांतील तुरुंगव्यवस्थेचा प्रभाव भारतातील तुरुंगव्यवस्थेवर पडलेला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर

भारतातील तुरुंगव्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आलेले आहेत. कैद्यांना सुधारण्यासाठी परीविक्षा, अभिवचन व फर्लो या पद्धतींचा अवलंब केला जात आहे. तसेच अनेक ठिकाणी मुक्त तुरुंग उभारले आहेत. सर्वात शेवटी तुम्ही भारतातील तुरुंग सुधारणा अभ्यासलेल्या आहेत. ब्रिटिश राजवटीत तुरुंग सुधारणांसाठी नेमलेल्या विविध समितींच्या शिफारसींचा व तुरुंग अधिनियम १८९४ मधील तरतुदींचा अभ्यास केलेला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तुरुंग सुधारणांतर्गत केलेल्या तरतुदी उदा. आदर्श तुरुंग, मुक्त तुरुंग यांचाही अभ्यास केलेला आहे.

## ३.४ स्मरणार्थ संज्ञा

- **तुरुंग :** न्यायालयाद्वारे शिक्षा झालेल्या गुन्हेगारांना स्थानबद्ध करावयाचे ठिकाण किंवा संस्था.
- **गुन्हेगार :** कायदेभंगाचा आरोप शाबीत झालेली व्यक्ती.
- **सुधारसंस्था :** व्यक्तीच्या वर्तनात सुधारणा घडवून आणणारी संस्था.
- **पुनर्समायोजन :** शिक्षा भोगून झाल्यानंतर गुन्हेगारास समाजात पुन्हा सामावून घेणे.
- **बोर्स्टल स्कूल्स :** युवा गुन्हेगारांना सुधारण्यासाठीच्या शाळा.
- **मानवी हक्क :** मानव म्हणून निसर्गतःच व्यक्तीस प्राप्त होणारे हक्क/अधिकार.
- **परीविक्षा :** चांगले वागण्याच्या अटीवर गुन्हेगाराची शिक्षा तात्पुरती स्थगित करून त्याला समुदायात मोकळे सोडणे.
- **अभिवचन (पॅरोल) :** तुरुंगवासाची शिक्षा कांही काळ भोगून झाल्यानंतर कैद्यास चांगल्या वर्तनाच्या हमीवर कांहीकाळ मुक्त करण्याची पद्धती.
- **फर्लो :** ज्यांच्यापासून समाजाला धोका नाही अशा कैद्यांना अल्पकाळासाठी तुरुंगातून मुक्त करण्याची पद्धती.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे.

★ **स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक १ ची उत्तरे**

१) ब   २) क   ३) ड   ४) अ   ५) क

★ **स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक २ ची उत्तरे**

१) ब   २) अ   ३) अ   ४) ब   ५) अ

★ **स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक ३ ची उत्तरे**

१) ब   २) क   ३) अ   ४) ड   ५) क

## ३.६ स्वाध्याय

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या.**

१) तुरुंगाचा अर्थ सांगून त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) तुरुंगाचा उदय आणि विकास स्पष्ट करा.

३) भारतातील तुरुंग सुधारणांची चर्चा करा.

**ब) टीपा लिहा.**

१) तुरुंगाचा अर्थ

२) तुरुंगाची भूमिका

३) ब्रिटिशपूर्व भारतातील तुरुंग व्यवस्था

४) स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील तुरुंग सुधारणा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


- Ahuja Ram (1981) – The Prision System Sahitya Bhavan- Agra.
- Sutherland & Cressey (1965) Principles of Criminology, The Time of India Press, New Delhi.
- Paranjape N. V. Criminology and Penology, Central Law Agency, Allahabad, 1980.
- माने माणिक - गुन्हेगारीशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
- कुलकर्णी पी. के. (२०१३) गुन्हेगारीचे समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर.
- संगवे विलास (संपादित), भारतातील सामाजिक समस्या.


❑❑❑

## घटक ४

# पोलीस आणि न्यायव्यवस्था

## (Police and Judiciary)

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ पोलीस व्यवस्थेचा इतिहास

४.२.२ गुन्हे नियंत्रणात पोलिसाची भूमिका

४.२.३ भारतातील न्यायव्यवस्था

४.३ सारांश

४.४ स्मरणार्थ संज्ञा

४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

### ४.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास–

- पोलीस व्यवस्थेच्या इतिहासाचे आकलन होईल.
- गुन्हे नियंत्रणात पोलिसाची भूमिका स्पष्ट करता येईल.
- भारतातील न्यायव्यवस्थेचे स्वरूप विशद करता येईल.

### ४.१ प्रास्ताविक

या शेवटच्या चौथ्या घटकात तुम्ही भारतातील पोलीस व न्यायव्यवस्थेचा अभ्यास करणार आहात. गुन्हेगारीस प्रतिबंध करण्यामध्ये व गुन्हेगारी नियंत्रित करण्यामध्ये पोलीस व्यवस्थेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. तसेच गुन्हा केलेल्या व्यक्तींवर कायदेभंगाचा म्हणजेच गुन्ह्याचा आरोप ठेवून त्यांना न्यायालयासमोर उभे करणे, त्यांच्यावर खटला दाखल करणे या कार्यातही पोलिसांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे दंडशास्त्रात पोलिसाच्या भूमिकेचा विचार करणे भाग पडते. पोलीस व्यवस्थेप्रमाणेच न्यायव्यवस्थेचाही अभ्यास दंडशास्त्रास करावा लागतो. व्यक्तीवर ठेवलेला कायदेभंगाचा आरोप न्यायालयात सिद्ध व्हावा लागतो. असा आरोप सिद्ध झालेल्या व्यक्तींना गुन्हेगार

ठरवून त्यांना कायद्यानुसार शिक्षा देण्याचे कार्य न्यायालय करीत असते. एकंदरीत गुन्हे प्रतिबंध व गुन्हे नियंत्रण यामध्ये पोलीस व न्याय या दोन्ही व्यवस्था अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावित असतात. त्यामुळे या दोन्ही व्यवस्थांचा अभ्यास दंडशास्त्रात केला जातो. या घटकात तुम्ही या दोन्ही व्यवस्थांचा अभ्यास भारतीय संदर्भात करणार आहात.

## ४.२ विषय विवेचन

विवेचनाच्या दृष्टीने या घटकाचे तीन विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात भारतातील पोलीस व्यवस्थेचा इतिहास संक्षिप्त स्वरूपात स्पष्ट केलेला आहे. दुसऱ्या विभागात गुन्हे नियंत्रणात असलेली पोलिसांची भूमिका विशद केलेली आहे. तर तिसऱ्या विभागात भारतातील न्यायव्यवस्थेची चर्चा केलेली आहे.

### **४.२.१ भारतातील पोलीस व्यवस्थेचा इतिहास** (History of Police System in India)

या घटकात सर्वप्रथम तुम्ही भारतातील पोलीस व्यवस्थेचा इतिहास समजावून घेणार आहात. हा इतिहास तुम्हाला प्राचीन कालखंड, मध्ययुगीन कालखंड ब्रिटिश कालखंड व स्वातंत्र्योत्तर कालखंड असे ४ कालखंड पाडून समजावून घेता येईल. पोलीस हा शब्द ग्रीक भाषेतील Polis या शब्दापासून बनलेला असून त्याचा अर्थ नगर किंवा नगरराज्य व राजकीय परिस्थिती किंवा राज्यघटना असा आहे. पोलीस हा शब्द मुलकी राज्यव्यवस्था या अर्थाने प्रथम फ्रेंच भाषेत वापरला जाऊ लागला. समाजात शांतता व सुव्यवस्था राखणे, लोकांच्या जीवितवित्तांचे रक्षण करणे, गुन्ह्यास प्रतिबंध करणे, गुन्हेगारांना शोधून पुराव्यासह न्यायालयासमोर उभे करणे इत्यादी कार्ये करणाऱ्या यंत्रणेसाठी किंवा व्यवस्थेसाठी आज पोलीस ही संज्ञा वापरली जाते. पोलीस ही सामान्य संज्ञा असून तिच्यात विविध हुद्दे असलेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश होतो. पाश्चात्त्य समाजात दिर्घकाळ उपरोक्त कार्ये पार पाडण्यासाठी असलेली आजच्यासारखी पोलीस यंत्रणा नव्हती. फ्रान्स व इंग्लंडमध्ये तर असा यंत्रणेस दिर्घकाळ लोकांचा विरोध होता. भारतात मात्र पोलीस यंत्रणा प्राचीन काळापासून अस्तित्वात असून तिच्या स्वरूपात कालानुरूप बदल होत आलेले आहेत. भारतातील पोलीस व्यवस्थेचे स्वरूप आपणास ४ कालखंड पाडून अभ्यासता येईल.

**अ) प्राचीन भारतातील पोलीस व्यवस्था**

प्राचीन भारतात मुख्यतः राजेशाही होती. जनतेच्या जीवित वित्ताचे रक्षण करणे व समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे हे राजाचे कर्तव्य मानले जाई व त्यासाठी राजेलोक आपल्या राज्यात मंत्र्याच्या दर्जाचा एक पोलीस अधिकारी नेमत. त्यास दंडिक, दंडपाशिक, चौरोद्धारणिक इत्यादी नावे असत. उदा. बंगालच्या पाल राजांचे दंडशक्ती नावाचे स्वतंत्र पोलीस खाते होते. प्रत्येक नगरात 'नागरीक व नगराध्यक्ष' हा अधिकारी नेमून त्याच्या हाताखाली १०, २० व ४० कुटुंबामागे एक 'गोप' नावाचा अधिकारी नेमला जाई. गोपांच्या वर्चस्वाखाली प्रकट रक्षकांचे व गुप्तहेरांचेही दल नेमलेले असे. ग्रामीण भागात प्रत्येक प्रांतात स्थानिक अधिकारी असून ते ठराविक गावांमागे एक एक गोप नेमत. प्रत्येक खेड्यासाठी 'ग्रामीण' वा ग्रामाधिपती वा ग्रामपती, ग्रामकूट, ग्रामिक या नावाचा ग्रामप्रमुख असे. शहरातील नागरीक व खेड्यातील ग्रामीणी हे राजाचे प्रतिनिधी म्हणून इतर कामाबरोबरच शांतता व सुव्यवस्था राखण्याचेही काम करीत असत. चोरांना पकडण्याचे काम ते

करीत. चोर पकडण्यात अपयश आल्यास त्यांना शासन होई. म्हणून ते दिवस-रात्र गस्त घालण्याचे काम करीत असत. गुन्हा घडणार नाही याची काळजी घेत. गोप, नागरीक, ग्रामीणी हे अधिकारी चोरट्या वाहतुकीस आळा घालणे, परक्या लोकांवर नजर ठेवणे,भांडणतंटा सोडविणे, चोरांना पकडणे अशी कामे करीत असत. राजा व त्याच्या या अधिकाऱ्यांना शांतता व सुव्यवस्था राखण्यात प्रजेने मदत करावी हे प्रजेचे कर्तव्य मानले जाई.

**ब) मध्ययुगीन भारतातील पोलीस व्यवस्था :**

मध्ययुगीन भारतात प्रथम सुलतानशाही व त्यानंतर मोगलशाही होती. या काळात पारंपरिक पोलीस यंत्रणेत बदल झाले. खेड्यातील गोपसंस्था (पोलीसदल) रद्द करून तिची पोलीस कार्ये ही जमीनदार वर्गाकडे सोपविली. खेड्यातील ग्रामीणी हे पद मात्र कायम ठेवून त्यांना वंशपरंपरागत वतने देण्यात आली. जमीनदारानीही स्वतःची दले (पथक) उभी केली व त्याद्वारे व न्यायदान व पोलीस यंत्रणेवर देखरेख ठेवू लागले. पुढे फौजदारी पद्धत सुरू केली. प्रत्येक प्रांताचे सुभे (उपविभाग) पाडून प्रत्येक सुभ्यासाठी फौजदार नावाचा अधिकारी नेमला. फौजदाराच्या हाताखाली ५०० ते १५०० रक्षकांचे दल नेमले गेले. हे दल रस्त्यावर पहारा देणे, वाहतूक व्यवस्था पाहाणे, महसूल अधिकाऱ्यांना कर वसूलीसाठी मदत करणे, बंडाळी झाल्यास ती मोडून काढणे इत्यादी कामे पार पाडू लागले. शहरात नागरीक या अधिकाऱ्याच्या जागी ‘कोतवाल’ हा अधिकारी नेमला जाऊ लागला. कोतवालाकडे शहरात गस्त घालणे, संचारबंदी लागू करणे, धर्मशाळेची सोय पाहाणे, वस्तूंच्या किंमती नियंत्रणात ठेवणे, खाटीक, भंगी, ढोर यांच्यासाठी वेगळ्या वसाहती उभारणे अशी कामे सोपविली. विजयनगरचे साम्राज्य व महाराष्ट्रात अशीच पोलीस यंत्रणा उदयास आली. महाराष्ट्रात करवसुली व शांतता व सुव्यवस्था ठेवण्याचे काम वतनदार पाटलाकडे देण्यात आले. त्याच्या कामावर देखरेख ठेवण्याचे काम तालुक्याच्या मामलेदार या अधिकाऱ्याकडे देण्यात आले. साधारणपणे भारतात ब्रिटिश राजवट सुरू होईतोपर्यंत वरीलप्रमाणे पोलीस व्यवस्था कार्यरत होती.

**क) ब्रिटिश राजवटीतील पोलीस व्यवस्था :**

ब्रिटिश राजवटीत भारतातील पोलीस व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडून आले. ब्रिटिश राजवटीच्या कालखंडाचे दोन भाग पडतात. १) ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्तेचा कालखंड २) इंग्लंडच्या राणीच्या सत्तेचा कालखंड. या दोन्ही कालखंडात भारतातील पोलीस व्यवस्थेचे स्वरूप कसे बदलत गेले हे आता तुम्ही अभ्यासणार आहात.

**१) ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्तेचा कालखंड**

व्यापाराच्या निमित्ताने भारतात आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीने हळूहळू भारताच्या विविध भागात आपली राजकीय सत्ता प्रस्थापित केली. आपल्या सत्तेखाली येणाऱ्या प्रदेशाचा कारभार पाहण्यासाठी आवश्यक असणारी शासकीय-प्रशासकीय व्यवस्था कंपनीने उभी केली. ही व्यवस्था निर्माण करताना कंपनी सरकारने अनेक आधुनिक यंत्रणांचा पाया भारतात घातला. पोलीस यंत्रणा ही त्यापैकी एक महत्त्वाची यंत्रणा आहे. भारतातील आजच्या पोलीस व्यवस्थेचा पाया कंपनी सरकारच्या काळात घातला गेला. कंपनी सरकारने पोलीस व्यवस्था उभारताना प्रारंभी वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळे प्रयोग

केले. इ.स. १६६८ ते १८६१ या काळात कंपनी सरकारने पोलीस व्यवस्थेबाबत केलेले प्रयोग पुढीलप्रमाणे होते.

**मुंबई बेट :** इ.स. १६६८ मध्ये कंपनीने मुंबई बेटावर कब्जा मिळविला. या बेटावर रात्री गस्त घालण्यासाठी एक दल (पथक) उभारले. या दलामध्ये प्रत्येक कुटुंबातील एक सदस्य असावा असे बंधन घातले. तथापि, या दलास अपेक्षित यश आले नाही. म्हणून पुढे १७७१ मध्ये ४८ अधिकारी व त्यांच्या हाताखाली ४०० पोलीस असलेले एक नवीन दल उभारले. या सर्वांना वेतन देणे सुरू केले. १७९० मध्ये या दलावर देखरेख ठेवण्यासाठी कलकत्ता शहरातल्याप्रमाणे एक अधीक्षक नेमला. तथापि, अकार्यक्षमता, भ्रष्टाचार इत्यादी कारणास्तव त्याला बडतर्फ करण्यात आले. आणि १७९३ मध्ये पोलीस दलाची पुनर्रचना केली. संपूर्ण बेटांवर १४ पोलीस चौक्या उभारल्या. त्यावर २८ युरोपियन अधिकारी व १३० सैनिक नियुक्त केले. आणि ही सर्व यंत्रणा एका नवीन अधीक्षकाकडे सोपविली. रस्ते व बाजार यावर दखरेख ठेवण्याचे काम हे दल करू लागले. या दलावर देखरेख/नियंत्रण ठेवण्याचे काम 'जस्टिस ऑफ द पिस' या अधिकाऱ्याकडे दिले.

**बंगाल, बिहार आणि ओरिसा :** हे तीन प्रांत कंपनीच्या ताब्यात आल्यानंतर कंपनीने तेथील पूर्वीची फौजदारी व्यवस्था बरखास्त केली. जमीनदारांच्या पोलीस दलावर देखरेख ठेवण्याचे काम जिल्हा न्यायाधीशाकडे सोपविले. तथापि, गुन्ह्यांचे प्रमाण वाढले. म्हणून पुन्हा फौजदारी पद्धती सुरू केली. परंतु फौजदारी व्यवस्था व जमीनदारांचे दल यांच्यात संघर्ष उद्‌भवला. त्यामुळे लॉर्ड कॉर्नवालीसने जमीनदाराकडून पोलीस व्यवस्थेचे काम काढून घेतले. आणि प्रत्येक २० चौ. मैलास एक पोलीस ठाणे उभे केले. या ठाण्यावर एक दरोगा व त्याच्या हाताखाली २० ते २५ सैनिक असे नवीन दल उभारले. हा दरोगा आपल्या ठाण्याच्या हद्दीतील खेड्यावर देखरेख ठेवू लागला. जिल्ह्यातील दरोगांच्या पोलीस कार्यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी जिल्ह्याच्या न्यायाधीशाकडे सोपविली. तथापि, हा प्रयोग फारसा यशस्वी झाला नाही. म्हणून १८१३ मध्ये कंपनी सरकारने एक समिती नेमली आणि या समितीच्या शिफारशीनुसार पोलीस कार्यांची जबाबदारी जिल्हा न्यायाधीशाकडून काढून घेतली व ती जिल्हाधिकाऱ्याकडे म्हणजेच कलेक्टरकडे सोपविली. जमीन महसूल गोळा करण्याबरोबरच कलेक्टर, मामलेदार व त्यांच्या हाताखालील कर्मचारी पोलीस कामेही पाहू लागले. मुंबई व मद्रास प्रांतात ही व्यवस्था लागू केली. १८२९ मध्ये बंगाल प्रांतात राजस्व आयुक्त हा अधिकारी नेमला व तो जिल्ह्याचा पोलीस निरीक्षक म्हणूनही काम पाहू लागला.

**सिंध प्रांत :** १८४३ मध्ये कंपनीने सिंध प्रांत जिंकला. तेथे निमलष्करी धर्तीचे नवे पोलीस दल उभारले. प्रत्येक जिल्ह्यासाठी १ वरीष्ठ अधिकारी नेमला व जिल्ह्यात कांही पोलीस ठाणी निर्माण करून त्यावर एक अधिकारी व कांही रक्षक नेमले. आणि त्यांच्याकडे केवळ पोलीस कामे सोपविली. हा प्रयोग चांगलाच यशस्वी झाला. त्यामुळे तो मुंबई, मद्रास, बंगाल या प्रांतातही सुरू केला. महसूल अधिकाऱ्याकडून पोलीस कामे काढून घेतली.

**२) इंग्लंडच्या राणीच्या सत्तेचा कालखंड :**

कंपनी सरकारविरोधात भारतीयांनी १८५७ मध्ये मोठा उठाव केला. हा उठाव इंग्रजांनी मोडून काढला. मात्र त्यानंतर इंग्लंडच्या राणीने कंपनी सरकार बरखास्त केले व भारताचा कारभार आपल्या हाती घेतला. १८६० मध्ये ब्रिटिश संसदेने संपूर्ण भारतासाठी एक स्वतंत्र पोलीस आयोग नेमला. या

आयोगाने पुढील शिफारशी केल्या. अ) प्रत्येक प्रांताचे आपल्यापुरते एक स्वतंत्र पोलीस खाते असावे व त्यावर पोलीस महानिरीक्षक नेमावा. ब) प्रत्येक जिल्ह्यासाठी एक पोलीस अधीक्षक असावा व कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम बिनलष्करी स्वरूपाच्या पोलीस दलाकडे असावे. क) सर्व प्रांताची पोलीस दले एकाच धर्तीवर उभारावीत. ड) ग्रामीण दलाने केवळ गुन्ह्याची वर्दी द्यावी, प्रत्यक्ष चौकशी मात्र पगारी पोलीस दलानेच करावी. ई) ब्रिटिश शासीत संपूर्ण भारतासाठी दंडशास्त्र, फौजदारी पुरावा, व पोलीस संघटना यासंबंधी एकच समान कायदा असावा. इत्यादी.

या शिफारशीनुसार पुढे भारतीय दंडसंहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, पुरावा अधिनियम, पोलीस अधिनियम इत्यादीबाबतचे कायदे संमत करण्यात आले. मुंबई सोडून सर्व प्रांतात पोलीस महानिरीक्षक नेमले. जिल्हा न्यायाधीश व पोलीस अधीक्षक यांचे दुहेरी अधिकार मुंबई, मद्रास व कलकत्ता येथील पोलीस आयुक्तांना देण्यात आले. १८८५ मध्ये मुंबई प्रांतासाठीही पोलीस महानिरीक्षक नेमला. १८९३ पर्यंत पोलीस अधिकाऱ्यांच्या जागा सेवानिवृत्त सेनाधिकाऱ्यांतून भरल्या जात. पुढे या जागांसाठी लंडनमध्ये स्वतंत्र परीक्षा घेणे सुरू केले.

१९०२ मध्ये लॉर्ड कर्झनने नवीन पोलीस आयोग नेमला. या आयोगाने सर्व प्रांतात एकाच प्रकारचे पोलीस दर असावे अशी सूचना केली. पुढे पोलीसांना कार्यक्षम बनविण्यासाठी प्रशिक्षण देणे, सात आठ जिल्ह्यातील पोलीस दलावर देखरेख ठेवण्यासाठी उपमहानिरीक्षक नेमणे, गुन्ह्यांचा तपास करणे, संघटीत गुन्हेगारी रोखणे, रेल्वे पोलीस यंत्रणेवर नियंत्रण ठेवणे, त्यासाठी अधिकारी नेमणे, इत्यादीबाबतचे नियम करण्यात आले. १९२० पासून वरिष्ठ पोलीस अधिकारी पदासाठी भारतात परीक्षा होऊ लागली. उच्च पोलीस पदावर भारतीयांची नियुक्ती होऊ लागली. भारतातील ही पोलीस व्यवस्था अत्यंत कार्यक्षम ठरली. ब्रिटिश सत्तेने तिचा उपयोग स्वातंत्र्य चळवळ दडपण्यासाठी केला.

### ड) स्वातंत्र्योत्तर काळातील पोलीस व्यवस्था

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय पोलीस व्यवस्थेत खूपच सुधारणा केल्या आहेत. कायदा व सुव्यवस्था हा विषय राज्यसरकारच्या अखत्यारीत ठेवला आहे. तथापि, अखिल भारतीय पोलीस सेवेसाठी केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे परीक्षा घेऊन निवडलेले अधिकारी सर्व राज्यात विभागून दिले जातात. या अधिकाऱ्यांसाठी माऊंट अबू व कलकत्ता येथे प्रशिक्षिण केंद्रे उभारली आहेत. पोलीस उपअधीक्षकाची पदे राज्य लोकसेवा आयोगातर्फे परीक्षा घेऊन भरली जातात. पोलीस उपनिरीक्षक पदासाठीही महाराष्ट्रात राज्य लोकसेवा आयोगातर्फेच परीक्षा घेतली जाते. शिपाई या पदाची भरती जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाद्वारे केली जाते. त्यातून पदोन्नतीने हवालदार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अशी पदे भरली जातात. काहींना पोलीस उपनिरीक्षक म्हणूनही बढती मिळू शकते. पोलीस उपनिरीक्षकांना पुढे सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक, पोलीस उपअधीक्षक अशी बढती मिळू शकते.

कांही महत्त्वाच्या महानगरपालीका क्षेत्रासाठी पोलीस आयुक्तालय सुरू केलेले असून त्यामध्ये पोलीस आयुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त (A.C.P) असे अधिकारी नेमले जातात. स्वातंत्र्यानंतर भारतीय पोलीस दलात स्त्रियांनाही भरती केले जाऊ लागले असून शिपायापासून पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्त अशा पदावर स्त्रिया समर्थपणे काम पाहू लागल्या आहेत. पोलीस

दलाच्या मदतीस गुप्तचर दल, राखीव पोलीस दल, गृहरक्षक दल ( होमगार्ड्स) न्यायवैद्यक प्रयोगशाळा उभारलेल्या आहेत.

स्वातंत्र्यानंतर सर्व राज्यांत सक्षम पोलीस यंत्रणा उभारली आहे. तथापि, राजकीय हस्तक्षेप, अकार्यक्षमता, भ्रष्टाचार, लालफित, जनतेविषयी बेपर्वाई अशा अनेक समस्यांनी ही यंत्रणा पोखरलेली आहे. १९७५-७६ मध्ये लागू केलेल्या राष्ट्रीय आणिबाणीत पोलीस यंत्रणेचा शासनाकडून दुरुपयोग झाल्याची ओरड झाली. त्यामुळे पोलीस दलाच्या दुरुपयोगास आळा घालण्यासाठी १९७७ मध्ये **धर्मवीर** यांच्या अध्यक्षतेखाली एक पोलीस आयोग नियुक्त केला. या आयोगाच्या कांही शिफारसी कांही राज्यांकडून स्वीकारल्या असल्या तरी पोलीस व्यवस्थेचे पुरेसे शुद्धीकरण झालेले नाही. 'पोलीस हा जनतेचा मित्र आहे' अशी प्रतिमा जनतेच्या मनात निर्माण करण्यात भारतीय पोलीस व्यवस्था असफल ठरलेली आहे. त्यामुळे पोलीस व्यवस्थेतील कर्मचाऱ्यांच्या मनात जनतेविषयी आस्था व बांधिलकी व कायद्याविषयी निष्ठा निर्माण होण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**★ स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक-१**

**योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१. पोलीस हा शब्द ................ भाषेतून निघालेला आहे.

अ) इंग्रजी ब) संस्कृत क) लॅटिन ड) ग्रीक

२. प्राचीन भारतात मुख्यतः .................. होती.

अ) लोकशाही ब) राजेशाही क) हुकूमशाही ड) ग्रीक

३. मध्ययुगीन पोलीस कार्ये ...................... वर्गाकडे सोपविली.

अ) जमीनदार ब) उमराव क) मध्यम ड) कनिष्ठ

४. १९०२ मध्ये ............... याने नवीन पोलीस आयोग नेमला.

अ) लॉर्ड कर्झन ब) लॉर्ड डलहौसी क) लॉर्ड वेलस्ली ड) लॉर्ड बेंटिंग

५. अखिल भारतीय पोलीस सेवेसाठी ................ लोकसेवा आयोग परीक्षा घेतो.

अ) राज्य ब) केंद्रीय क) संयुक्त ड) स्थानिक

## ४.२.२ गुन्हे नियंत्रणात पोलिसाची भूमिका (Role of Police in Crime Control)

भारतातील पोलीस व्यवस्थेचा अभ्यास केल्यानंतर आता तुम्ही पोलिसाची गुन्हे नियंत्रणात असलेली भूमिका समजावून घेणार आहात. भूमिका म्हणजे एखाद्या व्यक्तीची, पदाची किंवा समूहाची समाजाकडून अपेक्षित असलेली कार्ये होय. पोलिसाची भूमिका म्हणजे पोलिसाकडून समाजाला अपेक्षित असलेली कार्ये होय. या ठिकाणी पोलीस ही संज्ञा एका व्यवस्थेचा (यंत्रणेचा) निर्देश करते. त्यामुळे पोलिसाची भूमिका याचा अर्थ पोलीस व्यवस्थेची भूमिका असा होतो. पोलीस व्यवस्थेत विविध पदे असून त्या प्रत्येक पदांची स्वतःची अशी इतराहून वेगळी अशी भूमिका असते. उदा. शिपाई, हवालदार, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस अधीक्षक, इत्यादी विविध पदे असून या पदांची

एकमेकापासून वेगळी अशी भूमिका म्हणजेच कार्ये (कर्तव्ये) असतात. असे असले तरी ही सर्व पदे पोलीस व्यवस्थेचे अंग (भाग) असतात आणि त्या प्रत्येक पदाची भूमिका ही पोलीस व्यवस्थेच्या एकूण भूमिकेशी सुसंगत अशी असते. तसेच या विविध पदांच्या भूमिका देखील परस्परांशी सुसंगत असतात. या सर्व पदावरील व्यक्ती या परस्परसहकार्याने व सांघिकपणे आपापल्या भूमिका पार पाडीत असतात आणि त्या सर्वांच्या भूमिकांचे (कार्यांचे) एकत्रिकरण म्हणजे पोलिसाची भूमिका असा अर्थ होतो.

पोलीस व्यवस्थेला समाजात विविध प्रकारची कार्ये पार पाडावी लागतात. या सर्व कार्यांचा पोलिसाच्या भूमिकेत समावेश होतो. स्थूलमानाने असे म्हणता येते की, समाजात ''शांतता व सुव्यवस्था राखणे'' ही पोलीस व्यवस्थेची प्रमुख भूमिका आहे. या भूमिकेतंर्गत पोलिसव्यवस्थेच्या विविध कार्यांचा समावेश होतो. पोलीस व्यवस्थेची प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**१) गुन्हेगारीस प्रतिबंध करणे :** गुन्हेगारीस प्रतिबंध करणे हे पोलिसाचे पहिले कार्य आहे. कोणताही समाज आपल्या सदस्यांना स्वैर वर्तन करण्याची परवानगी देत नाही. समाजहितासाठी त्यांच्या वर्तनाचे नियमन/नियंत्रण करणे आवश्यक असते. म्हणून प्रत्येक समाज व्यक्तीवर्तनाचे नियमन करण्यासाठी कांही नियम तयार करतो या नियमनांनाच सामाजिक नियमने (Social norms) असे म्हणतात. लोकरूढी, लोकनीती, फॅशन, कायदे इत्यादी सामाजिक नियमनेच आहेत. आधुनिक समाजात इतर सामाजिक नियमनांपेक्षा कायद्यास अधिक महत्त्व दिले जाते. त्यामुळे लोकांनी कायदे पाळावेत असा समाजाचा दंडक असतो. व्यक्तीने कायदेभंग करण्याचे कृत्य केले की ते कृत्य गुन्हा (Crime) मानले जाते व ते कृत्य करणारी व्यक्ती गुन्हेगार (Criminals) मानली जाते आणि अशा गुन्हेगारास शिक्षा करण्याची तरतूद केलेली असते. समाजात गुन्ह्यांचे प्रमाण वाढल्यास व्यक्तींना व समाजासही आपल्या गरजा व्यवस्थितपणे भागविता येत नाहीत. त्यामुळे व्यक्तींच्या व समाजाच्या हितास बाधा येते व समाजाचे अस्तित्त्व व सातत्यास धोका निर्माण होतो. हे टाळण्यासाठी समाजात गुन्हेगारी कृत्ये घडणार नाहीत याची काळजी घ्यावी लागते. त्यासाठी गुन्हेगारी कृत्यांना अटकाव करावा लागतो. यालाच गुन्हेगारीस प्रतिबंध (Prevention of Crime) असे म्हणतात. गुन्हे घडून गेल्यावर त्यावर उपाय करण्यापेक्षा गुन्हेच घडणार नाहीत याची दक्षता घेणे अधिक उपयुक्त असते. त्यामुळे पोलीस व्यवस्थेस गुन्ह्यास प्रतिबंध करण्याचे कार्य करावे लागते. यादृष्टीने पोलीस दल हे संवेदनशील क्षेत्रात गस्त घालणे, पहारा देणे, रात्रीची गस्त घालणे, संशयीत व्यक्तींवर निगराणी ठेवणे, गुप्त बातम्या काढणे, सार्वजनिक कार्यक्रमात बंदोबस्त करणे, ज्यांच्या हातून गुन्हा घडण्याची शक्यता आहे अशा व्यक्तिंना वेळीच ताब्यात घेणे, लोकांकडून कायदेभंग होणार नाही यासाठी त्यांना वेळीच मार्गदर्शन करणे इत्यादी कार्ये पार पाडीत असते. पोलिसांच्या या प्रतिबंधात्मक कार्यामुळे समाजात शांतता व सुव्यवस्था राखण्याचे कार्य पार पाडले जाते. थोडक्यात गुन्हेगारीस प्रतिबंध करणे हे पोलिसांचे एक महत्त्वाचे कार्य आहे. गुन्हे नियंत्रणात अशा प्रतिबंधात्मक कार्यास महत्त्वाचे स्थान आहे.

**२) कायदेशीर कारवाई करणे :** गुन्हेगारांवर कायदेशीर कारवाई करणे हे पोलिसांचे दुसरे कार्य आहे. गुन्हेगारीस प्रतिबंध करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी कांही व्यक्ती ह्या गुन्हे करीतच असतात. त्यामुळे गुन्हेगारांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करणे म्हणजेच त्यांना गुन्हा केल्याबद्दल

योग्य ती म्हणजेच कायदेशीर शिक्षा मिळण्यासाठी करावयाची कारवाई पोलिसांना करावी लागते. त्यादृष्टीने गुन्हा घडलेल्या ठिकाणास भेट देणे, पंचनामा करणे, जाबजबाब नोंदविणे, गुन्हेगारांचा शोध घेणे, संशयीतांना ताब्यात घेणे, त्यांची कसून चौकशी करणे, त्यांच्यावर आरोप ठेवून त्यांना न्यायालयापुढे उभे करणे, पोलिस किंवा न्यायालयीन कोठडी (कस्टडी) मिळविणे , तपास करणे, आवश्यक ते पुरावे गोळा करून ते न्यायालयासमोर सादर करणे, त्याअनुषंगाने न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे पालन करणे इत्यादी कार्ये पोलीस दल पार पाडीत असते.

**३) प्रासंगिक कार्ये :** गुन्हे प्रतिबंध व गुन्हेगारावर कारवाई करणे या दोन कार्याशिवाय पोलीस यंत्रणेस वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळी कार्येही पार पाडावी लागतात. त्यांना प्रासंगिक कार्ये असे म्हणतात. अशी प्रासंगिक कार्येही खूपच आहेत. त्यापैकी कांही महत्त्वाची पुढीलप्रमाणे सांगता येतील.

- वाहतूकीचे नियंत्रण करणे, वाहतुकीची कोंडी झाल्यास ती सुरळीत करणे.
- वेगवेगळी आंदोलने, मोर्चा, सभा, सार्वजनिक उत्सव, सणसमारंभ, मंत्र्यांचा दौरा इत्यादी प्रसंगी बंदोबस्त ठेवणे.
- सार्वजनिक ठिकाणी लोक असभ्य वर्तन, हिंसाचार, बेशिस्त वर्तन करणार नाहीत याची काळजी घेणे.
- महापूर, भूकंप, त्सुनामी, आग, दंगल, अपघात अशा संकटकाळात गरजूंना योग्य ती मदत करणे, पीडितांना साहाय्य करणे

अशाप्रकारे पोलिस यंत्रणा ही विविध प्रकारची कार्ये पार पाडीत असते. ही कार्ये म्हणजेच या यंत्रणेची भूमिका आहे. थोडक्यात सज्जनांचे रक्षण करणे व दुष्टांचे निर्दालन करणे हे पोलीस व्यवस्थेचे कार्य आहे आणि या कार्यामुळेच समाजात शांतता व सुव्यवस्था टिकून राहात असते. त्यामुळे सज्जनांचे रक्षण करून व दुर्जनांचे निर्दालन करून समाजात शांतता व सुव्यवस्था राखणे हीच पोलिस व्यवस्थेची भूमिका ठरते.

**नियमावली :** समाजात पोलिस व्यवस्थेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. तथापि, तिला आपली भूमिका कायद्याच्या चौकटीत राहूनच पार पाडावी लागते. पोलिस यंत्रणेने आपली भूमिका कशी पार पाडावी याबाबत समाजाने निश्चित नियमावली घालून दिलेली असते. भारतात त्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता (Criminal Procedure Code) व फौजदारी न्यायदान पद्धती घालून दिलेली आहे. त्यानुसार पोलिसांनी खालील नियमावलींचे पालन करूनच आपली भूमिका पार पाडावी लागते.

१) जोपर्यंत व्यक्तींवरील गुन्ह्याचा आरोप सिद्ध होत नाही तोपर्यंत तिला निष्पाप मानणे.

२) ज्या गुन्ह्याबद्दल एखाद्या आरोपीवर खटला चालला आहे त्याच गुन्ह्याबद्दल त्याच्यावर पुन्हा खटला न चालविणे.

३) आरोपीविरुद्धचे सर्व आरोप हे निःसंशयपणे अभियोगाने (Prosecution) सिद्ध करणे.

४) अनेक गुन्हेगार सुटले तरी चालतील पण एकाही निरपराध्यास शिक्षा होता कामा नये.

थोडक्यात पोलिस आपली भूमिका आपल्या मर्जीनुसार पार पाडू शकत नाहीत. त्यांना प्रचलित नियमावलीनुसारच आपली भूमिका पार पाडावी लागते.

**पोलिसांच्या भूमिकेवर प्रभाव टाकणारे घटक :** पोलिसांना आपली भूमिका कायद्याच्या/ नियमाच्या चौकटीत राहूनच बजावावी लागते हे खरे. तथापि, त्यांच्या भूमिकेवर व्यवस्थेतील व व्यवस्थेबाहेरील अनेक घटक प्रभाव टाकीत असतात.

**अ) पोलीस व्यवस्थेतील पुढील घटक पोलिसांच्या भूमिकेवर प्रभाव टाकतात.**

१) पोलिसांना मिळणारे अपूरे वेतन व भत्ते, सोयीसुविधा, सुट्ट्या, रजा व इतर सवलती.

२) कामाच्या अनिश्चित वेळा.

३) अपर्याप्त कर्मचारी संख्या.

४) अत्याधुनिक शस्त्रे, संप्रेषण व वाहतूक सुविधांचा अपुरेपणा.

५) पोलीस व्यवस्थेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कनिष्ठ कर्मचाऱ्यांना मिळणारी पक्षपाती व अन्यायकारक वागणूक.

**ब) पोलीस व्यवस्थेबाहेरील पुढील घटक पोलिसांच्या भूमिकेवर प्रभाव टाकतात.**

१) राजकीय व्यक्तींचा पोलिसांच्या कार्यात होणारा हस्तक्षेप, त्यांच्याकडून येणारा दबाव.

२) पोलिसांना जनतेकडून अपेक्षित सहकार्य न मिळणे.

३) न्यायव्यवस्थेचा अति तांत्रिक दृष्टिकोन.

४) पोलीस व्यवस्थेची समाजातील मलीन प्रतिमा इत्यादी.

वरील घटकांच्या प्रभावामुळे पोलिसांना आपली भूमिका सक्षमपणे पार पाडण्यात अडथळे येतात.

**★ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न क्रमांक २**

**योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१) पोलिसाची भूमिका म्हणजे पोलिसाकडून समाजाला अपेक्षित असलेले .............. होय.

अ) अधिकार ब) कार्य क) सवलत ड) आदर

२) आधुनिक समाजात ................ ला अधिक महत्त्व आहे.

अ) लोकरूढी ब) लोकनीती क) फॅशन ड) कायदा

३) कायदेभंग करणाऱ्या कृत्यास ................ म्हणतात.

अ) दुष्कृत्य ब) पाप क) गुन्हा ड) अनैतिक वर्तन

४) संकटकाळात गरजूना मदत करणे हे पोलिसांचे ................. प्रकारचे कार्य ठरते.

अ) प्रतिबंधात्मक ब) कायदेशीर कारवाई

क) प्रासंगिक ड) न्यायीक

५) पोलिसाच्या भूमिकेवर प्रभाव टाकणारा पोलिसव्यवस्थेबाहेरील ............ हा घटक आहे.

अ) राजकीय व्यक्तींचा हस्तक्षेप ब) पोलिसांचे अपूरे वेतन

क) अपर्याप्त कर्मचारी संख्या ड) कामाच्या अनिश्चित वेळा

### ४.२.३ भारतातील न्यायव्यवस्था (Judicial System in India)

भारतातील पोलीस व्यवस्थेचा इतिहास आणि पोलिसाची गुन्हे नियंत्रणातील भूमिका अभ्यासल्यानंतर आता तुम्ही भारतातील न्यायव्यवस्थेचा अभ्यास करणार आहात.

भारत संघराज्य असले तरी येथील न्यायव्यवस्था मात्र एकेरी (एकात्म) आहे. तिच्या शिरोभागी सर्वोच्च न्यायालय, त्याच्याखाली घटक राज्यातील उच्च न्यायालये आहेत. तर उच्च न्यायालयांच्या खाली जिल्हा व तालुका स्तरावर कनिष्ठ न्यायालये आहेत.

**सर्वोच्च न्यायालय** (Supreme Court)

संसदेने केलेल्या कायद्यानुसार सर्वोच्च न्यायालयाची स्थापना २६ जानेवारी १९५० रोजी झाली. या न्यायालयाची रचना व अधिकार क्षेत्राबाबत कायदे करण्याचा अधिकार संसदेला आहे. या न्यायालयातील न्यायाधीशांची नेमणूक, निवृत्ती, पदच्युती, पात्रता इ. बाबतच्या तरतुदी घटनेतील कटम १२४ (१ ते ७) मध्ये केल्या आहेत. **संख्या :** सर्वोच्च न्यायालयात १ मुख्य न्यायाधीश आणि इतर ७ न्यायाधीश असावेत अशी मुळ राज्यघटनेत तरतूद आहे. इतर न्यायाधीश किती असावेत हे ठरविण्याचा अधिकार संसदेला आहे. त्यानुसार संसदेने १९८६ मध्ये इतर न्यायाधीशांची संख्या २५ निश्चित केली आहे. **नेमणूक :** भारताचा राष्ट्रपती मुख्य न्यायाधीशाची नेमणूक करतो आणि मुख्य न्यायाधीशाच्या सल्ल्याने राष्ट्रपतीच इतर न्यायाधीशांचीही नेमणूक करतो. प्रत्यक्षात न्यायाधीशपदी नेमावयाच्या व्यक्तीच्या नावांची शिफारस केंद्रीय गृहखाते करते. कॅबिनेटची नियुक्ती संदर्भातील समिती त्या शिफारशींची छाननी करते आणि पंतप्रधानाच्या संमतीनंतर निवड निश्चित होते. **निवृत्ती :** हे न्यायाधीश वयाची ६५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर सेवानिवृत्त होतात. तथापि त्यापूर्वीही ते राष्ट्रपतीकडे राजीनामा देऊ शकतात. **पदच्युती :** एखाद्या न्यायाधीशाचे गैरवर्तन किंवा अकार्यक्षमता सिद्ध झाल्यास व संसदेच्या प्रत्येक गृहाने तशा आशयाचा ठराव एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने व उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सभासदांच्या २/३ बहुमताने संमत केल्यास राष्ट्रपती त्याला पदच्युत करू शकतो, सेवानिवृत्त करू शकतो. सेवानिवृत्त न्यायाधीशास भारतातील कोणत्याही न्यायालयात बदली करण्यास बनाई आहे. **पात्रता :** सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश होण्यासाठी ती व्यक्ती - (१) भारताची नागरीक असावी आणि (२) तिने एखाद्या उच्च न्यायालयात ...... दोन किंवा अधिक उच्च न्यायालयात सलग किमान पाच वर्ष न्यायाधीश म्हणून काम केलेले असावे किंवा एखाद्या न्यायालयात अथवा दोन किंवा अधिक उच्च न्यायालयात सलग किमान दहा वर्षे अधिवक्ता (advocate) म्हणून काम केलेले असावे. किंवा राष्ट्रपतींच्या मते ती ख्यातनाम कायदेपंडित असावी. (न्यायाधीशांची नेमणूक करताना त्यांच्यापैकी किमान एकतरी मुस्लिम असावा व मुख्य न्यायाधीशांची

नेमणूक जेष्ठता क्रमानुसार व्हावी असे संकेत पाळतात.) **शपथ :** या न्यायाधीशांना आपले पदग्रहण करण्यापूर्वी राष्ट्रपतीसमोर किंवा त्याने या कामासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तीसमोर शपथ घ्यावी लागते. **वेतन :** कलम १२५ नुसार या न्यायाधीशांना संसदेने निर्धारीत केलेले वेतन मिळते. याशिवाय सरकारी वाहन, निवासस्था, रजा मुदतीत प्रवास सुविधा, विमा आणि निवृत्तीनंतर मूळ पगाराच्या अर्ध्या रक्कमेएवढे पेन्शन इ. सुविधा मिळतात.

**प्रभारी (Acting) मुख्य न्यायाधीश** : कलम १२६ नुसार जर भारताच्या मुख्य न्यायाधीशाचे पद रिक्त असेल किंवा त्या पदावरील व्यक्ती काही काळासाठी गैरहजर असेल किंवा त्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ असेल तर अशावेळी राष्ट्रपती इतर न्यायाधीशांपैकी एकाची प्रभारी मुख्य न्यायाधीश म्हणून नेमणूक करू शकतो.

**तदर्थ न्यायाधीश (ad hoc judges)** कलम १२७ नुसार सर्वोच्च न्यायालयाचे एखादे सत्र भरविण्यासाठी आवश्यक असणारी गणसंख्या (quorum) त्या न्यायालयात उपलब्ध नसल्यास त्याचा मुख्य न्यायाधीश राष्ट्रपतीच्या पूर्वसंमतीने एखाद्या उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाच्या सल्ल्याने तेथील एखाद्या न्यायाधीशास - ज्याच्याकडे सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश होण्याची पात्रता आहे - सर्वोच्च न्यायालयात तदर्थ न्यायाधीश म्हणून नेमू शकतो. अशा तदर्थ न्यायाधीशास प्राधान्य क्रमाने सर्वोच्च न्यायालयाच्या बैठकांना उपस्थित राहावे लागते व त्या काळात त्यास सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या सर्व शक्ती प्राप्त होतात.

**सेवानिवृत्त न्यायाधीशांची उपस्थिती :** कलम १२८ नुसार सर्वोच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश राष्ट्रपतीच्या पूर्व संमतीने सर्वोच्च न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायाधीशास (किंवा उच्च न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायाधीशास जो सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यास पात्र आहे) सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून काम करण्यास विनंती करू शकतो. अशा व्यक्तीने विनंती मान्य केल्यास तिला त्या कामाच्या कालावधीत राष्ट्रपतीने निर्धारित केलेले भत्ते मिळतात. तसेच तिला सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाचे सर्व अधिकार, शक्ती व विशेषाधिकार मिळतात; पण तिला त्या न्यायालयाचा न्यायाधीश मानले जात नाही.

**अभिलेख न्यायालय :** कलम १२९ नुसार सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय (Court of record) असून त्याला आपली बेअब्रु करणाऱ्यास शिक्षा करण्यासह अशा न्यायालयाच्या सर्व शक्ती असतात. या न्यायालयाचे निर्णय अभिलेखित केले जातात व त्यांना कायद्याचे स्वरूप प्राप्त होते. त्याच्या निर्णयांना भारतातील कोणत्याही न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकत नाही. तसेच त्याचे निर्णय भारतातील सर्व न्यायालयांवर बंधनकारक असतात. **स्थान :** सर्वोच्च न्यायालय हे दिल्लीमध्ये किंवा भारताचा मुख्य न्यायाधीश राष्ट्रपतीच्या मान्यतेनुसार वेळोवेळी ठरवील त्या एक वा अधिक ठिकाणी असेल.

**सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार व शक्ती**

**१) प्रारंभिक अधिकार क्षेत्र :** कलम १३१ नुसार खालील वाद सर्वोच्च न्यायालयाच्या प्रारंभिक अधिकार क्षेत्रात येतात. (अ) भारत सरकार विरुद्ध एक किंवा अधिक घटकराज्ये यांच्यातील वाद किंवा (ब) भारत सरकार व एक किंवा अधिक घटकराज्ये विरुद्ध एक किंवा अधिक

घटक राज्ये यांच्यातील वाद किंवा (क) दोन किंवा अधिक घटकराज्ये यांच्यातील वाद. तथापि या वादात कायद्याचा किंवा वस्तुस्थितीचा असा मुद्दा अंतर्भूत असावा की ज्यावर कायदेशीर अधिकाराचे अस्तित्व व व्याप्ती अवलंबून असेल. परंतु राज्यघटना अमलात येण्यापूर्वी झालेले तह, करार, ठराव इत्यादीमधून उद्‌भवणारे तंटे किंवा ज्या संलेखात (instruments) असा स्पष्ट उल्लेख असेल की त्यांच्यासाठी प्रारंभिक अधिकार क्षेत्र लागू होणार नाही त्या संबंधीचे वाद या न्यायालयाच्या प्रारंभिक अधिकार क्षेत्रात येत नाहीत.

**२) अपिलाचे (पुनर्निर्णयाचे) अधिकार क्षेत्र :** कलम १३२ नुसार उच्च न्यायालय किंवा इतर न्यायाधिकरणांच्या निर्णयाचा फेरविचार करण्यासाठी येणारे खालील वाद अपिलाच्या अधिकार क्षेत्रात येतात. **(अ) दिवाणी दावे :** कलम १३३ नुसार उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालात राज्यघटनेच्या अर्थासंबंधी कायदेशीर प्रश्न गुंतलेला आहे आणि या दाव्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने देणे आवश्यक आहे असे उच्च न्यायालयाने म्हटले असल्यास तो दावा अपिलासाठी सर्वोच्च न्यायालयात येऊ शकतो. **(ब) फौजदारी दावे :** कलम १३४ नुसार (१) कनिष्ठ न्यायालयाने निर्दोष ठरविलेल्या व्यक्तीस उच्च न्यायालयाने अपिलाअंती फाशीची शिक्षा दिली असल्यास (२) कनिष्ठ न्यायालयाकडून खटला काढून घेऊन उच्च न्यायालयाने एखाद्यास फाशीची शिक्षा दिली असल्यास (३) सर्वोच्च न्यायालयात अपील करण्याची शिफारस उच्च न्यायालयाने केली असल्यास या तीन प्रकारच्या फौजदारी दाव्यात सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते. **(क) खास दावे :** कलम १३६ नुसार सर्वोच्च न्यायालय स्वविवेकानुसार भारताच्या राज्यक्षेत्रातील कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने कोणत्याही बाबीसंबंधी दिलेला निर्णय, हुकूमनामा, निर्धारण, शिक्षा किंवा आदेश यावर अपील करण्याची खास परवानगी देऊ शकते. पण लष्करी न्यायालयाने लष्करी कायद्यानुसार दिलेल्या निर्णयाविरुद्ध मात्र अशी परवानगी देता येत नाही.

**३) पुनर्विलोकनाचा (Review) अधिकार** : कलम १३७ नुसार संसदेने केलेल्या कायद्यानुसार किंवा कलम १४५ नुसार बनविलेल्या नियमानुसार सर्वोच्च न्यायालयास स्वतःच दिलेल्या निर्णयांचे व आदेशांचे पुनर्विलोकन (फेरविचार) करण्याचा अधिकार आहे. याचा अर्थ असा की, आपला निर्णय चुकीचा असल्याचे किंवा त्याचा जनहितावर विपरीत परिणाम झाल्याचे लक्षात आल्यावर सर्वोच्च न्यायालय आपला निर्णय बदलू शकते वा त्याच्यावर फेरफार करू शकते. मूळचा निर्णय ज्या खंडपीठाने दिलेला असेल त्यापेक्षा अधिक मोठ्या खंडपीठाकरवी त्याचे पुनर्विलोकन केले जाते.

**४) अधिकार वृद्धी :** कलम १३८ नुसार सर्वोच्च न्यायालयास केंद्रसूचीतील विषयाच्या संबंधी असे जादा अधिकार व शक्ती प्राप्त होतात ज्या संसदेने कायद्याद्वारे त्याला प्रदान केलेल्या असतील.

**५) प्राधिलेख अधिकार क्षेत्र :** कलम १३९ नुसार सर्वोच्च न्यायालयास मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी निर्देश (directions) आदेश किंवा प्राधिलेख (orders or writes) ज्यामध्ये हेबियस कॉर्पस, मँडॅमस, प्रोहिबिशन, को वॉरंट आणि सर्शिओराराय हे समाविष्ट असतील, काढण्याचा अधिकार आहे.

६) **आनुषंगिक शक्ती** (Ancillary Powers) : संसद कायद्याद्वारे सर्वोच्च न्यायालयाला अशा काही आनुषंगिक शक्ती देऊ शकते ज्या घटनेतील तरतूदींशी विसंगत नसतील आणि या न्यायालयास घटनेने दिलेले अधिकार अधिक प्रभावीपणे वापरण्यासाठी आवश्यक किंवा अपेक्षित असतील.

७) **कलम १४१ नुसार** सर्वोच्च न्यायालयाने घोषित केलेले कायदे भारतातील सर्व न्यायालयावर बंधनकारक आहेत.

८) **सल्लादायी अधिकार क्षेत्र :** कलम १४३ नुसार एखाद्या समयोचित व सार्वजनिक दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या कायदेविषयक प्रश्नांवर किंवा घटनेवर राष्ट्रपती त्याला आवश्यक वाटल्यास सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला मागवू शकतो. अशावेळी सल्ला देणे या न्यायालयावर बंधनकारक असते पण त्याने दिलेला सल्ला राष्ट्रपतीवर मात्र बंधनकारक नसतो.

९) **कामकाजासंबंधीचे अधिकार :** कलम १४५ नुसार संसदेने केलेल्या कायद्यातील तरतुदीनुसार सर्वोच्च न्यायालय वेळोवेळी राष्ट्रपतीच्या संमतीने न्यायालयाची कार्यपद्धती व प्रक्रिया यांचे नियमन करण्यासाठी नियम बनवू शकते. उदा. सर्वोच्च न्यायालयात वकिली करणाऱ्या व्यक्तीसंबंधीचे, अपीलाच्या सुनावणीसंबंधीचे, अपील दाखल करण्याच्या वेळेसंबंधी जमानत (Bail) मंजूरीसंबंधीचे, कार्यवाही रोखण्यासंबंधीचे (Stay) इ. नियम हे न्यायालय करू शकते. कलम १४६ नुसार न्यायालयातील सर्व अधिकारी, सेवक यांची नेमणूक मुख्य न्यायाधीश किंवा त्याने याकामी नेमलेला कनिष्ठ न्यायाधीश वा अधिकारी करू शकतो. त्याचे सेवा नियम राष्ट्रपतीच्या सल्ल्याने ठरविले जातात. त्याच्यावरचा संपूर्ण खर्च देशाच्या संमिश्र निधीतून केला जातो. कलम १४७ नुसार राज्यघटनेचे निर्वचन (interpretation) ज्यांच्या निर्णयातून होईल अशा प्रकरणांची सुनावणी किमान ५ न्यायाधीशांसमोर आणि इतर प्रकरणांची एका वा अधिक न्यायाधिशासमोर केली जाते. निर्णय बहुमताने दिले जातात. एखादा न्यायाधीश आपले वेगळे मत नोंदवू शकतो. सर्व प्रकरणांच्या सुनावण्या, निर्णय व घोषणा खुल्या न्यायालयात केल्या जातात.

१०) **न्यायिक पुनर्विलोकनाचा (Judicial Review) अधिकार :** भारतीय राज्यघटनेने सर्वोच्च न्यायालयास न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार दिलेला आहे. संसदेने वा राज्यविधीमंडळाने संमत केलेला कायदा तसेच कार्यकारी मंडळाची एखादी कृती यांची वैधता तपासल्यावर जर ती राज्यघटनेशी विसंगत आढळली तर ती घटनाबाह्य ठरविण्याचा (रद्द करण्याचा) अधिकार म्हणजे न्यायिक पुनर्विलोकन होय. संसद वा राज्य विधीमंडळ यांना घटनेने दिलेल्या कायदेविषयक अधिकाराच्याबाहेर जाऊन त्यांनी एखादा कायदा केला आणि तो कायदा मूलभूत अधिकारांशी विसंगत असला तर तो कायदा सर्वोच्च न्यायालय रद्द करू शकते.

**उच्च न्यायालय (High Court)**

**कलम २१४ नुसार** प्रत्येक राज्यासाठी एक उच्च न्यायालय असते. **कलम २१५ नुसार** उच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय असते. त्याला आपला अवमान करणाऱ्यास शिक्षा करण्यासह अशा न्यायालयाच्या सर्व शक्ती असतात. **कलम २१६ नुसार** प्रत्येक उच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश आणि राष्ट्रपती वेळोवेळी ठरविल तितके इतर न्यायाधीश असतात. **नियुक्ती व सेवाशर्थी :** कलम २१७(१) नुसार उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाची नियुक्ती राष्ट्रपती, सर्वोच्च

न्यायालय मुख्य न्यायाधीश व संबंधित राज्याचा राज्यपाल यांच्या सल्ल्याने करतो तर इतर न्यायाधीशांची नियुक्ती करताना वरील दोघाशिवाय संबंधित उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांचा सल्ला राष्ट्रपती घेतो. **कालावधी :** उच्च न्यायालयाचे न्यायाधीश वयाच्या ६२ वर्षांपर्यंत त्या पदावर राहतात. तथापि, तत्पूर्वीही न्यायाधीश राष्ट्रपतीकडे राजीनामा देऊ शकतात. **पदच्युती** सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांना **पदच्युत** करण्याची जी पद्धती कलम १२४ (४) नुसार दिलेली आहे, त्या पद्धतीनुसारच उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदच्युत करता येते. (म्हणजे एखाद्या न्यायाधीशावर महाभियोगाचा प्रस्ताव संसदेच्या प्रत्येक सभागृहात उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सभासदांच्या २/३ बहुमताने व सभागृहातील एकूण सभासद संख्येच्या बहुमताने संमत केल्यास राष्ट्रपती त्याला पदच्युत करू शकतो.) एखाद्या न्यायाधीशास राष्ट्रपतीने सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नियुक्त केल्यास किंवा इतर उच्च न्यायालयात त्याची बदली केल्यास त्याचे पद रिकामे होते.

**उच्च न्यायालयातील न्यायाधीशाची पात्रता : कलम २१७ (२) नुसार** (१) ती व्यक्ती भारताची नागरीक असावी. (२) तिने भारताच्या राज्यक्षेत्रात किमान दहा वर्ष न्यायिक अधिकारपद धारण केलेले असावे किंवा ती व्यक्ती एखाद्या उच्च न्यायालयात किंवा दोन किंवा अधिक उच्च न्यायालयात सलग किमान दहा वर्षे अधिवक्ता म्हणून काम केलेली असली पाहिजे. कलम २१७ (३) नुसार उच्च न्यायालयातील एखाद्या न्यायाधीशाच्या वयाबाबत काही प्रश्न उद्‌भवल्यास त्यावरचा निर्णय राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाच्या सल्ल्याने घेतो व त्याचा तो निर्णय अंतिम असतो. **शपथ : कलम २१९ नुसार** उच्च न्यायालयांच्या न्यायाधीशाना पदग्रहण करण्यापूर्वी राज्याच्या राज्यपालासमोर किंवा त्याने त्या कामासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तीसमोर शपथ घ्यावी लागते. **व्यवसाय निर्बंध : कलम २२० नुसार,** एखाद्या उच्च न्यायालयातील स्थायी (कायम) न्यायाधीशास सर्वोच्च व इतर उच्च न्यायालये सोडून भारतातील इतर कोणत्याही न्यायालयात किंवा प्राधिकाऱ्यासमोर वकिली व्यवसाय करता येत नाही. **वेतन व भत्ते : कलम २२१ नुसार** उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना संसदेने कायद्याद्वारे निश्चित केलेले वेतन, भत्ते, रजा व पेन्शन मिळते व त्यामध्ये त्यांच्या नियुक्तीनंतर नुकसानकारक बदल केले जात नाहीत. **बदली : कलम २२२ नुसार** राष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाच्या सल्ल्याने एखाद्या न्यायाधीशाची एका उच्च न्यायालयातून दुसऱ्या उच्च न्यायालयात बदली करू शकतो.

**कार्यकारी मुख्य न्यायाधीश : कलम २३३ नुसार** एखाद्या उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीशाचे पद रिक्त असले किंवा तो गैरहजर असल्याने किंवा इतर कारणांमुळे तो आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ असेल तेंव्हा त्या न्यायालयातील इतर न्यायाधीशांतील एखाद्याची प्रभारी किंवा कार्यकारी (Acting) मुख्य न्यायाधीश म्हणून राष्ट्रपती नियुक्ती करू शकतो.

**अप्पर (additional) व कार्यकारी (acting) न्यायाधीश : कलम २२४ नुसार** (१) उच्च न्यायालयातील काम वाढले असेल किंवा कामाचा उरक होत नसेल अशावेळी त्या न्यायालयाचे काम वेगाने होण्यासाठी राष्ट्रपती त्या न्यायालयात पात्र व्यक्तीची अप्पर न्यायाधीश म्हणून दोन वर्षासाठी नेमणूक करू शकतो. (२) एखाद्या उच्च न्यायालयातील (मुख्य सोडून) इतर कोणी न्यायाधीश गैरहजेरी किंवा अन्य कारणामुळे आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ असेल किंवा त्याला अस्थायी मुख्य न्यायाधीश म्हणून नेमले असेल तेंव्हा राष्ट्रपती एखाद्या पात्र व्यक्तीला कार्यकारी न्यायाधीश म्हणून तोपर्यंत नेमू शकतो जोपर्यंत स्थायी न्यायाधीश आपला पदभार स्वीकारत नाही. (३) अप्पर व कार्यकारी न्यायाधीशास ही वयाची ६२ वर्षे पूर्ण केल्यावर त्या पदावर रहाता येत नाही. **सेवानिवृत्तांची नियुक्ती :** कलम २२४ क नुसार एखाद्या उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश राष्ट्रपतीच्या पूर्वसंमतीने कोणत्याही उच्च न्यायालयातील

सेवानिवृत्त न्यायाधीशास त्या न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम करण्यास विनंती करू शकतो आणि त्याला त्या काळात राष्ट्रपतीच्या आदेशाप्रमाणे ठरलेले भत्ते मिळतात शिवाय त्याला उच्च न्यालयाच्या न्यायाधीशाचे सर्व अधिकार, शक्ती व विशेषाधिकार मिळतात पण त्याला उच्च न्यायालयाचा न्यायाधीश मानले जात नाही.

**उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र :**

**कलम २२५ नुसार** राज्यघटना अमलात येण्यापूर्वी उच्च न्यायालयास दिवाणी व फौजदारी क्षेत्रात जी अव्वल (Primary) व अपील विषयक अधिकारिता होती ती नव्या कायद्यांच्या व नियमांच्या अधिनतेने घटना अमलात आल्यानंतरही प्राप्त झालेली आहे. ४२ व्या घटना दुरुस्तीने (१९७६) महसुलाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधीची अव्वल अधिकारिताही उच्च न्यायालयास प्राप्त झालेली आहे.

**१) अव्वल (प्रारंभिक) अधिकार क्षेत्र :** काही विशिष्ट दाव्यांची सुनावणी केवळ उच्च न्यायालयातच होऊ शकते. उदा. (अ) जेंव्हा एखाद्या नागरिकाच्या मूलभूत अधिकारांवर अतिक्रमण होते तेंव्हा तो उच्च न्यायालयात विनंती अर्ज करून आपल्या मूलभूत अधिकारांच्या संरक्षणाची मागणी करतो. (ब) खासदार किंवा आमदार याच्या निवडणुकीच्या वैधतेला आव्हान देणारा विनंती अर्ज उच्च न्यायालयात करता येतो. (क) ज्या वादात राज्यघटनेचा अर्थ लावण्याचा प्रश्न उपस्थित झाला असेल अशा वादांची सुनावणी उच्च न्यायालयातच होते.

**२) प्राधिलेख काढणे : कलम २२६** नुसार उच्च न्यायालयास आपल्या राज्यक्षेत्राच्या हद्दीतील कोणत्याही व्यक्तीला, प्राधिकरणाला, शासनाला उद्देशून हेबिअस कोर्पस, मँडामस, प्रोव्हिबीशन, क्वोवारंटो व सर्शिओरारी या प्राधिलेखासह इतर प्राधिलेख काढू शकते. ज्या राज्यक्षेत्रात वाद उद्‌भवला असेल तेथील उच्च न्यायालय असे प्राधिलेख काढू शकते. मग ज्यांना उद्देशून ते काढले जातात त्या व्यक्तीचे निवासस्थान किंवा त्या प्राधिकरण वा शासनाचे कार्यस्थळ दुसऱ्या राज्यक्षेत्रात असले तरी हरकत नसेल.

**३) देखरेख करण्याचे अधिकार** : कलम २२७ नुसार उच्च न्यायालय आपल्या राज्यक्षेत्रातील सर्व न्यायालयावर व अधिकरणांवर देखरेख करू शकते. त्यानुसार उच्च न्यायालय (१) अशा न्यायालयाकडून प्रतिवेदने (returns) मागवू शकते. (२) त्या न्यायालयांच्या कार्यवाहीचे नियम बनवू शकते किंवा नमुने ठरवून देऊ शकते. (३) त्या न्यायालयातील अधिकाऱ्यांनी पुस्तके, नोंदी व लेखे कोणत्या नमुन्यानुसार ठेवावेत हे विहित करू शकते. (४) अशा न्यायालयाचे शेरीफ, लिपीक, अधिकारी, अटर्नी (न्यायवादी) अधिवक्ते व वकील यांना द्यावयाच्या फीची कोष्टके ठरवू शकते आणि या गोष्टींना राज्यपालांची पूर्वमान्यता आवश्यक असते. लष्करी कायद्याद्वारे निर्माण झालेली न्यायालये व प्राधिकरणे उच्च न्यायालयाच्या अधिकारितेत येत नसल्याने त्यांच्यावर त्याला देखरेख ठेवता येत नाही.

**४) विशिष्ट प्रकरणे स्वतःकडे वर्ग करण्याचा अधिकार :** कलम २२८ क नुसार उच्च न्यायालयाची अशी खात्री झाली की त्याला दुय्यम असलेल्या एखाद्या न्यायालयात प्रलंबित असलेल्या एखाद्या प्रकरणात भारतीय राज्यघटनेच्या अर्थासंबंधीचा महत्त्वाचा कायदेविषयक प्रश्न अंतर्भूत झालेला आहे. तेंव्हा त्या प्रश्नाचा निर्णय झाल्याशिवाय त्या प्रकरणाचा निकाल दिला जाऊ शकत नाही. अशावेळी उच्च न्यायालय दुय्यम न्यायालयाकडून ते प्रकरण काढून घेऊन एकतर स्वतःच त्या प्रकरणाचा निकाल लावू शकते किंवा तो कायदेविषयक प्रश्न निर्धारित करून आपल्या न्याय निर्णयाच्या प्रतीसह ते प्रकरण संबंधित दुय्यम न्यायालयाकडे परत पाठवू शकते. उच्च न्यायालयाकडून आलेल्या न्यायनिर्णयानुसार ते न्यायालय संबंधित प्रकरण निकालात काढण्याची कार्यवाही करते.

**५) अधिकारी व सेवकांच्या नियुक्त्या करणे : कलम २२९ नुसार** (१) उच्च न्यायालयातील अधिकारी व सेवक यांच्या नियुक्त्या त्या न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश किंवा त्याने निर्देशित केलेला अन्य न्यायाधीश किंवा अधिकारी करू शकतो पण काही विशिष्ट जागा राज्य लोकसेवा आयोगाचा विचार घेतल्यावाचून भरल्या जाऊ शकत नाहीत. (२) या अधिकारी व सेवक यांच्या सेवाशर्ती राज्यपालाच्या पूर्वमान्यतेने त्या न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश किंवा त्याने प्राधिकृत केलेला अन्य न्यायाधीश वा अधिकारी निर्धारित करू शकतो. (३) उच्च न्यायालयाचे अधिकारी व सेवक यांचे वेतन, भत्ते व न्यायालयाचा संपूर्ण प्रशासकीय खर्च राज्याच्या एकत्रित निधीतून केला जातो. न्यायालयाचे उत्पन्न त्या निधीत जमा होते.

**६) अधिकाराचा विस्तार : कलम २३० नुसार** एखाद्या उच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राचा विस्तार करून त्यात केंद्रशासित प्रदेशाचा अंतर्भाव संसद कायद्याद्वारे करू शकते. तसेच एखाद्या केंद्रशासित प्रदेशाला उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रातून संसद वगळू शकते. **कलम २३१ नुसार** संसदेला कायद्याद्वारे दोन किंवा अधिक राज्यांसाठी अथवा दोन किंवा अधिक राज्ये व एखाद्या केंद्रशासित प्रदेश यांच्यासाठी एक सामाईक उच्च न्यायालय स्थापन करता येते. (महाराष्ट्र व गोवा या दोन राज्यांसाठी **मुंबई उच्च न्यायालय** हे एकच सामाईक न्यायालय आहे. आसाम, मणिपूर, मेघालय, नागालँड, त्रिपुरा, मिझोराम व अरुणाचल प्रदेश या राज्यांसाठी एक सामाईक **गुवाहटी उच्च न्यायालय** आहे. पंजाब व हरियाणासाठी **चंदीगढ** हे एकच उच्च न्यायालय आहे.)

**दुय्यम किंवा कनिष्ठ न्यायालये** (Subordinate Courts)

प्रत्येक राज्यात उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली जिल्हा व तालुका स्तरावर दुय्यम न्यायालये असतात. दुय्यम न्यायालयाचे अधिकार राज्याच्या कायदेमंडळास राज्यघटनेच्या आधीन राहून ठरविता येतात.

**जिल्हा व सत्र न्यायालय :** हे जिल्ह्यातील प्रमुख न्यायालय असते. त्यात दिवाणी व फौजदारी खटले चालतात. जेंव्हा न्यायाधीश दिवाणी खटले ऐकतो तेंव्हा त्यास जिल्हा न्यायाधीश म्हणतात व जेंव्हा तो फौजदारी खटले चालवितो तेंव्हा त्यास सत्र न्यायाधीश म्हणतात.

**नियुक्ती व पात्रता : कलम २३३ नुसार** राज्यपाल उच्च न्यायालयाच्या सल्ल्याने केंद्र व राज्य सरकारच्या सेवेत नसलेल्या आणि किमान सात वर्षे अधिवक्ता किंवा वकील म्हणून असलेल्या व्यक्तीची जिल्हा व सत्र न्यायाधीश म्हणून नियुक्ती करतो. याशिवाय काही जागा पदोन्नतीने (बढतीद्वारे) भरल्या जातात. **कलम २३४ नुसार** जिल्हा न्यायाधीशांहून वेगळ्या अशा व्यक्तींची राज्याच्या न्यायिक सेवेतील नियुक्ती राज्यपाल, लोकसेवा आयोग व उच्च न्यायालय यांच्या सल्ल्याने व त्याने स्वतः तयार केलेल्या नियमानुसार करतो.

**दुय्यम न्यायालयावरील नियंत्रण : कलम २३५ नुसार** जिल्हा न्यायालये व त्यांना दुय्यम असणारी न्यायालये यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार उच्च न्यायालयास आहे. राज्याच्या न्यायिक सेवेत असलेल्या व जिल्हा न्यायाधीशाच्या पदाहून कनिष्ठ पद धारण करणाऱ्या व्यक्तीचे पदस्थान, बढती, रजामंजुरी इ. बाबतचे नियंत्रण अधिकार उच्च न्यायालयासच आहेत.

**जिल्हा न्यायालयाचे अधिकार क्षेत्र :** जिल्हा न्यायालयात दिवाणी व फौजदारी खटले चालविण्यासाठी वेगवेगळी व्यवस्था असते.

**(अ) जिल्हा न्यायालयाचे दिवाणी वादाबाबतचे अधिकार क्षेत्र पुढीलप्रमाणे आहे :** जिल्हा न्यायालयास दिवाणी वादाबाबत प्रारंभिक अधिकार क्षेत्र असते. दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीशास 'जिल्हा न्यायाधीश'

म्हणतात. त्याच्या न्यायालयीन कामात मदत करण्यासाठी इतर न्यायाधीश असतात. त्यांना 'अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश' म्हणतात. ज्या जिल्ह्याचे क्षेत्रफळ मोठे असेल तेथे जिल्हा न्यायाधीशाच्या दर्जाचा एक सहन्यायाधीश असतो. जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश कनिष्ठ न्यायालयाकडून पुनर्निर्णयासाठी आलेले खटले ऐकतात. **दिवाणी न्यायालय – वरिष्ठ स्तर :** जिल्हा न्यायालयाच्या खालोखाल ''दिवाणी न्यायाधीश – वरिष्ठ स्तर'' यांचे न्यायालय असते. ह्या न्यायाधीशास आपल्या कनिष्ठांमध्ये कामाची विभागणी करण्याबाबतचा प्रशासकीय अधिकार असतो. ज्या दिवाणी दाव्याची किंमत २५,०००/– पेक्षा कमी नसेल ते दावे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर या न्यायालयात सुनावणीसाठी येतात. **दिवाणी न्यायालय – कनिष्ठ स्तर :** यांचे न्यायालय दिवाणी न्यायालय – वरिष्ठ स्तर यांच्या खालोखाल असते. हा न्यायाधीश न्यायशाखेच्या निम्न स्तरावर असतो. ज्या दाव्यांची किंमत रु. २५०००/– पर्यंत असेल असे खटले चालविण्याचा अधिकार हा न्यायाधीशास असतो.

**(ब) सत्र न्यायालय :** फौजदारी खटल्याबाबतचे न्यायालयाचे अधिकार क्षेत्र व अधिकार पद परंपरा पुढीलप्रमाणे आहे.

**(१) जिल्हा व सत्र न्यायालय :** या न्यायालयाच्या न्यायाधीशास सत्र न्यायाधीश म्हणतात. त्याच्या मदतीसाठी अतिरिक्त सत्र न्यायाधीश असतात. या न्यायाधीशांना कायद्यानुसार कोणतीही शिक्षा देण्याचा अधिकार असतो पण या न्यायालयाने दिलेली फाशीची शिक्षा उच्च न्यायालयाने कायम करणे आवश्यक असते.

**(२) मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय :** या न्यायालयास ''फाशी, जन्मठेप व सात वर्षापेक्षा अधिक बंदीवास'' या तीन शिक्षा सोडून कायद्यानुसार कोणतीही शिक्षा करण्याचा अधिकार असतो.

**(३) प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालय :** हे न्यायालय तीन वर्षापेक्षा कमी मुदतीच्या बंदीवासाची शिक्षा किंवा पाच हजार रुपयांपेक्षा कमी दंड किंवा या दोन्हीही शिक्षा देऊ शकते.

सिटी सिव्हिल अँड सेशन्स कोर्ट : राज्याच्या राजधानीतील दुय्यम न्यायालयास 'सिटी सिव्हिल अँड सेशन्स कोर्टस'' म्हणतात. महाराष्ट्रात ते मुंबईत आहे. या न्यायालयाचे कामकाज जिल्हा न्यायाधीशाच्या दर्जाचा न्यायाधीश पाहातो. यात रु. ५०,०००/– किंमतीपर्यंतचे दावे ऐकता येतात. याशिवाय महानगर न्यायदंडाधिकारी असतात. त्यांच्याकडे फौजदारी खटल्यांचे काम असते. महानगरातील प्रमुख न्यायालयास ''प्रमुख महानगर न्यायदंडाधिकाऱ्यांचे न्यायालय'' असे म्हणतात. ते मुंबईत आहे.

**लघुवाद न्यायालये :** महाराष्ट्रात मुंबई, पुणे व नागपूर येथे ही न्यायालये असून त्यात रु. १०,०००/– पेक्षा कमी किंमतीचे दावे ऐकतात.

**★ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न क्रमांक ३**

**योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश ................ वर्षे पूर्ण झाल्यावर निवृत्त होतात.

अ) ५८ ब) ६० क) ६२ ड) ६५

२) सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाची नेमणूक ................ करतात.

अ) राष्ट्रपती ब) राज्यपाल क) प्रधानमंत्री ड) उपराष्ट्रपती

३) उच्च न्यायालयाचे न्यायाधीश .................. कडे राजीनामा देतात.

अ) राज्यपाल ब) मुख्यमंत्री क) प्रधानमंत्री ड) राष्ट्रपती

४) मुंबई उच्च न्यायालय हे महाराष्ट्र व .............. या दोन राज्यांसाठी सामाईक आहे.

अ) कर्नाटक ब) केरळ क) गोवा ड) छत्तीसगढ

५) .................. स्तरावर दुय्यम न्यायालये असतात.

अ) केंद्र ब) राज्य क) स्थानिक ड) जिल्हा व तालुका

## ४.३ सारांश

या घटकात तुम्ही पोलीस व न्याय या दोन व्यवस्थांचा अभ्यास केलेला आहे. सर्वप्रथम तुम्ही भारतातील पोलीस व्यवस्थेचा इतिहास समजावून घेतलेला आहे. प्राचीन काळात नगरात नागरीक नावाचा तर खेड्यात ग्रामीणी नावाचा अधिकारी शांतता व सुव्यवस्था ठेवण्याचे काम करीत असे. मध्ययुगात पोलिसाची कार्ये जमीनदारवर्गाकडे सोपविली गेली. पुढे प्रत्येक प्रांतात सुभे (उपविभाग) पाडून प्रत्येक सुभ्यावर फौजदार हा अधिकारी नेमला. शहरात 'नागरीक' या अधिकाऱ्याच्या जागी 'कोतवाल' हा अधिकारी नेमला. ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीत जमीनदाराचे अधिकार काढून घेऊन स्वतंत्र पोलीस दल उभारले. प्रथम जिल्हा न्यायाधीशाकडे व नंतर महसूल अधिकाऱ्यांकडे पोलीस दलावर देखरेख ठेवण्याचे काम सोपविले. पुढे इंग्लंडच्या राणीच्या राजवटीत १८६० मध्ये भारतासाठी पोलीस आयोग नेमला. भारतीय दंडसंहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, पुरावा अधिनियम, पोलीस अधिनियम याविषयीचे कायदे संमत केले. सर्व प्रांतात पोलीस महानिरीक्षक नेमले. स्वातंत्र्यानंतर कायदा व सुव्यवस्था हा विषय राज्य सरकारकडे सोपविला व प्रत्येक राज्यात स्वतंत्र पोलीस दल (यंत्रणा) उभारले. अखिल भारतीय पोलीस सेवा, राज्य पोलीस सेवा यांमध्ये लोकसेवा आयोगामार्फत स्पर्धा परीक्षा घेऊन पोलीस अधिकाऱ्यांची पदे भरली जाऊ लागली. यानंतर तुम्ही गुन्हे नियंत्रणात पोलिसाची असलेली भूमिका समजावून घेतली आहे. गुन्हेगारीस प्रतिबंध करणे, गुन्हेगारावर कायदेशीर कारवाई करणे, प्रासंगिक कार्ये पार पाडणे इत्यादी कार्यांचा पोलिसांच्या भूमिकेत समावेश होतो. पोलिसांना आपली भूमिका पार पाडण्यासाठी विशिष्ट नियमावलीचे पालन करावे लागते. पोलिसाच्या भूमिकेवर प्रभाव टाकणारे विविध घटक कोणते आहेत हे ही तुम्ही अभ्यासलेले आहे. सर्वात शेवटी तुम्ही भारतातील सर्वोच्च, उच्च व दुय्यम न्यायालय यांची रचना व कार्ये अभ्यासलेली आहेत.

## ४.४ स्मरणार्थ संज्ञा

- **गुन्हा :** कायद्याचे उल्लंघन करणारे कृत्य.
- **आरोपी :** कायद्याचे उल्लंघन केले आहे असा आरोप जिच्यावर ठेवला जातो ती व्यक्ती.
- **जमीनदार :** शेकडो एकर शेतजमिनीवर मालकी असणारी व्यक्ती.

- **महसूल अधिकारी :** शेतसारा वसूल करणारा अधिकारी.
- **निर्दालन :** दमन करणे, नाश करणे.
- **पदच्यूती :** पदावरून काढून टाकणे, बडतर्फ करणे.
- **हेबियस कॉर्पस :** अटकेत किंवा बंदीत ठेवलेल्या व्यक्तीस न्यायालयापुढे हजर करण्यास सांगणारा आदेश.
- **मँडॅमस :** सर्वोच्च व उच्च न्यायालयाने सरकार, अधिकारी, कनिष्ठ न्यायालय यांना आदेशाप्रमाणे कृती करावी असा आदेश देणे.
- **प्रोहिबिशन :** कनिष्ठ न्यायालयाने अधिकार कक्षा ओलांडून एखाद्या प्रकरणाचा (खटल्याचा) विचार करू नये असा उच्च व सर्वोच्च न्यायालयाचा आदेश.
- **को वारंटो :** अधिकार नसताना एखाद्या व्यक्तीने एखादे अधिकार पद धारण केल्यास ते सोडावयास लावणारा आदेश.
- **सर्शिओरारी :** कनिष्ठ न्यायालयापुढील खटल्याची कागदपत्रे व पुरावे उच्च न्यायालयाने स्वतःकडे मागविण्यासाठी दिलेला आदेश.

## ४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

★ **स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक १ ची उत्तरे**

१) ड  २) ब  ३) अ  ४) अ  ५) ब

★ **स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक २ ची उत्तरे**

१) ब  २) ड  ३) क  ४) क  ५) अ

★ **स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक ३ ची उत्तरे**

१) ड  २) अ  ३) ड  ४) क  ५) ड

## ४.६ स्वाध्याय

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) भारतातील पोलीस व्यवस्थेचा इतिहास स्पष्ट करा.

२) गुन्हे नियंत्रणातील पोलिसाची भूमिका विशद करा.

३) सर्वोच्च न्यायालयाची रचना व कार्ये स्पष्ट करा.

४) उच्च न्यायालयाची रचना व कार्ये स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१) ब्रिटिश राजवटीतील पोलीस व्यवस्था

२) पोलिसाची कार्ये

३) उच्च न्यायालय

४) दुय्यम न्यायालये

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


- मराठी विश्वकोश
  - माणिक माने - गुन्हेगारीशास्त्र - फडके प्रकाशन, कोल्हापूर
  - चंद्रकांत खंडागळे : सामान्यज्ञान - प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.


❑❑❑